४२ वा वर्धापन दिन

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २५४ | पाने १२+८+८+८+४ | किंमत रु. ८/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



CMYK

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६ | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. | dainiktarunbharat.com

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



हिंदू समाजाच्या संघटनेच्या परिकल्पनेत सर्वांगीण सामाजिक परिवर्तन अभिप्रेत आहे. अशा प्रकारच्या परिवर्तनासाठी, आपल्या शाखांचा विस्तार, कार्यक्रमांची रचना, कार्यकर्त्यांची मानसिक सिद्धता इ. गोष्टींची गरज आहे. या सर्व दिशांनी आपल्या सर्वांचे प्रयत्न झाले पाहिजेत.

**स्व. हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात संथ व्यवहार

**मुंबई** : सोमवारी भारतीय शेअर बाजारात कमालीची चढ-उतार पाहायला मिळाली. दिवसाच्या अखेरीस मुख्य निर्देशांक जवळपास स्थिर पातळीवर बंद झाले. गुंतवणूकदारांनी सावध पवित्रा घेतल्यामुळे बाजाराला मिळालेली सुरुवातीची वाढ शेवटपर्यंत टिकवता आली नाही. दिवसभरात सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही निर्देशांकांमध्ये सतत चढ-उतार होत राहिले. व्यवहाराच्या अखेरीस सेन्सेक्स ४३.२७ अंकांनी म्हणजेच ०.०६ टक्क्यांनी वाढून ७८,५४२.४४ च्या पातळीवर बंद झाला. तर निफ्टी १३.१५ अंकांनी म्हणजेच ०.०५ टक्क्यांनी वधारून २४,५८३.८० वर स्थिरावला. व्यवहारादरम्यान निफ्टीने २४,६२०.९५ या उच्चांकी पातळीला स्पर्श केला, तर सेन्सेक्सने ७८,६७६.९८ पर्यंत मजल मारली होती.

### आज भव्य तिरंगा रॅली; मुख्यमंत्र्यांची उपस्थिती

**पुणे** : स्वातंत्र्यदिनाच्या पृष्ठभूमीवर तिरंगा यात्रा गौरव समितीच्या वतीने उद्या ११ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता हर घर तिरंगा अभियान भव्य तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ही तिरंगा रॅली पार पडणार आहे. शिवाजीनगरातील पोलिस परेड ग्राऊंडजवळ असलेल्या ललित महाल हॉटेल परिसरातून तिरंगा रॅलीची सुरुवात होणार आहे.

### खासदार विलीनीकरण; सुनावणी तहकूब

**लोकसभा अध्यक्षांच्या निर्णयाला आव्हान**

**नवी दिल्ली, १० ऑगस्ट**

उबाठा गटाच्या सहा खासदारांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेतील विलीनीकरणास लोकसभा अध्यक्षांनी दिलेल्या मंजुरीला आव्हान देणाऱ्या याचिकेवरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दोन आठवड्यांसाठी तहकूब केली.

उबाठा गटाचे नेते अरविंद सावंत यांनी दाखल केलेल्या याचिकेवर जारी करण्यात आलेली नोटीस लोकसभा अध्यक्षांचे कार्यालय आणि इतरांना अद्याप बजावण्यात आलेली नाही, याची नोंद न्या. पी. एस. नरसिंहा आणि न्या. आलोक आराधे यांच्या न्यायासनाने घेतली. न्यायालयाने अंतरिम दिलासा देण्याबाबत विचार करणे आवश्यक आहे, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ट विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी केला.

याचे गंभीर परिणाम होतात. अपात्रतेच्या अर्जावर केवळ बचावाचा मुद्दा विचारात घेऊनच अध्यक्ष निर्णय घेऊ शकतात. त्यांना कोणतेही अमर्याद अधिकार नाहीत, असे सिब्बल यांनी सांगितले. या मुद्यावर दोन आठवड्यांनी सुनावणी केली जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाने यावर स्पष्ट केले. पावसाळी अधिवेशनापूर्वी १८ जुलै रोजी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी उबाठा गटाच्या सहा खासदारांच्या शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत विलीनीकरणास मान्यता दिली. सहा खासदारांच्या विलीनीकरणासह शिवसेनेचे लोकसभेतील संख्याबळ १३ झाले आहे आहे. उबाठाच्या तिकिटावर एकूण नऊ खासदार निवडून आले होते. त्यापैकी सहा जण शिंदे यांच्या शिवसेनेत सहभागी झाले आहेत. (वृत्तसंस्था)

# झारखंडमध्ये जेन-झींचा आक्रोश

## विधानसभेवर धडक; रात्री विद्यार्थ्यांवर दुसऱ्यांदा लाठीमार

**रांची, १० ऑगस्ट**

राज्य परीक्षांमधील कथित अनियमिततेच्या मुद्यावरून सुरू झालेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने सोमवारी उग्र रूप धारण केले आहे. सोरेन सरकार मागण्या मान्य करीत नसल्याचे पाहून संतप्त झालेल्या जन-झेंनी थेट झारखंड विधानसभेवर धडक दिली. विधानसभेच्या द्वारावर पोहचलेल्या युवकांना पांगविण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. तसेच अश्रूधूराचे गोळे सोडले. यामध्ये अनेक विद्यार्थी जखमी झाले. रात्री साडेवाजता पुन्हा लाठीमार केल्याने परिस्थिती आणखीनच स्फोटक झाली.

विद्यार्थ्यांचा राग कमी करण्यासाठी तसेच अनियमिततेबाबत सुरू असलेल्या तपासाचा भाग म्हणून झारखंड लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष एल. खियांगते यांना अटक करण्यात आली. ते झारखंडचे माजी सचिव तसेच १९९७ च्या तुकडीचे आयएएस अधिकारी आहेत. २ जुलै रोजी जेपीएससीने १४ व्या संयुक्त नागरी परीक्षेचे प्राथमिक निकाल जाहीर केले. जवळपास साडेतीन लाख उमेदवारांनी ही परीक्षा दिली होती.

या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून राज्यात निदर्शने सुरू आहेत. सोमवारी सकाळी सात ते आठ या वेळेत प्रामुख्याने विद्यार्थी आणि नोकरीच्या शोधातील तरुण झारखंडच्या विविध भागांतून येऊन रांचीतील जुन्या विधानसभेच्या ठिकाणी जमू लागले. जुन्या विधानसभा इमारतीपासून नवीन इमारतीपर्यंत मोर्चा काढण्याचे नियोजन होते. या नवीन इमारतीत सध्या पावसाळी अधिवेशन सुरू आहे.

मोर्चा सुरू होईपर्यंत १० हजारांपेक्षा मोठी गर्दी झाली होती. हातात फलक, तिरंगा आणि स्वातंत्र्यसैनिक भगतसिंग, जेएमएमचे संस्थापक शिबू सोरेन तसेच राजकारणी व कार्यकर्ते निर्मल महतो याचे पोस्टर्स घेऊन आंदोलकांनी आपल्या नियोजित स्थळाकडे कूच करण्यास सुरुवात केली. सुमारे दोन किमी चालत गेल्यावर आंदोलक पोलिसांच्या पहिल्या बॅरिकेड्सपर्यंत पोहोचले. तिथे थोडा वेळ थांबून घोषणाबाजी सुरू असतानाच अनेक दिवसांपासून उपोषणावर असलेले नेते देवेंद्र महतो यांची प्रतीक्षा करीत होते. त्यांना स्ट्रेचरवरून तिथे आणण्यात आले. निदर्शकांनी पहिला अडथळा (बॅरिकेड्स) तोडण्याचा प्रयत्न सुरू केला, तेव्हा पोलिसांनी वॉटर कॅननचा वापर केला. निदर्शक २००-३०० मीटर पुढे सरकल्यावर त्यांना दुसरा अडथळा लागला. तिथे सुमारे दीड तासानंतर निदर्शकांनी दुसरा अडथळाही ओलांडला. त्यांनी तिसरा अडथळा तसेच अंतिम थराच्या दिशेने कूच केली. तोपर्यंत सुरक्षा व्यवस्था अधिक कडक झाली होती. (वृत्तसंस्था)





राज्य परीक्षेतील गैरव्यवहारांवरून झारखंडमध्ये विद्यार्थ्यांचे आंदोलन पेटले आहे. सोमवारी हजारो आंदोलकांनी रांचीतील विधानसभेवर धडक दिली

### बळाचा वापर करण्याचा विचार केला नव्हता : पोलिस अधिकारी

**सुरुवातीला पोलिसांचा बळाचा वापर करण्याचा कोणताही विचार नव्हता. परंतु जमावाला मुद्दाम चिथावणी देणाऱ्या काही व्यक्तींमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे सुरक्षेच्या कारणास्तव कारवाई करावी लागली, असे पोलिस अधीक्षक अजय आर्यन यांनी सांगितले. आंदोलकांनी बॅरिकेड्स तोडून पुढे जाण्यासाठी हिंसक प्रयत्न केल्यामुळे आम्हाला लाठीचार्ज करावा लागला. बळाचा वापर न करण्याच्या सूचना आम्हाला देण्यात आल्या होत्या.**

# झोपेत सर्पदंश

## तीन विद्यार्थिनींचा मृत्यू

**गडचिरोली जिल्ह्यातील घटना** | **आश्रमशाळेतील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**



**गडचिरोली, १० ऑगस्ट**

जिल्ह्यातील धानोरा तालुक्यात जपतलाई येथील आश्रमशाळेत जमिनीवर झोपलेल्या तीन विद्यार्थिनींना मध्यरात्री अडीच वाजताच्या सुमारास विषारी सापाने दंश केला. यामध्ये तीन मुलींचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. विशेष म्हणजे ही शाळा अनुदानित असून विद्यार्थिनी खाट उपलब्ध नसल्याने मुली जमिनीवरच झोपल्या होत्या. तीन मुलींवर उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर संताप व्यक्त केला जात असून आश्रमशाळांतील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.गडचिरोली जिल्हा घनदाट जंगलासाठी ओळखळा जातो. धानोरा तहसीलमधील जपतलाई गावसुद्धा जंगलाने वेढलेले आहे. त्यामुळे वन्य आणि सरपटणाऱ्या प्राण्यांचा सतत वावर असतो. सध्या पावसाळा सुरू असल्याने साप निघण्याचे प्रमाण वाढते. आदिवासी दिनाच्या मध्यरात्रीच

जपतलाई येथील आश्रमशाळेत रात्री झोपलेल्या विद्यार्थिनींना विषारी सापाने दंश केल्याने जीव गमवावा लागला. सर्पदंशानंतर शाळेच्या मुख्याध्यापक व कर्मचाऱ्यांनी तातडीने विद्यार्थिनींना धानोरा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र उपचारादरम्यान दोन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला, तर गंभीर अवस्थेतील एका विद्यार्थिनीला पुढील उपचारासाठी गडचिरोली येथे हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान तिचाही मृत्यू झाला. तर तीन विद्यार्थिनींवर उपचार सुरु आहेत.

### विद्यार्थिनीला हेलिकॉप्टरने नागपूरला हलविले

एका विद्यार्थिनीची प्रकृती गंभीर असल्याने जिल्हा प्रशासन व गडचिरोली पोलिस दलाच्या समन्वयातून तिला हेलिकॉप्टरने नागपूर येथील जी.एम.सी. रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. सर्पदंशाच्या घटनांपासून सावध राहून अंधश्रद्धेला बळी न पडता तत्काळ वैद्यकीय उपचार घ्यावेत, असे आवाहन पोलिस अधीक्षक एम. रमेश यांनी केले.

दीपिका एकनाथ लाकडा(वय १२), सुष्मिता सरोजित मंडल(वय १४) आणि अनु गजुराम कोरोटी(वय ७),अशी मुलींची नावे आहेत. तर समृद्धी सुरेश नैताम(वय १४) हिला हेलिकॉप्टरने उपचारासाठी नागपूरला हलविले आहे तर दीपिका बटुकराम मडावी(वय १२) हिच्यावर गडचिरोली येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. विद्यार्थिनींच्या उपचारात कोणतीही कमतरता राहू नये, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी या दुर्दैवी घटनेबद्दल शोक व्यक्त करून मृत विद्यार्थिनींच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत.

**विद्यार्थिनींच्या मृत्यूची उच्चस्तरीय चौकशी**

विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याच्या घटनेची प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक व नागपूर येथील पथके आज घटनास्थळी दाखल होणार आहेत. आश्रमशाळेतील विद्यार्थिनींच्या सुरक्षाव्यवस्थेची सखोल तपासणी करून निष्काळजीपणा किंवा सुरक्षाविषयक त्रुटी आढळल्यास जबाबदारी निश्चित करून दोषींवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. (तभा वृत्तसेवा)

# विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर चर्चेची सरकारची तयारी

**अमित शाह यांचे उत्तर विरोधकांनी ऐकावे : किरेन रिजिजू**

**नवी दिल्ली, १० ऑगस्ट**

विद्यार्थ्यांचे आंदोलन आणि पोलिसांचा लाठीहल्ला यासह सर्व मुद्यावर संसदेत चर्चा करण्याची सरकारची तयारी असून या चर्चेला गृहमंत्री अमित शाह उत्तर देतील, असा निर्वाळा सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सोमवारी दिला.





गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात येऊन विद्यार्थ्यांचे आंदोलन आणि पोलिसांचा लाठीहल्ला या मुद्यावर निवेदन करावे, अशी मागणी विरोधकांनी दोन आठवड्यांपासून लावून धरली आहे.

या मागणीसाठी संसदेच्या दोन्ही सभागृहात गदारोळ सुरू असून त्याची परिणती दररोज कामकाज स्थगितीत होत आहे. या मुद्यावर एका वृत्तसंस्थेशी बोलतांना सरकारची भूमिका स्पष्ट करतांना किरेन रिजिजू म्हणाले की, जेव्हा गृहमंत्री चर्चेला उत्तर देतील, तेव्हा विरोधकांनी सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे. गदारोळ करुन सभागृहाच्या कामकाजात अडथळा आणू नये. जेव्हा सभागृहात चर्चा होईल आणि या चर्चेला गृहमंत्री अमित शाह उत्तर देतील, तेव्हा सभागृहाचे कामकाज शांततेत चालू द्यावे आणि सभागृहातून पळ न काढता त्यांचे उत्तर ऐकावे. (तभा वृत्तसेवा)

# राम मंदिराच्या 'सीईओ' पदासाठी आज मुलाखती

**प्रशासकीय अनुभव असलेल्यांना प्राधान्य**

**अयोध्या, १० ऑगस्ट**

श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदाच्या (सीईओ) मुलाखतीसाठी २८ उमेदवारांची यादी तयार करण्यात आली आहे, अशी माहिती मंदिराच्या सूत्रांनी सोमवारी दिली. या पदासाठी सोमवारी आणि मंगळवारी राम मंदिर परिसरात मुलाखती घेतल्या जातील.

या पदासाठी ५,३०० उमेदवारांपेक्षा जास्त लोकांनी अर्ज केला होता. छाननी समितीने त्यापैकी १८ जणांची निवड मुलाखतीसाठी केली आहे. प्रशासकीय अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल, असे सूत्रांनी सांगितले. उमेदवारांची मुलाखत माजी न्या. प्रमोद कोहली, सेवानिवृत्त लेफ्टनंट जनरल विष्णुकुमार चतुर्वेदी आणि वैज्ञानिक तसेत शिर्डीत साईबाबा ट्रस्टचे माजी अध्यक्ष सुरेश हावरे यांचा समावेश असलेली समिती घेईल.

उमेदवारांसाठी निकष

राम मंदिराचे कामकाज आणि व्यवस्थापनावर देखरेख करणे, ही मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची प्राथमिक जबाबदारी असेल. निवडलेला उमेदवार हा हिंदू असावा आणि त्याला हिंदू परंपरा आणि मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल. उमेदवार शुद्ध शाकाहारी आणि निर्व्यसनी असावा. या पदासाठी वयोमर्यादा ५० ते ७० वर्षे निश्चित करण्यात आली आहे, असे सूत्रांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



संपादकीय पान ४ वर

# आमदाराला गोळी घाल, पैसे देतो!

**धक्कादायक प्रकार; आमदार कल्याणशेट्टी यांच्या चालकाला दिली त्यांच्या हत्येची सुपारी**

**तडीपारासह दोघांवर गुन्हा; एकाची पोलिस कोठडीत रवानगी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या चालकाला पैशांचे आमिष दाखवून त्यांची गोळी झाडून हत्या करण्यासाठी चिथावणी देण्याचा धक्कादायक प्रकार सोलापुरात घडला. या प्रकरणी सदर बझार पोलीस ठाण्यात एका तडीपारसह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महावीर चौकातील प्युमा शोरुम समोर हा प्रकार घडला. तडीपार श्रीशैल हुळ्ळे आणि त्याचा चालक प्रभाकर फुलारी अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत आमदार कल्याणशेट्टी यांचे चालक आनंद सुरवसे (वय ३०, रा. मोट्याळ, ता. अक्कलकोट) यांनी फिर्याद दिली आहे.

यातील फिर्यादी हे १५ दिवसापासून आ. कल्याणशेट्टी यांच्याकडे चालक म्हणून कार्यरत आहेत. ते ७ ऑगस्ट रोजी दुपारी पावणे चार वाजता आमदारांच्या पत्नी आणि मुलाला घेऊन महावीर चौकातील प्युमा शोरूमजवळ कारमधून आले होते. आमदारांचे कुटुंबीय शोरूममध्ये गेल्यानंतर चालक वाहनाबाहेर थांबला होता. त्यावेळी पांढरा शर्ट घातलेल्या श्रीशैल हुळ्ळे आणि त्याच्यासोबत फुलारी हे दोघे सुरवसे यांच्याजवळ आले. त्यांनी चालकाला 'तुला पैसे देतो, तुझ्या दादा आमदाराला गोळी घालून मार, पुढचे मी बघून घेतो,' असे सांगून चिथावणी दिली.

घाबरलेल्या चालकाने ही बाब आमदारांचे बंधू मिलन कल्याणशेट्टी यांना सांगितली. त्यानंतर शोरूम परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता संशयितांची ओळख पटली. आमदारांच्या जीवितास धोका निर्माण करण्याच्या उद्देशाने हे कृत्य केल्याचे स्पष्ट झाल्याने सुरवसे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आरोपी फुलारी यास सोमवारी अटक केली असून दोन दिवसाची कोठडी मिळाली आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक राहुल सावंत हे करत आहेत.

# 'सोलापूर तरुण भारत'चा वर्धापन दिन कार्यक्रम आज

- दै.तरुण भारतद्वारा ४२ वर्षांची वाचकसेवा
- विविध क्षेत्रातील मान्यवरांची मांदियाळी





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० ऑगस्ट-**

राष्ट्रीय विचाराचे दैनिक म्हणून सर्वदूर परिचित असलेले आणि सोलापूरसह धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर, सातारा येथून एकाच वेळी वितरित होणाऱ्या दै.'सोलापूर तरुण भारत'च्या वतीने मंगळवार, दि.११ ऑगस्ट २०२६ रोजी ४२ व्या वर्धापन दिनोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

होटगी रोडस्थित दैनिक तरुण भारत प्रेसच्या पाठीमागे असलेल्या दि सोलापूर इंडस्ट्रियल को-ऑप इस्टेट सोसायटी फंक्शन हॉल येथे सायंकाळी ६ ते रात्री ९ यावेळेत आयोजित केलेल्या या कार्यक्रमातंर्गत 'दैनिक तरुण भारत'च्या ४२ वर्षांच्या वाचकसेवेचा आणि प्रिंटींग क्षेत्रात नावलौकिक मिळविलेल्या 'प्रिसिजन प्रिंटस्'च्या ग्राहकसेवेचा गौरव करण्यात येणार आहे.

सोलापूर तरुण भारत न मे कर्मफले स्पृहा

याप्रसंगी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक, क्रीडा अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांची मांदियाळी राहणार आहे. या कार्यक्रमास वाचक, जाहीरातदार, विक्रेते आणि सोलापूरकर मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन सोलापूर तरुण भारत मिडिया लिमिटेडचे अध्यक्ष तथा निरुपणकार विवेक घळसासी, मुख्य समूह संपादक दिलीप यशवंत पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने यांनी केले आहे.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर | मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर **तरुण भारत**

आजच्या अंकासोबत २८ पानी वर्धापन दिन विशेष पुरवणी देत आहोत.



## श्रीक्षेत्र भीमाशंकर आता पूर्णवेळ खुले

**घोडेगाव** - आगामी श्रावण महिन्याच्या पृष्ठभूमीवर श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिर पूर्णवेळ खुले ठेवण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. येत्या १३ ऑगस्टपासून मंदिर भाविकांसाठी सकाळी ५ ते रात्री ९:३० वाजेपर्यंत खुले राहणार असून पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या श्रावणी सोमवार यात्रा नियोजन बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. श्री क्षेत्र भीमाशंकर परिसर विकास आराखड्या अंतर्गत सभामंडप व पायरी मार्गाचे काम सुरू असल्याने दर्शन सकाळी ७ ते ११ पर्यंत सुरू ठेवण्यात आले होते. मात्र, सध्या काम बंद असून १३ ऑगस्टपासून श्रावण महिना सुरू होत असल्याने भाविकांची मोठी गर्दी होणार आहे. यामुळे हा निर्णय घेण्यात आला.












## अग्रलेख

# इतिहासाचे अवजड ओझे!

महाराष्ट्राच्या भूमीला इतिहासाने जितके समृद्ध केले आहे, तितकीच त्या इतिहासाच्या खुणा जपण्याची जबाबदारी महाराष्ट्रावर टाकली आहे. सह्याद्रीच्या कडेकपारीत उभे असलेले गड-किल्ले, अजिंठा-वेरूळच्या लेण्या, प्राचीन मंदिरे, इतिहासकालीन वाडे, किनारपट्टीवरील जलदुर्ग, जुन्या घाटवाटा, बारवा आणि कोकणातील कातळचित्रे हे केवळ भूतकाळाचे भग्नावशेष नाहीत. त्यांचे अवशेषांच्या रूपात जतन करणे हा वारसा जपण्याचा मार्गदेखील आहे. कारण, महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्मृतींचे ते जिवंत दस्तावेज आहेत. आता मात्र, या दस्तावेजांची पाने हळूहळू जीर्ण होत आहेत आणि त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्राच्या गड-किल्ल्यांना, ऐतिहासिक स्थळांना जागतिक मान्यता मिळत असताना त्यांच्या संवर्धनाची जबाबदारी अधिकच वाढली आहे. दगडादगडातून इतिहास सांगणाऱ्या या वारशाकडे केवळ पर्यटनाच्या चौकटीत न पाहता शास्त्रीय संवर्धन, सातत्यपूर्ण देखभाल आणि स्थानिक समाजाच्या सहभागाची गरज आहे. महाराष्ट्राच्या किल्ल्यांना अलिकडे जागतिक पातळीवर मोठी मान्यता मिळाली. अनेक वारसा वास्तूंचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाला, तेव्हा उभ्या महाराष्ट्राने अक्षरशः आनंदोत्सव साजरा केला. पण हा दर्जा सातत्यपूर्ण नसतो. तो टिकवून ठेवण्यासाठी या स्थळांचे निगुतीने जतन करावे लागते. त्यामुळे, ज्या अभिमानास्पद वारशाला जगाने मान्यता दिली, त्याचे जतन आपण किती गांभीर्याने करतो याचा विचार सतत करत राहावा लागेल. हजारो वर्षांच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा सचित्र आणि जिवंत वारसा म्हणून ज्याकडे पाहिले जाते, त्या अजिंठा लेण्यातील अनेक गुंफा आज अस्तित्वाचा संघर्ष करत आहेत. हजारो वर्षे पाऊसपाणी आणि अनुकूल प्रतिकूल वातावरणाशी जुळवून घेत तेथील प्राचीन चित्रकलेचा उत्कृष्ट वारसा जिवंत राहण्याचा संघर्ष करत आहे. अशा अनेक वारसा स्थळांचा इतिहास आता केवळ महाराष्ट्राचा किंवा भारताचा विषय राहिलेला नाही. ही केवळ जागतिक पर्यटकांची आकर्षण केंद्रेही नाहीत, तर ती जागतिक वारशाचा भाग आहेत. त्यामुळे, तो वारसा जपण्याची जबाबदारी केवळ आपल्या संस्कृतीने नव्हे, तर संपूर्ण जगाने आपल्या खांद्यावर सोपविली आहे, याची जाणीव जिवंत राहावयास हवी. अजिंठा लेण्यातील अनेक पुरातन चित्रे आज पावसाच्या गळतीपुढे अस्तित्वाच्या उंबरठ्यावर उभी राहिल्याची भीती व्यक्त होत असल्याने, एकूणच, संस्कृती आणि वारशाचा उदोउदो करत इतिहासाचे अभिमानास्पद पोवाडे गाणाऱ्या महाराष्ट्राच्या कसोटीचा काळ सुरू झाला आहे. वारसा स्थळांची दुरवस्था ही महाराष्ट्रासाठी नवी बाब नाही. किल्ल्यांच्या तटबंदीवर वाढलेली झाडे, वारावादळाने व पावसाने ढासळलेल्या भिंती, मोडकळीस आलेले दरवाजे, दुर्लक्षित पाण्याच्या टाक्या, अस्वच्छ परिसर, ऐतिहासिक वास्तूंच्या भिंतीवरील आधुनिक प्रतिभावंत, प्रदूषणकारी प्लास्टिकचा कचरा आणि अतिक्रमणांचा विनाशकारी विळखा हे चित्र अनेक ठिकाणी दिसते. काही ऐतिहासिक ठिकाणी पर्यटकांची गर्दी वाढते आहे; पण त्या तुलनेत सुविधांचा विकास झालेला नाही. पर्यटक वाढणे ही चांगली गोष्ट आहे; पण त्या पर्यटकांच्या गर्दीमुळे स्थळाचीच झीज होत असेल तर पर्यटनाचा अर्थ नव्याने विचारात घ्यावा लागेल. मुळात, ऐतिहासिक स्थळांचे जतन करण्याबाबतच्या समजुतीतच काही संभ्रम दिसतो, हे वास्तव लक्षात घ्यावयास हवे. आज 'संवर्धन'च्या नावाखाली जे काही केले जाते, ते प्रत्यक्षात केवळ 'सुशोभीकरण' वाटावे अशीच स्थिती दिसते. ऐतिहासिक वास्तूंवर सिमेंटचे थर चढविणे, नव्या फरशा बसविणे, रंगरंगोटी करणे आणि परिसरात सिमेंटच्या इमारती उभारून त्यांचा व्यावसायिक वापर करणे ही आजकालची संवर्धनाची संकल्पना रूढ होत चालल्याने, ऐतिहासिक वारसा स्थळांची नव्या बदलाच्या माऱ्यात घुसमट होत चालली आहे. त्यामुळे, वारसा संवर्धनाची पद्धत बदलण्याची गरज आहे. केवळ अर्थसंकल्पात एखाद्या ऐतिहासिक स्थळाच्या संवर्धनासाठी मोठी आर्थिक तरतूद केल्यानंतरही एखाद्या स्थळाची उपेक्षा कायम राहत असेल, तर शाश्वत संवर्धन शक्य नाही. ही जबाबदारी केवळ सरकारी यंत्रणांची नाही. त्यासाठी समाजाचा सहभागही गरजेचा असतो.

अजिंठा लेण्याची अवस्था पाहता, आता केवळ 'वारसा वास्तू वाचवा' एवढ्या भावनिक घोषणा पुरेशा नाहीत. आता वारसा व्यवस्थापनाची व्यापक संकल्पना स्वीकारणे गरजेचे आहे. कारण, त्या परिसराचे सांस्कृतिक जीवन हादेखील त्या वारशाचा अविभाज्य भाग असते. इतिहासाची पुनरावृत्ती करता येणार नसेल, तर इतिहासाचे जतन तरी करावेच लागेल. त्यामध्ये कोणतीही कसूर झाली तर ती इतिहासाशी प्रतारणा ठरते. आपण अमाप उत्साहात वारशाचे उत्सव साजरे करतो, गडकोटांवर सोहळे साजरे करतो, ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या स्मृती जागवतो, भव्य कार्यक्रम करतो, पण ते सोहळे संपल्यानंतर त्या वास्तू पुन्हा अस्तित्वाचा संघर्ष करत राहतात. हा संघर्ष त्यांना प्रामाणिक साथ दिली नाही, तर इतिहासाचे उदात्तीकरण होत असतानाही, इतिहासाचे प्रत्यक्ष पुरावे मात्र ढासळत राहतील. त्यामुळे वारशाचे 'राजकारण' न होता 'व्यवस्थापन' हवे. सुशोभीकरण न करता, शास्त्रीय संवर्धन हवे आणि त्यासाठी केवळ सरकारकडे बोट न दाखविता सामाजिक सहभागाचे भानही हवे. विकासाच्या वेगात वारसा चिरडला जाऊ नये आणि वारशाच्या नावाखाली विकास रोखलाही जाऊ नये. दोन्हींचा समतोल साधणे हेच खरे आव्हान आहे.

'विकास भी, विरासत भी' हा आधुनिक भारताचा दृष्टिकोन आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२४ मध्ये जागतिक वारसा समितीच्या अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी सांगितले होते. २०२६ मध्येही या संकल्पनेचा पुनरुच्चार झाला. विकास हवा, आधुनिक पायाभूत सुविधा हव्यात, महामार्ग हवेत, रेल्वे, विमानतळ, शहरे, उद्योग आणि रोजगार हवा; पण हे सर्व उभारताना हजारो वर्षांच्या इतिहासाच्या खुणा नष्ट होता कामा नयेत, एवढेच या संकल्पनेचे साधे तत्त्व आहे. विकास आणि वारसा हे परस्परविरोधी आहेत, अशी धारणा काही दशकांपूर्वी अधिक प्रबळ होती. आज जगातील अनेक देश या धारणेतून बाहेर पडत आहेत. आधुनिकता आणि इतिहास एकत्र नांदू शकतात, हे अनेक उदाहरणांनी सिद्ध केले आहे. भारतासाठी 'विकास' आणि 'विरासत' यांची सांगड घालण्याचे आव्हान खडतर आहे. पण ते पेलणे अशक्यदेखील नाही. वारसा जतन करण्यासाठी विकास रोखण्याची गरज नाही, उलट सांस्कृतिक वारशाचे जतन ही आर्थिक वाढ आणि विविधीकरणाचा महत्त्वाचा स्रोत आहे, अशी पंतप्रधान मोदी यांची भूमिका आहे. त्यामुळे, वारसा आणि विकास यांच्यातील संघर्षाची भीती न बाळगता, वारशातून विकास आणि विकासासोबत वारशाचे संरक्षण अशी भावना जपणे आवश्यक आहे. ही भूमिका स्वीकारणे सोपे नाही. कारण विकासाचे राजकारण तत्काळ परिणाम दाखवते. वारसा संवर्धनाचे परिणाम मात्र अनेकदा अदृश्य असतात. म्हणून वारसा ही संकल्पना राजकीय किंवा धार्मिक निवडीपुरती मर्यादित झाली तर तिचे सांस्कृतिक मूल्य कमी होईल. विकासाच्या आराखड्यात वारसा हा शेवटी आठवणारा घटक नसून सुरुवातीपासूनच नियोजनाचा भाग असायला हवा. भूतकाळ पुसून भविष्य उभारणे ही विकासदृष्टी नाही. कारण, ज्यांचा भूतकाळ जिवंत असतो, त्यांचा भविष्यकाळाकडे पाहण्याचा आत्मविश्वास अदम्य असतो. विकासाच्या नकाशावर वारशासाठी जागा राखून ठेवली जाईल आणि वारशाच्या नावाखाली विकासाला थांबवलेही जाणार नाही, तेव्हा भविष्यकाळही उज्ज्वल असेल. अजिंठा लेण्यांच्या सद्यःस्थितीने हेच भान अधोरेखित केले आहे. ■

## आंतरराष्ट्रीय

# तेल, ट्रम्प आणि तिसऱ्या संकटाची चाहूल

**प्रा. जयसिंग यादव**

दुसऱ्या महायुद्धानंतर जगाने अनेक युद्धे पाहिली. कोरिया, व्हिएतनाम, अफगाणिस्तान, इराक, सीरिया, युक्रेन... प्रत्येक संघर्षाने वेगवेगळे धडे दिले; परंतु एक गोष्ट कायम राहिली, ती म्हणजे जगातील प्रत्येक मोठ्या संघर्षाच्या केंद्रस्थानी ऊर्जा, विशेषतः तेल, हा घटक होता. आजही परिस्थिती वेगळी नाही. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षाकडे केवळ दोन राष्ट्रांमधील वैर म्हणून पाहणे ही मोठी चूक ठरेल. हा संघर्ष प्रत्यक्षात जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर नियंत्रण, सामरिक वर्चस्व आणि भू-राजकीय हितसंबंध यांचा आहे. गेल्या काही आठवड्यांपासून पश्चिम आशियामध्ये तणाव सातत्याने वाढत आहे. इराणच्या अणुकार्यक्रमावरून निर्माण झालेला वाद, इस्रायल-इराण संघर्ष, अमेरिकेची आखातातील वाढती लष्करी उपस्थिती आणि होर्मुज सामुद्रधुनीभोवतीचे तणावपूर्ण वातावरण यामुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाली आहे. अशा वेळी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणखी एका मोठ्या लष्करी कारवाईच्या तयारीत असल्याची चर्चा होती, मात्र त्यांनी ती कारवाई तूर्तास स्थगित केली. वरकरणी हा निर्णय शांततेचा वाटत असला, तरी त्यामागे युद्धापेक्षा अधिक मोठे गणित दडलेले आहे. इराणने स्पष्ट शब्दांमध्ये इशारा दिला आहे की, अमेरिकेने किंवा इस्रायलने आपल्या ऊर्जा पायाभूत सुविधांवर हल्ला केला, तर प्रत्युत्तरादाखल सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, कतार आणि इतर आखाती देशांमधील तेल आणि नैसर्गिक वायू प्रकल्प लक्ष्य केले जातील. ही धमकी सामान्य नाही. कारण जगातील सर्वांत मोठ्या तेलक्षेत्रांपैकी अनेक या प्रदेशात आहेत. त्यामुळे अवघ्या जगापुढील धोका वाढू शकतो.

सौदी अरेबियातील घवार तेलक्षेत्र, अबकैक प्रक्रिया केंद्र, संयुक्त अरब अमिरातीतील झाकूम क्षेत्र आणि कतारमधील 'नॉर्थ फील्ड' हे प्रकल्प जागतिक ऊर्जा व्यवस्थेचा कणा मानले जातात. या प्रकल्पांवर हल्ला म्हणजे जागतिक तेलपुरवठ्यावर थेट प्रहार असेल. युद्धाचे स्वरूप आता बदलले आहे. एके काळी लष्करी तळ, विमानतळ किंवा संरक्षण यंत्रणा ही प्रमुख लक्ष्ये असायची. आज ऊर्जा पायाभूत सुविधा, इंटरनेट नेटवर्क, सायबर व्यवस्था आणि पुरवठा साखळी ही नवी रणभूमी बनली आहे. रशिया-युक्रेन युद्धात युरोपने नैसर्गिक वायुसंकट अनुभवले. त्याचप्रमाणे पश्चिम आशियातील युद्धाने तेल संकट निर्माण झाले, तर त्याचा परिणाम संपूर्ण जगाला भोगावा लागेल. आज जगातील अर्थव्यवस्था अजूनही मोठ्या प्रमाणावर खनिज तेलावर अवलंबून आहे. अक्षय ऊर्जा, हरित तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रिक वाहनांची चर्चा वाढली असली, तरी विमान वाहतूक, जहाज उद्योग, पेट्रोकेमिकल्स, खत उद्योग आणि उत्पादन क्षेत्र अजूनही तेलाशिवाय चालू शकत नाही. त्यामुळे तेलाच्या किमतीत अचानक वाढ झाली, की महागाईवर थेट परिणाम होतो. वाहतूक महाग होते, उत्पादन खर्च वाढतो, अन्नधान्याच्या किमती वाढतात आणि सामान्य नागरिकाच्या खिशावर परिणाम होतो. भारतासाठी ही परिस्थिती विशेष चिंताजनक आहे. देशाच्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के तेल आयातीवर अवलंबून आहे. त्यातील मोठा हिस्सा आखाती देशांकडून येतो. त्यामुळे या प्रदेशात निर्माण होणारा कोणताही संघर्ष भारतासाठी आर्थिक संकट निर्माण करू शकतो.



पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढल्या, की केवळ वाहनचालकांवर परिणाम होत नाही, तर शेती, उद्योग, वाहतूक, बांधकाम, विमानसेवा आणि सर्वसामान्यांच्या जीवनमानावर परिणाम होतो. युद्धाचा आणखी एक मोठा परिणाम म्हणजे पुरवठा साखळीतील अडथळे. कोविड-१९ नंतर जगाने याचा अनुभव घेतला आहे. त्यानंतर रशिया-युक्रेन युद्धामुळे अन्नधान्य आणि खतांच्या पुरवठ्यावर परिणाम झाला. आता आखातातील तेल आणि एलएनजी निर्यात प्रभावित झाल्यास जागतिक अर्थव्यवस्थेला तिसरा मोठा धक्का बसू शकतो. आधी महामारी, नंतर युरोपमधील युद्ध आणि आता पश्चिम आशियातील ऊर्जा संकट ही साखळी जगासाठी अत्यंत धोकादायक ठरू शकते. इराणच्या भूमिकेकडेही वस्तुनिष्ठपणे पाहण्याची गरज आहे. अनेक दशकांपासून अमेरिकेच्या आर्थिक निर्बंधांचा सामना करणाऱ्या इराणने 'प्रतिबंधक प्रतिकार' हे धोरण स्वीकारले आहे. म्हणजे स्वतःवर हल्ला झाल्यास शत्रूला इतकी मोठी किंमत मोजावी लागेल, की तो पुढील कारवाई करण्यापूर्वी विचार करेल. आखाती देशांमधील तेल प्रकल्पांना लक्ष्य करण्याची धमकी ही याच रणनीतीचा भाग आहे; मात्र अशा प्रकारची रणनीती अत्यंत धोकादायक असते. कारण त्यात युद्धाचे नियंत्रण कोणाच्याही हातात राहत नाही. या संघर्षामध्ये सौदी अरेबियाची भूमिकाही महत्त्वाची आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत सौदी अरेबिया आणि इराण यांच्यात तीव्र वैर होते. चीनच्या मध्यस्थीने दोन्ही देशांमध्ये संवाद सुरू झाला; मात्र आज पुन्हा तणाव वाढत आहे. सौदी अरेबिया या संघर्षात ओढला गेल्यास संपूर्ण आखात अस्थिर होऊ शकते. त्याचा परिणाम जागतिक बाजारपेठांवर होईल.

ऊर्जा सुरक्षेला लष्करी राजकारणापासून वेगळे ठेवण्याची वेळ आली आहे. तेल आणि नैसर्गिक वायू ही केवळ व्यापारी उत्पादने नाहीत, तर जगाच्या आर्थिक रक्ताभिसरणाची साधने आहेत. त्यांचा वापर युद्धाचे अस्त्र म्हणून होऊ लागल्यास होणारे परिणाम कोणत्याही एका देशापुरते मर्यादित राहणार नाहीत. आज ट्रम्प यांनी हल्ला स्थगित केला आहे. उद्या परिस्थिती बदलू शकते. इराणने धमकी दिली आहे; पण ती प्रत्यक्षात आणली जाईलच, असे निश्चित नाही; मात्र या सर्व घडामोडींनी जगाला एक स्पष्ट संदेश दिला आहे, तो म्हणजे पश्चिम आशियातील शांतता ही केवळ प्रादेशिक प्रश्न राहिलेली नाही, तर ती जागतिक आर्थिक स्थैर्याची पूर्वअट बनली आहे.

पश्चिम आशियातील तणाव कमी करण्यासाठी संवाद, मुत्सद्देगिरी आणि परस्परविश्वासाची पुनर्बांधणी याशिवाय दुसरा कोणताही टिकाऊ पर्याय नाही. अन्यथा, तेलाच्या विहिरींमधून वाहणारे इंधन नव्हे, तर जागतिक अर्थव्यवस्थेचे भविष्यच धगधगू लागेल. ट्रम्प यांनी संभाव्य लष्करी कारवाई सध्या स्थगित केल्याची चर्चा असली, तरी त्यामागे इराणच्या या प्रतिआक्रमणाच्या क्षमतेचाही विचार झाल्याचे मानले जात आहे. हा संघर्ष आता केवळ दोन देशांपुरता मर्यादित राहिलेला नाही. तो जगाच्या ऊर्जासुरक्षेला, जागतिक अर्थव्यवस्थेला आणि भारतासारख्या तेल आयात करणाऱ्या देशांच्या भवितव्यालाही स्पर्श करणारा ठरला आहे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# ज्ञानगंगा अभयारण्यात 'धुरंधर' पाठोपाठ 'मोना'

वाघ जंगलात असतो म्हणून जंगलाचे अस्तित्व असते आणि जंगलाचे अस्तित्व असते म्हणून माणसाचे भवितव्य सुरक्षित राहते. ही केवळ पर्यावरणाची भावनिक मांडणी नाही तर निसर्गाच्या अन्नसाखळीपासून जलचक्रापर्यंत पोहोचणारे निर्विवाद वास्तव आहे. एखाद्या जंगलात वाघाचे आगमन ही केवळ एका वन्यप्राण्याच्या येण्याची घटना नसते. त्या घटनेत संपूर्ण परिसंस्थेच्या आरोग्याचा संदेश दडलेला असतो. महाराष्ट्रातील पेंच, ताडोबा-अंधारी, उमरेड-कऱ्हांडला आणि बोर यासारख्या प्रमुख व्याघ्र प्रकल्पांमुळे भारताची व्याघ्र राजधानी म्हणून नागपूरची ओळख झाली आहे. नागपूरच्या केवळ १०० किमी परिसरात प्रसिद्ध व्याघ्र अभयारण्ये आहेत. ज्यामुळे वन्यजीवप्रेमी आणि व्याघ्रप्रेमींसाठी हे एक उत्तम पर्यटनस्थळ झाले आहे. नागपूर प्रादेशिक वनांमध्ये ४५ वाघांची नोंद करण्यात आली आहे. वनविभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार राज्यातील वाघांची संख्या ६२५ पर्यंत पोहोचली आहे. २०२२च्या अखिल भारतीय व्याघ्रगणनेत महाराष्ट्रात ४४४ वाघांची नोंद झाली होती. पर्यावरण संरक्षणाचे प्रतीक ९ जुलै १९६९ हा दिवस भारताच्या पर्यावरणीय इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरला. याच दिवशी वाघाला भारताचा राष्ट्रीय प्राणी म्हणून घोषित करण्यात आले. हा निर्णय केवळ एका प्राण्याला सन्मान देण्यापुरता मर्यादित नव्हता तर भारताच्या जैवविविधतेचे, वनसंपदेचे आणि पर्यावरण संरक्षणाचे प्रतीक म्हणून वाघाची निवड करण्यात आली होती. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरात सुमारे १०० च्या आसपास वाघ असल्याचा अंदाज आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पात ९०, गडचिरोली, ब्रह्मपुरी, उमरेड-कऱ्हांडला आणि नवेगाव-नागझिरा या भागांत वाघांची लक्षणीय वाढ नोंदविण्यात आली. भंडारा-गोंदिया जिल्ह्यांत सुमारे १५ वाघांची नोंद झाल्याची माहिती आहे.



राज्यात मानव-वन्यजीव संघर्षाची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून गेल्या सहा वर्षांत वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ५०१ जणांचा मृत्यू झाला आहे. आकडेवारीनुसार २०२० ते २०२६ या कालावधीत या घटना घडल्या आहेत. वन्यप्राण्यांच्या अधिवासामध्ये मानवी वावर चिंतेचा विषय ठरत आहे. त्यातच बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा वन्यजीव अभयारण्यात पुन्हा एकदा वाघाची डरकाळी ऐकू येऊ लागली आहे. पेंच व्याघ्र प्रकल्पातून आणण्यात आलेला वाघ पी. के. टी. ७ सी. पी. १ जानेवारी २०२६ मध्ये ज्ञानगंगा अभयारण्यात आणण्यात आला. प्रारंभी त्याला अभयारण्यातील बोरखेड-देव्हारी परिसरातील विस्तारित बंदिस्त जाळीच्या क्षेत्रात ठेवण्यात आले होते. पुढे त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याचे काम सुरू झाले. त्याचे टोपणनाव 'धुरंधर' ठेवण्यात आले. ज्ञानगंगा अभयारण्यात वाघाच्या अस्तित्वाची चाहूल लागणे ही केवळ वन्यजीवप्रेमींसाठी आनंदाची बातमी नाही तर ती बुलढाण्याच्या वनभवितव्याची एक मोठी सूचना आहे. जंगलात पट्टेदार 'राजा' फिरताना दिसतो. तेव्हा त्याच्या पावलांबरोबर अनेक प्रश्नही जंगलाबाहेर येतात. त्याच्यासाठी पुरेसे जंगल आहे का, पुरेसे भक्ष्य आहे का, पाण्याची उपलब्धता किती आहे, मानवी वस्ती आणि वन्यजीव यांच्यातील अंतर सुरक्षित आहे का, सर्वांत महत्त्वाचे म्हणजे बुलढाण्यात वाघाला केवळ पाहुणा म्हणून ठेवायचे की त्याच्यासाठी शाश्वत अधिवास निर्माण करायचा. ज्ञानगंगा परिसरात 'धुरंधर' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वाघाची चर्चा आहे. त्यानंतर 'मोना' या वाघिणीचे आगमन झाले आहे. मंत्री आकाश फुंडकर यांच्या प्रयत्नातून मोना वाघीण ज्ञानगंगा परिसरात आणली गेली. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या धोरणातही व्याघ्र अधिवासातील गावांच्या स्वेच्छिक पुनर्वसनाला महत्त्व दिले आहे. याचा उद्देश वाघासाठी जंगल मोकळे करणे एवढाच नसून मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी करून दोघांसाठी सुरक्षित व्यवस्था निर्माण करणे हा आहे. म्हणून देव्हारीचे पुनर्वसन झाले. ज्ञानगंगा प्रकल्प २० हजार ५०० हेक्टर परिसरात आहे. वन्यप्राण्यांसाठी लागणारे परिक्षेत्र कमी असल्याने पलढगपासून मोताळ्यापर्यंत सुमारे १५ हजार हेक्टर वनक्षेत्र वाढविण्याची मागणी केली जात आहे. त्याकडे केवळ राजकीय मागणी म्हणून पाहण्याची गरज नाही. तिच्या मागे एक मोठा पर्यावरणीय विचार आहे. अन्यथा रस्ते, शेती, वस्ती आणि मानवी हालचालींमध्ये अडकलेला वाघ संघर्षाचा कारणीभूत ठरू शकतो. ■

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# परीक्षा घेणाऱ्यांचीच परीक्षा

**दत्तात्रेय आंबुलकर**

विविध विषय अथवा शैक्षणिक क्षेत्रांमधील प्रवेश अथवा निवडीसाठीचा प्रथम निकष म्हणजे स्पर्धा परीक्षा. त्यानंतर क्रम येतो तो समूह-चर्चा, वैयक्तिक मुलाखत इत्यादीचा. बहुतांश निवड प्रक्रियेत ही पद्धत तशी सर्वमान्य ठरलेली. काही ठिकाणी मूळ निवड परीक्षेला शारीरिक क्षमता चाचणी व वैद्यकीय तपासणीचीही जोड दिली जाते. यापैकी निवड परीक्षेसाठी नव्याने करण्यात आलेल्या प्रशासनिक प्रयोगानुसार, विशिष्ट पदांसाठीच्या उमेदवारांसाठी निवड करताना मुख्य भर हा संबंधित उमेदवारांच्या स्पर्धा परीक्षेतील गुणांकांवर देऊन त्याआधारे व प्रत्यक्ष मुलाखतीविनाच उमेदवारांची निवड पद्धतीचा अवलंब करण्यास सुरुवात झाली व या नव्या प्रयोगाला अपेक्षित यशदेखील प्राप्त झाले. यामुळे प्रामुख्याने लक्षात आलेला मुद्दा म्हणजे, विविध स्पर्धा परीक्षेतून उमेदवारांची निवड करताना प्रसंगी उमेदवारांची मुलाखत बाजूला ठेवली, तरी यासाठीच्या स्पर्धा परीक्षेला मात्र पर्याय नसतो. त्यामुळेच स्पर्धा परीक्षेचे महत्त्व प्रामुख्याने लक्षात येते. हीच बाब प्रामुख्याने 'नीट' प्रवेश परीक्षेच्या निमित्ताने स्पष्ट झाली व जणू स्पर्धा घेणाऱ्यांची परीक्षा घेण्याचा व अशाप्रकारे राष्ट्रीय स्वरूपातील व देशपातळीवरील स्पर्धा घेणारे परीक्षक ते संबंधित पुढारी या साऱ्यांनीच परीक्षा व प्रसंगी फेरपरीक्षा देण्याचा प्रयोग आणि प्रकार पण आपण नव्यानेच अनुभवला व त्यातून विद्यार्थ्यांपासून शिक्षणमंत्र्यांपर्यंत सर्वांनाच जणू धडा पण मिळाला.

'नीट' परीक्षा व आंदोलनाच्या निमित्ताने प्रामुख्याने स्पष्ट झालेली बाब म्हणजे, या आणि अशा महत्त्वपूर्ण निवड-स्पर्धा परीक्षांचा विचार, तयारी, परीक्षा देणे व त्यांचा निकाल या साऱ्यांचा परिणाम केवळ स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थीच नव्हे, तर त्यांचे संपूर्ण कुटुंबीय-नातेवाईक या साऱ्यांवर होत असतात. याशिवाय, या स्पर्धा-निवड परीक्षांची पूर्वतयारी करवून घेणारे व त्यानुषंगाने कामे करणारे मार्गदर्शक इ.ची मोठी संख्या असते ती वेगळीच. त्यामुळे समाजातील व देशपातळीवर स्पर्धा परीक्षा प्रक्रियेशी संबंधितांची संख्या प्रसंगी फार मोठी ठरू शकते. या साऱ्यांनी आपल्या पैशांपासून परिश्रमापर्यंत विविध पैलू आपला पाल्य वा नातेवाईकाच्या परीक्षेपोटी लावले असतात. स्पर्धा परीक्षांच्या निमित्ताने व त्या माध्यमातून केवळ स्पर्धक विद्यार्थीच नव्हे, तर त्याचे कुटुंब-नातेवाईक व परीक्षा प्रक्रियेशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सहभागी सर्व घटकांचा त्यामध्ये सहभाग होत असतो. इंजिनीअरिंग व तंत्रज्ञान विषयातील नामवंत संस्थांमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी, इच्छुक विद्यार्थ्यांची पूर्वतयारी करून देण्यासाठी मोठा लौकिक कमावणाऱ्या राजस्थानच्या कोटा शहराची आर्थिक-व्यावसायिक व सामाजिक व्यवस्था ही स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रक्रियेवर अवलंबून असते, ही बाब अगदी सुपरिचित. याचे कारण, कोटा मुक्कामी देशातील सर्व भागांतून विद्यार्थी इंजिनीअरिंगच्या प्रवेश तयारीसाठी दीर्घकालीन मुक्कामाने येतात व त्यांना शैक्षणिक मार्गदर्शनाशिवाय त्यांचे निवास, भोजन व आनुषंगिक सोयीसुविधा यांची गरज आज कोटा शहर व तेथील रहिवासी भागवत असतात.

हे असे होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, वाढती लोकसंख्या व वाढणाऱ्या शैक्षणिक-रोजगार संधी व त्यामुळे वाढत्या स्पर्धेच्या पृष्ठभूमीवर प्रवेश पात्रता परीक्षेचे परिणाम व्यापक स्वरूपात व विविध संदर्भात होताना दिसतात. त्यातही विद्यार्थी-उमेदवारांच्या वयोगटाचा विचार करता, या स्पर्धा सर्वस्वी युवावर्गासाठी असल्याने त्यामध्ये युवकांचाच सहभाग प्रयत्नपूर्वक व मोठ्या प्रमाणात असतो. त्यामुळे अशा परीक्षांचे आयोजन, नियोजन व व्यवस्थापन अत्यंत काळजीपूर्वक करावे लागते. याची मुख्य जबाबदारी अर्थातच, संबंधित परीक्षेनुसार राज्य वा केंद्र सरकारकडे असल्याने, यामध्ये काहीही गडबड झाल्यास त्याचे त्वरित व थेट परिणाम राजकारणी व शासनकर्त्यांवर होतात.

देशाच्या लोकसंख्येच्या अनुषंगाने जागतिकसंदर्भात व फार मोठ्या संख्येत व प्रमाणावर स्पर्धा परीक्षा घेण्याचे मोठे व जोखमीचे काम भारताशिवाय चीनमध्ये नेहमीच करावे लागते. त्यामुळे यासंदर्भात या उभय देशांची तुलना स्वाभाविकपणे व अपरिहार्यपणे केली जाते. अशी तुलना भारत आणि चीनमध्ये यावर्षी घेण्यात आलेल्या मोठ्या स्वरूपातील स्पर्धा परीक्षांच्या संदर्भात केल्यास काही महत्त्वपूर्ण बाबी स्पष्ट होतात.

आपल्याकडील यावर्षीच्या मूळ 'नीट' निवड परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे २.२६ दशलक्ष होती. या परीक्षा प्रक्रियेच्या दरम्यान झालेल्या पेपरफुटीमुळे या साऱ्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेण्याची व्यवस्था स्वाभाविकपणे केंद्र सरकारला करावी लागली. हे काम मोठे व दुहेरी जोखमीचे होते. शासन स्तरावर सर्वोपरी प्रयत्न करून केवळ दीड महिन्याच्या कालावधीत फेरपरीक्षेचे व त्यानंतरची प्रक्रिया पूर्ण करण्याचे काम अत्यधिक काळजीपूर्वक पद्धतीने करण्यात तर आले. मात्र, यावेळच्या परीक्षेची फार मोठी किंमत अनेकार्थांनी चुकवावी लागली.

आपल्याकडील 'नीट' परीक्षेची यावेळची प्रक्रिया सुरू असतानाच चीनमधील अशाच प्रकारची 'गुकू' ही प्रवेश पात्रता परीक्षा घेतली जात होती. दरवर्षी जूनमध्ये घेण्यात येणारी ही प्रवेश पात्रता परीक्षा जागतिक स्तरावरील सर्वांत मोठी व सर्वाधिक संख्येसह घेतली जाणारी पात्रता परीक्षा म्हणून मान्यताप्राप्त आहे. यावर्षी या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या होती, १३.३५ दशलक्ष. चीनमधील या परीक्षेचे नियोजन व त्याच्या अंमलबजावणीसाठी काटेकोर काळजी घेतली जाते. परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांचे जतन व हाताळणी मोठ्या शासकीय गोपनीय कागदपत्रे वा दस्तावेजासारखी केली जाते. परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांची वाहतूक करताना 'जीपीएस'युक्त वाहनांचाच उपयोग केला जातो व या वाहनांना संपूर्णपणे पोलिसांचे संरक्षण दिले जाते. प्रत्यक्ष प्रश्नपत्रिकांच्या संदर्भात सांगायचे म्हणजे, स्पर्धा परीक्षेच्या तयारी-व्यवस्थेत सहभागी असणाऱ्या शिक्षक वा विषयतज्ज्ञांना या साऱ्या प्रक्रियेदरम्यान म्हणजे प्रश्न वा प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून परीक्षा प्रक्रिया संपेपर्यंतच्या सुमारे एक महिन्याच्या कालावधीसाठी सर्वांपासून दूर व एकांतस्थळी ठेवले जाते. प्रश्नपत्रिकांची छपाई संरक्षण मंत्रालयांतर्गतच्या छापखान्यांमार्फत होते. कच्च्या कामासाठी वापरलेले कागद निगराणीखाली जाळले जातात. प्रत्यक्ष परीक्षा कालावधीत व परीक्षा केंद्रांवर सुरक्षेची संपूर्ण काळजी घेतली जाते. परीक्षा केंद्र परिसरात संपूर्ण सुरक्षाव्यवस्था प्रदान करतानाच, त्या क्षेत्र-परिसरात मोबाईल वापरावर प्रतिबंधासह मोबाईल जॅमर्सचा वापर केला जातो. याशिवाय, समाजमाध्यमांद्वारे गैरवापर न होण्याची काळजी पण संपूर्णपणे घेतली जाते. या महत्त्वाच्या कामी चीनमधील शासन-प्रशासन व पक्षपातळीवर दरवर्षी सर्वोपरी व सर्वार्थाने प्रयत्न केले जातात. कारण, देशाच्या युवा पिढीचे पुढील शिक्षणाच्या माध्यमातून भविष्य घडविणारी 'गुकू' ही प्रवेश पात्रता परीक्षा ही देशपातळीवर स्पर्धा देणाऱ्यांचीच नव्हे, तर स्पर्धा घेणाऱ्यांचीसुद्धा वार्षिक परीक्षाच असते. ■

(लेखक एचआर-व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### वृक्षतोड करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी

'ग्रीन सिटी'चा मुखवटा गळाला' या मथळ्याची बातमी १० ऑगस्टच्या अंकात वाचली. माणसांपेक्षा झाडे कमी हे निश्चितच खरे आहे. नागपूर शहरातील लोकसंख्या व उपलब्ध जागा याचा विचार केला तर झाडे कमी असणारच.

विकासासाठी झाडे तोडण्यात येतात, हे काही प्रमाणात योग्य आहे. परंतु काहीही कारण नसताना स्वतःच्या घर बांधकामासाठी रस्त्याच्या कडेला असलेली झाडे, जी नागपूर महानगर पालिकेने पंचवीस-तीस वर्षांपूर्वी लावलेली आहेत, ती भूखंडधारक कुठलीही परवानगी न घेता तोडतात यास काय म्हणावे?

सॅटेलाईट छायाचित्रवरून अशी मोजदाद करून वृक्षसंवर्धन कायद्याअंतर्गत दंड ठोठावल्यास, कमीत कमी पुढे असे घडणार नाही. महानगर पालिकेकडे या बाबतीत स्वतंत्र विभाग असून देखील डोळेझाक होते. भविष्यासाठी हे योग्य नाही. आज लावलेल्या रोपट्याचे वृक्षात रूपांतर होण्यास बराच कालावधी लागणार. तेव्हा अकारण वृक्षतोड करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असे सुचवावेसे वाटते.

**शरद सोनकुसरे**/९४२३०७३३२२

■■■

## वाचक पत्रे

### पदपथांवर अतिक्रमणाचे साम्राज्य

प्रशासनाचे बर्डी, महाल, आयटी पार्ककडेच लक्ष असल्याचे दिसते. उर्वरित नागपूर अतिक्रमणाच्या विळख्यात आहे. मनपाचे अधिकारी सांगतात की, आम्ही कारवाई करतो पण दुसऱ्याच दिवशी पुन्हा अतिक्रमण होते. कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी धोरणात्मक निर्णयाची गरज आहे. नागरिकांच्या मते आता केवळ दंड करून प्रश्न सुटणार नाही. कायमस्वरूपी तोडगा आवश्यक आहे. अतिक्रमण आढळल्यास थेट गुन्हा दाखल करावा. सर्व झोनमध्ये समान कारवाई करण्यात यावी. केवळ व्हीआयपी भागावर नको. तसेच,राजकीय हस्तक्षेपावर बंदी असावी. कारवाईत ढवळाढवळ करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. प्रश्न एकच आहे, पदपथ कधी मोकळा श्वास घेणार?

पदपथावरील अतिक्रमणे हटवून पादचाऱ्यांसाठी सुरक्षित व मोकळे करण्यासाठी काही उपाययोजना प्रभावी ठरू शकतात. महापालिकेने व पोलिस प्रशासनाने संयुक्तपणे नियमित कारवाई करून अनधिकृत स्टॉल, फेरीवाले व बांधकाम साहित्य हटवावे. वारंवार अतिक्रमण करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी. फेरीवाल्यांसाठी स्वतंत्र विक्री क्षेत्र (हॉकर झोन) तयार करावे, जेणेकरून ते पदपथावर व्यवसाय करणार नाहीत. पुरेशा रुंदीचे, समतल व अडथळामुक्त पदपथ बांधावेत. दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांसाठीही ते सुरक्षित असावेत. प्रमुख चौक व रस्त्यांवर सीसीटीव्ही बसवून अतिक्रमणावर सतत लक्ष ठेवावे. नागरिकांनी अतिक्रमणाची माहिती महापालिकेला मोबाईल ॲप किंवा हेल्पलाईनद्वारे द्यावी. पदपथ हा पादचाऱ्यांचा हक्काचा मार्ग आहे, याबाबत व्यापारी व नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करावी. पदपथ हे पादचाऱ्यांसाठी सुरक्षितपणे चालण्याचे साधन आहे. प्रभावी प्रशासन, कठोर अंमलबजावणी, पर्यायी व्यवस्था आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग यांच्या साहाय्याने पदपथ अतिक्रमणमुक्त करून सर्वांसाठी सुरक्षित व सुलभ बनवता येतील.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

■■■

### 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' आणि 'उर्मटपणा' यातील फरक कळावा

लोकशाहीत राजकीय विचारसरणीवर मतभेद असणे आणि सरकारच्या धोरणांवर सडकून टीका करणे हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. मात्र, टीकेच्या नावाखाली देशाच्या पंतप्रधानांसारख्या सर्वोच्च संवैधानिक पदावर बसलेल्या व्यक्तीविरुद्ध हिंसक किंवा असभ्य भाषेचा वापर करणे पूर्णपणे अयोग्य आहे. 'आयथ्राईव्ह'च्या संस्थापक मुग्धा प्रधान यांनी देशाच्या पंतप्रधानांबद्दल केलेले अत्यंत बेजबाबदार आणि आक्षेपार्ह विधान वाचून तीव्र संताप व्यक्त करावासा वाटतो. लोकशाहीत राजकीय विचारसरणीवर मतभेद असणे, सरकारच्या धोरणांवर टीका करणे हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. मात्र, टीकेच्या नावाखाली संवैधानिक पदावर बसलेल्या व्यक्तीला हिंसक आणि गल्लीबोळातील भाषेचा वापर करणे ही कोणत्या प्रकारची प्रगल्भता आहे?

उच्चशिक्षित आणि कॉर्पोरेट क्षेत्रात मोठ्या पदावर असलेल्या व्यक्तींकडून समाजात जबाबदार वर्तनाची अपेक्षा असते. दुर्दैवाने, केवळ स्वतःला सुशिक्षित समजणाऱ्या काही मंडळींना 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' आणि 'उर्मटपणा' यातील फरक कळत नसल्याचेच या घटनेवरून दिसते. शिक्षणामुळे पदव्या मिळतात, पण भाषेतील संयम आणि सामाजिक भान अनुभवातून आणि संस्कारांतून येते, हेच अशा प्रकारच्या विधानांवरून अधोरेखित होते. ■

**अविनाश देशपांडे**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

**पोतराज मिरवणूक...**



सोलापूरः आषाढ मासानिमित्त बेडर समाजाच्या वतीने सोमवारी पोतराज मिरवणूक काढण्यात आली.

# स्मार्ट मीटर, श्रमसंहिता, महागाई आदींप्रश्नी आंदोलन; पोलिसांनी घेतले ४०० जणांना ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० ऑगस्ट-**

स्मार्ट मीटरचा निर्णय रद्द करण्यात यावा, चार श्रमसंहिता रद्द कराव्यात, कामगार कायदयांची प्रभावी अंमलबजावणी करावी, वाढती महागाई व बेरोजगारी रोखावी यांसह विविध प्रश्नांसंदर्भात मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीप्रणित 'सीटू'च्या वतीने माजी आमदार नरसय्या आडम यांच्या नेतृत्वाखाली शांती चौक येथे आंदोलन करण्यात आले.

यावेळी आंदोलक आणि पोलिस यांच्यात झटापट झाली. दत्त नगर, कुंभारी या ठिकाणीही तीव्र आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी गगनभेदी घोषणा देत परिसर दणाणून सोडले होते. दरम्यान, आंदोलकांनी गनिमी काव्याचा आधार घेत आंदोलनसंदर्भात रणनीती आखली होती. तरीपण, पोलिसांनी ४०० जणांना ताब्यात घेतले. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकाळी ९ वाजल्यापासून दत्तनगर येथील लालबावटा कार्यालयाला पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावत घेराव घातला. त्यामुळे नियोजित ठिकाणी आंदोलकांना एकत्र येणे शक्य झाले नाही. मात्र, पोलिसांचा बंदोबस्त झुगारुन विविध भागांतील कार्यकर्ते जथ्यांच्या स्वरुपात शांती चौक, पाणी टाकी परिसरात दाखल झाले.



या आंदोलनात युसुफ शेख, अनिल वासम, दत्ता चव्हाण, व्यंकटेश कोंगारी, वीरेंद्र, पद्मा, दाऊद शेख, नरेश दुगाणे, हनीफ सातखेड, मल्लेशम कारमपुरी, पांडुरंग म्हेत्रे, दीपक निकंबे, अभिजीत निकंबे, विजय हरसुरे, अमित मंचले, सनी शेट्टी, रविंद गेंट्याल, अरुण सामल, बालाजी गुंडे, शिवा श्रीराम, शहाबुद्दीन शेख, विजय मरेड्डी, किशोर म्हेत्रे, रहीम नदाफ, बजरंग गायकवाड, खाजाभाई करजगी, प्रशांत चौगुले, राजेश काशीद, प्रकाश कलबुर्गी, अमीन शेख, जुबेर सगरी, माजीद नदाफ, युसुफ शेख, अबू शेख, असलम शेख, विल्यम ससाणे, बापू साबळे, विक्रम कलबुर्गी, हसन शेख, रफिक काझी, वसीम मुल्ला, बालाजी तुम्मा, नरसिंग बुगले, आफसाना बेग, राजेंद्र गेंट्याल, आप्पाशा चागले, गोपाळ बंडी, दिनेश बडगु, परशुराम बुगले, संतोष पुकाळे, शबीर नारोकाट, श्रीनिवास गोण्याल, श्रीनिवास डक्का, नागेश सरला, इमाम शेख, कुरमेश म्हेत्रे, अतीक दंडोती, मुन्ना कलबुर्गे, संगीता एडके, मधुकर चिल्लाळ, गुंडप्पा डक्का, नागनाथ जल्ला, योगेश अकीम, चंटी, बिटला, शशिकांत गुंडला, राजू गड्डम, योहान सातालोलु, हनुमंतु पेद्दी, दशरथ आमाटी, चंद्रकांत गोण्याल, कुमार येलगेटी, राजू सीता, श्रीनिवास गोण्याल, नरेश गुल्लापल्ली सामील झाले होते.

# 'आत्मचिकित्सेशिवाय ज्ञानव्यवहाराला आव्हान शक्य नाही'

## भारतीय ज्ञानव्यवहार सामान्य माणसाच्या विरोधात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

स्वबोधातून आत्मचिकित्सा केल्याशिवाय ज्ञानव्यवहाराला आव्हान देता येत नाही. महात्मा फुल्यांनी विकसित करण्याचा प्रयत्न केलेला ज्ञानव्यवहार हा भारतीय समाजाच्या आत्मचिकित्सेचा मार्ग होता. त्यांच्या विचारांनी भारतीय ज्ञानव्यवहारालाच आव्हान दिले. कारण भारतातील ज्ञानव्यवहार हा सामान्य माणसाच्या विरोधी आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासकार प्रा. उमेश बगाडे यांनी केले.

येथील महात्मा फुले जन्मद्विशताब्दी समिती आयोजित फुले जन्मद्विशताब्दी व्याख्यानमालेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ मार्क्सवादी कार्यकर्ते कॉ. रा. गो. म्हेत्रस होते. प्रा. बगाडे म्हणाले,



माणूस अनेकदा स्वतःवरच गुलामी लादून घेतो. कोणतेही शासन सामान्य माणसाच्या इच्छा आणि स्वप्नांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करते. फुल्यांनी आपल्या नाट्यलेखनातून या नियंत्रणाचे स्वरूप उलगडून दाखवले आहे. त्यांची कार्यपद्धती आणि अभ्यासपद्धती ही क्रांतिकारी ज्ञानव्यवहाराची उदाहरणे आहेत.

ज्ञान आणि सत्ता यांचा परस्पर संबंध समजून घेणे आवश्यक आहे. सामान्य माणसाची ओळख ही सत्तेने घडवलेली असते. ज्ञानाच्या मक्तेदारीतून शोषणाची व्यवस्था अधिक बळकट करण्यात आली. कोणतेही शासन तर्क आणि विवेकाचा वापर करते; मात्र भारतीय ज्ञानसत्तेविषयी बोलताना महात्मा फुले 'कुतर्क' हा शब्द वापरतात. आजही सत्ताधारी व्यवस्था विविध प्रकारच्या कुतर्कांचा आधार घेत असल्याचा अनुभव समाजाला येत आहे. अशा कुतर्कांमधून सामाजिक न्यायाला बाधा पोहोचवणाऱ्या शासननीती आकार घेतात, असेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात रा.गो. म्हेत्रस यांनी महात्मा फुले यांच्या विचारांचा आणि सामाजिक कार्याचा आढावा घेतला. प्रारंभी ज्येष्ठ समाजवादी नेते डॉ. कुमार सप्तर्षी आणि ज्येष्ठ साहित्यिक विलास पाटील यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी दत्ता गायकवाड, प्रा. नरेश बदनोरे, प्रा. एम. आर. कांबळे, लक्ष्मीदास सोनकवडे, प्रा. संजय गायकवाड, अॅड. गोविंद पाटील, मनीष गडदे उपस्थित होते. प्रास्ताविक दत्ता थोरे यांनी तर सूत्रसंचालन डॉ.अस्मिता बालगावकर यांनी केले.





सोलापूर : पोलिस आयुक्तालयाच्या वतीने ड्रग्स फ्री कॅम्पस अभियान अंतर्गत आयोजित कार्यशाळेत बोलताना रामचंद्र वाघमारे. (छाया-केवल तिवारी)

## जाहीर प्रगटन

**उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत.**

**वक्फ संस्थेचे नाव व पत्ता : हजरत बदीयुद्दीन उर्फ बाबासाहेब कादरी पिर दर्गाह व मस्जिद ट्रस्ट, औज मंद्रुप, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर.**

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असून अर्जदार श्री. सिकंदरताज हुसेनताज पाटील, जि. सोलापूर यांनी दिनांक २५.१०.२०२४ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळा/जिल्हा वक्फ अधिकारी सोलापूर कडे प्रारूप योजना दाखल केलेली आहे. प्रारूप योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ आजिवन असून व्यवस्थापन समिती निवडीची रित उर्वरित विश्वस्त नवीन विश्वस्तांची नेमणुक करतील अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | म.जाफरताज हुसेनताज पाटील | अध्यक्ष |
| २ | अख्तरताज बाखरताज पाटील | उपाध्यक्ष |
| ३ | सिकंदरताज हुसेनताज पाटील | सचिव |
| ४ | असलम मुस्ताकपाशा पाटील | सहसचिव |
| ५ | गयासोद्दीन शरफोद्दीन पाटील | खजिनदार |
| ६ | अब्दुलगनी ताजोद्दीन पाटील | सदस्य |
| ७ | मुमताज मिराताज पाटील | सदस्य |
| ८ | अहमद निजामोद्दीन पाटील | सदस्य |
| ९ | ताहेरताज मोहम्मदताज पाटील | सदस्य |
| १० | मुसदिकाताज सिकंदरताज पाटील | सदस्य |
| ११ | तौफिकुन्निसा बेगम इकबाल पीरजादा | सदस्य |

सदर प्रारूप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी, सोलापूर दारुल सलाम इमारत, सिद्धेश्वर पेठ सोलापूर-४१३००१ येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(फरदीन काझी)**
**जिल्हा वक्फ अधिकारी**
**सोलापूर**

# राज्य विमा रुग्णालयातून १८ हजारांचे कॉपर वायर चोरीस

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

ऑपरेशन थिएटर च्या कामासाठी आणून ठेवलेले १८ हजार रुपयांचे कॉपर वायर चे बंडल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना होटगी रोडवरील राज्य विमा रुग्णालयात घडली. दरम्यान या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ऋषीपाल फकीरचंद पाल (वय ४२, रा. रा-१६८, दाबका, पो. चामरोवा, जि. रामपूर) यांनी फिर्याद दिली आहे. होटगी रोडवरील राज्य विमा रुग्णालयात ऑपरेशन थिएटर तयार करण्याचे काम नागपूर येथील ग्लोबल मेडी हेल्थ केअर प्रा.लि. या कंपनीला देण्यात आले होते. विविध रंगाच्या पॉलीकॅब, हॅवल्स कंपनीचे ४ एमएम.,२.५ एम.एम,१.५ एम.एम.या बंडल मधील शिल्लक व वेस्ट राहिलेल्या कॉपर वायर लबाडीने चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. .

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज क्र. ४४/२०२६
पुढील नेमलेली तारीखः २७/०८/२०२६
नि. ६

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**(मा. एस.एस. सुक्रे)**

**१) तुळसा उत्तम शेळके,**
वय ७० वर्ष, धंदा - घरकाम,
रा. सुभाष नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
**२) राधा सुभाष शिंदे,**
वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. सदर
— **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** — **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार हे वर नमूद ठिकाणचे रहिवासी असून अर्जदार नं.२ ही अर्जदार नं.१ ची मुलगी असून अर्जदार नं. १ चे दिर म्हणजेच अर्जदार नं. २ चे चुलते वैजीनाथ कृष्णा शेळके हे होते ते दि. १५/११/२०२० रोजी हे तडवळे, ता. माढा येथे मयत झालेले आहेत. सदर वैजीनाथ कृष्णा शेळके हे अविवाहीत मयत होते. त्यांचा सांभाळ, सेवा शुश्रुषा यातील अर्जदार यांनीच दिर व चुलता या नात्याने केला असून मृत्यू पश्चातचे सर्व धार्मिक कार्य देखील केलेले आहेत. यातील अर्जदार नं.१ चे पती म्हणजेच अर्जदार नं.२ चे वडिल उत्तम कृष्णा शेळके हे दि. ०४/०९/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. यातील अर्जदाराना त्यांचे कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता, शासनाचे योजनेचा लाभ घेणेकरीता हेअरशिप (वारस) प्रमाणपत्राची गरज भासली असे कथन करुन अर्जदारानी या मे. कोर्टाकडे वारसा प्रमाणपत्राकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस वा कोणाचे हक्कात काही दस्त असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ३० दिवसांचे आत वा पुढील नेमले तारीख २७/०८/२०२६ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होऊन आपले म्हणणे, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्कयानिशी प्रसिध्द केले असे. ताः १०/०८/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**क.स्तर, बार्शी**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर, बार्शी**

# जीवन प्रेरणा दिनानिमित्त आजी-आजोबांची चरण पूजा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

विष्णुपंत तथा तात्यासाहेब कोठे यांची ८९ वी जयंती सोमवारी जीवन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. आमदार देवेंद्र कोठे यांचे आजोबा विष्णुपंत कोठे यांच्या जयंतीनिमित्त विष्णुपंत कोठे प्रतिष्ठान संचलित विष्णुपंत कोठे मेमोरियल इंग्लिश स्कूल येथे ज्येष्ठांचा सन्मान व संस्कारांचा अभिमान कार्यक्रमांतर्गत आजी-आजोबांचे पाद्यपूजन हा अतिशय कौतुकास्पद अन भावस्पर्शी कार्यक्रम करण्यात आला.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या आजी आजोबांचे चरण पूजन करून आशीर्वाद घेतले. या उपक्रमाचे पालकांनी तसेच विद्यार्थ्यांच्या आजी-आजोबांनी कौतुक केले. जयंतीनिमित्त शाळेतर्फे



विद्यार्थ्यांसाठी लाठीकाठी, दंड साखळी व कराटे यांचे प्रशिक्षण, व्याख्यान, दंत तपासणी, मेंटल हेल्थ अवेअरनेस शिबिर, आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी शिबिर आदी उपक्रमही राबविण्यात आले. याप्रसंगी आत्मतृप्ती योजनेच्या डब्यांचे पूजन करून त्यांचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी नगरसेवक सत्यनारायण गुर्रम, सिद्धेश्वर कमटम, दर्शन पटेल, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, राधिका चिलका, मोनिका कोठे, रमेश यन्नम, मुख्याध्यापिका पुष्पा नायर, श्रीनिवास म्याडम पंतलु तसेच शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## संत नामदेव महाराजांचा आज संजीवन समाधी सोहळा

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

श्री संत नामदेव शिंपी समाज सेवा मंडळाच्या वतीने मंगळवार, दि. ११ ऑगस्ट रोजी सोमवार पेठेतील मारुती पांडुरंग देवस्थान येथे संत नामदेव महाराजांचा संजीवन समाधी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत 'श्री'स अभिषेक, महापूजा, ह.भ.प.बाबुराव काळजे यांचे गुलालाचे कीर्तन, दोड्डी ग्रामस्थ भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम, पालखी दिंडी मिरवणूक, महाप्रसाद वाटप आदी कार्यक्रम होणार आहेत.

Classifieds

**विकणे आहे**

**सराफ बाजारातील सुसज्ज फर्निचरसह गाळा योग्य किंमत आल्यास त्वरित विकणे आहे.**
**संपर्क : ९९७५६३७९५९ ९९७५७२११२०**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

अुत्तम सेवा

मंगळवार
दि. ११ ऑगस्ट २०२६

## नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **भारतीय स्टेट बँक, SBI** | | | |
| १ | लिपीक (१५३८ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | २८ पर्यंत | २७/०८/२६ |
| २) | **इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन, IBPS** | | | |
| १ | लिपीक (११४०३ पदे) | पदवी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २८ पर्यंत | २१/०८/२६ |
| ३) | **इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन, ISRO** | | | |
| १ | असिस्टंट (११३ पदे) | पदवी (६०%) व संगणक ज्ञान असावे | २८ पर्यंत | १६/०८/२६ |
| २ | पर्सनल असि. (८१ पदे) | पदवी व १ वर्ष अनुभव संगणक ज्ञान | २८ पर्यंत | |
| ३ | उच्च श्रेणी लिपीक (२२ पदे) | पदवी (६०%) व संगणक ज्ञान असावे | २८ पर्यंत | |
| ४ | स्टेनोग्राफर (१० पदे) | पदवी (६०%) व टायपिंग स्टेनो व किमान १ वर्ष अनुभव असावा | २८ पर्यंत | |
| ४) | **इंडियन ओव्हरसीज बँक, IOB** | | | |
| १ | स्थानिक बँक अधिकारी (२५० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३० पर्यंत | २४/०८/२६ |
| ५) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | | | |
| १ | सेक्शन कंट्रोलर (११९ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३३ पर्यंत | १४/०८/२६ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्‌ॲप करावा.**

**सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.**
**२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)**
**३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.**

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

**अुत्तम सेवा**
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर,
सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर.
वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना व सर्व जनतेस विषेशतः बार्शी शहर व तालुक्यातील सर्व जनतेला या जाहीर नोटीसने कळविणेत येते की, डि. सोलापूर सब डि. व तालुका बार्शी व शहर हद्दीतील मिळकत गट नं. १३८७ त्याचे क्षेत्र ०९ एकर २० आर हि मिळकत नोटीस देणाऱ्यांचे आजोबा कै. भिमराव लक्ष्मण मुंढे व कै. लिंबराज लक्ष्मण मुंढे, रा. चुंब, ता. बार्शी यांचे एकत्र हिंदू कुटुंबाचे उत्पन्नातून श्री. अर्जुन भिमराव मुंढे, रा. बार्शी, ता. बार्शी, व कमळबाई गोवर्धन काळे रा. कोरेगांव, ता. बार्शी, यांचे नावे कै. भिमराव लक्ष्मण मुंढे व कै. औदुंबर त्रिंबक काळे हे एकमेकांचे मित्र असलेने वरील वर्णनाची मिळकत ही दोघांमध्ये खरेदी केलेली होती व आहे. असे असताना श्री. अर्जुन भिमराव मुंढे यांचे नावे केलेली असल्यामुळे केवळ त्यांचे मनात स्वार्थ बुध्दी निर्माण झालेली असल्यामुळे सदरची एकत्र कुटुंबाचे मिळकतीचे कायदेशीरपणे स्वतःचे मुलांचे, सुनांची नावे पोकळ स्वरूपाचे बक्षीसपत्र करून वरील कै. भिमराव लक्ष्मण मुंढे व कै. लिंबराज लक्ष्मण मुंढे हे दोघे मयत झालेले असल्यामुळे त्यांचे वारसदार यांना वरील मिळकतीमधील एकत्र हिंदू कुटुंबातील हिस्सा मिळू नये म्हणून स्वार्थ बुध्दीने स्वतःचे घरातील मुलांचे नावे काही क्षेत्राचे बेकायदेशीर बक्षीसपत्राचे दस्त करून हस्तांतर केलेले आहे. तसेच सदरच्या मिळकतीचे अर्जुन भिमराव मुंढे यांचे नावे असलेल्या मिळकतीमध्ये एकत्र हिंदू कुटुंबाचे वरील दोघांचे वारसदारांचा हक्क व अधिकार होता व आहे.

तसेच बार्शी तालुक्यातील चुंब, कोरेगाव, खडकोणी, कळंबवाडी (आ) तसेच धाराशिव जिल्ह्यातील भूम, तालुक्यातील आरसोली व वाशी तालुक्यातील कडकनाथ वाडी येथेही कै. भिमराव लक्ष्मण मुंढे व लिंबराज लक्ष्मण मुंढे यांचे एकत्र हिंदू कुटुंबाचे उत्पन्नातून खरेदी केलेल्या व वडीलोपार्जित असलेल्या वरील गावच्या मिळकतीस दोन्ही आजोबा मयत झाल्यानंतर वारसदार म्हणून नोंदी झालेल्या आहेत परंतु यातील सर्वच मिळकतीचे अद्याप पावेतो कसल्याही प्रकारचे वाटप झालेले नव्हते व नाही. अर्जुन भिमराव मुंढे यास एकत्र हिंदू कुटुंबाचे मिळकतीबाबत हस्तांतराचा कुठलाही दस्त करण्याचा हक्क अधिकार नव्हता व नाही.

सबब तरी या जाहिर नोटीसीने कळविणेत येते की, वरील मिळकती बाबत कोणाची फसगत होऊ नये म्हणून कोणीही बक्षीस, गहाण, दान, तारण, विक्री, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार अर्जुन भिमराव मुंढे, रा. रोडगा रस्ता, बार्शी यांचे बरोबर करू नयेत. या उपर केल्यास कै. भिमराव लक्ष्मण मुंढे व कै. लिंबराज लक्ष्मण मुंढे यांचे दोघांचे वारसाचे मुलामुलींचे हिश्श्यावर हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाची फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली. दि. १०/०८/२०२६

**सही/-**
**श्री. एस. पी. होनमुटे**
**ॲडव्होकेट, बार्शी मो. ९८६०५६९७१८**
**१) अभिजित पंडीतराव मुंढे**
**२) अनिल बाबुराव मुंढे**
**मु.पो. चुंब, ता. बार्शी**
**तर्फे ॲडव्होकेट**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






# सिध्दांत कोठारी, जयराज भिकाने आघाडीवर

## जगन्नाथ शिंदे चॅम्पियन चषक बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेत बारा वर्षाखालील गटात चौथ्या फेरीअखेर साडेतीन गुण मिळवून सिद्धांत कोठारी जयराज भिकाने यांनी इतर खेळाडू पेक्षा अर्ध्या गुणांची आघाडी घेतली आहे.

ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रमा जगदीश बहुउद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेच्या वतीने ही स्पर्धा आयोजित केली आहे. पंचवीस वर्षाखालील गटात पृथा ठोंबरे हिने साईराज घोडके चा पराभव करत आघाडी घेतली आहे. प्रसेनजित जांभळे, श्रेयस कुदळे, स्वराली हातवळणे, युवराज गायकवाड,भार्गव भास्करे,सानिध्य जमादार, वेद आगरकर हे खेळाडू आघाडीवर आहेत. या स्पर्धेत १४८खेळाडूंनी भाग घेतला असून ही स्पर्धा यशस्वी रित्या संपन्न करण्यासाठी या स्पर्धेचे प्रमुख पंच म्हणून सागर गांधी, ईरांन्ना जमादार, सचिन चव्हाण, संस्कार भस्मे, बिलानीसिद्ध बिराजदार, मंगल हुल्ले, सौरभ कुलकर्णी हे काम पहात आहेत.




















CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...




### कवी संतोष चिले यांना राष्ट्रीय भारत गौरव पुरस्कार प्रदान

**सांगोला, दि. १० ऑगस्ट-**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ओटवणे (ता.सावंतवाडी) येथील कवी संतोष चिले यांना राष्ट्रीय भारत गौरव पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार वितरण सोहळा डॉ.बाबासाहेब आंबेडकर संस्कृती भवन, पुणे येथे पार पडला. संतोष चिले यांनी बेटी बचाओ बेटी पढाओ, व्यसनमुक्ती, अमली पदार्थ विरोधी जन जागृती, अंधश्रद्धा निर्मूलन आणि निसर्ग संवर्धन यांसारख्या सामाजिक विषयांवर सातत्याने लेखन व काव्यरचना केल्या आहेत. या यशाबद्दल साहित्यिक, सांस्कृतिक व सामाजिक वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### मनोज जरांगे-पाटील यांचे सांगोल्यात पुष्पवृष्टीने स्वागत

**सांगोला, दि. १० ऑगस्ट-**

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील गेले दोन दिवस सांगयांचा पश्चिम महाराष्ट्र प्रत्यक्ष गाठीभेटी नियोजित दौरा शुक्रवार दि.७ ऑगस्ट पासून आयोजित करण्यात आला आहे. रविवार दि.९ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल, वाटंबरे, ता.सांगोला येथे जाहीर सभा हजारो संख्येच्या उपस्थितीत पार पडली. दरम्यान सदर सभेच्या ठिकाणी जाण्या अगोदर मनोज जरांगे पाटील यांचे सांगोला तालुक्यात ठिकठिकाणी व शहरात मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. हलगीच्या कडकडात व फटाक्यांची आतषबाजी करून जेसीबीच्या साह्याने फुलांची मुक्त उधळण करून त्यांचे स्वागत करण्यात आले. यासाठी सकल मराठा समाज, सांगोला शहर व तालुका यांनी परिश्रम घेतले. तसेच सदर मार्गावर विविध समाज बांधवांनी मोठ्या उत्साहात स्वागत करत त्यांचा सन्मान केला. सभा संपल्यानंतर पुढील सांगली जिल्ह्यातील दौऱ्यावर मार्गस्थ होताना त्या मार्गावरील सांगोला तालुक्यातील अनेक गावांनी त्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत केले. सदर स्वागत व सन्मान सोहळ्यातील युवकांचा, ग्रामस्थांचा उत्साह पाहून मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील भारावून गेले.

### प्रज्वल शिंदे यांची केन्द्रीय सशस्त्र पोलिस दलात सहाय्यक कमांडंट पदावर निवड

**श्रीपूर, दि. १० ऑगस्ट -**



जांबूड गुळुमकर वाडी येथील प्रज्वल शिंदे यांची केंद्रीय सशस्त्र पोलीस दलात सहाय्यक कमांडंट पदावर नियुक्ती झाली आहे. ते जांबूड गुळुमकरवाडी येथील राजकुमार शिंदे यांचे चिरंजीव आहेत. राजकुमार शिंदे हे महाराष्ट्र शासन कृषी विभागात कृषी सहायक म्हणून पुणे येथे कार्यरत आहेत. त्यांचा लक्ष्मी नारायण कट्टा ग्रुप आहे. त्या ग्रुपचे ते अध्यक्ष आहेत. प्रज्वल शिंदे यांनी एसी युपीएससीमार्फत क्लास वन अधिकारी झाले आहेत. त्यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन श्रीपाद कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार बी. टी. शिवशरण, भालचंद्र शिंदे पाटील, गौतम आठवले, अनिल दळवी, गुडुलाल शेख यांनी अभिनंदन केले. प्रज्वल शिंदे यांचे आजोबा श्रीपूर येथील दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडीकेट क्रेडिट एम्प्लॉइज सोसायटी मर्यादितमध्ये लेखनिक म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा देऊन आपले उज्वल भवितव्य घडवून ध्येय साध्य करावे असे श्रीपाद कुलकर्णी यांनी शुभेच्छा देताना सांगितले.

# मराठा तरुणांची आर्थिक कोंडी करणाऱ्यांना हटवा

## नरेंद्र पाटील आक्रमक; प्रसंगी राजीनाम्याचीही तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख हे आपल्या पदाचा गैरवापर करून मराठा समाजातील उद्योजक होऊ इच्छिणाऱ्या तरुणांसाठी जाचक नियम व अटी लादत असल्याने मराठा तरुणांची आर्थिक कोंडी होत असल्याचा गंभीर आरोप महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी आयोजित पत्रकार परिषदेत आज (दि. १०) केला.

दरम्यान, या अधिकाऱ्यांच्या मनमानी कार्यपध्दतीची चौकशी करून त्यांना पदावरून दूर करावे, अशी आपली मागणी असून, या मागणीची दखल घेतली नाही तर आपल्याला महामंडळाच्या खुर्चीवर बसण्याचा अधिकारच नाही. त्यामुळे प्रसंगी अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचीही आपली तयारी असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले.

अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या



लाभार्थ्यांना येत असलेल्या अडचणींचा आढावा घेण्यासाठी अध्यक्ष पाटील यांनी राज्यभर दौरा सुरू केला आहे. या पार्श्वभूमीवर ते सोलापुरात आले असता पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. जाचक अटींमुळे मराठा तरुण उद्योजक कसे होणार? व्यवस्थापकीय संचालकांकडून जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केले जात असल्याने मराठा समाज आणि सरकारमध्ये दरी निर्माण करून सरकारला बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे, असा गंभीर आरोपही त्यांनी केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी सकारात्मक भूमिका घेतली आहे. मात्र, महामंडळाच्या पातळीवर घेतल्या जाणाऱ्या निर्णयांमुळे शासनाविषयी मराठा समाजातील तरुणांमध्ये असंतोष निर्माण होत असल्याचे पाटील म्हणाले. आम्ही व्यवस्थापकीय संचालकांना तीन-चार वेळा पत्र देऊन नियम व अटींबाबत भूमिका स्पष्ट केली. मात्र, आमच्या पत्रांची कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. मराठा तरुणांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी महामंडळाची स्थापना झाली आहे. नियमांच्या नावाखाली त्यांच्याच मार्गात अडथळे निर्माण होत असतील तर ते खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा पाटील यांनी दिला.

नरेंद्र पाटील यांनी काही मागण्या केल्या असून, त्याची पूर्तता झाल्याशिवाय स्वस्थ बसणार नसल्याचे त्यांनी सांगितले. महामंडळाच्या दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करावी, बंद करण्यात आलेली वाहन कर्ज योजना पुन्हा सुरू करावी, कर्जासाठी लादलेल्या जाचक अटी व शर्ती रद्द कराव्यात, व्याज परताव्याची रक्कम दर महिन्याला महामंडळाकडे जमा करण्याची व्यवस्था करावी, उत्पन्नाच्या निकषासंदर्भातील जाचक नियमांचा पुनर्विचार करावा, मराठा तरुणांना उद्योग-व्यवसायासाठी कर्ज मिळण्याची प्रक्रिया सुलभ करावी, अशा त्यांच्या मागण्या आहेत. या पत्रकार परिषदेस जिल्हा परिषदेचे सदस्य नेताजी खंडागळे, नगरसेवक अनंत जाधव, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण, सौदागर पवार उपस्थित होते.

### मुख्यमंत्र्यांना माहिती देणार

मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या उपस्थितीत येत्या दोन दिवसांत बैठक होणार आहे. या बैठकीत महामंडळातील सर्व प्रश्न आणि व्यवस्थापकीय संचालकांच्या कारभाराबाबतचे मुद्दे मांडण्यात येणार आहेत. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन संपूर्ण प्रकरणाची माहिती देणार असल्याचे नरेंद्र पाटील यांनी सांगितले.

# मोडनिंबमध्ये विठ्ठल पालखी सोहळ्याचे स्वागत

## अश्वपूजन, पुष्पवृष्टी सोहळा ; भाविकांची दर्शनासाठी गर्दी




**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १० ऑगस्ट -**

पंढरपूरहून श्री संत सावता माळी यांच्या भेटीसाठी अरणकडे मार्गस्थ झालेल्या श्री विठ्ठलाच्या पालखी सोहळ्याचे मोडनिंब (ता. माढा) येथे आगमन होताच जल्लोषात स्वागत करण्यात आले.

मोडनिंबमध्ये ग्रामस्थांकडून स्वागत प्रसंगी भव्य पुष्पवृष्टी आणि फटाक्यांच्या आतिशबाजी करण्यात आली. पालखी सोहळ्याचा पहिला मुक्काम रोपळे आणि दुसरा मुक्काम आष्टी (ता. मोहोळ) येथे पार पडला. आज सोमवारी दुपारी पालखी सोहळा मोडनिंबच्या हद्दीत दाखल झाला. विठुरायाची पालखी शहरात येताच भाविक, ग्रामस्थांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. पालखीचे दर्शन घेण्यासाठी मोडनिंब व परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. अनेक भाविकांनी पालखीसमोर नतमस्तक होत दर्शन घेतले. टाळ-मृदंगाचा गजर, हरिनामाचा जयघोष आणि भक्तिमय वातावरणामुळे मोडनिंब नगरीत जणू पंढरी अवतरल्याचा अनुभव भाविकांना आला.

पालखी सोहळ्यात सहभागी वारकऱ्यांसाठी स्थानिक नागरिक व भाविकांच्या वतीने पाणी, चहा, अल्पोपहार तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. पालखी मार्गावर भाविकांनी ठिकठिकाणी रांगोळ्या काढून व फुलांची सजावट करून भक्तिभावाने स्वागत करण्यात आले.

मोडनिंब येथील स्वागतानंतर विठ्ठलाची पालखी संत सावता माळी महाराजांच्या भेटीसाठी अरणच्या दिशेने मार्गस्थ झाली. अरण येथे पालखीच्या आगमनानंतर संत सावता माळी महाराजांच्या पुण्यभूमीत विठ्ठल भक्तीचा सोहळा रंगणार असून, या सोहळ्यासाठी परिसरातून वारकरी, भाविक उपस्थित राहणार आहेत.

### मोडनिंब नगरीत अवतरली पंढरी

''विठुरायाची पालखी मोडनिंब शहरात दाखल होताच संपूर्ण वातावरण विठ्ठलमय झाले होते. टाळ-मृदंगाचा गजरात, भगव्या पताकांचा फडफडाट आणि विठ्ठल-विठ्ठल, जय हरी विठ्ठल च्या जयघोषाने अवघी मोडनिंब नगरी दुमदुमून गेली. पालखीचे दर्शन घेण्यासाठी अलोट गर्दी जमली होती. मोडनिंब शहरात जणू साक्षात पंढरपूरच अवतरल्याचा भास होत होता.



# वैराग येथे सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांनी आदिवासी दिन साजरा

## आकर्षक पारंपरिक नृत्य, कला प्रदर्शनाने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १० ऑगस्ट-**

वैराग येथील विविध सामाजिक व सांस्कृतिक संस्थांच्या वतीने जागतिक आदिवासी दिन साजरा झाला. यावेळी विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम, प्रबोधनात्मक रॅलीचे आयोजन करण्यात आले. उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वैराग शहरात हा दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान आदिवासी समाजाची समृद्ध परंपरा, कला आणि सामाजिक एकतेचे दर्शन घडवणारे विविध उपक्रम पार पडले. त्यात रक्तदान शिबिर, वृक्षारोपण मोहीम, पारंपरिक नृत्य व रॅली काढण्यात आली. आदिवासी समाजाचे आकर्षक पारंपरिक नृत्य, कला प्रदर्शन आणि जनजागृतीपर रॅलीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या सोहळ्याला प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

पोलीस निरीक्षक अमुल कादबने, वैरागचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर, बाळू भोसले, सागर शिंदे, सुनील भोसले, योगेश भोसले, अतुल काळे, किरण काळे, ॲड. सुहास कांबळे, प्रशांत भालशंकर, शाहीर शिंदे, महेश भोसले, अजय भोसले, अमोल शिंदे, सचिन भोसले, किरण भोसले, ॲड. नितीन शिंदे आणि ॲड. उषा पवार आदींनी संबोधित केले. कार्यक्रमात मान्यवरांनी आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याबाबत मार्गदर्शन केले.

### यशस्वी व्यक्तींचा सन्मान

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करून समाजाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या व्यक्तींचा या प्रसंगी विशेष सन्मान करण्यात आला. यामुळे कार्यक्रमाला वेगळीच शोभा प्राप्त झाली.

# नालेसफाईतील अनियमिततेचा अहवाल सात दिवसांत द्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

▶▶ महापालिका आयुक्तांचे चौकशी समितीला आदेश

▶▶ मुख्य लेखापरीक्षकांसह उपअभियंत्याचा समावेश

नालेसफाईच्या कामातील कथित आर्थिक अनियमिततेच्या चौकशीला आता वेग आला आहे. चौकशी समितीने सात दिवसांत अहवाल सादर करावा,. चौकशी अधिक व्यापक करण्यासाठी समितीत मुख्य लेखापरीक्षक सदानंद वाघमोडे आणि उपअभियंता आनंद जोशी यांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे,असे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

नालेसफाईच्या कामातील आर्थिक अनियमिततेबाबत नगरसेवक अनंत जाधव यांनी तक्रार केली होती. चौकशी समितीत मुख्य लेखापरीक्षकांचा समावेश करावा, अशी मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली होती. त्यानंतर मुख्य लखा परीक्षक सदानंद वाघमोडे आणि उपअभियंता आनंद जोशी यांचा समितीत समावेश करण्यात आला.

नालेसफाईतील अनियमिततेची चौकशी करण्यासाठी आयुक्तांनी २१ जुलै रोजी समिती गठित केली होती. अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ. रत्नराज जवळेकर आणि कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती यांचा समितीत समावेश करण्यात आला होता. समितीला १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते.

मात्र, निर्धारित मुदतीत चौकशी पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे समितीचा विस्तार करण्यात आला असून, आता नव्या सदस्यांसह चौकशी पूर्ण करून सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले आहेत.

नालेसफाईच्या कामातील खर्च, प्रत्यक्ष कामाची स्थिती आणि आर्थिक व्यवहारांबाबत तक्रारी झाल्याने या चौकशीच्या अहवालाकडे महापालिका वतुर्ळाचे लक्ष लागले आहे.

# वडशिंगेच्या ऐतिहासिक कुस्ती परंपरेला गालबोट

## आनंद जाधव यांची यात्रा समितीच्या कारभारावर टीका

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. १० ऑगस्ट-**

माढा तालुक्यातील ऐतिहासिक वडशिंगे येथील रामसिद्ध बुवा यात्रेनिमित्त आयोजित भव्य कुस्ती स्पर्धेतील मानाची कुस्ती अनिर्णीत (जोडीवर) सोडल्याच्या घटनेवरून निर्माण झालेला वाद आता चांगलाच पेटला आहे. याप्रकरणी डोनर आनंद आगतराव जाधव यांनी कुर्डुवाडी येथे पत्रकार परिषद घेऊन यात्रा समितीच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

स्पर्धेत रॅप सिंगर उर्फ शुभम जाधव यांच्या सौजन्याने ५,०५,५५५ बक्षीस रक्कमेची मानाची कुस्ती आयोजित केली होती. ही लढत महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख आणि उपमहाराष्ट्र केसरी माऊली कोकाटे या दोन दिग्गज मल्लांमध्ये रंगली होती. मात्र, केवळ १५ मिनिटांचा वेळ दिल्यानंतर पंचांनी ही कुस्ती जोडीवर सोडल्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे उपस्थित हजारो कुस्तीप्रेमी, मल्ल आणि ग्रामस्थांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असल्याचे जाधव यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

पंचांच्या निर्णयावर आणि यात्रा समितीच्या नियोजनावर आक्षेप घेत आनंद जाधव म्हणाले, ''स्पर्धेत संबंधित नियमांचे काटेकोर पालन होत नसल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. यात्रा समितीने निष्पक्ष भूमिका घेतली नाही, तर आम्ही सर्व उपलब्ध कायदेशीर उपायांचा अवलंब करू.

वडशिंगे गावाच्या कुस्ती परंपरेचा उल्लेख करताना जाधव पुढे म्हणाले, ''यात्रेचे योग्य नियोजन, पारदर्शक व्यवस्थापन आणि पंचांचे निर्णय निष्पक्ष असणे अत्यंत गरजेचे आहे. अशा प्रकारच्या वादग्रस्त घटनांमुळे वडशिंगे गावच्या ऐतिहासिक कुस्ती परंपरेला गालबोट लागत आहे. गावाची आणि कुस्तीची प्रतिष्ठा जपण्यासाठी सर्व संबंधितांनी जबाबदारीने काम करणे काळाची गरज आहे.''

### आनंद जाधव यांचे आरोप चुकीचे

वडशिंगे गावातील यात्रेची परंपरा ही १०० ते १५० वर्षापासून सुरू आहे. यात्रा कमिटीच्या वतीने भरवण्यात येणाऱ्या कुस्तीबाबत सर्व निर्णय हे पंचाचे अंतिम असतात. एखादी कुस्ती १५ मिनिट खेळल्यानंतर आम्ही ती बरोबरीत सोडतो,तो निर्णय आमचा आहे. आनंद जाधव यांचे आरोप चुकीचे आहेत. त्यांनी यापुढे खोटे आरोप केले तर आम्ही देखील त्यांच्या विरोधात पत्रकार परिषद घेऊन त्यांची सत्यता समोर आणणार आहोत.

**- पांडुरंग जाधव, सदस्य, रामसिद्ध बुवा यात्रा कमिटी, वडशिंगे.**

### जिल्हा परिषद मदनेवस्ती शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि. १० ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मदने वस्ती शाळेच्या विद्यार्थ्यांनी २०२६मध्ये झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत दैदीप्यमान यश संपादन केले. वृषाली जावळे हिने २५८ गुण मिळवित पिलीव केंद्रात प्रथम क्रमांक मिळविला. वरद जावळे हा २३८ गुण मिळवित शिष्यवृत्तीधारक ठरला. दोघांना अप्पासाहेब पोतदार यांचे विशेष मार्गदर्शन लाभले .या यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे माळशिरस पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, केंद्रप्रमुख राजकुमार फासे, झिंजेवस्तीच्या माजी सरपंच उमा जावळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी यांच्याकडून अभिनंदन होत आहे.

## 'फिटरीयम जिम' फिटनेस नाही, तर फिट जीवनशैलीची सुरुवात!

आता फिटनेस ची चिंता सोडा.. होय सोलापुरातील प्रीमियर अशा फिटरिअम जिम मधून तुमचा फिटनेस चा प्रवास सुरू होणार आहे... तुमचं स्वागत आहे फिटरीयम जिम मध्ये.. जे आहे सोलापूर शहराच्या मध्यवर्ती भागात..

FITRIUM GYM
"Elevate Your Strength, Master Your Potential."

फिटरियम देतो तुम्हाला जागतिक दर्जाच्या सुविधा.. नामांकित इम्पोर्टेड यंत्रसामग्री आणि अल्हाददायक मनप्रसन्न करणाऱ्या वातावरणात आता फिटनेस अनुभवा.

फिटरिम जिमचं का जॉईन करायचं ? अहो याची अनेक कारणे आहेत..जसे की, कार्डिओ सेशन मध्ये आमच्या उच्च दर्जा कार्डिओ वर्क आऊट सह कॅलरीज बर्न करा, योगा आणि पावर योगा मध्ये आमच्या तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली योग सत्रासह संतुलन लवचिकता आणि ताकद मिळवा.
क्रॉस फिट मधून मिळवा त्रिव्र कार्यात्मक फिटनेस.. आधुनिक स्टीम बात मध्ये आराम करताना अनुभवा मनाचा आणि शरीराचा ताजेपणा.. सोलापूर जिल्ह्यातील पहिला आणि एकमेव अल्ट्रा मॉडर्न स्पायडर क्लाइंबिंग मशीन जे ताकद आणि सहनशक्ती वाढवण्यास आणि संपूर्ण शरीर व्यायाम करण्यास मदत करते...आरोग्याबद्दल प्राथमिक माहिती आणि जागृतीसाठी BMI (Body mass Index) मशीन द्वारा चाचणी.. शिवाय महिलांसाठी सक्षम वातावरणात खास डिझाईन केलेले सत्र आणि वेळ सुद्धा..
युवतीने आत्मनिर्भर आणि सुरक्षित राहण्यासाठी स्वसंरक्षण (self defence) प्रशिक्षण.. लेडीज आणि जेंट्स पात्र प्रशिक्षकांकडून वैयक्तिक मार्गदर्शन.. सुरक्षेसाठी बायोमेट्रिक्स प्रवेश तसंच लॉकररूम ची सुरक्षित आणि स्वतंत्र व्यवस्था..९० दिवसाचा विशेष प्रोग्राम.. ज्यात तुम्ही अनुभवू शकता तुमचा आलेख.. आम्ही सकाळी ०६ ते रात्री १० पर्यंत आपल्या सेवेत आहोत. एकदा भेट द्या, आम्हाला खात्री आहे की तुम्ही फिटरियमच्या प्रेमात पडणार . आजच संपर्क करा आमच्याशी..
Mobile-7262061001 / 7262071001
Website -www.fitriumgym.com
Address-Fitrium Gym, 816, Mangalwar Peth, Saraf Bazaar, Solapur - 413 002

तुमच्या फिटनेसची क्रांती इथूनच सुरू होते.



# लोकल टु ग्लोबल अन् ग्लोबल टु लोकल!



## आमदार सुभाषबापूंचा नवा अध्याय सुरू!

**लोकमंगल फाऊंडेशनप्रमाणेच सोलापूर सोशल फाऊंडेशन आणि आता विश्वमंगल मराठी फाऊंडेशन, विश्वमंगल बिजनेस फोरमच्या माध्यमातून लोकल टु ग्लोबल अन् ग्लोबल टु लोकल या संकल्पनेतून आमदार सुभाष देशमुख यांनी आपल्या जिल्ह्यासह महाराष्ट्र राज्यासाठीही काम चालू केले असल्याने आमदार सुभाष देशमुखांच्या कामाची कमालच म्हणावी लागेल. ही थोर संकल्पना, नवा अध्याय असा की, सोलापूर जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी निर्माण केलेले उत्पादन विश्वात पोहोचवायचे आणि आपल्या जिल्ह्यातून, राज्यातून विविध देशात गेलेल्या उत्पादकांना आपल्या राज्यात, जिल्ह्यात आणून त्यांच्या नाविण्यपूर्ण उद्योगाच्या उत्पन्नातून आपल्या नागरिकांचा आर्थिक आलेख उंचवायचा... हा विडा आता आमदार देशमुखांनी उचलला आहे आणि त्यास प्रतिसादही मिळू लागल्याचे समाधान आमदार देशमुखांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना व्यक्त केले.**

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघाचे आमदार सुभाष सुरेशचंद्र देशमुख उर्फ बापू हे भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ व प्रमुख सदस्य. मृदुभाषी स्वभाव, संवाद साधण्याची कला, सर्वांना जोडून घेण्याची वृत्ती, लोकांचे म्हणणे ऐकून घेण्याची कला, पक्ष संघटन कौशल्य, उत्तम निर्णयक्षमता या गुणांमुळे बापूंना आजतागायत कार्यकर्ते व जनतेचा विश्वास आणि उत्तम पाठिंबा लाभला आहे. त्यांनी भूषविलेल्या मंत्रीपदावरून त्यांनी नेहमी जनहिताचे निर्णय घेतले व महाराष्ट्राला प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर ठेवण्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. यामुळे त्यांची लोकप्रियता सोलापुरातच नाहीतर अवघ्या राज्यात वाढली. लोकमंगल समूहाच्या माध्यमातून आमदार देशमुखांनी अनेक जनहिताची आणि सामाजिक कामे केली आहेत. त्यांनी सोलापूर जिल्ह्यात शेती, साहित्य, शिक्षण, जलसंधारण, सर्वधर्मिय सामुदायिक विवाहसोहळा, आरोग्य, युवा पिढी आणि वृक्षलागवड क्षेत्रात मोठे सामाजिक काम केले आहे. तसेच लोकमंगल फाऊंडेशनच्या माध्यमातून अन्नपूर्णा योजना राबवून दररोज शेकडो निराधार लोकांना मोफत ३ वेळ जेवण पुरवण्यासारखा सामाजिक उपक्रमही त्यांच्या माध्यमातून राबवला जात आहे. समृध्द गाव अभियान, पर्यटन सप्ताह, सोलापूरचा गारमेंट उद्योग, सोलापुरी चटणी, सोलापूरचे धार्मिक पर्यटन असे उपक्रम आजही त्यांचे चालूच असून, यामुळे विकासकामांचा डोंगर रचणारे बापू अशी ओळखही त्यांची झाली आहे. यामुळे ८० टक्के समाजकारण आणि २० टक्केच राजकारण त्यांच्या वागण्या-बोलण्यातून दिसून येते. (पान ५ वर)

### सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळा



**विवाह** सोहळा म्हणलं की खर्च वाढतो. शेतकरी, कष्टकरी समाजाची बेताच्या आर्थिक परिस्थितीमुळे आपल्या मुला- मुलींच्या विवाहासाठी बरीच आर्थिक ओढाताण होते. हे लक्षात घेऊन बापूंनी सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले. या योजनेमध्ये विवाह तर मोफत होतोच परंतु या जोडप्यांना संसारोपयोगी साहित्याचे वाटपही केले जाते. याचबरोबर व्यवसाय सुरू करण्यासाठी अर्थसहाय्य केले जाते. लोकमंगल फाऊंडेशनतर्फे यंदाचे २१ वे वर्ष असून, ४८ वा सोहळा पार पडला आहे. या सोहळ्यात वाटचालीत तब्बल ३२३० जोडपी विवाहबद्ध झाली आहेत. हा सोहळा समाजा-तील एकात्मता, साधेपणा आणि समानतेचा संदेश देतो. साधेपणा, समता आणि सामाजिक बांधिलकी जपणारा हा केवळ एक सोहळा नाही, तर परिवर्तनाची एक चळवळ आहे.



### अन्नपूर्णा योजना

**ज्येष्ठ** नागरिक म्हणजे समाजाचा आधार. परंतु ज्या ज्येष्ठांना कौटुंबिक आधार नाही त्यांच्या वाटेला उपेक्षा येऊ नये, त्यांचे हाल, उपासमार होऊ नयेत यासाठी 'अन्नपूर्णा योजना' राबविली जाते. या अंतर्गत ५०० वृध्द व निराधार ज्येष्ठ नागरिकांना दररोज दोन वेळा मोफत भोजन घरपोच पुरविले जाते. हीच योजना आता त्यांनी जवळच्या धाराशिव जिल्ह्यातही सुरू केली आहे.

### सुभाषबापूंची राजकीय वाटचाल

**सोळा** वर्षे कंत्राटदारीच्या कामांचा व्यवसाय व बरोबरीने समाजकार्य यामध्ये बापूंनी नाव मिळविले होते. स्थानिक स्वराज्य संस्थेचे, राजकीय पक्षाचे सदस्यही नव्हते. १९९८ साली जानेवारी महिन्यात सोलापूर स्थानिक स्वराज्य संघाची निवडणूक जाहीर झाल्यानंतर भारतीय जनता पक्षातर्फे एक खंबीर, लोकप्रिय नेतृत्व म्हणून सुभाषबापूंचे नाव निश्चित करण्यात आले. सामाजिक दृष्टी, गोरगरिबांच्या अडचणी सम जून घेण्याची वृत्ती यांमुळे बापूंना मोठा जनाधार लाभला. या निवडणुकीत प्रचंड मताधिक्यासह विजय प्राप्त करत बापूंनी आमदारकी मिळविली व येथे त्यांच्या राजकीय कारकीर्दीचा शुभारंभ झाला. यानंतर आजवर बापूंनी पक्षातर्फे पाच वेगवेगळ्या मतदारसंघात निवडणुका लढविल्या. तसेच त्यांना विधानपरिषद सदस्य, लोकसभा सदस्य, विधानसभा सदस्य असे तीन सभागृहाचे सदस्यत्व प्राप्त झाले आहे.

सर्वप्रथम बापूंनी जानेवारी १९९८ मध्ये सोलापूर येथे स्थानिक स्वराज्य संस्थेतून विधानपरिषद निवडणुकीत विजय मिळवत आमदारकी प्राप्त केली. २००४ साली लोकसभेची निवडणूक जिंकून त्यांनी लोकसभा सदस्यत्व स्वीकारले. २०१४ च्या निवडणुकीत निवडून आल्यानंतर आ. देशमुखांनी महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेत सहकार, पणन व वस्त्रोद्योग या खात्यांचा पदभार स्वीकारला. यानंतर ऑक्टोबर २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्येही दक्षिण सोलापूर मतदारसंघातील जनतेने पुन्हा त्यांना चांगला कौल दिल्याने पुन्हा एकदा ते आमदार झाले आहेत.

### गोरगरिबांसाठी उभारले हॉस्पिटल

**समाजाला** सशक्त बनवण्यासाठी सर्व समाज घटकांचे आरोग्य उत्तम राखणे आवश्यक असते. विशेषतः ग्रामीण भागातील गरीब रुग्णांसाठी महाआरोग्य शिबिरांचे आयोजन सातत्याने केले जाते. या योजनेअंतर्गत आजवर हजारो रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या गेल्या आहेत. बेताची आर्थिक परिस्थिती हा उपचारांमधील अडसर ठरू नये यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रस्ट संचलित लोकमंगल जीवक हॉस्पिटल आणि संशोधन केंद्र या हॉस्पिटलची स्थापना केली गेली. येथे गरजूंवर नाममात्र शुल्कामध्ये उपचार केले.

### दक्षिण'च्या विकासकामांची मुख्यमंत्र्यांनी घेतली दखल

**दक्षिण** सोलापूरच्या विकासासाठी महत्त्वाच्या असलेल्या अनेक प्रकल्पांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्यासमवेत स्वतंत्र बैठक झाल्याने यावेळी आमदार देशमुखांची त्यांचे लक्ष वेधले. यामध्ये भीमा-सीना जोड कालवा प्रकल्प, कुडल संगम तीर्थक्षेत्राचा विकास, सीना-भीमा नदीवरील बॅरेजेस, मंद्रूप येथील नवीन बसस्थानक, होटगी येथील आयटी पार्क, जुळे सोलापूर येथे आधुनिक नाट्यगृह उभारणी, दुबई युनिफॉर्म गारमेंट प्रदर्शनासाठी शासकीय सहकार्य, कौशल्य विकास विद्यापीठाची उभारणी तसेच शासनाच्या विविध विकासकामे आणि जनहिताच्या योजनांचा समावेश होता. आमदार सुभाष देशमुख यांनी या सर्व विषयांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा करून आवश्यक पाठपुरावा करण्याची विनंती केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनीही प्रत्येक विषयाची सकारात्मक दखल घेत संबंधित कामांना गती देण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. यावेळी सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध पायाभूत सुविधा, रोजगारनिर्मिती, औद्योगिक वाढ, कौशल्य विकास आणि धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण प्रकल्पांवर सकारात्मक चर्चा झाली. या विकासकामांमुळे दक्षिण सोलापूरसह संपूर्ण सोलापूर जिल्ह्याच्या प्रगतीला चालना मिळेल, असा विश्वास आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केला.





### जलसंधारणावरही बापूंचे लक्ष

**एकीकडे** विकासाकडे वाटचाल सुरू असताना पाण्याचा प्रश्न मात्र दिवसेंदिवस मोठा होत चालला आहे. यावर वेळीच उपाय केले नाहीत तर भविष्यात पाण्याचे मोठे संकट समाजापुढे उभे राहील. लोकसहभागातून पुढाकार घेत बापूंनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या योजने अंतर्गत अनेक कामे केली. ओढे, तलाव, बंधारे यांसारख्या जल स्त्रोतांमध्ये साठणार्या गाळामुळे त्यांची साठवण क्षमता कमी होते. यासाठी सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील अनेक ठिकाणी ओढे, तलाव, बंधार्यांचे रुंदीकरण, खोलीकरण, सरळीकरण केले गेले.

### लोकमंगलच्या माध्यमातून पुरस्कार

माणसाच्या गुणवैशिष्ट्यांचा समाजाने केलेला सन्मान म्हणजे पुरस्कार. बापूंनी लोकमंगल फाऊंडेशन आणि वाचनालयाच्यावतीने साहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या व्यक्तींसाठी साहित्य पुरस्कारांचे वितरण केले जाते. याचबरोबर इतर क्षेत्रातील गुणवंतांनाही पुरस्कार चालू केले आहेत.

### सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री

**महाराष्ट्राला** समृद्ध करण्यासाठी सहकार क्षेत्र समृद्ध करणे आवश्यक आहे. सहकारी संस्था या सर्वसमावेशक असल्याने सामान्य जनतेच्या प्रत्यक्ष सहभागातून त्या उभ्या रहात असतात. मर्यादित कंपन्यांचे मालकी हक्क हे केंद्रीकृत असतात परंतु सहकार तत्वावर चालणाऱ्या व्यवसायामध्ये अनेकांचे सहकार्य लाभत असल्याने विकासाचा, प्रगतीचा वेग हा अधिक असतो. विशेषतः ग्रामीण भागाला समृद्ध करण्यासाठी सहकार क्षेत्र वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे सहकार खात्याचा पदभार स्विकारल्यानंतर बापूंनी सहकार क्षेत्र बळकट केले.



अविनाश गायकवाड
विशेष मुलाखत

### वस्त्रोद्योग क्षेत्रात रोजगाराच्या युवकांना संधी

**महाराष्ट्रामध्ये** कृषी व त्या खालोखाल वस्त्रोद्योग क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. तरुणांना या संधीची ओळख व्हावी व अधिकाधिक तरुणांनी या संधींचा लाभ घ्यावा यासाठी विविध योजना व उपक्रम यांच्या मार्फत बापू प्रयत्न करीत आहेत. कापूस उत्पादनापासून रेडिमेड गारमेंट्स बनविण्यापर्यंत अनेक उद्योग येथे निर्मिले जाऊ शकतात; त्यांना मेक इन इंडिया, स्टार्ट अप सारख्या योजनांची जोड देत तरुणांना, महिलांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून देणे हे बापूंचे लक्ष्य होते.

### विद्यादानाचीही भरीव कामगिरी

शिक्षण हा सशक्त समाजाचा पाया असतो हे ओळखून समाजातील कोणताही घटक शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी बापूंनी अविरत प्रयत्न केले. बापूंनी विद्यादान योजने अंतर्गत दरवर्षी २५० गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दत्तक घेतले आहे. मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देत जिल्ह्यातील १५० मुलींच्या नावावर शुभमंगल योजनेच्या माध्यमातून २००० रुपयांची ठेवही ठेवण्यात आली आहे. शिक्षणाविषयी ओढ, तळमळ याचा वारसा बापूंना त्यांच्या आई वडिलांकडून मिळाला. बापूंनी शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी श्रीराम प्रतिष्ठान मंडळाच्या माध्यमातून वडाळ्यासारख्या ग्रामीण भागात नवे शिक्षण संकुल सुरू केले आहे.

### सांगलीचे पालकमंत्री असताना साधली प्रगती

**सांगली** जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर सुभाषबापूंनी सांगली जिल्ह्याच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू केले. राज्य व केंद्र सरकारच्या जनहिताच्या योजना कोणत्याही परिस्थितीत समाजातील अखेरच्या घटकांपर्यंत पोहचल्या पाहिजेत, यामध्ये हयगय होता कामा नये. हा दृष्टिकोन ठेवून काही निर्णय घेतले. सामान्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आणि सांगली जिल्हा कृषी, औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा, अशा सर्वच क्षेत्रात विकासाच्या सर्व टप्प्यांवर अग्रेसर ठेवण्यासाठी ते नेहेमीच कटिबद्ध राहिले.

### शेती व शेतकऱ्यांसाठीही विशेष काम

**शेती** उत्पादने व कृषिउद्योग उत्पादनांची विक्री व पणन यांद्वारे अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी बापू कार्यरत राहिले. कृषी उत्पन्न बाजार समिती, मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी शेतीमालाच्या विक्रीची व्यवस्था करणे, मालाला हमीभाव मिळवून देणे या क्षेत्रातील त्रुटी दूर करून व्यवस्था सुरळीत राखणे हा बापूंचा प्राथमिक अजेंडा होता. शेतकऱ्यांना वि. वि. सोसायट्यांचा सभासद करून घेण्याचा आदेश, संचालकांची मालकशाही मोडीत काढण्यासाठी शेतकऱ्यांना बाजार समितीत मतदानाचा अधिकार यांसारख्या महत्वाच्या निर्णयांचा समावेश होतो.

### समृध्द गाव अभियान, गारमेंट, पर्यटन सप्ताहावर विशेष लक्ष

आमदार देशमुखांनी जिल्ह्यातील काही गावात समृध्द गाव अभियान जोरदार राबविले. बचत गट, उद्योजकांच्या मालाला बाजारपेठ मिळावी यासाठी पुणे, ठाणे, मुंबई, खारघर आणि पंढरपूर येथे महोत्सव घेतले. सोलापूरच्या गारमेंट व्यवसायाला चांगले दिवस येण्यासाठी बेंगलोर, हैदराबाद, मुंबई, वाराणसी, सोलापूर, नंतर आता चेन्नईत १० वे आंतरराष्ट्रीय गारमेंट प्रदर्शन येत्या डिसेंबर महिन्यात होणार आहे. यामुळे स्थानिक उद्योजकांना आंतरराष्ट्रीय व्यवसायाच्या संधी मिळत आहेत.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर | मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# मनोज जरांगे-पाटील यांच्या मराठा आंदोलनद्वारे जात प्रमाणपत्र समित्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न

## लक्ष्मण हाके यांचा गंभीर आरोप

## ओबीसी आरक्षण आले धोक्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० ऑगस्ट-**

महाराष्ट्रातील ओबीसी आरक्षण आजच्या घडीला धोक्यात आले आहे. मनोज जरांगे-पाटील यांच्या मराठा आंदोलनाच्या माध्यमातून जात प्रमाणपत्र व जात पडताळणी समित्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न होत आहे, असा गंभीर आरोप 'ओबीसी'चे नेते लक्ष्मण हाके यांनी सोलापुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओबीसींच्या जागांवर मराठा-कुणबी समाजातील उमेदवार निवडून आल्याने मूळ



ओबीसी समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. 'ओबीसी आमचा डीएनए आहे' असे मुख्यमंत्री म्हणतात, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

आज ओबीसी आरक्षणाचा प्रश्न आहे. उद्या एससी-एसटी आरक्षणावरही परिणाम होऊ शकतो. जातनिहाय जनगणना, भटक्या-विमुक्त समाजाची नोंद आणि ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर आंबेडकरी व दलित चळवळीतील संघटनांनीही पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले.

### सत्ताधारी आणि पुरोगामी नेते गप्प का आहेत?

मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनातील भाषेवरही हाके यांनी आक्षेप घेतला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूलमंत्री, ओबीसी नेत्यांबद्दल आक्षेपार्ह भाषा वापरली जात असताना सत्ताधारी आणि पुरोगामी नेते गप्प का आहेत? असा सवाल त्यांनी केला.

### प्रसाद लाड यांच्या कंपनीला कंत्राटे कशी मिळतात?

प्रसाद लाड यांच्या कंपनीला मिळणाऱ्या शासकीय कंत्राटांबाबतही लक्ष्मण हाके यांनी गंभीर आरोप केले. दरम्यान, कंपनीला मोठ्या प्रमाणात कंत्राटे कशी मिळतात? त्यामध्ये विविध आरक्षित प्रवर्गातील किती तरुणांना रोजगार मिळाला? याबाबतची माहिती गोळा करणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

शिक्षक भरतीसह सरकारी नोकऱ्यांमध्ये ओबीसी, व्हीजेएनटी, एससी-एसटी समाजाला अपेक्षित प्रतिनिधित्व मिळत नाही, असा आरोपही त्यांनी केला.

यावेळी शंकर लिंगे, प्रशांत इंगळे, अर्जुन सलगर, पवन पाटील, शेखर बंगाळे, आप्पासाहेब व्हनमाने, प्रतिभा चव्हाण आदी उपस्थित होते.

## 'वालचंद'ची सृष्टी सगरे वक्तृत्व स्पर्धेत प्रथम

**सोलापूर, दि.१० ऑगस्ट-**

सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ व प्रज्ञाश्रमण दिगंबर जैन जनकल्याण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् अ‍ॅन्ड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११ व्या इयत्तेत शिकणारी सृष्टी चंद्रकांत सगरे हिने प्रथम क्रमांक पटकावले. राजकारणात युवकांची गरज या विषयावर तिने वक्तृत्व सादर केले होते. सहशिक्षक चंद्रशेखर कस्तुरे व चेतन तुपकर यांचे तिला मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयचे प्राचार्य डॉ.संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ.जीवराज कस्तुरे यांनी तिचे अभिनंदन केले.

## 'कुलगुरु' जेव्हा 'मानद कर्नल' म्हणून जबाबदारी स्वीकारतात...

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० ऑगस्ट-**

कुलगुरु हे केवळ एक प्रशासकीय प्रमुख नसून ते हजारो विद्यार्थ्यांसाठी एक दिशादर्शक असतात. विद्यापीठाचे 'कुलगुरु' जेव्हा 'मानद कर्नल' म्हणून जबाबदारी स्वीकारतात, तेव्हा ते विद्यापीठातील सर्व एनसीसी युनिटचे प्रमुख मार्गदर्शक बनतात, ज्यामुळे विद्यार्थी व सैन्यदल यांच्यातील दुवा अधिक भक्कम होतो, असे प्रतिपादन एनसीसी पुणेचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर एस.पी.एस. रौतेला यांनी केले.

उच्च शिक्षणातील उत्कृष्ट नेतृत्व, प्रदीर्घ समर्पण आणि नॅशनल कॅडेट कोरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शिस्त रुजवण्याच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.डॉ.प्रकाश महानवर यांना भारतीय




सैन्यदल आणि एनसीसी महासंचालनालयाकडून कर्नल पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी ते बोलत होते.

कुलगुरु प्रा.डॉ.प्रकाश महानवर यांना कर्नल पदाची रँक, कॅप आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्र.कुलगुरु प्रा.लक्ष्मीकांत दामा, प्र.कुलसचिव डॉ.अतुल लकडे, वित्त अधिकारी डॉ.महादेव खराडे, परिक्षा नियंत्रक डॉ.श्रीकांत अंधारे, प्रसिध्दि समिती समन्वयक डॉ.मलिक रोकडे, कुलगुरु महानवर यांचे कुटुंबिय आदी उपस्थित होते.

### अत्यंत भावूक, अभिमानाचा क्षण

कर्नल पदवीच्या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना कुलगुरु प्रा.डॉ महानवर म्हणाले की, भारतीय सैन्यदल आणि एनसीसीकडून मिळालेला हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत भावूक आणि अभिमानाचा क्षण आहे. हा बहुमान केवळ माझा वैयक्तिक नसून तो सोलापूर विद्यापीठातील प्रत्येक विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्याचा आहे. विद्यापीठातील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी एनसीसीमध्ये सहभागी होऊन देशसेवेसाठी पुढे यावे, यासाठी प्रयत्न अधिक गतिमान होतील.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी-१५२९

**तुका म्हणे खोडी । देवमणी न देती दडी ।**

संसारात अडकलेल्या जीवात, संपूर्णत: चांगुलपणा जोपासणारा जीव सहजासहजी सापडणे अत्यंत कठीण आहे. अर्थात जवळपास प्रत्येकाकडे कोणत्या ना कोणत्या प्रकारची उणीव, दोष, त्रुटी ही असते. संसारात अडकलेल्या या जीवाला जेव्हा संसार म्हणजे नेमके काय? त्यात कुठपर्यंत स्वत:ला झोकावे? त्यात राहून त्यापेक्षा वेगळे राहता येते काय? संसारात राहून संसारापेक्षा वेगळे राहण्यासाठी काय करावे लागेल? या प्रश्नाची उत्तरे सापडतात, तेव्हा तो पूर्णत: चांगला होऊ शकतो. एकदा का तो स्वपरीचित झाला की मग त्यात दोष असण्याचा प्रश्न उद्धवत नाही.



इतरांप्रमाणे तो ही संसार करीत असला तरी त्याच्याकडून होणारे दोष, उणीवा, त्रुटी ह्या त्याच्या नसतात. सहज प्रवृत्ती किंवा दैनंदिन वर्तन म्हणून त्याच्याकडून असे कांही घडून गेले तरी तो त्या वर्तनात अडकत नाही. त्यामुळे हे गुणदोष त्याला चिकटत नाहीत. एखादा खोडसाळ घोडा देवाच्या नांवावर किंवा राज्याच्या नावावर गळ्यात एक देवपणाचे किंवा राज्याच्या आदेशाचे चिन्ह बांधून सोडला तर त्याच्या खोडी त्या चिन्हाखाली झाकून जातात. त्याप्रमाणे एखाद्या दुर्जनाने जरी चांगल्याचा सहवास मिळिवला व चांगुलपणाने वागू लागला तर आपण त्याच्या पूर्वाश्रमीच्या खोडीकडे दुर्लक्ष करायला हवे. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**तुका म्हणे खोडी । देव मणी न देती दडी ।**

सर्व गल्ली बोळाची, अवघ्या गावाची घाण सोबत घेऊन लेंडओहळ, नाला जेव्हा नदीला मिळतो तेव्हा तो पवित्रतेस पात्र होतो. एखादा चोर, दुष्ट वृत्तीचा माणूस असला तरी जेव्हा हा मन:पूर्वक वारकरी सांप्रदायात प्रवेश करतो आणि मुखाने संत श्री ज्ञानोबा-तुकोबां आदी संतांचा गजर करतो, तेव्हा तो वैष्णव म्हणून गणला जातो. कळत न कळत त्याच्यात चांगले गुण येऊ लागतात. अर्थात, वाईटांना चांगल्यांचा सहवास लाभला म्हणजे तेही हळूहळू चांगुलपणास पात्र होत असतात. अशा दुर्जनातून चांगले होणाऱ्यांना त्यांच्या वाईटपणाची आठवण देणे चुकीचे असते. लग्न होण्याअगोदर एकमेकांचे चारित्र्य किती पाहायचे ते पाहावे. मात्र लग्न झाल्यानंतर तू अशी होतीस, तू असा होतास असं काहीतरी व्यर्थ बडबडत राहणे म्हणणे म्हणजे सुखी संसारात आडकाठी करणे होय. थोडक्यात, चांगुलपणाच्या मार्गावर चालणाऱ्यांना किंवा चालू इच्छिणाऱ्यांना त्याच्या गतकाळातील चुकांची आठवण देऊन हिणवू नये. आपले असे हिणवणे त्याला चांगुलपणाच्या मार्गावरून पुन्हा वाईट मार्गावर नेऊ शकते. आपल्या हिणवल्यामुळे जर कोणी वाईट मार्गावर गेला तर त्याच्या वाईटपणाचा पूर्ण दोष आपणालाच लागेल. म्हणून कोणाच्या पापाला आपण कारणीभूत होऊ नये.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार,**
**दि. ११ ऑगस्ट २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - आषाढ कृ. चतुर्दशी**
**ऋतु - वर्षा ।**
**नक्षत्र- पुर्नवसु (१०.०९)**
**योग - सिध्दी (१८.५१)**
**करण - विष्टी (१५.२२)**
**राहू काल : मंगळवार**
**स. ०३.०० ते ०४.३०**
**दिनविशेष :**

**१९४३: सी. डी. देशमुख हे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे पहिले भारतीय गव्हर्नर झाले.**
**१९६०: चाड देशाला फ्रान्सपासून स्वातंत्र्य मिळाले.**
**१९६१: दादरा आणि नगर हवेली हा प्रदेश भारताचा केंद्रशासित प्रदेश बनला.**
**१९७९: गुजरातधील मोर्वी येथे मच्छू धरण फुटून मोठी दुर्घटना घडली.**

## फोनची दखल अनब एका दिवसात ड्रेनेजचा प्रश्न निकाली

**माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्या तत्परतेचे नागरिकांकडून कौतुक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

प्रभाग क्रमांक २६ मधील परमेश्वर नगर परिसरात गेल्या तीन-चार दिवसांपासून तुंबलेल्या ड्रेनेज लाईनमुळे नागरिकांना दुर्गंधी, अस्वच्छता आणि आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागत होता. मात्र, स्थानिक नागरिकांनी ही बाब माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तात्काळ दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. त्यानंतर जेटिंग मशीनच्या साहाय्याने तुंबलेली ड्रेनेज लाईन साफ करून नागरिकांना मोठा दिलासा देण्यात आला.



परमेश्वर नगरातील नागरिक विजय चव्हाण यांनी परिसरातील ड्रेनेज समस्येची माहिती माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांना दिली. समस्येचे गांभीर्य लक्षात घेत त्यांनी संबंधित अधिकारी थोरात यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्याची तत्काळ दखल घेत आज जेटिंग मशीनच्या साहाय्याने तुंबलेली ड्रेनेज लाईन साफ करण्यात आली. या कामामुळे परिसरात पसरलेली दुर्गंधी दूर होण्यास मदत झाली असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील मोठी अडचण दूर झाली आहे. यापूर्वीही नागरिकांनी संबंधित ठिकाणी तक्रारी केल्या होत्या; मात्र प्रश्न प्रलंबित राहिल्याची नागरिकांची भावना होती. माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्या निदर्शनास ही बाब येताच अल्पावधीतच समस्या मार्गी लागल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. माजी नगरसेविका राजश्री चव्हाण या नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधत प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. तुंबलेल्या ड्रेनेजचा प्रश्न तातडीने निकाली काढल्याबद्दल परमेश्वर नगरातील नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# ३० वर्षांच्या न्यायालयीन लढ्याला अखेर यश

**✻ १३ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियुक्तीच्या तारखेपासून फरक**
**✻ ६ टक्के व्याजासह रक्कम देण्याचा उच्च न्यायालयाचा आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

शहर व जिल्ह्यातील विविध शाळांमधील १३ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नियुक्तीच्या तारखेपासून सेवेला मान्यता व वेतनातील फरक मिळावा, यासाठी तब्बल ३० वर्षे दिलेल्या न्यायालयीन लढ्याला अखेर यश आले. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने ४ ऑगस्ट २०२६ रोजी कर्मचाऱ्यांच्या बाजूने निकाल देत नियुक्तीच्या तारखेपासून मागील वेतनातील फरक ६ टक्के व्याजासह देण्याचे आदेश दिले, अशी माहिती ॲड. विश्वासराव देवकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या १३ कर्मचाऱ्यांची १९९६ ते २००१ या कालावधीत रीतसर नियुक्ती झाली होती. मात्र शासनाने २००४ मध्ये शासन निर्णय काढून त्यांना २००४ पासूनच मान्यता दिली. नियुक्तीच्या तारखेपासून मान्यता मिळावी, यासाठी कर्मचाऱ्यांनी जिल्हा पातळीपासून उपसंचालक, संचालक तसेच मंत्रालयापर्यंत सातत्याने पाठपुरावा केला. सोलापूर, पुणे व मुंबई येथे आंदोलने, उपोषणे आणि विविध लोकप्रतिनिधी व मंत्र्यांकडेही त्यांनी दाद मागितली.

या प्रकरणी २०१३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका



दाखल करण्यात आली. ती फेटाळल्यानंतर २०१८ मध्ये वैयक्तिक याचिका दाखल करण्यात आली. त्यानंतर पुनर्विचार याचिकाही दाखल करण्यात आली. या दोन्ही प्रयत्नांना यश आले नाही. अखेर २०२३ मध्ये १३ कर्मचाऱ्यांनी पुन्हा रिट याचिका दाखल केली. या संपूर्ण न्यायालयीन लढ्यात नऊ वकिलांनी बाजू मांडली. २०२५ मध्ये ॲड. विश्वासराव देवकर यांनी हे प्रकरण हाती घेतल्यानंतर सुनावणीला निर्णायक दिशा मिळाली.

कर्मचाऱ्यांची कोणतीही चूक नसताना त्यांना नियुक्तीच्या तारखेपासून त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवण्यात आल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. त्यानंतर कोल्हापूर सर्किट बेंचने कर्मचाऱ्यांना नियुक्तीच्या तारखेपासून सेवा ग्राह्य धरून मागील वेतनातील फरक ६ टक्के व्याजासह देण्याचे आदेश दिले. त्यामुळे ३० वर्षांपासून सुरू असलेल्या लढ्याला अखेर न्याय मिळाल्याचे ॲड. देवकर यांनी सांगितले. या याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. विश्वासराव देवकर व ॲड. रंजना देवकर यांनी काम पाहिले.

## सुधारणा जितक्या जास्त तितका माणूस असमाधानी

ईश्वराने आपल्याला आपल्या कल्पनेपेक्षा खरोखरच कितीतरी जास्त दिलेले असते. तरीदेखील माणसाची हाव कमी होत नाही. तो अजूनच्या मागे धावत असतो. सुधारणा जितक्या जास्त तितका माणूस जास्त असमाधानी झाल्याचे पहावयास मिळते, असे प्रतिपादन परमपूज्य अक्षयश्रीजी महाराज यांनी केले.




बलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित अक्षय चातुर्मासात त्या बोलत होत्या. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, श्रावक-श्राविका यांना साधू आणि साध्वीच्या माता-पिता मानले जाते. मोठेपणी देखील लहान बनून लहानपणाचा अनुभव घेता येतो.आपल्यासाठी प्रत्येक दिवस नवा असतो. जीवनात अगदी जन्मापासून मृत्यूपर्यंत येणारा प्रत्येक क्षण हा आपल्यासाठी नवाच असतो. प्रत्येक श्वास नवा असतो.

नाहक अहंकार बाळगू नका. घरातील आणि समाजातील संबंध बिघडायला आपला अभिमान, अहंपणा विशेष करून कारणीभूत होत असतो. हा अभिमान फक्त पैशाचा अथवा श्रीमंतालाच असतो असे नव्हे.कोणाला कोणत्या गोष्टीचा अभिमान वाटेल हे सांगता येत नाही. हे योग्य हे अयोग्य, हे चांगले हे वाईट, हे सत्य हे असत्य याचा निर्णय बुद्धीच करते. बुद्धी इतकी आत्म्याच्या निकट असणारी दुसरी वस्तू नाही. एकाग्र झालेल्या सूक्ष्म बुद्धीलाच आत्मदर्शन घडते. विवेक जागरूक असेल तर शुद्ध बुद्धीमध्ये आत्मज्ञानाचा प्रकाश पडतो.

**-मल्लेश पुरवंत**



## आंतरराष्ट्रीय प्रार्थना योग मंडळातर्फे रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

आंतरराष्ट्रीय प्रार्थना योग मंडळाच्या वतीने परमपूज्य महातपस्वी श्री कुमार स्वामीजी यांच्या ११७ व्या जयंती महोत्सवानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन डॉ. शंकरराव हणमंतराव पाटील-बेलाटीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आंतरराष्ट्रीय प्रार्थना योग मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांच्या हस्ते डॉ. पाटील-बेलाटीकर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना डॉ. पाटील-बेलाटीकर म्हणाले की, आध्यात्मिक कार्य करणाऱ्या संस्थेने समाजासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या रक्तदानाच्या गरजेचे गांभीर्य ओळखून आयोजित केलेले हे शिबिर कौतुकास्पद आहे. यावेळी २८ जणांनी रक्तदान झाले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष निळकंठप्पा कोनापुरे, सचिव बाबासाहेब कुलकर्णी, विश्वस्त रमेश चौगुले, विश्वनाथ म्हेत्रे, संतोष मंठाळकर, चनबसप्पा अलमेल उपस्थित होते.

या रक्तदान शिबिरास रक्त संकलनाचे कार्य शिवशंभो ब्लड बँक, मोहोळ यांच्या पथकाने केले. मंडळाचे विश्वस्त नागनाथ चौगुले यांनी आभार मानले.

## बटरफ्लाय स्कूलमध्ये वक्तृत्व स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

श्री सिध्देश्वर शिक्षण मंडळ संचलित बटरफ्लाय इंग्लिश मिडियम स्कूल येथे आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाचे परीक्षक प्रा. सचिन पवार, प्रा. हणमंत पवार यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरवात झाली.

प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत माध्यमिक विभागाच्या प्रभारी मुख्याध्यापिका अपर्णा कदम व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रश्मी पूर्वत यांनी केले. स्पर्धेत विविध शाळेतील ४५ विद्यार्थी स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. पाहुण्यांचे परिचय प्रशालेच्या सहशिक्षिका दिपाली शिंदे, वृषाली गडहिरे यांनी करुन दिला. स्पर्धेबद्दल माहिती कोमल सोनकांबळे यांनी दिली. प्रास्ताविक व सूत्रसंचालन सिमरन मुल्ला यांनी केले तर आभार किरण शिवसिंगवाले यांनी मानले.

## गेनसिध्द प्रशालेत क्रांतिदिनी क्रांतिकारकांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

कुंभारी (ता. द. सोलापूर) येथील श्री. गेनसिद्ध प्रशालेत क्रांतिदिन साजरा करण्यात आला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या क्रांतिकारक व स्वातंत्र्यसैनिकांना यावेळी अभिवादन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी सोलापूरच्या थोर हुतात्म्यांच्या प्रतिमेचे पूजन प्रशालेचे मुख्याध्यापक रमेश बसुदेपाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी क्रांतिदिनाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर भाषणे केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाची पार्श्वभूमी, महात्मा गांधींचे नेतृत्व, स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी झालेला संघर्ष याबाबत विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या भाषणातून देशभक्ती, स्वातंत्र्यसैनिकांविषयी कृतज्ञता आणि राष्ट्रप्रेमाची भावना व्यक्त झाली. मुख्याध्यापक रमेश बसुदेपाटील यांनी मार्गदर्शन करताना, देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या त्याग, धैर्य व देशभक्तीचे स्मरण करून त्यांचा आदर्श विद्यार्थ्यांनी अंगीकारावा, असे आवाहन केले. स्वातंत्र्यासाठी असंख्य ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांनी केलेल्या त्यागाची जाणीव ठेवून 'राष्ट्र प्रथम' ही भावना मनात बाळगावी. प्रत्येकाने आपल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करून सामाजिक सलोखा राखत देशाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणा देत स्वातंत्र्यवीरांना अभिवादन केले. सूत्रसंचालन सुनील स्वामी यांनी केले.




## ए.जी. पाटील तंत्रनिकेतनमध्ये मार्गदर्शन सत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

विद्यार्थ्यांना शैक्षणिक तसेच करिअरच्या दृष्टीने योग्य मार्गदर्शन मिळावे या या उद्देशाने ए.जी. पाटील तंत्रनिकेतनमध्ये विजय नवले यांचे सत्र आयोजित करण्यात आले. हे सत्र विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी अशा दोन स्वतंत्र सत्रांमध्ये घेण्यात आले.

या मार्गदर्शन सत्रात विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, परीक्षेची तयारी, करिअरच्या विविध संधी तसेच भविष्यातील उद्दिष्टे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पालकांच्या सत्रात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये पालकांची भूमिका, मुलांशी प्रभावी संवाद आणि त्यांच्या करिअर निवडीसाठी आवश्यक असलेले सहकार्य याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विजय नवले यांनी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी आणि पालकांनी विद्यार्थ्यांना योग्य वातावरण व प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन केले. या कार्यक्रमास विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शैक्षणिक व करिअर विषयक शंकांचे निरसन करून घेतले. पालकांनीही आपल्या पाल्यांच्या भविष्य संदर्भात महत्वपूर्ण प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला.

सूत्रसंचालन प्राध्यापिका एल एस बिराजदार व प्राध्यापिका एस एन गवंडी यांनी केले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, कॅम्पस डायरेक्टर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एम.ए. चौगुले व उपप्राचार्य स.के. मोहिते यांचे मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रथम वर्ष इन्चार्ज व्ही. आर. आवटे यांचे सहकार्य लाभले.

## महालक्ष्मी देवीची त्रिवार्षिक यात्रा १२ ऑगस्टला

**१ हजार सुवासिनींची जलकुंभ मिरवणूक**

**३० हजार भाविकांसाठी महाप्रसाद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

सिव्हील हॉस्पिटल परिसरातील श्री महालक्ष्मी मंदिराची त्रिवार्षिक आषाढ यात्रा बुधवार, १२ ऑगस्ट रोजी होणार आहे. यानिमित्त मंगळवार, ११ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता बलिदान चौकातील हुतात्मा स्तंभापासून १ हजार सुवासिनींची जलकुंभासह मिरवणूक काढण्यात येणार असल्याची माहिती श्री महालक्ष्मी मंदिर ट्रस्ट व सोलापूर शहर वीरशैव लिंगायत गवळी समाजाच्या वतीने ट्रस्टचे अध्यक्ष अनिल गवळी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मिरवणूक बलिदान चौक, मंगळवार पेठ पोलीस चौकी, माणिक चौक, दत्त चौक, लक्ष्मी मार्केट, पंचकट्टा, जिल्हा परिषद, गुरुभेट, रंगभवनमार्गे सिव्हील हॉस्पिटल परिसरातील महालक्ष्मी मंदिरापर्यंत जाणार आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पावसासाठी महालक्ष्मी मातेला साकडे घालण्यात येणार आहे. यात्रेच्या दिवशी पहाटे ५ वाजता केशव झिपरे यांच्या हस्ते महालक्ष्मी मातेला पंचामृत अभिषेक होईल. सकाळी ११ ते रात्री ९ वाजेपर्यंत मंदिरालगतच्या शामियान्यात सुमारे ३० हजार भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गवळी समाजाच्या पारंपरिक श्रद्धेचा भाग म्हणून वाद्यांच्या निनादात म्हशी पळिवण्याचा कार्यक्रम ही होणार आहे.

यात्रा यशस्वी करण्यासाठी देवबा डोईजोडे, अनिल संभाजी गवळी, केशव झिपरे, प्रभाकर जानगवळी, पांडुरंग परळकर, वसंत पंगुडवाले, कृष्णात झिपरे, सुरेश जानगवळी, राजेश बहिरवाडे, शिवा भास्कर, दिलीप भास्कर, अशोक कलागते, देवा अंजीखाने, सुरेश कलागते, नागा खंडेराव, गोरख घुले, संजू शहापूरकर, टिनू अंजीखाने, महादेव बडवणे, योगेश झिपरे, प्रशांत झिपरे परिश्रम घेत आहेत. या पत्रकार परिषदेस संभाजी झिपरे, पांडुरंग परळकर, प्रभाकर जानगवळी, ज्ञानेश्वर अंजीखाने, वसंत पंगुडवाले, केशव झिपरे, योगेश झिपरे उपस्थित होते.



## विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्षपदी श्रेया गुंड

**ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थी परिषद निवडणूक**

**तभा वृत्तसेवा,**
**बोरामणी, दि. १० ऑगस्ट-**

कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, बोरामणी येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विद्यार्थी परिषद निवडणूक पार पडली.

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची भावना, लोकशाही मूल्यांची जपणूक आणि संघटन कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने या निवडणुकीचे आयोजन करण्यात आले होते.

निवडणुकीत श्रेया गुंड यांची विद्यार्थी परिषद अध्यक्षपदी निवड झाली. तसेच रिया मोहिते (सचिव), उद्धव कवडे (विज्ञान प्रमुख), यशराज भोसले (शालेय मासिक प्रमुख), राहुल कलशेट्टी (सहल प्रमुख), तनुजा पाटील (सांस्कृतिक प्रमुख) आणि अभिषेक राऊत (क्रीडा प्रमुख) यांची विविध पदांवर निवड झाली.

वर्ग प्रतिनिधी म्हणून आर्या लोंढे, आराध्या पाटील, दिग्विजय राठोड, अखिलेश पाटील, रेहान नदाफ, काशीनाथ मुदके, श्रेयश कवडे, साहिल नदाफ, वीर कांबळे आणि सुदर्शन राठोड यांची निवड झाली. या निवडणुकीचे निवडणूक अधिकारी म्हणून सोनाली मदकण्णा यांनी अत्यंत नियोजनबद्ध, पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने जबाबदारी पार पाडली. निवडून आलेल्या सर्व विद्यार्थी प्रतिनिधींचे संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, सचिवा संगिता शहा तसेच उपाध्यक्ष प्रा. अनिकेत चनशेट्टी यांनी अभिनंदन केले.

## दक्षिण मतदारसंघातील दोन रस्त्यांना ग्रामीण मार्गाचा दर्जा; आ. देशमुख यांच्या प्रयत्नांना यश

**आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नांना यश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील दोन महत्त्वाच्या रस्त्यांचा ग्रामीण मार्ग म्हणून रस्ते विकास योजना २००१-२१ मध्ये समावेश करण्यास महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे दक्षिण सोलापूर मतदारसंघातील ग्रामीण भागातील रस्ते विकासाला चालना मिळणार असून, यासाठी आमदार सुभाष देशमुख यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.



महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने ३ ऑगस्ट २०२६ रोजी यासंदर्भात शासन निर्णय जारी केला. सार्वजनिक बांधकाम विभागाचा प्रस्ताव तसेच सोलापूर जिल्हा परिषदेच्या ठरावाचा विचार करून शासनाने संबंधित रस्त्यांना ग्रामीण मार्गाचा दर्जा देण्यास मान्यता दिली आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील तेलगाव (मं.) ते खानापूर रस्ता हा ६ किलोमीटरचा असून त्याचा समावेश ग्रामीण मार्ग क्रमांक २३८ म्हणून करण्यात आला आहे. तसेच प्रजिमा १५० ते मड्डीवस्ती (होनमुर्गी) रस्ता हा ४ किलोमीटरचा असून त्याला ग्रामीण मार्ग क्रमांक २३९ देण्यात आला आहे. या दोन्ही रस्त्यांची एकूण १० किलोमीटर लांबी रस्ते विकास योजना २००१-२१ मध्ये ग्रामीण मार्ग म्हणून समाविष्ट करण्यात आली आहे. या निर्णयामुळे संबंधित रस्त्यांच्या विकासासाठी शासकीय निधी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या रस्त्यांना ग्रामीण मार्गाचा दर्जा मिळावा यासाठी आमदार सुभाष देशमुख यांनी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता. संबंधित गावांतील नागरिकांची दळणवळणाची गरज आणि रस्त्यांच्या विकासाची आवश्यकता लक्षात घेऊन त्यांनी हा प्रश्न प्रशासन व शासनाकडे लावून धरला होता. शासनाच्या या निर्णयामुळे दक्षिण सोलापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सुलभ होण्यास मदत होणार असून, या मार्गांच्या भविष्यातील विकासासाठीही मोठी चालना मिळणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### दृष्टिहीन पालकांच्या मुलांना शैक्षणिक मदत

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

जुना एम्प्लॉयमेंट चौक येथील बीसी बॉईज होस्टेल परिसरात राष्ट्रीय दृष्टिहीन संघ महाराष्ट्र जिल्हा शाखा सोलापूर आणि सक्षम प्रतिष्ठान अकुलगाव या दोन सामाजिक संस्थांच्या माध्यमातून अंध पालकांच्या डोळस पाल्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले. सुरुवातीला लुई ब्रेल यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. याप्रसंगी सोलापूर जिल्ह्यात वाचन चळवळ वाढण्यासाठी जे परिश्रम घेत आहेत ते श्रीधर खेडगीकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचबरोबर राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्र जिल्हा शाखा सोलापूरचे अध्यक्ष कबीर माने, महिला उपाध्यक्ष आशा पाटील, कोषाध्यक्ष धनाजी कदम, कार्यकारिणी सदस्य सुनील बोलाबत्ती, विभागीय शाखा पुणेचे विद्यमान उपाध्यक्ष प्रा. संजय बैरागी, सक्षम प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष जगताप, ब्रेल आणि बोलकी पुस्तकांच्या वाचनालयाचे प्रमुख प्रभाकर कदम उपस्थित होते. कार्यक्रमात ४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले. सूत्रसंचालन राष्ट्रीय दृष्टिहीन संघ शाखा सोलापूरचे महासचिव रियाज तांबोळी यांनी केले.



### रघोजी हॉस्पिटलतर्फे घोडातांडा शाळेस साऊंड सिस्टीम

**सोलापूर, दि. १० ऑगस्ट-**

वाढदिवसाचा आनंद समाजोपयोगी कार्यातून साजरा करण्याचा आदर्श रघोजी किडनी अँड मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. संध्या रघोजी यांनी घालून दिला. आपल्या वाढदिवसानिमित्त त्यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, घोडातांडा येथे रघोजी किडनी अँड मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलतर्फे ध्वनिक्षेपक संच भेट दिला. याप्रसंगी त्यांची कन्या, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. निहारिका पिलगुलवार (रघोजी) यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. संध्या रघोजी यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.प्रारंभी विद्यार्थिनींनी पारंपरिक बंजारा नृत्य सादर करून स्वागत केले. त्यानंतर अस्मिता राठोड, अर्पिता राठोड आणि पायल राठोड यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी वाचकदूत श्रीधर खेडगीकर, रघोजी किडनी अँड मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे व्यवस्थापक सलमान यांची विशेष उपस्थिती होती. शाळेतर्फे नुजहत आरा सय्यद यांनी आभार मानले. सूत्रसंचालन गणेश कुडले यांनी केले.कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक गायकवाड, सुजाता खेडगीकर, कृपा राठोड, संगीता बिराजदार, गणेश कुडले आदींनी परिश्रम घेतले.



### सिंहगड महाविद्यालयात प्रोटोटाईप/प्रोसेस डिझाईन अँड डेव्हलपमेंट कार्यशाळा

**पंढरपूर, दि.१० ऑगस्ट-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोर्टी, पंढरपूर येथे उद्योजकता विकासाला चालना देण्यासाठी इंटरपुनर्शिप डेव्हलपमेंट सेल आणि इन्स्टिट्यूट इनोवेशन कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रोटोटाईप/प्रोसेस डिझाईन अँड डेव्हलपमेंटङ्ग या विषयावर कार्यशाळा झाली. शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी ही कार्यशाळा झाल्याचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी सांगितले. कार्यशाळेसाठी चंद्रकांत लोंढे, अनुभवी इंडस्ट्री प्रोफेशनल व बिझनेस कन्सल्टंट, हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून डॉ. डी.एस.मंत्री, प्राचार्य सिंहगड, लोणावळा, पुणे यांनीही मार्गदर्शन केले. कार्यशाळेत उद्योजकता व स्टार्ट-अप क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोटोटाईपची संकल्पना, प्रोटोटाईप विकसित करण्याची प्रक्रिया, उत्पादन/प्रक्रिया डिझाईन, विकासाच्या विविध टप्प्यांतील अडचणी, उद्योगाच्या गरजेनुसार उत्पादन विकसित करणे तसेच नाविन्यपूर्ण कल्पनांचे व्यावसायिक रूपांतर याबाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी इंक्युबॅशन मॅनेजर डॉ. अतुल आराध्ये, ईडीसी सेल इन्चार्ज अतुल कुलकर्णी, आय आय सी व्हाईस प्रेसिडेंट प्रा. दत्तात्रेय कोरके, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी आणि प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांचे मार्गदर्शन लाभले. ईडीसी विद्यार्थी व्हाईस प्रेसिडेंट अस्मिता कोडलिंगे व ऐश्वर्या काशीद यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

### हसण्याचा जाब विचारले म्हणून मारहाण

**सोलापूर, दि.१० ऑगस्ट-**

आपल्याकडे बघून हसल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरून लोखंडी रॉड, बॅट आणि वायरने केलेल्या मारहाणीत तिघेजण जखमी झाले. ही घटना अणदुर (ता.तुळजापूर) येथे रविवारी रात्रीच्या सुमारास घडली . असलम दाऊद मुजावर (वय ४२), अजहर अलि मुजावर (वय २६) आणि मुसा वजूद शेख (वय ३० सर्व रा. अणदुर) अशी जखमीची नावे आहेत. त्या तिघांनी आम्हाला बघून का हसताय ? अशी विचारणा केली होती. त्यावरून ओंकार दत्तात्रय धनशेट्टी आणि इतर चौघांनी मिळून त्यांना मारहाण केली. त्यांना नळदुर्ग येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात आज सोमवारी दाखल करण्यात आले.

### पोलिस चौकीजवळ पत्नी आणि मुलीस मारहाण

**सोलापूर, दि.१० ऑगस्ट-**

सम्राट पोलीस चौकी जवळ घरगुती वादातून लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत मोसमी सुभाष कांबळे (वय ३०) आणि त्यांची मुलगी अस्मिता कांबळे (वय १५ दोघी रा.सारडा हॉस्पिटल समोर, सम्राट चौक) या दोघी जखमी झाल्या. ही घटना आज सोमवारी पहाटे पाच वाजेच्या सुमारास घडली. पती सुभाष कांबळे याने लाथाबुक्क्याने मारहाण करून पत्नीला ढकलून दिले होते.त्यांना उपचारासाठी पप्पू रणसूरे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# अंगणवाडीच्या मुलांचे आरोग्य धोक्यात

## मंद्रुप वॉर्ड क्रमांक तीनमध्ये चिखलाचे साम्राज्य; ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष; तीन वेळा खर्च करुनही समस्या कायम

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

मंद्रूप येथील वॉर्ड क्रमांक तीनमध्ये पावसाच्या पाण्यामुळे व गटारीच्या दुर्गंधीमुळे नागरिक हैराण झाले आहेत. जोडमोटे वस्ती व येळेगाव रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्यासाठी तीनवेळा मुरूमीकरण केल्याचे बिल काढूनही चिखलाचे साम्राज्यच दिसून येते. शिवाय अंगणवाडीजवळही मोठ्या प्रमाणात चिखल पसरला असून मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ग्रामपंचायतीच्या हलगर्जीपणामुळे नागरिक व मुलांना त्रास सहन करावे लागत आहे.

वॉर्ड क्रमांक ३ मध्ये सत्ताधारी गटाचे एक तर विरोधी गटाचे दोन सदस्य आहेत. विद्यमान सरपंच कोरेही २०१७ ते २०२२ या काळात या वॉर्डामधून सदस्य म्हणून निवडून गेल्या होत्या. तरीही या वॉर्डातील समस्या कायम आहेत. जोडमोटे पाणंद रस्त्यावर पावसाचे पाणी व गटारीच्या पाण्यामुळे परिसरातील नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. त्या ठिकाणी खड्डे असल्यामुळे पावसाच्या पाण्यामुळे दलदल निर्माण झाली आहे. दलदलीतून नागरिकांना वाहतूकीस व पायी जाताना अडचण निर्माण होत आहे. ग्राम पंचायत पदाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्यामुळे नागरिक संताप व्यक्त करीत आहेत.

वॉर्ड क्रमांक तीन मधील सदस्य नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी पाठपुरावा करण्याऐवजी त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. परिणामी सांडपाण्याची दुर्गंधी , पाणीटंचाई व रस्त्यावरील खड्डे



यासह इतर अनेक समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. ग्रामपंचायत याकडे दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

**अंगणवाडीच्या मुलांचे आरोग्य धोक्यात**

जोडमोटे पाणंद रस्त्यावर अंगणवाडी आहे. याठिकाणी परिसरातील लहान मुलांना मूलभूत शिक्षण दिले जाते. मात्र चिखलामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणाचा फटका लहान मुलांना बसत आहे.

**- महादेव जकुणे, नागरिक, मंद्रूप.**

**ग्रामपंचायतचा हलगर्जीपणा कारणीभूत**

ग्रामपंचायतीने यापूर्वी जोडमोटे वस्ती येथे जाण्यासाठी असणाऱ्या रस्त्यावर तीन वेळा मुरुमीकरणाचे बिल काढले आहे. तरीही रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे आहेत. या खड्डयात पाणी साचल्यामुळे रहदारी करणे कठीण होत आहे. सरपंच व ग्रामपंचायतच्या हलगर्जीपणामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

**- भीमाशंकर मेंडगुदले,** नागरिक, वॉर्ड क्रमांक ३ मंद्रूप.

# बबनराव शिंदे एक सप्टेंबरला माढ्यात परतणार

## पंच्याहत्तरीनिमित्त स्वागताची तयारी; सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय

**तभा वृत्तसेवा । सोमनाथ शिंदे**
**कुर्डुवाडी, दि. १० ऑगस्ट-**

माजी आमदार बबनराव शिंदे हे हृदय प्रत्यारोपणाच्या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर येत्या एक सप्टेंबर रोजी निमगाव टे या त्यांच्या जन्मगावी येत आहेत. योगायोगाने त्याच दिवशी त्यांचा ७५ वा वाढदिवस असल्याने त्यांचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. विविध सामाजिक उपक्रमाने हा वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे.



श्री विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याच्या आवारातील श्री दत्त मंदिरात शिंदे बंधूंच्या माढा तालुक्यातील आणि मतदारसंघातील कार्यकर्त्यांची आज बैठक झाली. बैठकीस माजी आमदार विनायक पाटील, माजी आमदार संजयमामा शिंदे, माजी जि.प.अध्यक्षा निशिगंधा माळी, माजी सभापती विक्रमसिंह शिंदे, शिवाजी कांबळे, आण्णासाहेब ढाणे, मुन्ना मोरे, वामन उबाळे, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन पोपटराव गायकवाड, सर्व जि.प, पंचायत समिती सदस्य, भाजपचे तालुकाध्यक्ष योगेश पाटील, बाबाराजे बोबडे, अशोक लुणावत, माजी जि.प. सदस्य झुंजार भांगे, कुस्ती सम्राट अस्लम काझी, प्रा.जी.के. देशमुख, धनंजय मोरे, मार्केट कमिटीचे सर्व संचालक उपस्थित होते.

गतवर्षी १८ ऑगस्ट रोजी बबनराव शिंदे यांच्यावर अमेरिकेतील सेंट लुईस येथील प्रख्यात हॉस्पिटलमध्ये यशस्वी हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केली होती. तेव्हापासून वर्षभर ते अमेरिकेत आहेत. आता वैद्यकीय सल्ल्यानुसार ते १ सप्टेंबर रोजी आपल्या गावी येणार आहेत. या निमित्ताने शिंदे बंधूंवर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांकडून त्यांचे जोरदार स्वागत करण्यात येणार आहे. योगायोगाने त्याच दिवशी शिंदे यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवसही असल्याने त्यांचे आगमन आणि वाढदिवस हा एक दुग्धशर्करा योग जुळून आला आहे. परिणामी रक्तदान शिबिर, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण विषयक उपक्रम, युवा महोत्सव, किर्तन महोत्सव, बैलगाडा शर्यत, राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा, आरोग्य शिबीर अशा अकरा उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. एक सप्टेंबर रोजी तालुक्याच्या सीमेवर भीमानगर येथे माजी आमदार शिंदे यांचे स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर ते टेंभुर्णी येथे येतील. त्यानंतर श्री विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना येथे येणार आहेत. येथे त्यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस साजरा होणार आहे.

यावेळी त्यांच्या ५ वेगवेगळ्या तुला करण्यात येणार आहेत. सुमारे सव्वा वर्षांपासून बाहेर असलेले माजी आमदार बबनराव शिंदे यांचे आगमन होत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सलग तिसऱ्या दिवशी बार्शीत विनापरवाना डीजेवर कारवाई

## सहा जणांविरुध्द गुन्हा; जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १० ऑगस्ट-**

बार्शी शहरातील पांडे चौक येथे ध्वनीप्रक्षेपण सुरु करुन मोठ्या आवाजात डीजे वाजवत गर्दी जमवून नृत्य केल्याप्रकरणी बार्शी शहर पोलिसांनी सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई दि. ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पांडे चौक येथे ध्वनीप्रक्षेपण सुरु असताना पाचपेक्षा अधिक व्यक्ती जमून डीजेच्या तालावर असभ्य हावभाव करत नृत्य करत होते. तसेच, जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन झाल्याचे पोलिसांच्या तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार विश्वजीत ठोंगे यांनी फिर्याद दिली आहे. आरोपी अनिकेत सदाशिव गायकवाड (रा. माळवाडी, कोथोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर), आनंद गुलाब डोलारे (रा. लहुजी चौक, बार्शी), आदित्य विशाल चौगुले (रा. मित्रनगर, शेळगी, सोलापूर), साईराम उत्तम शिंदे (रा. टिळक चौक, बार्शी), अर्थव सुनील नागून (रा. आर्वी, ता. हवेली, जि. पुणे) आणि विजयभाऊ रणदिवे (रा. टिळक चौक, बार्शी) यांच्या विरुद्ध कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. यातील काहीजण संबंधित डीजे/डॉल्बीचे मालक, तर काहीजण विविध मंडळांचे पदाधिकारी आहेत. पोलीस निरीक्षक गणेश कुंभार यांच्या आदेशाने ही कारवाई केली आहे. तपासी अंमलदार कादर तांबोळी हे तपास करीत आहेत.

**आदेशाचे उल्लंघन खपवून घेणार नाही**

सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना डीजे वाजवणे, ध्वनीप्रदूषण करणे, बेशिस्तपणे गर्दी करणे अथवा प्रशासनाच्या आदेशांचे उल्लंघन करणे खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा पोलीस निरीक्षक गणेश कुंभार यांनी दिला आहे.

### लॉजमध्ये आढळला एकाचा मृतदेह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० ऑगस्ट-**

४० वर्षीय इसम मृतअवस्थेत आढळून आला. ही घटना शहरातील एचपी पेट्रोल पंपासमोरील संतोष लॉज येथे आज सोमवारी सकाळच्या सुमारास उघळकीस आली. धनाजी भीमराव माळगे (वय ४० वर्ष, रा.बक्षीहिप्परगा वरळेगाव, ता.उत्तर सोलापूर) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास तो संतोष लॉज येथे बेशुद्ध अवस्थेत आढळला होता. त्याला शहर पोलिसांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून त्याच्या मृत्यू नेमका कशामुळे झाला यासाठी मृतदेहाची उत्तरीय तपासणी करण्यात येणार आहे. हवालदार जाधव पुढील तपास करीत आहेत.

### टायर फुटल्याने दुचाकी फरफटत जाऊन दोघे तरुण जखमी

**सोलापूर** - भरधाव दुचाकी अचानक टायर फुटून घसरल्याने दोघेजण गंभीर जखमी झाले. हा अपघात सोलापूर ते अक्कलकोट मार्गावरील लिंबेचिंचोळी ब्रिजवर रविवारी सायंकाळच्या सुमारास घडला. बसवराज सिद्धाराम नवटके (वय २५ रा.वळसंग) आणि सरदार सिद्धाप्पा धनशेट्टी (वय ३६ रा.हत्ताळी ता.अक्कलकोट) अशी जखमीची नावे आहेत.ते दोघे डबलसीट जात असताना लिंबेचिंचोळी ब्रिजवर अचानक दुचाकीचे टायर फुटले. त्यामुळे हा अपघात घडला. त्यांना ॲम्बुलन्स मधून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# पवित्र पोर्टलचा 'सर्व्हर घोळ' शिक्षक भरतीवर भारी

## पसंतीक्रमासाठी किमान दोन आठवड्यांची मुदतवाढ द्या

## सोलापूरसह राज्यातील हजारो उमेदवार संभ्रमात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० ऑगस्ट-**

तब्बल १५ महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर सुरू झालेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत आता पवित्र पोर्टलवरील तांत्रिक अडचणींचा अडथळा निर्माण झाला आहे. पसंतीक्रम नोंदविताना उमेदवारांना ओटीपी न मिळणे, पात्रतेनुसार विषय व पदांचे पर्याय उपलब्ध न होणे, माहिती योग्य प्रकारे प्रदर्शित न होणे तसेच इंटरनेट आणि सर्व्हरशी संबंधित अडचणी येत असल्याने उमेदवारांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. त्यामुळे पसंतीक्रम नोंदविण्यासाठी देण्यात आलेली ६ ते १३ ऑगस्ट २०२६ ही मुदत अपुरी असल्याने किमान दोन आठवड्यांची तात्काळ मुदतवाढ द्यावी, अशी मागणी युवा विद्यार्थी असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे.

राज्यात विना मुलाखत शिक्षक भरती प्रक्रियेसाठी एकूण ३० हजार २०९ पदे भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये जिल्हा परिषद स्तरावरील मुलाखतविना १३ हजार ३५१ पदांसह, मुलाखतीसह १० हजार ३२८ पदे, तसेच महानगरपालिका, नगरपालिका आणि आदिवासी विभागातील मिळून सुमारे ७ हजार पदांचा समावेश आहे. मोठ्या संख्येने रिक्त पदांसाठी उमेदवार स्पर्धेत असल्याने प्रत्येक पसंतीक्रम हा त्यांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. दीर्घकाळ रखडलेल्या भरती प्रक्रियेसाठी उमेदवारांनी आंदोलने आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. तब्बल १५ महिन्यांनंतर प्रक्रिया सुरू झाल्याने हजारो डी. एड.-बी.एड.धारकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. मात्र, आता ऐन पसंतीक्रम भरण्याच्या टप्प्यात तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने उमेदवारांची चिंता वाढली आहे.

**किमान काही आठवड्यांची मुदतवाढ द्यावी**

राज्यात शिक्षक भरती प्रक्रिया सुरू झाली असली तरी पावसाळ्यामुळे ग्रामीण भागातील उमेदवारांना ऑनलाइन पसंतीक्रम भरताना अनेक अडचणी येत आहेत. वीजपुरवठा खंडित होणे, इंटरनेटची समस्या आणि ओटीपी संदेश न मिळणे यामुळे उमेदवारांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे तांत्रिक अडचणींचा विचार करून महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने पसंतीक्रम भरण्यासाठी किमान काही आठवड्यांची मुदतवाढ द्यावी. कोणत्याही पात्र उमेदवाराचे नुकसान होणार नाही, असे डी.एड.-बी.एड. स्टुडंट असोसिएशनचे राज्य उपाध्यक्ष, प्रशांत शिरगुर यांनी सांगितले.

**पात्रता आहे; पण पर्यायच दिसत नाही**

अनेक उमेदवारांना त्यांच्या पात्रतेनुसार विषय, माध्यम किंवा उपलब्ध पदांचे पर्याय पोर्टलवर दिसत नसल्याच्या तक्रारी आहेत. काही उमेदवारांना ओटीपी मिळत नसल्याने लॉगिन प्रक्रियेतच अडथळा येत आहे. ग्रामीण भागातील उमेदवारांना इंटरनेटची समस्या, पावसाळ्यामुळे वीजपुरवठ्यात होणारा व्यत्यय आणि तांत्रिक अडचणी यामुळे पसंतीक्रम नोंदविण्यासाठी वारंवार प्रयत्न करावे लागत आहेत.

# 'जलजीवन'मध्ये अनियमितता; तत्कालीन सरपंच, ग्रामसेवकाला नोटीस

## ग्रामस्थाच्या आरोपानंतर उपविभागीय अभियंत्यांचा दणका; १५ दिवसांत त्रुटी दुरुस्त करण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० ऑगस्ट-**

बार्शी तालुक्यातील तडवळे येथे जलजीवन मिशन अंतर्गत ६१ लाख ९४ हजार ८८२ रुपयांच्या नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामात गंभीर अनियमितता झाल्याची तक्रार ग्रामस्थ किरण जाधव यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे २३ जुलै रोजी केली होती. त्यावर पाणीपुरवठा विभागाने पंधरा दिवसात त्रुटीची पूर्तता करण्याचे ग्रामपंचायतीला आदेश दिले आहेत.

तडवळे येथील किरण जाधव यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, २०२२ मध्ये तडवळे गावासाठी जलजीवन



मिशन अंतर्गत ६१ लाख ९४ हजार ८८२ रुपयांच्या नळ पाणीपुरवठा योजनेचे काम मंजूर केले. योजनेअंतर्गत विहीर, पंपिंग मशिनरी, जलवाहिन्या आणि घरगुती नळ जोडणीची कामे करण्यात येणार होती. मात्र, प्रत्यक्षात अनेक कामे अपूर्ण राहिली असून तांत्रिक निकषांचे पालन न करता कामे केल्याचा आरोप केला आहे. विहिरीचे आवश्यक खोलीपर्यंत काँक्रिटीकरण न झाल्याने तिची मजबुती धोक्यात आली आहे. भविष्यात विहीर ढासळण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

प्रत्येक घरापर्यंत स्वतंत्र नळ जोडणी देण्याऐवजी केवळ जलवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी बंदिस्त गटाराच्या पाइपसोबतच पिण्याच्या पाण्याची पाईपलाइन एकाच चारीत टाकली आहे. असे असले तरी दोन स्वतंत्र योजनांची कामे एकाच योजनेत दाखवून शासनाकडून गटारीच्या कामाची देयके मंजूर केली असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

**सर्वांना विश्वासात घेऊन करणार काम**

संबंधित ग्रामपंचायत तथा ठेकेदारास फक्त गटारीच्या कामाचे बिल अदा केले आहे. त्यांना पाणीपुरवठा योजनेसाठी एक रुपयाचेही बिल अदा केले नाही. भविष्यात ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांना विश्वासात घेऊन पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण केले जाईल.

**- अजित वाघमारे**, ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभागीय अभियंता बार्शी.

**मुदतीत दुरुस्ती न झाल्यास करणार कारवाई**

किरण जाधव यांच्या तक्रारीची दखल घेत बार्शी ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाने तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांना नोटीस बजावली आहे. संबंधित कामातील सर्व त्रुटी १५ दिवसांच्या आत दुरुस्त करण्याचे आदेश देण्यात आले असून, निर्धारित मुदतीत दुरुस्ती न झाल्यास होणाऱ्या प्रशासकीय व कायदेशीर कारवाईस तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक स्वतः जबाबदार राहतील, असे नोटिशीत स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

## जनसामान्यांचा आधारवड

# श्री.विठ्ठलराव भाऊसाहेब वाडगे

**श्रीगोंदा ( जि.अहिल्यानगर)**

अनेक वर्ष दुष्काळी, नंतर विकसनशील, पुढे सिंचन क्षेत्र वाढल्याने विकसित होऊ पाहणाऱ्या श्रीगोंदा तालुक्यात ४ साखर कारखाने उभे राहिले. पण सिंचनातील गोंधळ, राजमार्ग आणि एमआयडीसी नसल्याने विकसित होऊ पाहणारा श्रीगोंदा तालुका पुन्हा विकसनशीलच्या मार्गावर आला असताना तालुक्याचे बागायत भागाचे बागायतीपण टिकविण्यासाठी येथील शेतकऱ्यांना कर्ज रूपाने तसेच उत्पादित शेत माल विशेषतः कांदा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी, एमआयडीसीची कमतरता दूर करण्यासाठी, छोटे उद्योजकांना, महिलाना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी तसेच आदिवासी समाजातील मच्छीमारी करणाऱ्या दुर्लक्षित उपेक्षित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तालुक्यातील मांडवगण या पाट पाणी पासून आणि विकासापासून कोसो दूर असलेल्या गावातील एक व्यक्ती श्री. विठ्ठलराव भाऊसाहेब वाडगे पाठीमागे सक्षमपणे उभे राहिले. ते ही निस्वार्थी वृत्तीने आणि गेल्या १० वर्षात शेतकरी, उद्योजक, छोटे उद्योजक, गृहप्रक्रिया उद्योग सुरू करणाऱ्या महिला, विद्यार्थी यांच्या मध्ये खऱ्या अर्थाने चैतन्य निर्माण केले. राजकीय दृष्ट्या प्रगल्भ असलेल्या श्रीगोंदा तालुक्यात रोटरी क्लब, लायन्स क्लब अशा संघटनांची कमतरता होती ती कमतरता विठ्ठलराव वाडगे यांनी दूर केली.

कोणताही राजकीय वारसा नसताना ,साधने अपुरी असताना आणि लहानपण गरीब घरात गेलेल्या आईच्या छत्राला लहानपणीच हरपलेल्या विठ्ठलराव वाडगे यांनी शिक्षण नंतर ग्रामविकास अधिकारी म्हणून केलेली नोकरी आणि पुढे तालुक्यात शेतकरी, शेतमजूर, हजारो महिलांना बचत गट द्वारे कर्ज, यातून तालुक्याला पुन्हा विकासाकडे नेण्यात केलेली कामगिरी निश्चितच आश्चर्य चकित करणारी आहे. त्यांच्या या यशाची भुरळ युवा आमदार विक्रम पाचपुते यांना देखील पडली आणि एका कार्यक्रमात त्यांनी याची प्रांजल कबुली देताना म्हटले की विठ्ठलराव वाडगे यांनी कसे यश मिळवले याचे मार्गदर्शन आपण घेणार आहोत.

श्रीगोंदा तालुक्याचे बागायत,जिरायत भाग आहेत घोड प्रकल्प खाली लाभक्षेत्रातील गावे, कुकडी प्रकल्प खालील गावे वगळता मांडवगण , घोगरगाव, बांगर्डे, कामठी, रुइखेल कोळगाव, चिखली, कोथुळ, ढोरजे आदी गावे पाट पाणी पासून वंचित आहेत. लहरी निसर्गाच्या सरीवर येथील शेती पिकते म्हणजेच अनिश्चितता. अशा गावात लहान पण विठ्ठलराव वाडगे यांचे गेले पण शिकण्याची जिद्द त्यांना ग्रामसेवक पदापर्यंत घेऊन गेली.

नोकरी निमित्ताने तालुक्याच्या मुख्यालयी पंचायत समिती मध्ये येत असताना सहकारी कर्मचाऱ्यांच्या अडचणींची माहिती मिळू लागली. आपण आतापर्यंत जगलेल आयुष्य इतरांच्या वाटेला येऊ नये त्यांची शासकीय कामात अडचण येऊ नये या हेतूने सेवा केली. कर्मचारी जोडले त्यांच्या सुखदुः खात भाग घेत सेवा काळ सुरू असताना जिवलग मित्र आजारी पडला असताना त्याला उपचार खर्चासाठी झालेली धावपळ विठ्ठलराव वाडगे यांना अस्वस्थ करून गेली आणि इथेच समाजातील दैन्य, गरिबी दूर करण्यासाठी काहीतरी सामाजिक कार्य करावे याची पेरणी झाली आणि स्वेच्छा निवृत्ती घेऊन १२ वर्षापूर्वी दौंड येथे वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह सोसायटीचे रोप लावले. आज त्याचा वेलू दूरवर गेला आहे.

वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह सोसायटी श्रीगोंदाच्या ११ शाखा असून ठेवी सुमारे २८५ कोटी रुपये असून ३०० कोटी कडे वाटचाल सुरू आहे. वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी मार्फत छोट्या उद्योजकांना कर्ज दिले जाते तसेच सोने तारण कर्ज दिले जाते. सोन्याचे दर सातत्याने वाढत असताना त्यावर कर्ज रक्कम देखील वाढत आहे. वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी मध्ये सध्या प्रति तोळा ७६ हजार कर्ज दिले जात असून याला मोठा प्रतिसाद मिळत आहे. प्रारंभी महिला बचत गटांची स्थापना करून बचत गट द्वारे महिलांना कर्ज दिले. पुढे चैतन्य महिला बचत गटांची सहकारी पतसंस्था अहिल्यानगर येथे स्थापन केली. त्याचा कारभार वाडगे यांच्या पत्नी सौ. रुक्मिणीताई वाडगे या पाहत आहेत. स्नुषा सौ. सायली शुभम वाडगे या वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटीचा कारभार पाहत आहेत. त्या उच्च विद्या विभूषित आहेत

चैतन्य महिला बचत गटांची सहकारी पतसंस्था मार्फत दरवर्षी जून आणि दिवाळी पुर्वी प्राधान्याने कोट्यवधी रुपये कर्ज महिला बचत गटात दिले जाते. यामागील कारण देखील असे आहे की जून महिन्यात शेती कामाची लगबग असते तसेच मुलांचे शाळा प्रवेश, वह्या,पुस्तके, कपडे यासाठी रोख रकमेची गरज असते तसेच दिवाळीसणाच्या काळात खर्च असतो. वेगवेगळ्या मालाची खरेदी करावयाची असते.




दरम्यान काळात वर्षभर बचत गटाला कर्ज पुरवठा सुरूच असतो. प्रारंभी प्रति महिला १० हजार रुपये कर्ज घेणाऱ्या महिला आज रोजी १ लाख रुपये कर्ज घेत आहेत. सुमारे १७०० बचत गट द्वारे सुमारे १७ हजार महिलांनी कर्ज घेतले असून या सर्वांना दिवाळीत दिवाळीचे साहित्य देखील भेट स्वरूपात दिले जाते. इतर मायक्रो फायनान्स कंपन्यापेक्षा इथे जास्त सुविधा, माफक व्याजदर, प्रक्रिया उद्योगास चालना, आपुलकी यामुळे महिला वर्गात वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट आणि चैतन्य महिला बचत गटांची सहकारी पतसंस्था बाबत समाधानाचे वातावरण आहे. कोरोना काळात काही फायनान्स कंपन्यांनी महिलांना दिलेल कर्ज वसुलीचा निर्णय घेतला. नवे कर्ज बंद केले जात होते. अशा वेळी लॉकडाऊन काळात विठ्ठलराव वाडगे यांनी नव्याने कर्ज देण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यांचे असे म्हणणे होते की लॉकडाऊन किती काळ राहील माहीत नाही. आज महिला बचत गटांची अवस्था बिकट आहे. त्यांना पैशाची गरज आहे. आपण संकट काळी उभे राहिलो तर महिला भविष्यात कर्ज परत करतील. आज त्यांना मदत करणे गरजेचे आहे आणि झालेही तसेच या काळात सुमारे २ कोटी कर्ज वितरीत करण्यात आले. ठप्प पडलेली अर्थचक्र सुरू झाले. कालांतराने लॉकडाऊन काळ संपला आणि महिलांनी घेतलेले कर्ज अदा केले. माणुसकीतून विठ्ठलराव वाडगे या माणसाने घेतलेला निर्णय सार्थकी ठरला !



याच काळात सर्वाधिक म्हणजे सुमारे २ हजार एकरातील द्राक्ष मळे असल्याने श्रीगोंदा तालुक्यातील कॅलिफोर्निया समजला जाणारा पारगाव आणि परिसर लॉकडाऊन मुळे द्राक्ष विक्री तोट्यात करावी लागली. तत्पूर्वी नैसर्गिक आपत्ती मुळे उत्पादन घटले. कोरोना काळात बाहेरील व्यापाऱ्यांनी ८ ते १० रुपयांनी द्राक्ष खरेदी केल्याने द्राक्ष उत्पादक बागायतदार आर्थिक अडचणीत सापडला. त्याला बँका कर्ज देण्यास धजावत नसताना माणुसकीतून द्राक्ष बागायतदारांना देखील २, कोटी रुपये कर्ज दिले. आज या बागा दिमाखात उभ्या आहेत. यात वाडगे यांचे योगदान निश्चित असल्याचे येथील बागायतदार आवर्जून सांगतात. कोरोना काळात उपचारासाठी दाखल रुग्णांच्या नातेवाईकांना कर्मचाऱ्या मार्फत विठ्ठलराव वाडगे यांनी जेवणाचे डबे पोहोच केले. ग्रामीण भागात किराणा साहित्य पोहोच केले . स्वातंत्र्य मिळाल्या पासून शासन पातळी वर ७५ वर्ष आदिवासी विकासाच्या योजना आखल्या जात आहेत. पण तालुक्यातील घोगरगाव, तरडगव्हाण परिसरातील आदिवासी समाजातील मच्छीमार करणारी कुटुंबे विकासा पासून दूर आहेत. ही कुटुंबे वर्षातील ६ महिने मच्छीमार तसेच इतर दिवसात मोलमजुरी करून गुजराण करत होते. विठ्ठलराव वाडगे यांनी त्या कुटुंबांची भेट घेतली. कर्ज बाबत माहिती दिली. त्यांना महिला बचत गट स्थापन करून देण्यात आवश्यक कागद पत्र बाबत मार्गदर्शन केले. त्यांना मच्छीमारीसाठी आवश्यक साधने घेण्यासाठी कर्ज दिले. त्या महिलांनी मुदतीत कर्ज फेड केली. पुढेही कर्ज घेऊन आपले आर्थिक उत्कर्ष करत आहेत. हे सर्व निस्वार्थी वृत्तीने वाडगे यांनी केले.



श्रीगोंदा तालुक्यात ऊसा पाठोपाठ कांदा पिक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. पण कांदा उत्पादक शेतकऱ्यांना त्याचे दर मिळत नव्हते. अधिक दर मिळण्याच्या आशेपोटी शेतकरी पुणे, सोलापूर तसेच राज्याबाहेर कांदा पाठवत असे. पण काही वेळा पैसे बुडत अशी शेतकऱ्याची फसवणूक होत होती. त्यामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण असे. विठ्ठलराव वाडगे यांनी यातून मार्ग काढण्याचे ठरवले. हेतू एकच कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अधिकचे दाम मिळावेत. शासनाच्या मॉडेल अँक्ट नुसार त्यांनी खाजगी बाजार समिती उभारण्याचा निर्णय घेतला आणि नगर दौंड राजमार्गावर पारगाव फाटा येथे ओम चैतन्य मल्टी अँग्रो पर्पज को ऑपरेटिव्ह लिमिटेडचे चैतन्य कृषी उत्पन्न बाजार समिती खाजगी तत्वावर सुरू केली. या बाजार समितीचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व प्रथम मालाचे वजन केले जाते,महानगर धर्तीवर लिलाव पुकारला जातो म्हणजेच दर जास्त मिळतो आणि मालाचे पैसे म्हणजेच आडत्या आणि शेतकऱ्यांच्या भाषेत पट्टी लागलीच दिली जाते. ती देखील शेतकऱ्यांच्या खात्यावर ! त्यासाठी बाजार समितीच्या शेजारीच वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह सोसायटीची शाखा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे अधिकचे दाम लागलीच मिळत आहेत. त्यामुळे इथे कांदा मोठ्या प्रमाणावर शेतकरी आणत आहेत.



आठवड्यातून ३ दिवस लिलाव होतात. श्रीगोंदा तालुका तसेच शेजारील तालुक्यातून देखील इथे कांदा मोठ्या प्रमाणावर येतो. याशिवाय भुसार, कडधान्य, चिंच, फळे, टोमॅटो, लिंबू विक्री देखील सुरू करण्यात आली होती. भविष्यात सर्व धान्य,






कडधान्य, फळे खरेदी विक्रीचा समितीचा मानस आहे या बाजार समितीत विठ्ठलराव वाडगे यांचा मुलगा शुभम वाडगे कारभार पाहत आहे.

तालुक्यात शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, स्पर्धापरीक्षा, सीए, वैद्यकीय आदी क्षेत्रात प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी मार्फत केला जातो. ८ मार्च अर्थात महिला दिनाचे औचित्य साधून राजकीय, शासकीय सेवेतील महिला अधिकारी यांच्या उपस्थितीत मेळावा आयोजित करण्यात येतो. त्यात कर्ज वाटप देखील केले जाते. महिलांच्या आरोग्य आणि कायदेशीर अधिकार बाबत मार्गदर्शन आणि शिबिराचे आयोजन करण्यात येते. विठ्ठलराव वाडगे यांच्या कार्याची दखल घेत राज्य सहकारी मंडळाने गौरव केला. राज्य स्तरीय प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सहकार मंडळाचे संचालक विनीत नारायण यांनी वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी आणि बाजार समितीला भेट देऊन खऱ्या अर्थाने शासन आणि सहकार मंडळाला अभिप्रेत महिला सक्षमीकरण आणि उद्योजक घडविण्याचे तसेच शेतकऱ्यांची चिंता वाहणारी कामे विठ्ठलराव वाडगे यांनी केले असल्याचे गौरवोद्गार काढले होते.

शेतकरी मग तो कांदा उत्पादक असो की द्राक्ष, लिंबू, भुसार तसेच महिला उद्योजिका,शेतमजूर, छोटे उद्योजक, विद्यार्थी अशा सर्वांच्या जीवनात चैतन्य निर्माण करण्याचे मोठे कार्य विठ्ठलराव वाडगे सतत करत आहेत. याशिवाय गोशाळा, आश्रम शाळा यांना मदत केली जाते. सतत भ्रमंती वर राहून श्रीगोंदा तालुक्यात काय नवीन आणता येईल त्यातून बेरोजगारांना कसा रोजगार मिळेल आपल्या तालुक्यातील कृषी मालावर प्रक्रिया करून कुठे बाजारपेठ मिळवता येइल याचाच विचार कोणताच स्वार्थ न ठेवता ही व्यक्ती करत आहे.

शासनाने मल्टीस्टेट सोसायटीना आरोग्य क्षेत्रात उतरण्याचे आवाहन केले. त्याला अनुसरून विठ्ठलराव वाडगे यांनी अल्प दरात सर्व सुविधा युक्त रुग्णालय उभारण्याचे ठरवले असून या क्षेत्रात देखील ते यशस्वी ठरतील यात शंका नाही.

आज रोजी श्रीगोंदा तालुक्यातील विकासाची घोड दौड अखंडित ठेवण्यासाठी विठ्ठलराव वाडगे,त्यांच्या पत्नी सौ. रुक्मिणीताई आणि मुलगा शुभम, स्नुषा सौ. सायली शुभम वाडगे असे पूर्ण कुटुंब योगदान देत आहेत.





ADVT

राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त

## जिल्हा परिषद कर्म.सहकारी पतसंस्था, नि.न.१ सोलापूर

रजि.नं.७२३४ फोन नं.२७२२४५०२ नों.दि.११/०५/१९३४

✻ वैशिष्ट्ये ✻

भाग भांडवल : २० कोटी
बचत ठेव : ५कोटी २९ लाख
रिझर्व्ह फंड : ३कोटी ६७ लाख
गुंतवणुक : १ कोटी ४८ लाख
सभासद कर्ज घेणे : २८ कोटी ५२ लाख
स्व भांडवल
ऑडिट वर्ग : 'अ'

स्व भांडवल
ऑडिट वर्ग : 'अ'
सुसज्य कार्यालय व विश्राम गृह
कर्ज व्याज दर ६ टक्के
लाभांश दर ३.७५ टक्के
आरटीजीएस ने कर्ज जमा विमा संरक्षण
कर्ज मर्यादा ८ लाख

विविध सामाजिक उपक्रम

रक्तदान व आरोग्य शिबीर
एसएमएस सेवा
दिनदर्शिका प्रकाशन
गुणवंत पाल्य सत्कार
तातडीने कर्ज ५० हजार
कॅशलेस व्यवहार

डी.एल.देशपांडे — सचिव
श्रीधर कलशेट्टी — व्हा.चेअरमन
श्रीमती श्वेतांबरी राऊत — चेअरमन

संचालक मंडळ

डॉ.एस.पी.माने, व्ही.बी.पाटील, एस.आर.तांबोळी, एस.एन.कुंभार
व्ही.व्ही.घोगरे, जी.एम.मारडकर, एस.डी.म्हमाणे, टी.ए.मुतवल्ली
के.जी.लालबोंद्रे, व्ही.के.शिंदे, सी.ए.वाघमारे, आर.आर.घुले
व्ही.एम. घेरडे, एस.एच.राठोड, सौ.एम.एस.शिंदे

तज्ञ संचालक — डॉ.पी.बी.नवले
स्वी. संचालक — श्री.के.एन.खुर्द

तरुण भारत वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा



राष्ट्रीय विचाराचे एकमेव दैनिक
दै.सोलापूर तरुण भारतच्या
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!



✻ शुभेच्छुक ✻

## मा. सुनिल मल्लिकार्जुन काळे

✻ पुणे प्रादेशिक संघटक : विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन (१०२९)
✻ कोषाध्यक्ष : वीज मंडळ तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर
✻ वरिष्ठ तंत्रज्ञ : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सोलापूर शहर विभाग



सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
✻ शुभेच्छुक ✻

## न्यू डिजीटल इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड मोबाईल

पिलीव, ता.माळशिरस, जि.सोलापूर

✻ सर्व नामांकित कंपनीचे मोबाईल योग्य दरात मिळण्याचे एकमेव ठिकाण
✻ सर्व नामांकित कंपनीच्या एलईडी टिव्ही एस.सी.सर्व्हिसेस, रेफ्रीजेटरर्स, वॉशिंग मशीन
✻ सर्व प्रकारचे होम अप्लायनसेस मिळण्याचे एकमेव ठिकाण

मोबाईलसह सर्व वस्तू फायनान्सवर उपलब्ध

प्रो.प्रा.नानासाहेब मदने
सातारा-पंढरपूर रोड, एस.टी.स्टॅन्ड जवळ, पिलीव
मो.9960300333 / 9730977312



सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनाच्या शुभेच्छा..!
Since -2006 पासून सेवेत

डॉ. कोंढारे (चिखर्डेकर)



डॉ. अभिजीत अरुण कोंढारे
B.A.M.S.
कन्सल्टिंग जनरल फिजिशियन अन् सर्जन
श्री साई क्लिनिक व मेडिकल स्टोअर्स, वैराग
पत्ता: खडकपुरा गल्ली, वैराग
ता. बार्शी, जि. सोलापूर

डॉ. सरस्वती अभिजीत कोंढारे
B.A.M.S.
जनरल फिजिशियन अन् सर्जन
श्री साई क्लिनिक व मेडिकल स्टोअर्स, चिखर्डे
पत्ता: शिक्षक सोसायटी, तळमजला,
मेन रोड, चिखर्डे, ता. बार्शी

नियोजित
"श्री साई हॉस्पिटल"
मोहोळ रोड, वैराग
आमची वैशिष्ट्ये:-
✻ सर्व आजारावर गुणवत्तापूर्ण उपचार (Quality Treatment)
✻ अत्याधुनिक आरोग्य सुविधा
✻ माफक दर (Affordable Price)
✻ तज्ञ व अनुभवी डॉक्टरांचे मार्गदर्शन





सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
✻ शुभेच्छुक ✻

मा.विजय भगवंतराव तडसरे
माजी विद्यापीठ खो-खो खेळाडू



सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!




सौ.राजश्री अ.चव्हाण
प्रदेश कार्यकारिणी सदस्य
भाजपा अ.ज.मोर्चा, महाराष्ट्र
मा.नगरसेविका, सोमपा

## भाजपा अनुसूचित जमाती मोर्चाच्या प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी पुन:श्च माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांची निवड

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अनुसूचित जमाती (ब्ढ) मोर्चा प्रदेश अध्यक्ष मा. आ. देवराज होळी यांच्या अध्यक्षतेखाली कोअर कमिटी स्थापन करण्यात आली होती. त्यामध्ये नव्याने समाजात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांच्या नावाची शिफारस करण्यात आली असून त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातून समाजामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व समाजाला न्याय मिळवून देणाऱ्या माजी नगरसेविका सौ. राजश्री चव्हाण यांच्या नावाची शिफारस करण्यात आली आहे.

गेल्या तीन वर्षांत त्यांनी समाजासाठी उल्लेखनीय कामगिरी केल्याने परत स.न. २०२६ ते २०२९ या वर्षांसाठी भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश कार्यकारणी सदस्य पदी प्रदेशाध्यक्ष नियुक्ती करण्यात आली आहे.

### त्यांची उल्लेखनीय कामगिरी

आदिवासी पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा.
प्रभाग क्र. २६ मधील विविध विकास कामे आत्तापर्यंत केली गेली नव्हती. ती सर्व कामे करण्यात आली. तसेच भविष्यात देखील आणखीन विकासात्मक कार्य करण्याचा मानस व्यक्त आहे.
आदिवासी पारधी समाजाच्या विविध समस्या मार्गी लावण्यासाठी पुढाकार समाजात नावालौकिक निर्माण करून भाजपा पक्षाचे नाव रोशन केले.

आदिवासी पारधी समाज व सोलापूर शहर व जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्या शासन दरबारी सोडवण्यासाठी त्यांची नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागतील, असा विश्वास आदिवासी पारधी समाज व नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. त्यांच्या पुनर्नियुक्तीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून जनतेमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



श्री.अनिल चव्हाण
सामाजिक कार्यकर्ते


सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिन
चिरायु होवो..!

PLANNING EXECUTION EXCELLENCE

DHANSHETTYS CORPS —PMC—
PROJECT MANAGEMENT CONSULTANT



Sanjay Dhanshetty
Retired Executive Engineer
Water Supply (MJP)

सर्व प्रकारचे शासकीय व खाजगी पाणीपुरवठा, ड्रेनेज, रस्ते, इमारती बांधकाम इत्यादी सेवा पुरवठादार

Cell : 9834216208 / 9604536666
Mail : sanjaydhanashetty@gmail.com
Add : Shop No.28, Sahyadri Shopping Center, old employment chowk, near LIC office Solapur 413001

# सोलापूर: वैभवशाली वारसा, विकासाची वाट आणि उज्ज्वल भविष्य!

**एकेकाळी भारताचे मँचेस्टर म्हणून ओळखले जाणारे सोलापूर हे केवळ वस्त्रोद्योगाचे शहर नव्हते, तर कष्ट, संस्कृती, उद्योग आणि सामाजिक ऐक्य यांचे प्रतीक होते. आज काळ बदलला आहे; उद्योगांचे स्वरूप बदलले, अर्थव्यवस्थेची दिशा बदलली, परंतु सोलापूरची जिद्द आणि उभारी आजही कायम आहे. भूतकाळातील वैभव जपत भविष्यातील संधींचे स्वागत करण्याची हीच योग्य वेळ आहे.**









एक काळ असा होता की सोलापूरमधील कापड गिरण्या आशिया खंडात प्रसिद्ध होत्या. गिरण्यांमधील शिफ्ट संपल्यानंतर हजारो कामगार एकाच वेळी बाहेर पडत असत. नवी वीस पोलीस चौकी परिसरात वाहतुकीची प्रचंड कोंडी होत असे. वाहतूक पोलीस प्रथम कामगारांना सुरक्षितपणे मार्गस्थ करत आणि त्यानंतरच इतर वाहने सोडत. त्या काळी गिरणीत नोकरी मिळणे म्हणजे प्रतिष्ठेचे आणि सुरक्षित




भविष्याचे प्रतीक मानले जात असे. लग्न जुळिवताना मुलगा गिरणीत नोकरीला असल्यास मुलीच्या पालकांचा आनंद द्विगुणित होत असे. दुर्दैवाने काळाच्या ओघात राजकीय हस्तक्षेप, गटबाजी आणि विविध कारणांमुळे सोलापूरचा वस्त्रोद्योग कोलमडला. हजारो कामगारांचे संसार उद्ध्वस्त झाले. मात्र, संकटांवर मात करणे हा सोलापूरकरांचा स्वभाव आहे. उद्योगांचे स्वरूप बदलले, शेती, शिक्षण, वैद्यकीय सेवा आणि व्यापारी क्षेत्रात नवीन संधी निर्माण झाल्या आणि सोलापूरने पुन्हा नव्या उमेदीने वाटचाल सुरू केली.

सोलापूर हा कमी पर्जन्यमानाचा जिल्हा असला तरी कृषी क्षेत्रात त्याने उल्लेखनीय यश मिळवले आहे. डाळिंबासह अनेक पिकांचे उत्पादन राज्यात आणि देशात महत्त्वाचे स्थान मिळवत आहे. उजनी धरणामुळे या भागाच्या शेतीला मोठा आधार मिळाला असून जलसंधारण आणि आधुनिक शेतीच्या माध्यमातून विकासाची नवी दालने खुली होत आहेत. सोलापूर जिल्ह्याला लाभलेली धार्मिक आणि ऐतिहासिक परंपरा ही त्याची सर्वात मोठी ताकद आहे. पृथ्वीवरील वैकुंठ मानले जाणारे पंढरपूर, आई तुळजाभवानीचे पवित्र



तुळजापूर, श्री स्वामी समर्थांची कर्मभूमी अक्कलकोट, गाणगापूर, तसेच माचनूरसारखी ऐतिहासिक स्थळे या भागाला आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वैभव प्रदान करतात. माचनूर येथे छत्रपती संभाजी महाराजांचे सुपुत्र छत्रपती शाहू महाराज यांचा विवाह झाल्याची ऐतिहासिक नोंद या भूमीचे महत्त्व अधिक अधोरेखित करते. जर या सर्व धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाला पर्यटनाच्या दृष्टीने आधुनिक सुविधा, उत्तम रस्ते, माहिती केंद्रे, स्वच्छता आणि दर्जेदार निवासव्यवस्था उपलब्ध करून दिली, तर सोलापूर पर्यटन क्षेत्रात देशाच्या नकाशावर अधिक ठळकपणे झळकू शकते. वाहतूक आणि दळणवळणाच्या दृष्टीने सोलापूरला रेल्वे जंक्शनचा मोठा लाभ मिळाला आहे. आधुनिक सुविधांनी सजलेले रेल्वे स्थानक शहराची ओळख उंचावत आहे. विमानतळाचाही प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागला असला तरी नियमित आणि सातत्यपूर्ण विमानसेवा सुरू राहणे आवश्यक आहे. लोकप्रतिनिधींनी यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करणे गरजेचे आहे.


डॉ. सुखदेव शिनगारे
भ्र. ९९२२९२३८५४

शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातही सोलापूरने उल्लेखनीय प्रगती केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, वालचंद महाविद्यालय, दयानंद महाविद्यालय, संगमेश्वर महाविद्यालय, भारती विद्यापीठ यांसारख्या संस्थांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा निर्माण केली आहे.

वैद्यकीय महाविद्यालये, शासकीय रुग्णालये आणि अत्याधुनिक खासगी रुग्णालयांमुळे सोलापूर आज वैद्यकीय सेवांचे महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होत आहे. आयटी पार्कसारखे प्रकल्प भविष्यातील रोजगारनिर्मितीसाठी आशादायक ठरणार आहेत. तथापि, काही मूलभूत प्रश्न आजही गंभीर आहेत. उजनी धरण इतके जवळ असूनही अनेकदा शहरवासीयांना पिण्याच्या पाण्यासाठी दिवसन्दिवस प्रतीक्षा करावी लागते. हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविणे ही काळाची गरज आहे.

सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी पाणी, उद्योग, रोजगार आणि आधुनिक पायाभूत सुविधा यांचा समतोल साधणे अत्यावश्यक आहे याचबरोबर




समाजविघातक आणि राष्ट्रविघातक प्रवृत्तींवर कठोर कारवाई होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. समाजात सुरक्षितता, कायद्याचा धाक आणि राष्ट्रीय हित जपले गेले, तरच विकासाला खऱ्या अर्थाने बळ मिळेल. सजग नागरिक, जबाबदार प्रशासन आणि प्रामाणिक लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त प्रयत्नातूनच सोलापूरचे भविष्य अधिक उज्ज्वल होऊ शकते.

देशहित, राष्ट्रभक्ती आणि निर्भीड पत्रकारिता यांचा वारसा जपणारे दैनिक तरुण भारत हे मराठी




पत्रकारितेतील एक विश्वासार्ह नाव आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून राष्ट्रीय विचारांची परंपरा जपत या दैनिकाने समाजजागृती, लोकहित आणि सत्यनिष्ठ पत्रकारितेची भूमिका सातत्याने निभावली आहे.

बदलत्या काळातही लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून जनतेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य तरुण भारत जबाबदारीने करत आहे. दैनिक तरुण भारतच्या वर्धापनदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा! सत्य, राष्ट्रहित आणि समाजहिताची ही अखंड वाटचाल अधिक जोमाने सुरू राहो, हीच सदिच्छा.

# कर्करोग रुग्णांसाठी आशेचा किरण

## बार्शीच्या अश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च अँड रिलीफ सोसायटीचा प्रवास आणि 'PET-CT Scan' क्रांती






**रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा या उक्तीला प्रत्यक्ष कृतीत उतरवत, सोलापूर जिल्ह्यातील बार्शी सारख्या ग्रामीण भागात कर्करोगासारख्या (कॅन्सर) महाभयंकर आजाराविरुद्ध गेल्या चार दशकांपासून एक यशस्वी लढा लढला जात आहे. हा लढा देणारी अग्रगण्य संस्था म्हणजे अश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च अँड रिलीफ सोसायटी, बार्शी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुरू झालेला हा प्रवास आज जागतिक पातळीवर कौतुकाचा आणि अभिमानाचा विषय ठरला आहे. पूर्वी बार्शीची ओळख भगवंताची बार्शी म्हणून होती, ती आता कॅन्सर हॉस्पिटलची बार्शी म्हणून अधोरेखित झाली आहे.**

### १ ऐतिहासिक सुरुवात आणि पायाभरणी (१९८२–

सन १९८२ मध्ये या संस्थेची स्थापना करण्यात आली. त्या काळात ग्रामीण भागात कॅन्सरचे नाव ऐकूनही लोक घाबरत असत. अशा कठीण काळात संस्थापक चेअरमन कै. डॉ. बी. एम. नेने यांनी ग्रामीण भागात कर्करोगावर उपचार व संशोधनाचे धाडसी पाऊल उचलले आणि संस्थेची मुहूर्तमेढ रोवली.

**उदार देणगी:**

बार्शीतील प्रसिद्ध दानशूर कथले दांपत्याच्या उदार देणगीतून आणि कथले ट्रस्टच्या मौल्यवान सहकार्यातून या महान कार्याची सुरुवात झाली. याच वर्षी (१९८२) संस्थेच्या अंतर्गत नर्गिस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलची स्थापना करण्यात आली.

**लोकजागृतीचा वसा:**

सुरुवातीच्या काळात कॅन्सरबद्दल प्रचंड भीती आणि अंधश्रद्धा होती. त्यामुळे केवळ उपचार न करता, ग्रामीण भागात लोकांच्या दारापर्यंत जाऊन जनजागृती करण्याचे आणि ३००० हून अधिक रोग निदान शिबिरांच्या माध्यमातून रुग्णांना शोधून सेवा देण्याचे कार्य कै. डॉ. बी. एम. नेने व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे केले.

### २. सामाजिक कटिबद्धता आणि आर्थिक मदतीचा हात–

अश्विनी रुरल कॅन्सर हॉस्पिटलने नेहमीच गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ रुग्णांना प्राधान्य दिले आहे. पैशांअभावी कोणत्याही रुग्णावर उपचार थांबणार नाहीत, याची काळजी संस्थेने घेतली आहे.

**महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना–**

२०१२ सालापासून महाराष्ट्र शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेच्या (पूर्वीची राजीव गांधी जीवनदायी योजना) प्रारंभापासूनच संस्थेने यामध्ये सहभाग घेतला. गेल्या १२ वर्षांच्या काळात सुमारे १ लाख रुग्णांनी या योजनेअंतर्गत विनामूल्य उपचाराचा लाभ घेतला आहे.

**थेट आर्थिक मदत:**

या व्यतिरिक्त, निर्धन व आर्थिकदृष्ट्या अत्यंत दुर्बळ असलेल्या रुग्णांना संस्थेमार्फत सुमारे १० कोटी रुपयांच्या अर्थसहाय्याचा थेट लाभ मिळवून देण्यात आला आहे.

**सीएसआर (CSR) निधीची जोड–**

संस्थेच्या पारदर्शक आणि निष्ठायुक्त कार्याची दखल घेऊन देशातील नामांकित उद्योग समूहांनी सढळ हाताने मदत केली आहे. यात फिरोदिया ट्रस्ट पुणे, टाटा ट्रस्ट मुंबई, आणि एसबीआय फाउंडेशन मुंबई यांनी त्यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी फंडातून अत्याधुनिक उपचाराच्या सोयींसाठी भरीव आर्थिक मदत केली आहे.

प्रभाकर क्षीरसागर
भ्र. ७२१८३३८००९

### ३. जागतिक दर्जाचे संशोधन आणि व्यवस्थापन:

संस्थेच्या संचालक मंडळाने अत्यंत नियोजनबद्ध, कटकसरीने आणि पूर्ण पारदर्शकतेने संस्थेचा सर्वांगीण विकास केला आहे. केवळ उपचारच नव्हे, तर जागतिक दर्जाच्या संशोधनातही संस्थेने नाव कमावले आहे.

**वैश्विक मान्यता:**

संस्थेने जागतिक आरोग्य संघटना (WHO / I-RC - Inter national agency for Research on Cancer) आणि टाटा स्मारक केंद्र (Tata Memorial Centre), मुंबई यांच्या समवेत विविध कर्करोग संशोधन प्रकल्प यशस्वीपणे राबविले आहेत. या संशोधनास आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाल्यामुळे बार्शीचे नाव जागतिक वैद्यकीय नकाशावर झळकले आहे.

### ४. अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि 'PET-CT Scan'चे महत्त्व–

आज हे रुग्णालय २०० किलोमीटरच्या परिघातील (सोलापूर, उस्मानाबाद/धाराशिव, लातूर व लगतचा परिसर) हजारो गरजू कॅन्सर रुग्णांसाठी शाश्वत उपचाराचे हक्काचे ठिकाण बनले आहे. एकाच छताखाली सर्व प्रकारच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असणे हे या रुग्णालयाचे मोठे वैशिष्ट्य आहे.

आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये संस्थेने स्वतःच्या निधीतून (स्वनिधी) कोट्यवधी रुपयांची अत्याधुनिक रेडिएशन मशीन रुग्णांच्या सेवेत दाखल केली. यामुळे मुंबई–पुण्यासारख्या महानगरांमध्ये उपलब्ध असणाऱ्या 3 DCRT, IMRT आणि VM-T सारख्या हाय–टेक रेडिएशन थेरपीचा लाभ आता ग्रामीण भागातील गरीब रुग्णांना मिळत आहे. यासोबतच, रुग्णालयात नव्याने सुरू झालेली पेट सीटी स्कॅन (PET-CT Scan) सुविधा कर्करोग व्यवस्थापनात मैलाचा दगड ठरत आहे.

**कॅन्सर रुग्णांसाठी PET-CT Scan चे महत्त्व व मुख्य फायदे–**

अचूक निदान आणि मूल्यमापन: रोगाची नेमकी स्टेज (Staging) ओळखणे, उपचारांचे अचूक नियोजन करणे, चालू असलेल्या उपचारांचा (किमोथेरपी/रेडिएशन) किती फायदा होत आहे हे तपासणे आणि कॅन्सरचा पुनरुद्भव (Recurrence) शोधण्यासाठी हे स्कॅन अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

कॅन्सर व्यवस्थापनातील "Decision-Making Tool': PET-CT Scan ही केवळ एक सामान्य तपासणी नसून उपचाराच्या प्रत्येक टप्प्यावर महत्त्वाचे आणि योग्य निर्णय घेण्यासाठी डॉक्टरांना अत्यंत उपयुक्त ठरते.

**वेळ आणि पैशांची मोठी बचत:**

स्थानिक पातळीवर ही सुविधा उपलब्ध झाल्यामुळे रुग्णांचा मुंबई, पुणे सारख्या मोठ्या शहरांमध्ये जाण्याचा प्रवासखर्च, राहण्याचा खर्च आणि मौल्यवान वेळ वाचत आहे.

**त्वरित उपचार नियोजन:**

अचूक निदानामुळे पुढील उपचारांचे नियोजन आणि कार्यवाही तातडीने करणे शक्य झाले असून याचा थेट फायदा ग्रामीण भागातील रुग्णांना होत आहे.

**जीवनमानात सुधारणा:**

आधुनिक कॅन्सर उपचारामध्ये योग्य वेळी केलेल्या PET-CT मुळे रुग्णाच्या उपचार परिणामांमध्ये आणि जीवनमानात (Quality of Life) लक्षणीय सकारात्मक सुधारणा होते.

**इतर आजारांचेही अचूक परीक्षण:**

या सुविधेमुळे केवळ कर्करोगच नव्हे, तर हृदयविकार (Heart Diseases) आणि मेंदूचे विकार (Neurological Disorders) यांचे अचूक परीक्षण करणे आणि उपचारांच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करणे सहज शक्य झाले आहे.

### ५. सक्षम नेतृत्व आणि भावी संकल्प:

सध्या संस्थेचे कार्य अत्यंत सक्षम, अनुभवी आणि दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाखाली प्रगतीपथावर आहे. संस्थेच्या या यशाचे मुख्य आधारस्तंभ खालीलप्रमाणे आहेत:

विद्यमान कार्याध्यक्ष: आमदार ॲड. दिलीपरावजी सोपल
अध्यक्षा: श्रीमती प्रभावती झाडबुके
चेअरमन: श्री. नंदकिशोर सोमाणी
सेक्रेटरी: श्री. सत्यनारायण झंवर
खजिनदार: श्री. बन्सीधर शुक्ला

**तसेच समस्त संचालक मंडळ व तज्ज्ञ वैद्यकीय चमू. भविष्यातील मानस:**

भविष्यातही महानगरांमध्ये मिळणाऱ्या कॅन्सर उपचार व संशोधनाच्या सर्वच्या सर्व अत्याधुनिक सुविधा बार्शीत आणणे आणि त्या ग्रामीण भागातील सामान्य जनतेला अत्यंत माफक व परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणे, हाच संस्थेचा मुख्य संकल्प आणि ध्येय आहे.

**निष्कर्ष:–**

थोडक्यात सांगायचे तर, अश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च अँड रिलीफ सोसायटी म्हणजे केवळ एक रुग्णालय नसून, हजारो कॅन्सर रुग्णांना नवजीवन देणारे हक्काचे माहेरघर आहे.

जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान आणि ग्रामीण भागातील सेवाभाव यांचा मेळ घालत या संस्थेने आरोग्य क्षेत्रात एक आदर्श क्रांती घडवून आणली आहे.




# सोलापूरच्या विकासासाठी शैक्षणिक योगदान देणाऱ्या संस्था

पर्यावरणाचा, विज्ञानाचा,भौगोलिकतेचा, अभ्यास करता येतो. महिलांच्या शिक्षणाची सोय झाल्यामुळे त्यांच्या आर्थिक विकासाबरोबरच त्यांच्यातील अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा, नाहीशी होण्यास मदत होते. या दृष्टीने विस्तारपूर्वक विचार केला असता, सोलापूर शहर व सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात शिक्षण क्षेत्राचे योगदान अतिशय मोलाचे ठरले आहे. अनेक सामाजिक, शैक्षणिक संस्थांचा या कामी सिंहाचा वाटा आहे. त्यापैकी काही संस्थांचा आवर्जून उल्लेख करावा, असे वाटते. छोट्या- मोठ्या अनुदानित, विना अनुदानित संस्थाही आपली गुणवत्ता टिकविण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

**औद्योगिक क्षेत्रा प्रमाणेच सोलापूरच्या विकासात शैक्षणिक क्षेत्राचेही फार मोठे योगदान आहे. सोलापूर शहराबरोबरच जिल्ह्यातील नामांकित शिक्षण संस्था गुणवत्ता संपन्न शिक्षण देण्याचे प्रयत्न करीत आहेत. बालवाडीपासून ते विद्यापीठापर्यंत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानानुसार शिक्षण दिले जाते. जागतिक दर्जाचे ज्ञान व गुणवत्तापूर्ण शिक्षण हे शासनाचे प्रमुख ध्येय आहे. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमधील कौशल्ये विकसित होतात, शिवाय आधुनिक तंत्रज्ञान मिळविणेही त्यांना सुलभ होते.**



## एकमेव असे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय

वैद्यकीय महाविद्यालय आहे, जे पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा-कर्नाटक सीमा भागातील एकमेव असे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. सदर महामहाविद्यालय आरोग्य सुविधा व तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत सेवा देण्यासाठी सदैव जागरुक असते. डॉ.वैशंपायन स्मृती शासकीय महाविद्यालय असे या महाविद्यालयाचे नाव असून, वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून ओळखले जाणारे डॉ. विष्णू गणेश वैशंपायन यांनी, १९६३ मध्ये हे महाविद्यालय सुरु केले. सुरुवातीला ते खाजगी स्वरुपात चालवले जात होते; पण नंतर मात्र ते १९७७ च्या दरम्यान, महाराष्ट्र शासनाने ताब्यात घेतले.



## सोलापुरातील दयानंद शिक्षण संस्था

१७ जून१९४० रोजी स्थापन झाली. दयानंद अँग्लो वैदिक कॉलेज ट्रस्ट आणि मॅनेजमेंट सोसायटीद्वारे ही शिक्षण संस्था चालविली जाते. आर्य समाजाच्या चळवळीच्या विजयाची आठवण म्हणून या संस्थेकडे आदराने पाहिले जाते. वाणिज्य आणि व्यवस्थापन क्षेत्राचे अद्ययावत ज्ञान या संस्थेकडून दिले जाते. १९६४ साली या संस्थेमार्फत विधी महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. आजपर्यंत नामांकित विधिज्ञ या संस्थेने सोलापूरला दिले आहेत.




सोलापूरच्या शैक्षणिक विकासाच्या टप्प्यातील आणखी एक उल्लेखनीय नाव म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ सोलापूर १ ऑगस्ट २००४ रोजी स्थापन झालेले, हे विद्यापीठ म्हणजे उच्च शिक्षणाचे सर्वोच्च केंद्रच म्हणावे लागेल.

## श्री.शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालय



* सोलापुरात एम. बी.बी.एस शाखेप्रमाणेच बी.ए.एम एस् ही वैद्यकीय क्षेत्रातील दुसरी शाखाही कार्यरत आहे. * श्री.शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालय हे अतिशय जुने, नामांकित, प्रतिष्ठित, असे महाविद्यालय असून, ते शेठ सखाराम नेमचंद जैन आयुर्वेदिक औषधालय ट्रस्ट या संस्थेमार्फत चालवले जाते. या ट्रस्टच्या नावानेच शुद्ध आयुर्वेदिक औषधांचीही निर्मिती व विक्री या संस्थेच्या वास्तुतच केली जाते.

या क्षेत्रातील तिसरी शाखा आहे, होमिओपॅथिक महाविद्यालय हे श्री.दि. जैन जन मंगल प्रतिष्ठान अर्थात जैन बोर्डिंग संस्थेमार्फत चालवले जाते. सोलापुरातून वैदिक क्षेत्रातील तीनही शाखांधून नामांकित डॉक्टर तयार होऊन, शहरासह ग्रामीण भागातही ते सेवा देत आहेत. हे होमिओपॅथिक कॉलेज नाशिकशी संलग्न असून याच इमारतीत डी. फार्मसीचेही शिक्षण दिले जाते. सोलापूरच्या विकासात या तिन्ही महाविद्यालयांनी शिक्षण क्षेत्रात एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

आपले सोलापूर शहर मवैद्यकीय सेवेबरोबरच अभियांत्रिकी शिक्षण देण्यातही अग्रेसर आहे. नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालये तज्ज्ञ अभियंता तयार करण्यासाठी पुढे येत आहेत. त्या पैकीच एक स्वायत्त महाविद्यालय म्हणजे वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय. या महाविद्यालयाची स्थापना १९८३ च्या जुलै महिन्यात झाली. ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाला ट्रस्ट या संस्थेमार्फत हे महाविद्यालय चालवले जाते. १८८५ साली ही संस्था स्थापन झाली. विविध शाखांच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण या संस्थेमार्फतही दिले जाते. श्रीमान शेठ वालचंद हिराचंद यांच्या सन्मानार्थ, त्यांच्या नावाने हे अभियांत्रिकी महाविद्यालय चालवले जाते या संस्थेला जैन अल्पसंख्याक दर्जा प्राप्त झालेला आहे.




## संगमेश्वर महाविद्यालय

जून १९५३ मध्ये संगमेश्वर महाविद्यालय अस्तित्वात आले. कर्मयोगी कै. नागप्पा काडादी व कै.मडेप्पा काडादी यांच्या प्रेरणेतून ही संस्था स्थापन झाली. मकन्नड भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त असलेलेफ हे महाविद्यालय संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी याद्वारे चालविले जाते.

## वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय.




आपले सोलापूर शहर वैद्यकीय सेवेबरोबरच अभियांत्रिकी शिक्षण देण्यातही अग्रेसर आहे. नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालये तज्ज्ञ अभियंता तयार करण्यासाठी पुढे येत आहेत. त्या पैकीच एक स्वायत्त महाविद्यालय म्हणजे वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय. या महाविद्यालयाची स्थापना १९८३ च्या जुलै महिन्यात झाली. ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाला ट्रस्ट या संस्थेमार्फत हे महाविद्यालय चालवले जाते. १८८५ साली ही संस्था स्थापन झाली. विविध शाखांच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण या संस्थेमार्फतही दिले जाते. श्रीमान शेठ वालचंद हिराचंद यांच्या सन्मानार्थ, त्यांच्या नावाने हे अभियांत्रिकी महाविद्यालय चालवले जाते या संस्थेला जैन अल्पसंख्याक दर्जा प्राप्त झालेला आहे.



अरुण धुमाळ
भ्र. ९८९०९०२९२३

सोलापूरच्या हलवाई गल्लीत एका छोट्याशा जागेत. दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे कार्यालय होते. या मंडळाद्वारे मस्वर्गीय विठ्ठलराव शिवदारे- अण्णा ही संस्था आज सोलापुरातील एक नामांकित संस्था म्हणून ओळखली जाते. २००५ साली वि. गु. शिवदारे महाविद्यालय सुरु झाले. याच महाविद्यालयाच्या इमारतीत डी.फार्मसी महाविद्यालयही आहे. अनेक शाखा या संस्थेमार्फत चालवल्या



* १९१२ साली पद्मशाली शिक्षण संस्था अस्तित्वात आली. समाजातील दानशूर मंडळींच्या सहभागातून ही संस्था स्थापन झाली. प्रशाला, कनिष्ठ- वरिष्ठ महाविद्यालय, बुरला महाविद्यालय, इत्यादी शाखांमधून या संस्थेत शिक्षण दिले जाते. * सोलापूर बहुभाषिक शहर आहे. इथे कन्नड, तेलगू, उर्दू, हिंदी इत्यादी भाषा बोलल्या जातात. या भाषा भगिनींच्या माध्यमातू ही शिक्षण दिल्यामुळे सोलापूरचा विकास झपाट्याने होत आहे. आता तर आय. टी. पार्क होऊ लागला आहे. विमान सेवा ही सुरु झालेली आहे. आता मात्र सोलापूरचे विद्यार्थी सोलापूर बाहेर जाणार नाहीत. त्यांचे योगदान सोलापूरसाठीच असेल.



* एके काळी सोलापुरातील तीन साने गुरुजींनी, नामांकित संस्था उभ्या केल्या. दीनानाथ कमळे गुरुजींनी, सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाची स्थापना केली. * चंद्राम गुरुजींनी, मागास समाजसेवा मंडळाची स्थापना केली. * तर भीमराव जाधव गुरुजींनी, विमुक्त जाती सेवा मंडळाची स्थापना केली. या तीनही गुरुजींची, साने गुरुजींच्यावर अतिशय श्रद्धा होती. * प्रति साने गुरुजी आलुरे गुरुजींनी, अणदूरला खंडोबाच्या मंदिरात शाळा सुरु करुन, शिक्षण क्षेत्राला वाहून घेतले. या संस्थांमधून शिक्षणाबरोबरच नैतिकतेचेही धडे दिले जातात.

* कुमठे- बेलाटी भागात १९६७ मध्ये ब्रह्मदेवदादा माने यांनी शिक्षण प्रसारक मंडळ कुमठे या संस्थेची स्थापना केली. एस. पी. एम. पॉलिटेक्निक कॉलेज व बेलाटी- कुमठे येथे, त्यांच्या प्रेरणेने एक शिक्षण संकुलच उभे करण्यात आले आहे.



* थोर समाजसेवक तुळशीदास जाधव यांनी, बाळे येथे संस्था स्थापन केली, तर इंदिरा ज्ञान वर्धिनी सोलापूर ही मुख्य स ं स थ ा निर्मलाताई ठोकळ चालवत होत्या. या दोन्हीही संस्था आज गतिमान होत आहेत.

* महिलांना स्वावलंबी, सक्षम बनविण्यासाठी पं.पद्मश्री सुमतीबाई शहा यांनी सोलापुरात श्राविकाश्रम संस्थेची स्थापना केली. आजही ही संस्था महिला व मुलींसाठी कार्य करते.

* ऑर्किड अभियांत्रिकी व तांत्रिक महाविद्यालयमार्फत तांत्रिक कौशल्याचे ज्ञान देऊन, ग्रामीण भागातील तरुणांना या संस्थेने रोजगार मिळवून देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्याचे काम केले.

* नवले अभियांत्रिकी महाविद्यालय, भारतीय विद्यापीठ, नवीन काळातील प्रगत विद्यापीठ म्हणून एम.आय. टी.चा उल्लेख आवर्जून करता येईल. डिझाईन आणि फार्मसी क्षेत्रात जागतिक दर्जाचे शिक्षण या ठिकाणी दिले जाते.

* मुले व मुलींसाठी स्वतंत्रपणे व्यावसायिक शिक्षण देणारी,आय.टी.आय. ही एक नामवंत शिक्षण संस्था आहे.सामान्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य ही संस्था करते.

* शिक्षण महर्षी कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांची बार्शी- तील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संस्था, वैरागमधील कै. धन्यकुमार भुमकर यांची विद्यामंदिर संस्था, कै. शांतीलाल गांधी यांची सुवर्णशांती ही संस्था, बळीराम साठे यांची वडाळा येथील, शिक्षण संस्था आणि इतरही छोट्या-मोठ्या संस्था, उद्योगांना आणि शिक्षणाला गतिमान करण्याचे काम अविरतपणे करीत आहेत व ते असेच सुरु राहणार आहे, यात तिळमात्रही शंका नाही.

## सोलापूरच्या शैक्षणिक क्षेत्राचा इतिहास

महाराष्ट्राच्या शैक्षणिक व सामाजिक प्रगतीत सोलापूर शहर आणि जिल्ह्याचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आणि ऐतिहासिक आहे. सोलापूरच्या शैक्षणिक क्षेत्राचा इतिहास मोठा आणि समृध्द आहे. उपलब्ध नोंदीनूसार १८५५ – ५६ मध्ये जिल्ह्यात केवळ ११ शासकीय शाळा होत्या. १८८२- ८३ पर्यंत ह संख्या १७६ झाली. आणि विद्यार्थी संख्या सुमारे ७, ९११ वर पोहोचली होती. बार्शीत १८६९मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू झाली. हेही सोलापूरच्यज्ञा शिक्षण विस्तारातील महत्त्वाचे पाऊल स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते आजतागायत विविध संस्था, व्यक्ती आणि समाजसुधारकांनी सोलापुरात शिक्षणाचा पाया मजबूत केला आहे. ऐतिहासिक व संस्थात्मक योगदानजुनी शिक्षण परंपरा: सोलापुरात शतकानुशतके जुन्या व प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. यामध्ये डी.ए.व्ही. कॉलेज, वालचंद कला आणि विज्ञान महाविद्यालय, आणि अनेक जुन्या शाळांचा समावेश आहे. औद्योगिक व दानशूर व्यक्तींचे कार्य: वालचंद हिराचंद, सेठ हिराचंद नेमचंद यांसारख्या उद्योजक व समाजसेवकांनी सोलापुरात उच्च व व्यावसायिक शिक्षधणाचा पाया रोवला.



## उच्च शिक्षण आणि विद्यापीठ:

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ:** स्थानिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी स्थापन झालेले हे विद्यापीठ संशोधन, कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेचे शिक्षण पुरवत आहे. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये डिजिटल साधने आणि ई-संसाधनांच्या वापरावरही भर वाढला आहे.

**तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण:** सोलापुरात अभियांत्रिकी, वैद्यकीय (जसे की शासकीय वैद्यकीय महाविद्यालय), वास्तुकला आणि तंत्रनिकेतन संस्थांमुळे तांत्रिक शिक्षणाचा विस्तार झाला आहे. अलीकडेच शासकीय तंत्रनिकेतनचे उच्च स्तरात रूपांतर करून नवीन तंत्रज्ञान अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. ग्रामीण व सर्वसमावेशक शिक्षण आश्रम शाळा व ग्रामीण विकास: सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आणि उपेक्षित घटकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी आश्रम शाळांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**बहुभाषिक व सांस्कृतिक प्रवाह:** मराठी, कन्नड आणि तेलगू भाषेचा संगम असलेल्या या शहरात विविध भाषिक विद्यार्थ्यांना सामावून घेणारी शिक्षण व्यवस्था उभी राहिली आहे, ज्याने एकात्मतेचा संदेश दिला आहे. सोलापूरची शैक्षणीक वाटचाल दमदार आहे.



# माळशिरसचे पक्षी व वन्यजीव वैभव



**पक्ष्यांच्या अधिवासाबद्दल सोलापूर जिल्ह्यातील इतर तालुक्यांच्या तुलनेने अग्रेसर असलेले माळशिरस तालुका पक्षी वैविध्य व अन्य वन्यजीवांबाबतीत समृद्ध आहे. माळशिरस तालुक्याचा शिरोभाग माळरान, दगड- खडकाळ भागाने व्यापलेला असल्यामुळे या तालुक्याला माळशिरस असे समर्पक नाव दिले आहे. सोलापूर जिल्ह्यातील हा तालुका जिल्ह्याच्या पश्चिमेकडे, सांगली व सातारा व उत्तरेकडे पुणे जिल्ह्यांना जोडून आहे. तालुक्यात वीर-भाटघर व उजनी धरणातून खळाळणाऱ्या पाण्यामुळे तालुक्याचा पश्चिम भाग वगळता बहुतांश क्षेत्र बारमाही बागायती पिकांनी बहरून असतो.**



दरवर्षी बरसणाऱ्या बेताच्या पावसामुळे तालुका अवर्षणप्रवण भागात मोडत असला तरी खूप वर्षांपूर्वी सहकार चळवळीच्या माध्यमातून तालुक्यात पाण्याची पाटांचे जाळे पसरलेले आहे. त्यामुळे तालुक्याचा बराच भूभाग हिरव्या पिकांनी व वनसंपदेनी झाकोळलेला आहे. तालुक्यात घनदाट जंगल नसले तरी बहुतांशी क्षेत्र ऊसाने आच्छादित झालेले आहे. फळबागांची शेती फुलली आहेत; परिणामी विविध कीटक, पक्षी व वन्यजीवांना पोषक वातावरण तालुक्याला लाभले आहे. त्यामुळे तालुक्याला पक्षी तसेच वन्यप्राण्यांना समृद्ध प्रदेश म्हणून ओळखले जाते.

तालुक्यात चार साखर कारखाने असून कारखाना परिसरात लावलेले विविध भारतीय मूळ वृक्षराजी पक्ष्यांसाठी सारंगगार ठरले आहेत. माळीनगर व सदाशिवनगर येथील साखर कारखाना परिसरातील वृक्षसंपदेच्या गर्दीत दाटीवाटीने वर्षानुवर्षे स्थानिक व स्थलांतरित पक्षी वर्षभर रात्रीच्या विसाव्याला असतात. सदाशिवनगर येथील शंकर सहकारी साखर कारखाना परिसरातही गेली कित्येक वर्षांपासून विविध पक्ष्यांची किलबिल ऐकायला मिळते. माळीनगरच्या साखर कारखाना परिसरात सुमारे सत्तर वर्षांपूर्वी लावलेले मोठाले वृक्ष आजमितीला मोठ्या दिमाखाने हजारोंच्या संख्येच्या पक्ष्यांसाठी वसतीस्थान बनले आहेत. गायबगळे, राखीबगळे, पाणकावळे, पोपट, भारतीय साळुंकी, चमचे चोच इत्यादी पक्षी शेकडोंच्या कळपाने दिवसभरातील उदरनिर्वाह करून मुक्कामाला या ठिकाणी झाडांवर स्थान निश्चिती करून रात्रभर झोपी जातात. हिवाळ्यात युरोपमधून स्थलांतर करून येणारे भोरड्या (गुलाबी मैना) हे पक्षी लक्षावधी संख्येने या ठिकाणी मुक्काम करतात. तालुक्याला पुणे जिल्ह्या अलग करणारे सुमारे ५० किलोमीटर नीरा नदी काठ व माढा तालुक्याला विलग करणारे सुमारे ३० किलोमीटर भीमा नदीकाठ लाभलेली आहे. या दोन्ही नदी पात्रात व काठावर अनेक स्थानिक व स्थलांतरित जलपक्षी वर्षभर नजरेस पडतात. तसेच नदीच्या काठावरील गचपणीत सायाळ (साळिंदर) व खवले मांजर असे वैशिष्ट्यपूर्ण वन्यजीव दिसून येतात. तालुक्यातील लवंग गावाच्या शिवारातील ऐतिहासिक वज्राई मंदिराजवळच्या नीरा नदीच्या खडकाळ पात्रात नैसर्गिकरित्या तयार झालेल्या दगडाच्या कपारीत शेकडो पाकोळी पक्ष्यांनी चिखल वापरून गोवऱ्या सारखे घरटी लिंपून नवीन पिढीला जन्म घालतानाचे काम वर्षानुवर्षे चालत आहे.





डॉ. अरविंद कुंभार
भ्र. ९८२२१२४१९१

तालुक्याचा पश्चिम भाग डोंगराळ असून बहुतांश क्षेत्रा गवताळ कुरणाने व्यापला आहे. या भागातील जिल्ह्यातील अती उंच शिखर म्हणून प्रसिद्ध असलेल्या सुळकाई मंदिर परिसर विविध शिकारी पक्षी व वन्यजीवांना नंदनवन ठरले आहे. माळरानाचे वैभवाचे प्रतीक असलेले घारींपैकी कापशी घार, काळी घार (चचाण), ब्राह्मणी घार, गरुडांपैकी काळा ग[illegible], पिंगट गरुड व पांगूळ गरुड, ससाण्यातील बहिरी ससाणा व नारझिनट ससाणे, बाज, शिक्रा व खाटिक हे शिकारी पक्षी पावसाळा व हिवाळ्यात सावज टिपण्यासाठी आकाशात घिरट्या घालताना आढळतात. या भागातील माळावरील विशाल गवताळ प्रदेशात व कपारीत विविध साप, घोरपड, सरडे, साळिंदर, मुंगूस, खवले मांजर, कोल्हे, खोकड, लांडगे, तरस हे अनेक वन्यप्राणी वावरत पर्यावरणातील अन्नसाखळी शाबूत ठेवले आहेत. अन्नसाखळीत मुख्य घटक असलेले वटवाघळे तालुक्यातील रस्त्यांच्या कडेला जुन्या वृक्षांवर मोठ्या समूहाने उलटे टांगून लोंबकळतानाचे दृश्य सर्रास पाहायला मिळत असे; परंतू विकासाच्या सबबीखाली या झाडांची कत्तल केल्यामुळे या निशाचर वटवाघळांची संख्या घटली आहे.



तालुक्यातील निमगाव (म), फोंडशिरस, उघडेवाडी, फडतरी, पानीव- गिरझणी, कुसमोड या गावांच्या शिवारात मानवनिर्मित जुने तलाव आहेत. या सर्वच जलस्थानांवर वर्षभर स्थानिक पक्ष्यांबरोबर स्थलांतरित पक्षी गर्दी करून वावरत असतात.



तालुक्यात २०० हून अधिक प्रकारचे पक्ष्यांची नोंद डॉ. निनाद शहा, डॉ. अरविंद कुंभार या ज्येष्ठ पक्षी अभ्यासकांच्या मदतीने, ऋतुराज कुंभार, दिग्विजय देशमुख, डॉ. विधिन कांबळे, निरंजन मोरे, अश्विनी हेगडे, वृषाली कुंभार अश्विनी बाबर, अतुल जोशी, प्रकाश धाईंजे, अभय जोशी आदी पक्षी निरीक्षकांनी नोंद केली आहे.



२००७ नंतर पर्यटकांचे आकर्षण केंद्र ठरलेले सयाजीराजे पार्क नव्याने पक्षी धाम म्हणून नावारूपाला आले आहे. गेल्या काही वर्षांपासून या ठिकाणी मानव निर्मित तलावाकाठी उभे असलेल्या मोठ्या वृक्षांवर चित्रबलाक (रंगीत करकोचे) हे शेकडोंच्या जोडीने आपल्या पिल्लावळांना जन्म घालण्यासाठी 'मेटॅर्निटी होम' साकारत आहेत.



मुबलक पाणी व खाद्य, पक्ष्यांच्या अधिवासासाठी सुरक्षित ठिकाणं व झाडाझुडुपांचे अस्तित्व या कारणांमुळे पार्कला भेटी देणाऱ्या पर्यटकांना वर्षभर या ठिकाणी विविध पक्षी आपल्या मनमोहक छबीने भुरळ घालतात. अकलूज येथील कै. शंकरराव मोहिते- पाटील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील वखार व मोठ्या झाडांवर शेकडो भारतीय पोपट गेली कित्येक वर्षे वावरताना आढळतात. तालुक्यातील जैववैविध्य टिकून ठेवण्यासाठी त्यांच्या अधिवासातील मानवी शिरकाव, वृक्षतोड, शिकारी इत्यादी अहितकारक गोष्टींना आळा घातला पाहिजे.





# उपळाई बुद्रुक बनले अधिकाऱ्यांचे गाव



रोहिणी भाजीभाकरे | अश्विनी वाकडे | स्वप्निल पाटील | शिवप्रसाद नकाते | संदीप भाजीभाकरे

पोलिसांचे गाव, सैनिकांचे गाव, पुस्तकांचे गाव अशी अनेक गावे आजवर आपण पाहिली आहेत. पण सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील उपळाई बुद्रुक हे गाव प्रशासकीय अधिकाऱ्यांचे गाव म्हणून नावरूपास आले आहे. या गावाने आजपर्यंत तीन कलेक्टर, एक आयआरएस, एक आयपीएस, आरटीओ, तहसीलदार आणि १८ पोलिस उपनिरीक्षकांसह महसूल, बांधकाम, जिल्हा परिषद, समाजकल्याण अशा विविध विभागांतील पन्नासहून अधिक अधिकारी प्रशासनाला दिले आहेत. परराज्यांतील प्रशासनातही उपळाईतील अधिकाऱ्यांचा दबदबा आहे.

सोलापूर शहरापासून ८० किलोमीटरवर माढा- शेटफळ रस्त्यावर सुमारे नऊ हजार लोकसंख्येचे उपळाई बुद्रुक हे गाव. येथील तरुणांनी गावातील जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आणि रयत शिक्षण संस्थेच्या नंदिकेश्वर विद्यालयात शिक्षण घेऊन जिद्द, चिकाटी आणि प्रयत्नांच्या बळावर स्पर्धा परीक्षेतील यशाला गवसणी घातली आहे. केवळ एकमेकांच्या प्रेरणेमुळे गावातील तरुणाईने दिशादर्शक वाटचाल केली आहे.

२००३ मध्ये लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून पोलिस उपअधीक्षक म्हणून डॉ. संदीप भाजीभाकरे हे पहिल्यांदा पोलिस दलात रुजू झाले. त्यानंतर त्यांची बहीण रोहिणी भाजीभाकरे या जिल्हाधिकारी झाल्या आणि त्यानंतर गावातील तरुणाईचा नूरच बदलला. बहुतेक तरुण स्पर्धा परीक्षेत उतरू लागले. त्यानंतर एकेक करत गेल्या २० वर्षांत तब्बल ६० अधिकारी उपळाई बुद्रुकने प्रशासनाला दिले. त्यापैकी बहुतेक महाराष्ट्रात आहेतच. काहीजण राजस्थान, तमिळनाडू, तेलंगणा आणि दिल्लीसारख्या राज्यातही आपलं आणि आपल्या गावाचे नाव उज्वल करत आहेत.

**माढा तालुक्यातील उपळाई बुद्रुक हे एक छोटस गाव असलं तरी माढा तालुक्यासह सोलापूर जिल्ह्याची मान उंचवणारी गोष्ट म्हणजे या गावाची ओळख अधिकाऱ्याची गाव म्हणून सर्व दूर झाली आहे.**

## माढा तालुक्यासह सोलापूर जिल्ह्याची मान उंचावणारी गोष्ट

डॉ. संदीप भाजीभाकरे हे सध्या पुण्यात पोलिस उपायुक्त आहेत. तर त्यांची बहीण आएएस रोहिणी भाजीभाकरे या केंद्र सरकारच्या ग्रामविकास मंत्रालयात सचिव आहेत. या आधी त्या तामिळनाडूत सेलमच्या जिल्हाधिकारी होत्या. आयएएस शिवप्रसा नकाते हे राजस्थानला जिल्हाधिकारी होते. आता ते राजस्थानच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त झाले आहेत. आयएएस आश्विनी वाकडे या तेलंगणातील वारंगणा येथे महापालिका आयुक्त आहेत. आयआरएस स्वप्नील पाटील हे दिल्लीत केंद्रीय ग्रामविकास मंत्री यांचे सचिव म्हणून कार्यरत आहेत.

शेखर म्हेत्रे
माढा

उपळाई बुद्रुक येथील प्रमोद शिंदे म्हाडामध्ये कार्यकारी अभियंतापदी, तर श्रीकृष्ण नकाते सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरदीप वाकडे तहसीलदार, संजय वाकडे हे उपविभागीय कृषी अधिकारी आहेत. मीनाक्षी वाकडे या वित्त व लेखा अधिकारी म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेत कार्यरत आहेत. त्याशिवाय सचिन कवले हे सोलापुरात सहायक समाज कल्याण अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे छोटे बंधू नितीन कवले हे मुंबईत सहायक कामगार आयुक्त आहेत. याशिवाय १८ पीएसआयसह ३० ते ४० तरुण पोलिस दलात कार्यरत आहेत. तसेच महसूल, जिल्हा परिषद या विभागात अधिकारी- कर्मचारी म्हणून गावातील अन्य काही तरुण कार्यरत आहेत.

### उपळाई बुद्रुकचे अधिकारी....

३ आयएएस
१ आय आर एस
१ पोलीस उपायुक्त
२० पोलीस उपनिरीक्षक
५० पेक्षा अधिक इंजिनिअर
५० प्राध्यापक
१०० हून अधिक शिक्षक
१ तहसीलदार
१ वित्त व लेखा अधिकारी
१ तालुका कृषी अधिकारी
१ म्हाडा कार्यकारी अभियंता
१ आरटिओ
१ जिल्हा समाजकल्याण अधिकारी
१ सहायक कामगार आयुक्त
यासह अन्य इतर क्लास २ अधिकारी आहेत.

# श्रीपूरच्या पांडुरंग सहकारी साखर कारखान्याची गरुड भरारी



श्रीपूरच्या खाजगी साखर कारखाना सन १९८९ चे सुमारास सहकारातील डॉक्टर म्हणून मान्यता पावलेले कै. सुधाकरपंत परिचारक यांनी विकत घेवून पांडुरंग साखर कारखाना या नावाने सहकारी तत्वावर चालू केला. सुरुवातीचा कालखंड फारच अडचणीचा गेला. परंतू सर्व अडचणींवर मात करत कारखान्याने उत्तमोत्तम प्रगती केली.

सन १९८९ ते सन २०२६ या ३७ वर्षाच्या कार्यकाळावर नजर टाकल्यास अल्पावधीत ऊस उत्पादक सभासद, कामगार यांचा विश्वास संपादन करत कारखान्याने उत्त्म व्यवस्थापकीय कौशल्याच्या जोरावर दैदीप्यमान प्रगती केल्याचे पाहावयास मिळते. यात सर्वात महत्वाची बाब म्हणजे प्रतिदिन ९०० मे. टन ऊस गळीत व हंगामामधे जेम तेम १ लाख साखर पोती तयार करणारा कारखाना आज प्रतिदिन १० हजार मे. टन ऊस गळीत करीत हंगामामध्ये १० ते ११ लाख साखर पोती निर्माण करत आहे.



प्रकाश केसकर
भ्र. ९८२२६५६३३९

इथेनॉल मध्येही दुप्पट निर्मिती करत ९० हजार प्रतिदिन उत्पादन तसेच २३ मेगॅवॅट को–जनरेशन निर्मिती करत आहे. कारखान्याने सभासदांसाठी एआय तंत्रज्ञान, माती परिक्षण, उत्कृष्ठ ऊस बेणे, ठीबक सिंचन, सेंद्रीय खते याच्या वापरासाठी प्रोत्सहन बक्षिस योजना चालु केल्याने सभासदांबरोबर कारखान्यास याचा चांगला फायदा होत आहे. याबरोबरच कारखान्यामध्ये काम करत असताना कामगार नेहमी तंदरुस्त राहावा यासाठी कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत रक्तदान शिबीर, सुपंत मैदानी क्रिडा स्पर्धा तसेच कर्तव्यदक्ष कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांचे वाढदिवसानिमित राज्य बॅडमिंटन व क्रिकेट स्पर्धा, वृक्षारोपण मनोरंजन, बौध्दीक व्याख्यान यांचे आयोजन करण्यात येते यातून संघभावना, स्वंस्थेप्रति निष्ठा वाढीस लागणेस मदत होते.



या सर्वाचा परिणाम म्हणजे कारखान्याने सहकारी साखर उद्योगामध्ये आपला वेगळा ठसा निर्माण केला आहे. याची प्रचिती म्हणजे कारखान्यास राज्य पातळीवरचा सर्वोच्च साखर कारखाना प्ररस्कारासह अन्य पन्नासचेवर पुरस्कार मिळाले आहेत.





**साखर क्षेत्रामध्ये आपल्या नावाचा दबदबा निर्माण करत श्रीपूर येथिल कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने आपल्या उत्कृष्ठ नियोजनाच्या बळावर विकास करत गरुड भरारी घेतली आहे. कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक, उपाध्यक कैलास खुळे, सर्व संचालक व कार्यकारी संचालक डॉ . यशवंत कुलकर्णी यांच्या अधिपत्याखाली पांडुरंग कारखाना प्रगतीची नवनवी शिखरे पादाक्रांत करत आहे.**






## विकसीत व्यवस्थापन

**कोणत्याही उद्योगाचा आत्मा म्हणजे व्यवस्थापन होय या कारखान्याची धुरा कार्यकारी संचालक म्हणून डॉ. यशवंत कुलकर्णी हे पाहत आहेत. परिपूर्ण व्यक्तिमत्व व कठोर प्रशासन व साखर उद्योगातील परिस्थितिचा अचूक अंदाज व त्यावर उपाय योजना या जोरावर त्यांनी कारखान्याच्या विकासात भर घातली आहे. त्यांच्या या कार्याचा सन्मान करत त्यांना प्रतिष्ठेचा व्हीएसआयचा सर्वोकृष्ठ कार्यकारी संचालक पुरस्कार देवून गौरविले असून साखर उद्योगाच्या जडण घडणी संबधी अनेक अभ्यास गटावर शासनाने त्यांची नियुक्ती केली आहे. यावरून त्यांच्या कार्याची चमक दिसून येते. एकूणच व्यवस्थापन, सर्व संचालक मंडळ, कामगार यांच्या संयुक्त प्रयत्नाने. कै. सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना आज गरुड भरारी घेत आहे. या परिसराच्या विकासाच्या दृष्टीने हे सर्वांना अभिमान वाटणारी गोष्ट आहे.**

---

# सोलापूरचा सर्वांगीण विकास... सोलापूरकरांच्या मनातील स्वप्न...

**आजच्या घडीला सोलापुरातील प्रत्येक घटकाच्या मनात एकच तळमळीची इच्छा आहे. ती म्हणजे सोलापूरचा सर्वांगीण विकास व्हावा. सोलापूर सर्व सोयींनीयुक्त, स्वच्छ, सधन, संपन्न व्हावं. रोजगार निर्मिती व्हावी, प्रत्येकाच्या हाताला काम मिळावं, सुखाचा समाधानाचा घास मिळावा या आणि अशा छोट्या छोट्या अपेक्षामध्ये सोलापूरचा विकास दडलेला आहे. विकास विकास म्हणजे नेमकं काय? तर रस्ते दिवे पाणी या मूलभूत गरजा शंभर टक्के पूर्ण करणे आणि शहराच्या औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैद्यकीय गरजांची पूर्तता करणं.**





सोलापूरच्या आजच्या विकासाची चर्चा करण्यापूर्वी सोलापुरचा इतिहास जाणून घेणं महत्वाचे आहे. पूर्वी सोलापूर हे गिरण गाव म्हणून ओळखलं जातं होतं. जुनी मिल, नरसिंग गिरजी मिल, लक्ष्मी विष्णू मिल, जाम मिल यासारख्या मोठ्या मिलसह अनेक हातमाग लूमस् आणि याला पूरक इतर अनेक उद्योग जोमाने सुरू होते. त्यामुळे सोलापूरचं अर्थकारण चांगलं होतं. सोलापूरची पूर्वीची नगरपालिका आणि १९६३ नंतर झालेली महानगर पालिका महाराष्ट्रामध्ये पहिल्या काही महापालिकेत गणली जात होती.

सोलापूर हे दक्षिण भरताचं प्रवेशद्वार समजलं जातं. अनेक वर्षापासून रेल्वे मुळे सोलापूर दक्षिण व उत्तर भारताशी जोडलेलं आहे. व्यवसाय व्यापारासाठी ही खूप पूरक बाब आहे. सोलापूर जिल्ह्यात भीमा–सिना या मुख्य नद्यांसह लहान मोठ्या दहा नद्या आहेत. उजनी धरण, नदीवरील बंधारे, तलाव यामाध्यमातून सोलापुरचे बागायती क्षेत्र वाढले असून ऊस, डाळिंब, द्राक्ष, केळी यासह ज्वारी, बाजरी, भुईमूग आदी प्रमुख पिकांचे उत्पादन होते. सोलापूर जिल्ह्यात सध्या तीसपेक्षा जास्त साखर कारखाने आहेत. तसं पाहिलं तर सोलापूर प्रामुख्याने अध्यात्मिक पर्यटन केंद्र म्हणून गणलं जातं. दक्षिणेची काशी समजले जाणारे पंढरपूर या जिल्ह्यात आहे. लाखो भाविक इथे दर्शनाला येतात.



प्रशांत पाटील
सोलापूर



अक्कलकोट गाणगापूर तुळजापूर सोलापूरमधील सिध्देश्वर मंदिर इथेही भाविकांची ओढ असते. सध्या मेडिकल आणि एज्युकेशनल हब म्हणून सोलापुरची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. एवढं सारं विकासाला आवश्यक इन्फ्रास्ट्रक्चर असताना सोलापूर आजही विकासामध्ये मागे आहे. कारणं अनेक असतील पण महत्वाचं कारण म्हणजे सकारात्मक प्रबळ इच्छाशक्तीचा खूप मोठा अभाव.



शासन प्रशासन आणि समाज या तीन घटकांची इच्छाशक्ती अत्यंत महत्वाची आहे. ती जेंव्हा एकत्रित काम करेल तेंव्हा सोलापूरचा कायापालट झालेला नक्की दिसेल. सध्या सोलापुरातील बुद्धिमत्ता इथे संधी नसल्याने पुणे, मुंबई, बेंगलोर, हैद्राबाद इत्यादीसह परदेशात जाणे पसंत करतात त्यामुळे सोलापुरातील उच्चशिक्षित तरुणाई मोठ्या संख्येने स्थलांतरित होत आहेत. त्यांच्यासोबत अनेक कुटुंबेही सोलापूर सोडून जाताना दिसतात. याचा सोलापुरातील अर्थकारणावर बराच परिणाम होताना दिसतो. या बाबींचा गांभीर्याने विचार करून सोलापूरच्या विकासासाठी नेमकं काय हवं आहे हे शोधणं महत्वाचे आहे. सध्या प्राधान्यक्रमाने सोलापूरला मोठे उद्योग, व्यवसाय, आयटी कंपन्या तसेच आहे त्या व्यवसायांना प्रेरणादायी सपोर्ट आणि शेती व्यवसायाला योग्य बाजारपेठ व शेती व्यवसायाला प्रोत्साहनपर सहकार्याचा हात आदी बाबींची किमान गरज आहे. अर्थात यासाठी सोलापूरकरांचीही मोठी जबाबदारी आहे. एक म्हणजे सोलापूरला नियमित पाणीपुरवठा आवश्यक आहे. सहा दिवसाआड पाणी येतं हे ऐकून बदली झालेले लोक लवकर रुजू होत नाहीत मग मोठ्या कंपन्या कशा येणार. दुसरी महत्वाची गोष्ट रस्ते आणि वाहतूक व्यवस्था सुरळीत हवी सोबतच महापालिकेची परिवहन व्यवस्था शहरभर परिपूर्ण असावी. तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे नागरिकांनी कर्तव्य दक्ष असणे गरजेचे आहे. उदा. वाहतुकीचे नियम पाळणे, महापालिकेचा कर वेळेत भरणे, कायदा सुव्यवस्थाबाबतचे नियम तंतोतंत पाळणे, सोलापूर शहर जील्ह्याबद्दल सातत्याने सकारात्मक चर्चा करणे, सोलापूरला असणारा ऐतिहासिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक, औद्योगिक, भौगोलिक वारसा याचा योग्य व नित्यनियमित प्रसार प्रचार करणे इत्यादी बाबत सोलापूरकरांनी आवर्जून दक्षता घेतली पाहिजे. बारकाईने व अभ्यासपूर्ण विचार केल्यास सोलापुरला हवा तो विकास साधण्यासाठी उपलब्ध इन्फ्रास्ट्रक्चर खूप चांगलं आहे. त्याचा पुरेपूर उपयोग करून विकासाची एकमुखी, अराजकीय आखणी गरजेची आहे. समाजातून उठाव व शासन प्रशासन यांचा योग्य पाठपुरावा केल्यास सोलापूरचं चित्र नक्की बदलेल. ते लवकरात लवकर बदलावं, सोलापूर सुजलाम् सुफलाम् व्हावं यासाठी मन:पुर्वक हार्दिक सदिच्छा.

### सर्वांगीण विकासासाठी...

सोलापूरच्या विकासाला आता केवळ रस्ते, पूल आणि इमारतींपुरते मर्यादित न ठेवता शिक्षण, आरोग्य, उद्योग, रोजगार, शेती, वाहतूक, पाणी, पर्यटन आणि पर्यावरण या सर्व क्षेत्रांचा समतोल विकास साधणे आवश्यक आहे. सोलापूरची पारंपरिक हातमाग व यंत्रमाग उद्योगाची ओळख मजबूत करताना आधुनिक उद्योग, स्टार्टअप, तंत्रज्ञान आणि कौशल्याधारित रोजगाराच्या संधी वाढविण्यावर भर द्यायला हवा. जिल्ह्यातील यंत्रमागामुळे रोजगारनिर्मितीची पायाभरणी आधीपासूनच आहे. त्याचबरोबर उच्च शिक्षण आणि कौशल्यविकास ही भविष्यातील सोलापूरची मोठी ताकद ठरू शकते. स्वच्छ, सुंदर, सुरक्षित, रोजगारक्षम आणि उद्योगपूरक सोलापूर घडविण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी, उद्योजक आणि नागरिक यांचा समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे.



# एकसंघ भारताच्या निर्मितीत नवतरुणाईचा सहभाग



**भारतीय संस्कृती ही देशाच्या इतिहासामुळे, विलक्षण भूगोलामुळे आणि जनतेतील वैविध्यामुळे आकारास आली आहे. शेजारच्या देशांतील चालीरीती, परंपरा व कल्पना सामावून घेत, भारतीय संस्कृतीने सिंधु संस्कृतीदरम्यान जन्माला आलेले तसेच वैदिक काळात, दक्षिण भारतातील लोहयुगकाळात, बौद्ध धर्माच्या उद्भव आणि ऱ्हासाच्या काळात तसेच भारताचे सुवर्णयुग, मुसलमानी आक्रमण व युरोपियन देशांच्या वसाहतींदरम्यान झालेले बदल पचवूनदेखील स्वतःचे परंपरागत प्राचीनत्व टिकवून ठेवले आहे. भारतीय संस्कृतीने तिच्या इतिहासाने, अद्वितीय भौगोलिक रचनेने, वैविध्यपूर्ण लोकजीवनाने आणि शेजारील देशांच्या परंपरा स्वीकारून तसेच पुरातन परंपरा जपून आकार घेतला आहे.**

भारतात जागोजाग वेगवेगळे लोक, धर्म, वातावरण, भाषा, चालीरीती आणि परंपरा यात वैविध्य दिसत असूनही, आढळणारे साम्य हे या देशाचे वैशिष्ट्य आहे. देशभरात पसरलेल्या विविध उपसंस्कृती आणि हजारो वर्षांच्या परंपरा यांची एकत्रित वळलेली मोट म्हणजे भारतीय संस्कृती. ती अनेक प्रसिद्ध आध्यात्मिक गुरूंचे व योगशिक्षकांचे आश्रयस्थान आहे. भारतीय संस्कृतीला स्वतंत्र अशी वेगळी वैशिष्ट्ये आणि परंपरा लाभलेली आहे.

भारतीय संस्कृती ही अतिप्राचीन आहे. वैदिक साहित्य हे भारतीय संस्कृतीचे मूळ साधन ग्रंथ आहेत. भारतीय संस्कृती समजून घेताना या धार्मिक साहित्याचा उपयोग होतो. वैदिक साहित्यामध्ये प्रामुख्याने वेदांचा. उपनिषदांचा. आरण्यक ग्रंथ यांचा प्रामुख्याने समावेश होता.

मनुष्य व त्याच्या भोवतीचे विश्व मिळून निसर्ग बनतो. या निसर्गामध्ये जीवनाच्या उत्कर्षाला अनुकूल असे बदल करून म्हणजेच निसर्गावर काही संस्कार करून मनुष्य आपली जीवनयात्रा चालवितो. तो केवळ बाह्य विश्वातील पदार्थांवर संस्कार करतो असे नव्हे तर स्वतःचा देह आणि मन बुद्धी यांच्यावरही संस्कार करून स्वतःत बदल घडवून आणतो.संस्कृती या शब्दात हे दोन्ही प्रकारचे बदल अभिप्रेत आहेत.

भारताच्या सांस्कृतिक इतिहासाची वाटचाल पाहिला असता तिच्यात प्रमुख तीन वैशिष्ट्ये दिसून येतात– १. अखंडित परंपरा २. राजकीय व धार्मिक सत्तांच्या केंद्रीकरणाचा अभाव ३. संस्कृतिसंघर्ष टाळून संस्कृति संगम करण्याची प्रवृत्ती. भारतीय संस्कृतीचा पाया वेद हा मानला जातो. वेद म्हणजे ज्ञान. ज्ञानाच्या अधिष्ठानावर आधारित अशी ही संस्कृती आहे. ३ वेदावर आधारलेली संस्कृती म्हणजे वैदिक संस्कृती होय. वेद आपले सर्वाधिक प्राचीन साहित्य मानले जातात. वेदांची निर्मिती अनेक ऋषींनी केली.

वेदांमधील काही सूक्त हे स्त्रियांनीही रचलेले आहेत. वैदिक साहित्याची भाषा संस्कृत होती वैदिक वाङ्मय अत्यंत समृद्ध आहे ऋग्वेदात यातील मूळ ग्रंथ मानला जातो तो काव्य रूपामध्ये आहे. ऋग्वेदा सह यजुर्वेद सामवेद आणि अथर्ववेद असे चार वेद आहेत. या चार वेदांच्या ग्रंथांना संहिता असे म्हणतात म्हणजे जाणणे त्यापासून वेधही संज्ञा तयार झाली तिचा अर्थ ज्ञान असा होतो मौखिक पटनाच्या आधारे वेदांचे जतन केले गेले वेदांना श्रुती असेही म्हणतात.

**संस्कृतीच्या संदर्भात विविध संकल्पना मानल्या आहेत-**

१. **ऋणकल्पना-** ही भारतीय समाजशास्त्रीय महत्त्वाची संकल्पना असून आश्रम व्यवस्थेशी या संकल्पनेची सांगड घातलेली दिसून येते.

२. **आश्रम-** मानवी आयुष्याचे चार भाग कल्पून त्या प्रत्येक भागाला आश्रम असे नाव दिले आहे.ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास असे हे चार आश्रम आहेत.

३. **पुरुषार्थ-** धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ मानले असून नीतिशास्त्राच्या दृष्टीने यांना विशेष महत्त्व आहे.

४. **चातुर्वर्ण्य-** ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे चार वर्ण मानले गेले आहेत. वर्ण व्यवस्था ही कौशल्य पण देत होती ६४ कला या जतन करण्याचाच विषय आहे .

हिंदू धर्मानुसार वर्णव्यवस्था ही प्राचीन काळातील चार प्रमुख सामाजिक विभागांवर (चातुर्वर्ण्य) आधारित आहे. मानवी समाजाचे सुव्यवस्थित संचालन करण्यासाठी ही विभागणी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार वर्णांमध्ये करण्यात आली होती.

**या चार वर्णांचे स्वरूप खालीलप्रमाणे-**

**ब्राह्मण:** हे ज्ञानाचे आणि शिक्षणाचे कार्य करत असत.

**क्षत्रिय:** हे समाजाचे रक्षण, शत्रूंसोबत युद्ध आणि राज्यकारभार सांभाळत असत.

**वैश्य:** हे व्यापार, शेती आणि अर्थव्यवस्थेची धुरा चोख सांभाळत असत.

**शूद्र:** हे या तीन वर्णांना मदत करणे आणि शारीरिक श्रम व सेवा



देण्याचे कार्य करत असत.

ऐतिहासिकदृष्ट्या, या व्यवस्थेचा संदर्भ आपल्याला मनुस्मृती आणि ऋग्वेद यांसारख्या ग्रंथांमध्ये मिळतो. प्राचीन काळात मूळ वर्णव्यवस्था ही व्यक्तीच्या जन्मावरून न ठरता तिच्या गुण, कर्म आणि स्वभावावर आधारित होती. परंतु, कालांतराने तिचे रूपांतर कठोर आणि जन्मजात जातीव्यवस्थेत झाले हा मोठा अलीकडे कोणतेही वर्तमानपत्र



डॉ. दीपांजली पाटील
भ्र.-७३८५३०१०१२

उघडले की, अपघात व अपराध यांच्याच बातम्या ठळकपणे दृष्टीस पडतात. अपघातात मृत्यू पावणारे असोत अथवा अपराधात गुंतलेले असोत, त्यात तरुणांची संख्या लक्षणीय असते.

अलीकडे कोणतेही वर्तमानपत्र उघडले की, अपघात व अपराध यांच्याच बातम्या ठळकपणे दृष्टीस पडतात. अपघातात मृत्यू पावणारे असोत अथवा अपराधात गुंतलेले असोत, त्यात तरुणांची संख्या लक्षणीय असते.

अज्ञान आणि बेकारीतून व्यसनाकडे वळणारी जशी तरुण पिढी आहे, तशीच उच्च शिक्षित व आयटी क्षेत्रात लठ्ठ वेतन घेणारी तरुणाई प्रत्येक वीक एन्डला रिलॅक्स होण्यासाठी व्यसनाचा आधार घेणारीदेखील आहे. मेडिकल तसेच अभियांत्रिकीसारखे उच्च शिक्षण घेणारे तरुण ड्रग्ज, दारू, धूम्रपान या गोष्टीकडे कसे काय अज्ञान आणि बेकारीतून व्यसनाकडे वळणारी जशी तरुण पिढी आहे, तशीच उच्च शिक्षित व आयटी क्षेत्रात लठ्ठ वेतन घेणारी तरुणाई प्रत्येक वीक एन्डला रिलॅक्स होण्यासाठी





व्यसनाचा आधार घेणारीदेखील आहे. मेडिकल तसेच अभियांत्रिकीसारखे उच्च शिक्षण घेणारे तरुण ड्रग्ज, दारू, धूम्रपान या गोष्टीकडे कसे काय वळतात असा प्रश्न पडतो. हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या मुलांना अशी व्यसने लवकर घेरतात. कारण तिथे राहणार्या मुलांवर कुणाचे नियंत्रण नसते. येथे भेटणारे सिनिअर विद्यार्थी ज्युनिअर विद्यार्थ्यांना व्यसनांची दीक्षा देतात आणि मग हा सिलसिला कायम राहतो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे घरात आणि समाजात वेगाने घडणारे बदल हे आहे.

साधारणपणे पन्नास वर्षांपूर्वी समाजव्यवस्था धार्मिक प्रवृत्तीची होती. हिंदू कुटुंबात भजन, कीर्तन, पोथी वाचन या गोष्टी घराघरांतून होत असत. पाप– पुण्य याचा पगडा मानवी मनावर होता. घरातून मिळणारे संस्कार, शाळा– कॉलेजमधून मिळणारे शिक्षण, त्यावेळचे ध्येयनिष्ठ, निर्व्यसनी आदर्श शिक्षक यांच्याकडून संस्कारक्षम विद्यार्थी घडत होता. त्याची ध्येयासक्ती गगनाला गवसणी घालणारी असायची. पाठ्यपुस्तकांतून मिळणारे धडे आणि वडीलधार्यांचा धाक यातून व्यक्तिमत्त्व घडत होते. शिक्षकांची जरब मुलांवर असायची. त्यामुळे मुले कधी वाकड्या वळणावर गेली नाहीत.





एकत्र कुटुंबपद्धती अस्तित्वात असल्याने घरात वडीलधारी मंडळी बरीच असायची आणि त्या सर्वांची नजर घरातील लहान मुलांच्या





वागण्या– बोलण्याकडे असायची. काही चुकले तर लगेच कान पकडला जायचा किंवा पाठीत धपाटा बसायचा. वडील, काका, मामा, आजोबा या सगळ्या वडीलधाऱ्यांना लहान मुले घाबरून असायची. कारण शिस्तीचे धडे द्यायचे अबाधित अधिकार त्यांना होते. शाळेतील शिक्षकदेखील याच पठडीतील होते.

बरे, या कुणाबद्दल कुठे तक्रार करायची सोय नव्हती. सोनाराच्या मुशीतून सोने जसे तावून सुलाखून चोख निघते तसे मुलांचे चारित्र्य या धाकामुळे शंभर नंबरी सोन्यासारखे तावून सुलाखून निघालेले असायचे. कुठलेही गैरवर्तन अशा मुलांकडून होत नसे. बालपणी झालेले हे संस्कार जीवनभर टिकून राहायचे. आता काळ बदलला तसे आचारविचार बदलले.

२० वे शतक गतिमान झाले आणि सगळे जीवनचक्रच बदलून गेले. संगणकक्रांती झाली आणि त्या अनुषंगाने अन्य वस्तू घरात आल्या. त्यात टीव्ही, मोबाईल यांचे वेड आबालवृद्धांना लागले. या माध्यमातून होणारे संस्कार मानवी जीवनावर प्रभाव टाकू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर माणूस नोकरी– व्यवसायाच्या निमित्ताने स्थलांतरित झाला आणि इथेच एकत्र कुटुंबव्यवस्थेचे विघटन व्हायला सुरुवात झाली. एक कुटुंब होते त्याचे एकाहून अधिक भाग होऊ लागले. माणूस जिथे जाईल तिथे त्याने आपला स्वतंत्र आशियाना बनवला.

आपली पत्नी, आपली मुले एवढा संसार म्हणजे आपले कुटुंब ही धारणा वाढीस लागली. एकत्र कुटुंबपद्धती आक्रसत गेली आणि अशा विभक्त कुटुंबात जन्माला येणारी मुले अनेक चांगल्या गोष्टींना मुकली. एकत्रित कुटुंबातील वडीलधार्यांकडून मिळणार्या संस्कारांच्या बाळकडूचा स्त्रोत आटला. आई–वडील दो–घेही नोकरी करणारे असतील तर मुलांसाठी वेळ देणे त्यांना शक्य होईनासे झाले. मुले नोकरांच्या हवाली करून आई–वडील घराबाहेर; मग कसे होणार सुसंस्कार?

एकटे वडीलच नोकरीला असले आणि आई गृहिणी असली तरी मुलांवर लक्ष देण्यापेक्षा तिचे लक्ष आता मोबाईल, टीव्हीवरील कार्यक्रम, ब्युटीपार्लर, किटी पार्टी याकडेच अधिक! मुलांचा अभ्यास घेणे, त्यांच्या वागण्या– बोलण्याकडे लक्ष पुरवणे, मुले कुणाच्या संगतीत वावरतात हे पाहणे या गोष्टी मागे पडल्या, अगदी इतिहासजमा झाल्या. परिणामी, मुले काय करतील ते खरे अशी परिस्थिती निर्माण झाली. मुलांच्या अवास्तव मागण्या पूर्ण करण्याच्या, त्यांचे हट्ट पुरवण्याच्या नादात आपण एक पिढी बिघडवतो आहोत याचे भान आता पालकांना उरलेले नाही.

आपल्या बालपणी जे सुख आपल्याला घेता आले नाही ते आपण आपल्या मुलांना देत आहोत, अशा प्रकारची स्पष्टीकरणे आजच्या पालकांकडून ऐकू येतात. फाजील लाड करण्याने मुले हट्टी, दुराग्रही आणि स्वैर बनतात हे विसरले जाते. हीच मुले मोठी झाली की ती आपल्या आई–वडिलांना जुमानीत नाहीत, आपल्या मनाला येईल ते करतात आणि नंतर नको ते होऊन बसते. अलीकडेचे अफताभ– श्रद्धा प्रकरण हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. अशी ही हाताबाहेर गेलेली मुले गुंड, मवाली, बेजबाबदार आणि स्वैर बनतात. त्यांच्या मित्र– मैत्रिणींचा कंपू त्याच मुशीतून तयार झालेला असतो. यातून निर्माण होते ती चंगळवादी संस्कृती! नशा आणणाऱ्या मादक द्रव्यांचे सेवन, सिगारेटची धूम्रवलये, गुटका चर्वण, रात्री–बेरात्री चालणाऱ्या रेव्ह पार्ट्या यांची चटक त्यांना लागते. तारुण्याचा कैफ म्हणून बफाम ड्रायव्हिंग, मुलींची छेडछाड, त्यांच्यावर अतिप्रसंग, या सगळ्या गोष्टी घडायला लागतात. या चैनीसाठी पैसा हवा असला तर त्यासाठी मग चोरी, लबाडी, फसवाफसवी, खून, मारामाऱ्या अशांसारखे गुन्हेगारी मार्ग चोखाळले जातात. अशाच एखाद्या घोर अपराधात मुलगा किंवा मुलगी अडकते तेव्हा पालकांचे डोळे उघडतात. पण वेळ केव्हाच निघून गेलेली असते!

वयवर्षे १३ ते १९ या वयाला इंग्रजीत 'टीन एज' म्हणतात. या 'टीन एज'मध्ये मुले पौगंडावस्थेत असतात. चांगले वाईट याची जाण या वयात असत नाही (मुलींच्या बाबतीत सोळावं वरीस धोक्याचं म्हणतात). या वयात मुले अनुकरणप्रिय असतात. याच वयात त्यांना जपायला हवे. २० ते २५ वयाच्या गटातील मुलांना गद्धेपंचविशीतील तरुणपिढी म्हणून ओळखली जाते. कारण या वयात त्यांना पोक्तपणा आलेला नसतो, पण तारुण्याचा कैफ डोक्यात चढलेला असतो. या वयात ही तरुण मुले गैरमार्गाने वाहवत जाण्याची दाट शक्यता असते. आजकालच्या युगात सगळेजण तंत्रज्ञानाच्या मागे लागले आहेत त्यात एआयचा पण समावेश आहेच, पुरातन संस्कृती टिकवण्यासाठी खूप सारे प्रयत्न करावे लागतील आधी आपले अध्यात्म विसरता कामा नये mobile कडून मुलांना वचनाकडे आणि वाचनातून संस्काराकडे वळवणे सोपे होईल जसे वृक्ष संपदा टिकवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागत आहेत तसे मुलांना चांगले घडवण्यासाठी भविष्यात वेशेष प्रयत्न करावे लागू नयेत या साठी अभ्यसक्रमा पासुन ते समजा पर्यन्त सर्वांच्यात बदल होवो आणि पुन्हा एकदा माझा भारत संस्कारांची खाण म्हणुन ओळख प्राप्त करून घेवो.

आता मुलांना हे सुद्धा सांगावे लागेल कि किडा मुंगी चे जीवन जगणे हा मनुष्य धर्म नाही तर रंजल्यागांजल्या साठी सेवेस तत्पर राहणे हे जीवनाचे गमक आहे.








# गिरणगाव ते स्मार्ट सिटी



## १७४ वर्षांचा स्थानिक नागरी संस्थात्मक प्रवास

### क्रांतिकारी वारशापासून आधुनिक नागरी सुविधांपर्यंतचा सोलापूर नगरीचा प्रवास

### विकासाच्या प्रवासाला अजूनही काही प्रश्नांची किनार!

*स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच सोलापूरचे महत्त्व भारताच्या इतिहासात अद्वितीय राहिले आहे. स्वातंत्र्यलढ्यातील सोलापूरचे योगदान, येथील क्रांतिकारी चळवळ आणि त्यातून निर्माण झालेला जाज्वल्य इतिहास आजही प्रेरणादायी आहे. याच क्रांतिकारी भूमीतील सोलापूर नगरपालिका आणि त्यानंतरची महानगरपालिका हा देखील तितकाच महत्त्वपूर्ण इतिहास आहे. १८५२ मध्ये स्थापन झालेल्या सोलापूर नगरपालिकेने १ मे १९६४ रोजी महानगरपालिकेचे स्वरूप धारण केले. त्यानंतरच्या साठहून अधिक वर्षांच्या प्रवासात शहराचा चेहरामोहरा बदलला. नागरी सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, परिवहन, सुशोभीकरण आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात मोठी भर पडली. पर्यावरणपूरक सुशोभीकरणातून शहराला नवा लूक देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. स्मार्ट सिटी म्हणून सोलापूरची ओळख निर्माण होत असली तरी शहरातील अनेक मूलभूत प्रश्न अद्याप पूर्णपणे सुटलेले नाहीत, ही वस्तुस्थितीही दुर्लक्षित करता येणार नाही.*

**उतार पेठ ते गिरणगाव आणि आता स्मार्ट सिटीः-** सोलापूरला पूर्वी १८७४ पर्यंत 'उतार पेठ' म्हणून ओळखले जात होते. त्यानंतर जुनी मिलसह अनेक गिरण्या शहरात स्थापन झाल्या. हजारो गिरणी कामगारांना रोजगार मिळाला आणि त्यातून सोलापूरची 'गिरणगाव' अशी ओळख निर्माण झाली. काळ बदलला, उद्योगांची स्थिती बदलली आणि आता हेच शहर 'स्मार्ट सिटी' म्हणून ओळख निर्माण करू पाहत आहे. या संपूर्ण प्रवासात सोलापूर महापालिकेची भूमिका महत्त्वाची राहिली आहे.



**१७२ नागरिकांच्या अर्जातून नगरपालिकेची मुहूर्तमेढः-** १८५१ च्या दरम्यान सोलापुरात विविध नागरी समस्या आणि मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव यामुळे नागरिक त्रस्त झाले होते. पाणी, रस्ते आणि आरोग्याच्या सुविधा मिळाव्यात, शहरात सुधारणा व्हाव्यात, अशी नागरिकांची भावना होती. तत्कालीन दोन कलेक्टर मि. एन्व्हारारिटी आणि मि. लॉफनन यांच्या प्रोत्साहनातून १८५० च्या ॲक्ट २६ नुसार स्थानिक गैरसोयी दूर करण्यासाठी सरकारकडे शहरातील १७२ नागरिकांनी नगरपालिका स्थापनेची मागणी करणारा अर्ज केला. २८ ऑगस्ट १८५१ रोजी बापूजी कृष्ण व इतर १७२ सोलापूरकरांच्या स्वाक्षरीने सरकारला देण्यात आलेल्या या अर्जात शहरातील पाणीपुरवठा, रस्ते आणि आरोग्याच्या समस्यांचा सविस्तर उल्लेख करण्यात आला होता.

नागरिकांना पाण्यासाठी केवळ तलावावर अवलंबून राहावे लागत होते. ज्या खोडवीने तलावास पाणी येत होते, त्याचे बांध फुटले होते. तलाव गाळाने भरला होता. रस्ते, बोळ आणि गल्ल्यांची दुरवस्था झाली होती. पावसाळ्यात या रस्त्यांवरून जाणेही मुश्किल होत होते. नळाद्वारे पाणी आणून शहरातील विविध ठिकाणी हौद बांधावेत, अशी मागणीही करण्यात आली होती. अर्थात, आजपासून १७५ वर्षांपूर्वी सोलापूरकरांनी मांडलेले पाणी, रस्ते आणि आरोग्याचे प्रश्न आजही वेगवेगळ्या स्वरूपात चर्चेत असणे, हा इतिहासाचा विलक्षण विरोधाभास आहे.



किरण बनसोडे
भ्र.-८३८०८०००८३

**१ ऑगस्ट १८५२ : नगरपालिकेची स्थापना**

दि. १ ऑगस्ट १८५२ रोजी सोलापूर नगरपालिकेची स्थापना झाली. नगरपालिकेची पहिली सभा ३ ऑगस्ट १८५२ रोजी कलेक्टर कचेरीत भरली. नगरपालिकेचे कार्यालय मंगळवार पेठेत होते; मात्र सभांचे आयोजन कलेक्टर कचेरीतच होत असे.

**काशीबाई शेटे यांच्या वाड्यापासून कौन्सिल हॉलपर्यंत...** नगरपालिकेची स्वतःची मालकीची इमारत नसल्याने सुरुवातीला मंगळवार पेठेतील काशीबाई शेटे यांच्या वाड्यात सहा खण सोपा आणि सहा खण माडी अशी बारा खणांची जागा दरमहा पाच रुपये भाड्याने घेण्यात आली होती. यानंतर नवी पेठ येथील दगडी इमारतीत नगरपालिकेचे कामकाज सुरू झाले. पुढे इंद्रभुवन इमारत आणि त्यानंतर कै. यशवंतराव चव्हाण सभागृह असा महापालिका कार्यालयाचा प्रवास झाला.

**सभेत विडे, चंदनी अत्तर आणि गुलाबपाणी**

आजच्या डिजिटल युगातील महापालिका सभांचा विचार केला तर तत्कालीन सभांची पद्धतही तितकीच रंजक वाटते. नगरपालिकेच्या सभेवेळी प्रत्येक सभासदाला दोन पानांचे विडे दिले जात. सभेच्या शेवटी चंदनी अत्तर लावून गुलाबपाणी शिंपडले जात असे. प्रत्येक सभेसाठी विड्यांची सुमारे सहाशे पाने व इतर सामान लागत असे. पान- सुपारीचा खर्च नगरपालिकेमार्फत केला जात असे. १८५२ मध्ये नगरपालिकेतील सभासद संख्या १३ होती. १८५२ ते १८८३ या काळात शासन नियुक्त सभासद होते. त्यात अधिकारी आणि प्रतिष्ठित नागरिकांचा समावेश होता.१८८३ मध्ये नगरपालिकेची प्रथमच निवडणूक झाली. नागरिकांनी मतदानाद्वारे निवडलेले १२ आणि शासनाने नियुक्त केलेले १४ असे एकूण २६ सभासद नव्या नगरपालिका मंडळात होते. ऑगस्ट १८८५ मध्ये पहिल्या लोकनियुक्त नगराध्यक्षांची निवड झाली. राव बहादूर आप्पाजी देगावकर हे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष ठरले. १९४७ मध्ये 'नगरसेवा हीच ईश सेवा' हे नगरपालिकेचे ब्रीदवाक्य सर्वानुमते संमत करण्यात आले.

**पारतंत्र्यात नगरपालिकेवर फडकले राष्ट्रीय निशाणः-** सोलापूर महापालिकेच्या इतिहासातील सर्वाधिक अभिमानास्पद अध्याय म्हणजे स्वातंत्र्यलढ्यातील नगरपालिकेची भूमिका. ६ एप्रिल १९३० रोजी सोलापूर नगरपालिकेवर राष्ट्रीय झेंडा फडकवण्यात यावा, असा ठराव करण्यात आला. त्यानुसार देशभक्त अण्णासाहेब भोपटकर यांच्या हस्ते सध्याच्या नवी पेठ येथील नगरपालिकेच्या इमारतीवर राष्ट्रीय निशाण फडकवण्यात आले. ९ ते १२ मे १९३० दरम्यान सोलापूरकरांनी पारतंत्र्यातही स्वातंत्र्याचा अनुभव घेतला. आक्रमक क्रांतिकारी लढा उभारल्याने ब्रिटिशांनी सोलापुरात मार्शल लॉ पुकारला. मार्शल लॉच्या काळात नगरपालिकेवर फडकविण्यात आलेले राष्ट्रीय निशाण उतरवावे, असे फर्मान ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सोडले. मात्र नगरपालिकेच्या सभासदांनी सर्वानुमते केलेली कृती त्यांच्या संमतीशिवाय मागे घेता येणार नाही, असे बाणेदार उत्तर तत्कालीन नगराध्यक्ष माणिकचंद शहा यांनी दिले आणि निशाण उतरवण्यास स्पष्ट नकार दिला. महापालिकेच्या वास्तूला मिळालेला हा क्रांतिकारी वारसा आजही सोलापूरकरांसाठी प्रेरणेचा स्रोत आहे.

**नगरपालिका ते महानगरपालिकाः-** सध्याच्या नवी पेठ येथील प्राथमिक शिक्षण मंडळाच्या दगडी इमारतीत नगरपालिकेचा कारभार सुरू झाला. त्यानंतर १ मे १९६४ रोजी नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाले. महानगरपालिकेचा कारभार इंद्रभुवन इमारतीतून सुरू झाला. १९९८ पासून महापालिका आवारातील कै. यशवंतराव चव्हाण कौन्सिल हॉल या वास्तूत सभेचे कामकाज सुरू झाले. सध्या कौन्सिल हॉल, इंद्रभुवन आणि प्रशासकीय इमारत अशा तीन वास्तूंमधून कारभाराचा गाडा सुरू आहे.

**३८ महापौर, ३७ उपमहापौर आणि महिलांचे ठळक योगदानः-** १९६४ पासून सोलापूर महानगरपालिकेच्या साठ वर्षांच्या कालखंडात ३८ महापौर आणि ३७ उपमहापौर झाले. महापौरपदावर चार जणांची बिनविरोध निवड झाली. महापालिकेत महापौरपदी एकूण सात महिलांना संधी मिळाली. सात महिलांनी उपमहापौरपदही भूषविले आहे. महापालिकेचे ३.५ हजार कर्मचारी व अधिकारी कारभाराचा गाडा ओढत आहेत. नगरपालिकेचे शेवटचे नगराध्यक्ष पारसमल जोशी हेच सोलापूरचे पहिले महापौर झाले.

**पाणीप्रश्न : इतक्या वर्षांनंतरही कायमः-** भौतिक सुधारणा मोठ्या प्रमाणात झाल्या असल्या तरी गेल्या वीस वर्षांत सोलापूरकरांच्या दररोज पाणीपुरवठ्याच्या अपेक्षेची पूर्तता झालेली नाही. निवडणुकीचा मौसम आला की दररोज पाणीपुरवठ्याचे गाजर राजकीय धोरणी आणि लोकप्रतिनिधींकडून दाखवले जाते. आतापर्यंत अनेक पाणीपुरवठा योजना राबविण्यात आल्या. उजनी ते सोलापूर दुहेरी पाईपलाईन कार्यान्वित झाली. मात्र शहरातील अंतर्गत जलवाहिनीचे जाळे जुने



असल्याने पुन्हा नव्याने सुमारे १५०० कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना आणण्यात आली असून तिची प्रक्रिया सुरू आहे.तरीही सोलापूरचा पाणीप्रश्न अद्याप संपूर्णपणे सुटलेला नाही. सध्या शहराला चार ते पाच दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे.

**स्मार्ट सिटीची ६०० कोटींची कामे; देखभाल-दुरुस्तीचा प्रश्नः-** शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सुमारे ६०० कोटी रुपयांची कामे झाली. मात्र यातील अनेक प्रकल्प देखभाल-दुरुस्तीअभावी बंद आहेत.उजनी- सोलापूर दुहेरी जलवाहिनी हा महत्त्वपूर्ण प्रकल्प मार्गी लागला आहे. अमृत-२ योजनेअंतर्गत ड्रेनेज आणि जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी निधी मंजूर असून निविदा प्रक्रिया सुरू आहे. उड्डाणपुलाचे काम मात्र रखडले आहे.

**उद्योगांची गती मिळाली नाही-**

गिरणगाव म्हणून ओळख असलेल्या सोलापूरला औद्योगिकदृष्ट्या अपेक्षित





गती मिळू शकली नाही. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण अधिक असून स्थलांतराचे प्रमाणही मोठे आहे. राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे नवे उद्योग शहरात अपेक्षेप्रमाणे आले नाहीत. मात्र रस्ते आणि महामार्गांचे मोठे जाळे निर्माण झाले आहे. विमानसेवा सुरू झाली, काही दिवस बंद राहिल्यानंतर ती पुन्हा पूर्ववत झाली आहे. बोरामणी विमानतळाचाही विचार सुरू आहे. आयटी पार्कसाठी जागा निश्चित करण्यात आली आहे. विशेष म्हणजे सोलापूर मेडिकल हब म्हणूनही पुढे आले आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही सोलापूरने ओळख कायम ठेवली आहे.




**१९४९ ची बससेवा ते आजच्या ई-बसेसः-** सोलापूर शहरातील नागरिकांसाठी बससेवा सुरू करण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. अखेर १० जानेवारी १९४९ पासून म्युनिसिपालिटीच्या मालकीची बससेवा सुरू करण्यात आली. सुरुवातीला १५ बसेस उपलब्ध होत्या. आज ७७ वर्षांनंतर महापालिका परिवहन सेवेचा आढावा घेतला असता, मधल्या काळात दमदारपणे चालणारी ही सेवा आता डबघाईला आल्याचे चित्र आहे. सुमारे १४ लाख लोकसंख्येच्या सोलापूर शहरासाठी सध्या केवळ १८ बसेस मार्गावर धावत आहेत. यापूर्वी केंद्र शासनाच्या जेएनएनयूआरएम योजनेअंतर्गत मिळालेल्या सुमारे २०० बसेस सदोष असल्याच्या कारणाने बंद अवस्थेत पडून आहेत. आता पुन्हा केंद्र शासनाच्या योजनेतून १०० ई-बसेस मंजूर झाल्या आहेत. या नव्या बसेस महापालिका परिवहन उपक्रम कशा पद्धतीने चालवतो, यावरच या उपक्रमाचे भवितव्य अवलंबून आहे. अन्यथा 'ये रे माझ्या मागल्या' हे ठरलेलेच!

**चार महापौरांची बिनविरोध निवड**

महापालिकेच्या इतिहासात चार महापौर बिनविरोध निवडले गेले. मागासवर्गीय प्रवर्गातील पहिले महापौर होण्याचा मान दलितमित्र भीमराव जाधव गुरुजी (१९७४-७५) यांना मिळाला. मुस्लिम समाजातील पहिला व्यक्ती महापौरपदासाठी उभा असल्याने विरोधकांनी उमेदवार उभा केला नाही. त्यामुळे युन्नूस शेख (१९७५-७६) यांचीही बिनविरोध निवड झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्म शताब्दीचे औचित्य साधून अनुसूचित जाती प्रवर्गातील मुरलीधर पात्रे (१९९०-९१) यांची बिनविरोध निवड झाली होती. प्रशासकीय राजवटीनंतर प्रथमच भाजपला महापालिका निवडणुकीत ८७ जागी यश मिळाले. २०२६ मध्ये भाजपचे विनायक कोंड्याल यांची महापौरपदी बिनविरोध निवड झाली.

**पहिल्या महिला महापौराचा मान शेवंताबाई पवार यांनाः-** सोलापूर शहराच्या पहिल्या महिला महापौर होण्याचा मान शेवंताबाई पवार यांना मिळाला. मार्च २०१२ ते मार्च २०२२ या दहा वर्षांच्या कालावधीत अलका राठोड, प्रा. सुशीला आबुटे, शोभा बनशेट्टी आणि श्रीकांचना यन्नम या चार महिला महापौरांनी सलग कारभार सांभाळला. २०१७ ते २०१९ या कालावधीत महापौर आणि उपमहापौर ही दोन्ही पदे महिलांकडे होती. शोभा बनशेट्टी महापौर तर शशिकला बत्तुल उपमहापौर होत्या.

**महापौरपद भूषविलेल्या महिलाः-** शेवंताबाई पवार (१९९७-९८), नलिनी चंदेले (२००२-०५), अरुणा वाकसे (२००७-०९), अलका राठोड (२०१२-१४), प्रा. सुशीला आबुटे (२०१४-१७), शोभा बनशेट्टी (२०१७-१९) व श्रीकांचना यन्नम (२०१९-२२) यांनी महापौरपद भूषविले.

**उपमहापौरपद भूषविलेल्या महिलाः-** प्रा. नसीमा पठाण (१९७६-७७), सुषमा घाडगे (१९९२-९३), फातिमा शेख (१९९४-९५), महानंदा भोसले (१९९८-९९), सुमन मुदलियार (मार्च १९९९-ऑगस्ट १९९९), शशिकला बत्तुल (२०१७-१९) यांनी उपमहापौर म्हणून कारभार पाहिला. सध्या २०२६ मध्ये उपमहापौरपदी पर्यावरणप्रेमी ज्ञानेश्वरी देवकर विराजमान आहेत.

**पहिल्या महिला आयुक्त तथा प्रशासक : शितल तेली-उगलेः-** सोलापूर महापालिकेच्या साठ वर्षांच्या कार्यकाळात आतापर्यंत तीन वेळा प्रशासकीय राजवट लागू झाली. या प्रशासकीय राजवटीत आतापर्यंत एकूण नऊ प्रशासक तथा आयुक्तांनी कारभार पाहिला आहे. आठव्या प्रशासक म्हणून शितल तेली-उगले यांनी जबाबदारी सांभाळली. त्या सोलापूर महापालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त तथा प्रशासक ठरल्या. तर नववे प्रशासक म्हणून डॉ. सचिन ओम्बासे यांनी धुरा सांभाळली.

**महापालिकेवर विविध कारणास्तव तीन वेळा प्रशासकीय राजवटः-**

सोलापूर महापालिकेवर विविध कारणास्तव तीन वेळा प्रशासकीय राजवट लागू झाली.

१ जून १९६७ ते २२ जून १९६९ दरम्यान सुमारे दोन वर्षे २१ दिवस पहिली प्रशासकीय कारकीर्द होती. त्यानंतर दि. ६ फेब्रुवारी १९८१ ते १२ मे १९८५ या कालावधीत साधारणतः चार वर्षे तीन महिने प्रशासकीय राजवट होती.

१९६७ ते १९६९ आणि १९८१ ते १९८५ या सहा वर्षांच्या कालावधीत एम. जी. सप्रे, डी. डी. रणदिवे, एस. के. जांबवडेकर, व्ही. के. कोल्हटकर, रमानाथ झा आणि ए. के. नंदकुमार या आयुक्तांनी प्रशासक म्हणून काम पाहिले. त्यांची कारकीर्द वैशिष्ट्यपूर्ण ठरली. रमानाथ झा यांच्या कार्यकाळातील अतिक्रमणविरोधी बेधडक कारवाईच्या आठवणी आजही सांगितल्या जातात. मार्च २०२२ पासून तिसऱ्यांदा प्रशासकीय राजवट लागू झाली. महापालिका लोकप्रतिनिधींची पाच वर्षांची मुदत संपल्याने राज्य शासनाकडून ८ मार्च २०२२ पासून महापालिका आयुक्तांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

सुरुवातीच्या काळात आयुक्त पी. शिवशंकर यांनी प्रशासक म्हणून काम पाहिले. त्यांच्या बदलीनंतर दि. २१ नोव्हेंबर २०२२ पासून शितल तेली-उगले यांनी जबाबदारी सांभाळली. त्यांच्यानंतर डॉ. सचिन ओम्बासे यांनी प्रशासक तथा आयुक्तपदाची धुरा कार्यकुशलतेने सांभाळली. कर्तव्यदक्ष आयुक्त म्हणून डॉ. सचिन ओम्बासे सध्या कार्यरत आहेत.

**कर्मचारी अपुरे; ११२५ पदे रिक्तः-** महाराष्ट्र शासनाने सोलापूर महापालिकेसाठी दि. २८ डिसेंबर २०२१ रोजी आकृतीबंध मंजूर केला. या आकृतीबंधानुसार महापालिकेत ४ हजार ६१२ पदे मंजूर करण्यात आली. मंजूर आकृतीबंधानुसार आवश्यक ती पदे सोलापूर महापालिका प्रशासनात उपलब्ध नाहीत. मंजूर पदांपैकी ३ हजार ३९० कर्मचारी व अधिकारी कार्यरत आहेत. उर्वरित १ हजार १२५ म्हणजेच सुमारे २५ टक्के कर्मचारी व अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. अपुऱ्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवरच सोलापूर शहराचा कारभार चालला आहे. सहाय्यक आयुक्तांची १२ पदे रिक्त होती. त्यापैकी दोन पदे नुकतीच भरली आहेत. अ, ब, क, ड या चारही वर्गातील सुमारे १ हजार १२५ पदे रिक्त आहेत.




**दृष्टिक्षेपात सोलापूर महानगरपालिकाः-**

महापालिकेचे एकूण क्षेत्रफळ : १७८ चौरस किमी

- एकूण वार्षिक अंदाजपत्रक: १,४४९ कोटी रुपये
- एकूण कर्मचारी: सुमारे ३,५००
- रिक्त कर्मचारी-अधिकाऱ्यांची पदे : १,१२५
- एकूण वेतनावरील खर्च : ४५ टक्के
- विविध ३१ संवर्गांसाठी भरती प्रक्रिया : ३०२ पदांची भरती प्रक्रिया पूर्ण
- वेतन व भत्ते (पाणीपुरवठा वगळून) : २२१ कोटी ८ लाख रुपये
- निवृत्तीवेतन व कुटुंबवेतन : ११७ कोटी ९३ लाख रुपये

## गिरणगाव ते स्मार्ट सिटी : प्रवास मोठा, प्रश्नही मोठे

सोलापूरने गेल्या दीडशेहून अधिक वर्षांत मोठा नागरी प्रवास केला आहे. तलावाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या शहरापासून दुहेरी जलवाहिनी, स्मार्ट सिटी, अमृत- २, आयटी पार्क, विमानसेवा, मेडिकल हब आणि आधुनिक रस्ते-वाहतूक सुविधांकडे शहराने वाटचाल केली आहे. परंतु या विकासाच्या प्रवासाला अजूनही काही प्रश्नांची किनार आहे. पाणीपुरवठा, ड्रेनेज, परिवहन, रोजगार, उद्योग, रस्ते आणि रिक्त पदे या मूलभूत प्रश्नांवर ठोस आणि दीर्घकालीन उपायांची गरज आहे. सोलापूरने गिरणगावाची ओळख मागे टाकत स्मार्ट सिटीच्या दिशेने पाऊल टाकले असले, तरी स्मार्ट सिटीची खरी ओळख केवळ प्रकल्पांमधून नव्हे, तर नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील सुविधा, रोजगार आणि मूलभूत प्रश्नांच्या कायमस्वरूपी निराकरणातून निर्माण होईल. क्रांतिकारी वारसा लाभलेल्या या शहराने अनेक स्थित्यंतरे पाहिली. काळ बदलला, प्रशासन बदलले, पदाधिकारी बदलले, योजना बदलल्या मात्र शहराच्या विकासाची अपेक्षा कायम राहिली.गिरणगाव ते स्मार्ट सिटी हा प्रवास सोलापूरच्या बदलत्या चेहऱ्याची कहाणी आहे. आता या प्रवासाला सर्वांगीण विकासाची दिशा देणे, हीच पुढील पिढीसमोरील खरी जबाबदारी आहे.

तरुण भारत वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा
PRO SPORTS FOUNDATION SOLAPUR
प्रो स्पोर्ट्स फाऊंडेशन, सोलापूर
व्हॉलीबॉल अकॅडमी
मार्गदर्शक : अनिल विमल देविदास गिराम
राष्ट्रीय खेळाडू । आंतरराष्ट्रीय रेफरी
कनव्हेनर, महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटना
स्थळ : हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर
वेळ : सायं. ५.३० ते ७.३० मो.९४२२४५८०३५

'सोलापूर तरुण भारत'
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
रजि.नं. एफ २९०६०
आस्था सामाजिक संस्था
सोलापूर
मोफत जेवण वाटप
आनंद तालिकोटी
अध्यक्ष
शिवानंद सावळगी
सचिव
चंद्रकांत शहा
उपाध्यक्ष
सिध्दु बेऊर
सहसचिव
सुहास छंचुरे
कोषाध्यक्ष
हर्षलभाई कोठारी
सल्लागार
-: संचालक :-
डॉ.महावीर शास्त्री, अनिल जमगे, देविदास चेळेकर, योगेश कुंदुर, महेश नळे, वेदांत तालिकोटी
अन्नदानासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

'सोलापूर तरुण भारत'
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
* शुभेच्छुक *
सिध्देश्वर कन्स्ट्रक्शन,
नरोटेवाडी, सोलापूर

राष्ट्रीय विचाराचे दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
शिवश्री
सिमेंट पाईप
प्रो.प्रा.श्री.कृष्णाजी लोमटे
मो. 9921937279 / 9850979351
आमच्याकडे चेंबर कव्हर, कचराकुंडी, सेप्टीटँक, वॉटरटँक व सर्व साईजमध्ये पाइप्स मिळतील.
सिध्देश्वर मंदिरजवळ, भिमानदीजवळ, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे

तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा

# मैत्री, नेतृत्व आणि जनसेवा : लोकप्रिय उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे











'बॉस' शब्दाचा अर्थ शक्तिशाली', 'उत्कृष्ट' किंवा 'सुपर' असा होतो. बॉस' म्हणजे तर संकटात आधार देणारा,अतिशय मन मिळावु स्वभावाचा व्यक्ती, जेष्ठांचा आदर करणारे विनम्र व्यक्तिमत्व, आनंदात खांदा खांद्याला लावून उभा राहणारा एक जिवाभावाचा सोबती (मित्राचा जीव) होय.... मात्र मित्रांच्या व जनतेच्या मनावर प्रेमाने वर्चस्व निर्माण करणारा, आपला माणूस म्हणून पंढरपूर नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे यांचे बॉस या नाव पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला, मोहळ व माळशिरस या तालुक्यात लौकिक झाले आहे.

### * कौटुंबिक पार्श्वभूमी *

महादेव माणिक धोत्रे यांचे वडील बांधकाम व्यवसाय करत आहेत. महादेव धोत्रे यांचा परिवार मोठा आहे, वडिल माणिक शेट्टी धोत्रे, आई चंद्रभागा, भाऊ तुळजाराम धोत्रे, तीन विवाहित बहिणी नागरबाई पवार, अनिता पवार, रुपाली पवार या आहेत, तर सौभाग्यवती स्वाती या महादेव धोत्रे यांना सामाजिक कार्यात नेहमी खंबीर साथ देतात, थोरला ओंकार व छोटा समर्थ असा त्यांचा सुखी, समृद्ध, जिव्हाळा जपणारा परिवार आहे. त्यांचे चुलते विठ्ठल शेट्टी धोत्रे हे बांधकाम व्यवसाया बरोबरच राजकारणात सक्रीय होते. ते पंढरपूर नगरपालिकेचे नगरसेवक होते. तर त्यांचे चुलत बंधू सुधीर धोत्रे यांनी उपनगराध्यक्ष पदाची संधी मिळालेली आहे. आत्ता त्यांच्यानंतर महादेव धोत्रे यांनीही उपनगराध्यक्षपद मिळवले आहे. महादेव यांचे शिक्षण बी ए. च्या प्रथम वर्षापर्यंत झाले आहे. ते विद्यार्थी दशेपासूनच सुस्वभावी, मन मिळावू आहेत, त्यामुळे त्यांचा मित्र परिवार जात, धर्माच्या भिंती ओलांडून विस्तारलेला आहेत.

### * मित्रांच्या आग्रहाने राजकारणात अचानक प्रवेश *

समाज कार्यात नेहमीच पुढे असणारे महादेव धोत्रे हे राजकारणात फारसे सक्रिय नव्हते. परंतु बंधू तुळजाराम धोत्रे, नगरसेवक मित्र धनंजय धोत्रे, दीपक उर्फ दादा पवार, सचिन पवार, विशाल साठे, आमिर खान, प्रमोद कदम, अण्णा काळे या मित्रांच्या आग्रहामुळे २०१६ साली पंढरपूर नगरपरिषदेची निवडणूक लढविण्याचे ठरविले. त्यांचे कार्यक्षेत्र असलेला प्रभाग क्रमांक १४ त्यावेळी महिलेसाठी आरक्षित होती. यामुळे त्यांना पत्नी स्वाती यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. पहिल्याच प्रयत्नात चांगल्या मतांनी त्या विजयी झाल्या, त्यानंतर नऊ वर्षात महादेव धोत्रे यांनी आपल्या वार्डातील नागरिकांची कुटुंबातील व्यक्ती प्रमाणे काळजी घेतली. प्रत्येक व्यक्तीच्या मदतीला धावून जाणे, हा त्यांचा स्वभाव त्यामुळे त्यांची लोकप्रियता अधिक प्रमाणात वाढली. नागरिकांना मूलभूत लागणाऱ्याचा सोयी सुविधांचा पाठपुरावा करण्याचे त्यांचा स्वभाव त्याची ओळख बनला. त्यांच्या या लोकप्रियतेमुळे ९ वर्षा नंतर झालेल्या निवडणुकीत त्यांना १३७० एवढ्या भरघोस मताधिक्य मिळाले. तसेच शहर व तालुक्यातील महादेव धोत्रे यांची लोकप्रियता, त्यांचा जनसंपर्क, मित्रसंग्रह पाहून, माजी आमदार प्रशांत परिचारक व पंढरपूर मंगळवेढा शहर विकास आघाडीचे नेते उमेश परिचारक यांनी पहिल्यांदाच त्यांना नगरपालिकेच्या उपाध्यक्षपदी काम करण्याची संधी दिली.

## विकास वेध

१ यमाई तलाव येथे वृक्ष लागवड करून सायकल ट्रॅक, बोटींग, नाना-नानी पार्क, वॉर्टर स्पोर्ट, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र यासारखे उपक्रम राबविणेत येणार.

२. ६५ एकर परिसरात युवकांसाठी व खेळाडू यांच्यासाठी क्रीडांगणाची निर्मीती करणार.

३. शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरातील जड वाहतूक कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार आहे.

४. यात्रा कालावधी तसेच इतर वेळी होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रयत्न करणार.

५. राजमाता अहिल्यादेवी पुतळा व साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांचे पूर्णाकृती पुतळे उभारणी कामी निधी उपलब्ध करून देणार.

६. नगरपालिका परिसरातील वाहतूक कोंडी लक्षात घेता भक्तीमार्ग येथील ३ एकर जागेमध्ये नवीन प्रशासकीय भवन उभारणार.

७. शहरातील मंदिरा सभोवताली असणाऱ्या नगरपालिकेच्या जागेमध्ये बहुमजली पार्किंगची सुविधा करून देणार.

८. शहरात पडणाऱ्या पावसाचे पाण्याचा निचरा होणेसाठी जागतिक बँकेचे माध्यमातून नमामि चंद्रभागा योजनेअंतर्गत ३०० कोटी निधी मागणी प्रस्ताव सादर करणे.

९. शहरातील तरूणांना व्यवसाय उभारणीसाठी नवीपेठ येथील झेंडा चौक, इंदिरा गांधी भाजी मार्केट, स्टेशन रोडवरील खादी ग्रामोद्योग जागेत गाळ्यांची निर्मिती करणार.

१०. पंढरपूर शहर विकास योजने अंतर्गत आवश्यक ठिकाणी नगरोत्थान योजने अंतर्गत डिपी रोड विकसीत करणार.

११. सोलर ३ मेगावॅट प्रोजेक्ट राबविणार.

१२. पंढरपूर शहरात अत्याधुनिक सुविधा असलेले अध्यात्मिक केंद्र बनविणार.

१३.नमामि चंद्रभागा योजनेअंतर्गत घाट सुशोभिकरण,स्नानगृहे,चेंजिंग रुम,दशक्रिया विधी घाट पूर्ण करणेसाठी प्रयत्न करणार.

१४. शहरातील सर्व जुन्या तालिमीचे नूतनीकरण व अद्यावत करणे.

१५. मेहतर,बौध्द व मातंग समाजाच्या सफाई कर्मचारी बांधवाना मोफत घरे देणार.

१६. मंदिर समिती माध्यमातून येणारे भाविकांना सुलभ दर्शन व्हावे म्हणून तिरूपती व शिर्डीच्या धर्तीवर दर्शन हॉलची निर्मिती व स्काय वॉक करणार.

१७. पंढरपूर शहरामध्ये सन १९९२ साली भुयारी गटार योजना टप्पा क्रं.१-२६ किमी, सन २००९ मध्ये टप्पा क्रं. २-१०२ किमी, सन २०१८ मध्ये टप्पा क्रं. ३-६७ असे एकूण १९५ किमीची ड्रेनेज लाईन टाकणेत आली होती. परंतु वाढती उपनगरे व ज्या भागामध्ये भुयारी गटार योजना राबविली नाही अशा ठिकाणी भुयारी गटार योजना टप्पा क्रं.४ राबविणेत येत असून भुयारी गटार पाईप लाईन करणेसाठी प्रयत्न करणार.

१८. पंढरपूर शहरातील सर्व प्राथमिक शाळांचे बिल्डींगचे नुतनीकरण करून ई लर्निंग सुविधा देणार.

***पंढरपुरची लोकसंख्या १ लाखाच्या आसपास आहे. विठ्ठलाच्या दर्शनासाठी रोज किमान ५० हजार ते १ लाख भाविक पंढरपुरात येतात. उप नगराध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी नगराध्यक्ष, नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी यांच्यात समन्वय साधण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले. निर्णयप्रक्रियेत लोकहिताला प्राधान्य देणार आहे. नागरीकांसह भाविकांना पंढरपूर नगरपरिषद सोयी सुविधा पुरविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून माजी आ. प्रशांत परिचारक आणि आ. समाधान आवताडे, पंढरपूर मंगळवेता विकास आघाडीचे अध्यक्ष उमेश परिचारक हे शकडो कोटी रुपयांचा निधी आणत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शहराचा चेहरा बदलण्याचे काम करत असल्याचे उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे यांनी सांगितले.***

आशीर्वाद



स्व.महादेव आवताडे

लोकप्रिय आमदार







सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

## ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!



**मा.सोमनाथ आवताडे**
मा.सभापती, बाजार समिती



**मा.विनायक राऊत**
लोकनियुक्त सरपंच



**मा.संजय आवताडे**
चेअरमन, आवताडे शुगर

**मा.समाधानजी आवताडे साहेब**

शुभेच्छुक

## मा.श्री.विनायक माधवराव यादव

- लोकनियुक्त सरपंच मारापूर ग्रामपंचायत
- अध्यक्ष, माणगंगा शिक्षण मंडळ संचलित, शरदचंद्र कृषी विद्यालय मारापूर, ता.मंगळवेढा



# वारीपासून 'आदर्श शाळे'पर्यंत

## सोलापूर जिल्हा परिषदेची जनसेवेत ऐतिहासिक भरारी!



- वारीचे विक्रमी नियोजन
- आरोग्य क्षेत्रात NQS मानांकनाची नवी ओळख
- कर्मचाऱ्यांना १ कोटींचे मोफत विमा कवच आणि
- शिक्षण क्षेत्रात नवे आदर्श उभे करण्याची दमदार कामगिरी

### वारी यात्रेचे ऐतिहासिक आणि यशस्वी आयोजन

इतिहासात पहिल्यांदाच, पुणे, सातारा आणि सोलापूर या तिन्ही जिल्ह्यांतील वारी यात्रेच्या संपूर्ण नियोजनाची जबाबदारी सोलापूर जिल्हा परिषदेकडे 'नोडल एजन्सी' म्हणून होती. ग्रामीण विकास मंत्री, सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) यांच्या मार्गदर्शनाखाली आपण खालील मोठी कामे केली.



*गेले तीन महिने सोलापूर जिल्हा परिषदेसाठी ऐतिहासिक टप्पे आणि अभूतपूर्व प्रशासकीय बदलांचे ठरले आहेत. आम्ही केवळ दैनंदिन प्रशासनापुरते मर्यादित न राहता आरोग्य, कर्मचारी कल्याण, दर्जेदार शिक्षण आणि लाखो वारकऱ्यांच्या वारीचे यशस्वी नियोजन करून ग्रामीण प्रशासनात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. मागील ३ महिन्यांत आपण केलेल्या प्रमुख कामांचा सारांश खालीलप्रमाणे आहे.*





यशवंत गुरव
भ्र. ८८८८६५०७५५



**मुख्यमंत्री वारी सुविधा केंद्र:** १३ लाख चौ. फूट जर्मन हँगर आणि ७,८०,००० चौ. फूट वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात आले. विशेष म्हणजे, परतीच्या प्रवासातही वारकऱ्यांसाठी सुमारे १५ जर्मन हँगर पहिल्यांदाच उभारले गेले. या केंद्रांमध्ये मातांसाठी स्तनपान कक्ष, पाय व पोट्यांचे ७५० मसाजर (५ पट वाढ), चरण सेवा व फिजिओथेरपी कक्ष, मोबाईल चार्जिंग आणि इमर्जन्सीसाठी 'मुख्यमंत्री आरोग्य केंद्र' तसेच भजन संध्येचे म मंच उपलब्ध करून दिले.




**स्वच्छता आणि महिलांचा सन्मान:** ५,००० फिरती शौचालये (दुप्पट) आणि पालखीसोबत चालणारे ६७५ स्वच्छता कर्मचारी (५ पट वाढ) तैनात केले. वलवंत घाट परिसराची विशेष व कसून स्वच्छता करण्यात आली. तसेच महिलांसाठी ५०० स्नानगृहे (५ पट वाढ), सॅनिटरी नॅपकिन वाटप आणि विल्हेवाटीसाठी मशीन बसवल्या.

**आरोग्य व आपत्कालीन सेवा:** १९५ कायमस्वरूपी व ३२२ तात्पुरती उपचार केंद्र (३,६९७ आरोग्य कर्मचाऱ्यांसह) सुरू केली. तसेच ३५० बाईक ॲम्ब्युलन्स, एक एअर ॲम्ब्युलन्स आणि १३ 'मुख्यमंत्री आरोग्य रथ' (मोबाइल युनिट्स) तैनात करून वारकऱ्यांना २५,००० रेनकोट वाटले.

**आरोग्य क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी: १४ सुविधांना NQS मानांकन**

जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच, आपल्या ग्रामीण भागातील १४ शासकीय वैद्यकीय सुविधांना 'राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानक' (NQS) मानांकन मिळाले आहे. यामुळे ग्रामीण भागातील वैद्यकीय उपचारांचा दर्जा उंचावला आहे.

**कर्मचाऱ्यांसाठी १ कोटी रुपयांचा मोफत विमा**

आपले सर्व कर्मचारी हाच आपल्या प्रशासनाचा कणा आहे. कर्मचाऱ्यांना आर्थिक सुरक्षा मिळावी म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेने सर्व कर्मचाऱ्यांसाठी १ कोटी रुपयांच्या मोफत विमा योजनेची अंमलबजावणी केली आहे.

**ग्रामीण शिक्षणात क्रांती आणि आदर्श शाळा**

आदर्श शाळा: सोलापूर जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'आदर्श शाळा' उभारण्यात येत आहेत.

**राष्ट्रीय स्तरावर मान:** राष्ट्रीय सर्वेक्षणात 'हरित स्वच्छ शाळा' (Harit Swacch School) म्हणून निवडली गेलेली शेकलेवाडी प्राथमिक शाळा ही महाराष्ट्रातील एकमेव शासकीय शाळा ठरली आहे.

**आकांक्षित तालुका रँकिंगमध्ये अक्कलकोटची ऐतिहासिक झेप**

शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे अक्कलकोट तालुक्याने रँकिंगमध्ये ३८९ वरून थेट ५२ व्या क्रमांकावर ऐतिहासिक झेप घेतली असून, संपूर्ण महाराष्ट्रात तो तिसऱ्या क्रमांकावर आला आहे.

**निष्कर्ष**

त्रिजिल्हा वारीचे यशस्वी आयोजन असो, आरोग्य आणि शिक्षणात सुधारणा असो वा कर्मचाऱ्यांचे कल्याण असो– सोलापूर जिल्हा परिषदेने जनसेवेचे एक नवीन आणि प्रेरणादायी शिखर गाठले आहे. प्रशासनाच्या कामकाजाचा खरा अर्थ केवळ योजना राबविण्यात नसून, त्या योजना सर्वसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आहे. याच भूमिकेतून सोलापूर जिल्हा परिषदेने गेल्या कालावधीत ग्रामीण विकास, आरोग्य, शिक्षण, कर्मचारी कल्याण आणि मोठ्या धार्मिक–सामाजिक आयोजनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुणे, सातारा आणि सोलापूर या तिन्ही जिल्ह्यांतील वारी यात्रेच्या ऐतिहासिक नियोजनापासून ते ग्रामीण भागातील १४ आरोग्य सुविधांना राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानक अर्थात छटड मानांकन मिळवून देण्यापर्यंत जिल्हा परिषदेने जनसेवेचा नवा आदर्श निर्माण केला आहे.

**इतिहासात प्रथमच त्रिजिल्हा वारीचे 'नोडल एजन्सी' म्हणून यशस्वी नियोजन**

वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. लाखो वारकरी, विविध पालख्या आणि हजारो सेवाभावी संस्था सहभागी असलेल्या या यात्रेचे नियोजन ही मोठी प्रशासनिक जबाबदारी असते. यंदा इतिहासात पहिल्यांदाच पुणे, सातारा आणि सोलापूर या तिन्ही जिल्ह्यांतील वारी यात्रेच्या संपूर्ण नियोजनाची जबाबदारी सोलापूर जिल्हा परिषदेवर 'नोडल एजन्सी' म्हणून सोपविण्यात आली. ग्रामीण विकास मंत्री, सोलापूरचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेने या जबाबदारीचे प्रभावी नियोजन केले.

वारकऱ्यांना सुरक्षित, सुसज्ज आणि आरामदायी सुविधा मिळाव्यात यासाठी मुख्यमंत्री वारी सुविधा केंद्रांमध्ये तब्बल १३ लाख चौरस फूट जर्मन हँगर आणि ७ लाख ८० हजार चौरस फूट वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात आले. वारीच्या परतीच्या प्रवासातही वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी प्रथमच सुमारे १५ जर्मन हँगर उभारण्यात आले. या सुविधा केंद्रांमध्ये मातांसाठी स्वतंत्र स्तनपान कक्ष, पाय व पोटऱ्यांच्या वेदना कमी करण्यासाठी ७५० मसाजर, चरणसेवा आणि फिजिओथेरपी कक्ष उपलब्ध करून देण्यात आले. मोबाईल चार्जिंगची सुविधा, आपत्कालीन परिस्थितीसाठी 'मुख्यमंत्री आरोग्य केंद्र' आणि वारकऱ्यांच्या भक्तिमय वातावरणासाठी भजन संध्येचे मंच अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

**स्वच्छतेत पाचपट वाढ; महिलांसाठी स्वतंत्र आणि सन्मानजनक सुविधा**

लाखो वारकऱ्यांच्या उपस्थितीत स्वच्छता व्यवस्थापन हे सर्वांत मोठे आव्हान असते. हे आव्हान यशस्वीपणे पेलताना जिल्हा परिषदेने ५ हजार फिरती शौचालये उपलब्ध करून दिली. तसेच पालखीसोबतच चालणारे तब्बल ६७५ स्वच्छता कर्मचारी तैनात करण्यात आले.

या व्यवस्थेमुळे वारी मार्गावरील स्वच्छता अधिक प्रभावीपणे राखणे शक्य झाले. वलवंत घाट परिसरासह संवेदनशील आणि गर्दीच्या ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. महिलांच्या सन्मानाचा आणि आरोग्याचा विचार करून ५०० स्नानगृहे उपलब्ध



करण्यात आली. यासोबतच सॅनिटरी नॅपकिनचे वाटप आणि त्यांच्या शास्त्रोक्त विल्हेवाटीसाठी आवश्यक मशीनचीही व्यवस्था करण्यात आली. प्रशासनाच्या या संवेदनशील नियोजनामुळे वारीतील महिला वारकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला.

**आरोग्य सेवांचे भक्कम कवच; आपत्कालीन व्यवस्थेतही नवा मापदंड**

वारीदरम्यान आरोग्यविषयक कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तातडीने उपचार मिळावेत, यासाठी व्यापक आरोग्य यंत्रणा उभारण्यात आली. १९५ कायमस्वरूपी आणि ३२२ तात्पुरती उपचार केंद्रे, तसेच ३ हजार ६९७ आरोग्य कर्मचारी वारकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत होते. याशिवाय ३५० बाईक ॲम्ब्युलन्स, एक एअर ॲम्ब्युलन्स आणि १३ मुख्यमंत्री आरोग्य रथ अर्थात मोबाइल आरोग्य युनिट्स तैनात करण्यात आले. पावसाळी वातावरणात वारकऱ्यांचे आरोग्य सुरक्षित राहावे, यासाठी २५ हजार रेनकोटचे वाटप करण्यात आले. या सर्व व्यवस्थेमुळे वारीचे नियोजन केवळ धार्मिक आयोजन न राहता आरोग्य, स्वच्छता आणि मानवी सेवांचा एक आदर्श ठरला.

**आरोग्य क्षेत्रात ऐतिहासिक झेप; १४ सुविधांना NQS मानांकन**

सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण आरोग्य व्यवस्थेसाठी आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे १४ शासकीय वैद्यकीय सुविधांना राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानक अर्थात छटड मानांकन मिळणे होय. जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातील आरोग्य संस्थांनी राष्ट्रीय गुणवत्ता निकष पूर्ण केले आहेत. या मानांकनामुळे केवळ संस्थांची प्रतिष्ठा वाढलेली नाही, तर ग्रामीण नागरिकांना अधिक दर्जेदार, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवा मिळण्याचा मार्गही मजबूत झाला आहे. आरोग्य क्षेत्रात गुणवत्ता, स्वच्छता, उपचारपद्धती आणि रुग्णसेवा यांना प्राधान्य देत जिल्हा परिषदेने ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला नवी ओळख दिली आहे.

**कर्मचारी कल्याणाला प्राधान्य; १ कोटी रुपयांचे मोफत विमा कवच**

प्रशासनाचा खरा कणा म्हणजे त्याचे कर्मचारी. ही भूमिका ओळखून सोलापूर जिल्हा परिषदेने सर्व कर्मचाऱ्यांच्या आर्थिक सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांना १ कोटी रुपयांच्या मोफत विमा योजनेचे कवच उपलब्ध करून देण्यात आले आहे. या उपक्रमामुळे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक सुरक्षिततेचा मोठा आधार मिळणार आहे. कर्मचारी कल्याणाच्या दृष्टीने घेतलेला हा निर्णय प्रशासनातील मानवी संवेदनशीलतेचे उदाहरण ठरत आहे. जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना उत्तम भौतिक सुविधा, स्वच्छ वातावरण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे. ग्रामीण शिक्षणात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. याचबरोबर राष्ट्रीय स्तरावरही सोलापूर जिल्ह्याने मान मिळविला. 'हरित स्वच्छ शाळा' म्हणून शेकलेवाडी प्राथमिक शाळा ही महाराष्ट्रातील एकमेव शासकीय शाळा ठरली आहे. पर्यावरण, स्वच्छता आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा सुंदर संगम या शाळेने घडवून दाखविला आहे.



### जनसेवेचे नवे शिखर

त्रिजिल्हा वारीचे विक्रमी आणि यशस्वी आयोजन, स्वच्छता व आरोग्य सेवांमध्ये भक्कम नियोजन, ग्रामीण भागातील १४ आरोग्य संस्थांना छटड मानांकन, कर्मचाऱ्यांसाठी १ कोटी रुपयांचे मोफत विमा कवच, ११ तालुक्यांमध्ये आदर्श शाळांची उभारणी आणि अक्कलकोट तालुक्याची राष्ट्रीय रँकिंगमधील ऐतिहासिक झेप या सर्व कामगिरीतून सोलापूर जिल्हा परिषदेने विकासाचे बहुआयामी मॉडेल उभे केले आहे.

वारीपासून शिक्षणापर्यंत, आरोग्यापासून कर्मचारी कल्याणापर्यंत आणि शासकीय योजनांच्या अंमलबजावणीपासून सर्वसामान्यांच्या जीवनमान उंचावण्यापर्यंत सोलापूर जिल्हा परिषद आज जनसेवेचे नवे आणि प्रेरणादायी शिखर गाठताना दिसत आहे.

### 'आदर्श शाळां'मधून ग्रामीण शिक्षणाला नवी दिशा

**जॉर्डन... पश्चिम आशियातील एक महत्त्वपूर्ण देश. हा देश इस्त्रायलच्या पूर्वेला, सीरियाच्या दक्षिणेला, सौदी अरेबियाच्या उत्तरेला आणि इराकच्या पश्चिमेला वसलेला. यावरून या देशाचे भौगोलिक महत्त्वही लक्षात यावे. या मोक्याच्या भौगोलिक स्थानामुळे जॉर्डन पश्चिम आशियातील एक प्रमुख व्यापारी केंद्र म्हणून उदयास आला. त्यामुळे आखाती देश, उत्तर आफ्रिका आणि पुढे युरोपमधील प्रवेशाचा मार्गही जॉर्डनमधून जातो. जॉर्डनची महती अधोरेखित करण्याचे कारण म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा नुकताच यशस्वीरित्या संपन्न झालेला जॉर्डन दौरा.**

### अक्कलकोटची रँकिंगमध्ये थेट ऐतिहासिक झेप

शासकीय योजनांच्या प्रभावी आणि परिणामकारक अंमलबजावणीचे आणखी एक उदाहरण म्हणजे अक्कलकोट तालुक्याची आकांक्षित तालुका रँकिंगमधील कामगिरी. एकेकाळी ३८९ व्या क्रमांकावर असलेल्या अक्कलकोटने थेट ५२ व्या क्रमांकावर झेप घेतली आहे. विशेष म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रात अक्कलकोटने तिसरा क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

आरोग्य, शिक्षण, पोषण, मूलभूत सुविधा आणि विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यामुळे ही झेप शक्य झाली आहे. प्रशासनातील नियोजन, स्थानिक यंत्रणांचा समन्वय आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा याचे हे फलित मानले जात आहे.

# ‘ती’च्या कर्तृत्वाची गगनभरारी!



एकेकाळी चूल आणि मूल या पारंपरिक चौकटीत अडकलेल्या महिलांनी आज त्या चौकटी पार करून आकाशाला गवसणी घातली आहे. शिक्षण, राजकारण, प्रशासन, उद्योग, उद्योजकता, वैद्यकीय सेवा, क्रीडा, कला-संस्कृती, सामाजिक कार्य, पत्रकारिता अशा जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात महिला आपल्या कर्तृत्वाची स्वतंत्र ओळख निर्माण करत आहेत. या परिवर्तनाच्या प्रवाहात सोलापूर जिल्ह्यातील महिलांची कामगिरी विशेष अभिमानास्पद ठरली आहे.

## सोलापूरच्या महिलांच्या कर्तृत्वाचा नवा इतिहास

**जिद्द, आत्मविश्वास, परिश्रम आणि संधी यांची सांगड घालत सोलापूरच्या महिलांनी केवळ स्वतःच्या यशाची कहाणी लिहिली नाही, तर कुटुंब, समाज आणि जिल्ह्याच्या प्रगतीतही मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण भागातील बचतगटातील महिला असो वा राष्ट्रीय स्तरावर नेतृत्व करणारी महिला; डॉक्टर असो वा खेळाडू; उद्योजिका असो वा कलावंत-प्रत्येक क्षेत्रात सोलापूरच्या लेकींची यशस्वी भरारी लक्षवेधी ठरत आहे.**



आरती कुसेकर
भ्र. ९८६३७५१०००









### राजकारणातील ‘ती’

एकेकाळी राजकारणात महिलांना संधी मिळण्यामागे कुटुंबातील राजकीय वारसा हा प्रमुख घटक मानला जात होता. मात्र काळ बदलत असून, आता केवळ वारसाहक्कावर नव्हे, तर नेतृत्वगुण आणि कार्यक्षमतेच्या आधारे महिलांना राजकारणात संधी मिळत आहे. सध्या सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व खासदार प्रणिती शिंदे या लोकसभेत तर ज्योती वाघमारे या राज्यसभेत करीत आहेत. त्यामुळे राष्ट्रीय पातळीवरही जिल्ह्यातील महिलांचे नेतृत्व अधोरेखित झाले आहे. खासदार प्रणिती शिंदे यांनी महिला, युवक आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा चर्चेत राहिला आहे. तर ज्योती वाघमारे यांनी आपल्या राजकीय वाटचालीत सक्षम नेतृत्वाची छाप निर्माण केली आहे. सोलापूर शहराच्या उपमहापौर या महिला आहेत. तर जिल्हा परिषदेत तब्बल ३६ महिला सदस्या आहेत. तसेच ११ पंचायत समित्यांपैकी सहा सभापतिपदे महिलांकडे आहेत. पंचायत समित्यांमध्ये महिला सदस्यांची संख्या ७४ आहे. जिल्ह्यातील १७ नगरपालिकांपैकी १४ ठिकाणी महिला नगराध्यक्ष आहेत. नगरपालिकांतील एकूण ३७६ नगरसेवकांपैकी १८८ महिला सदस्य या शहरांचा कारभार पाहत आहेत. स्वताच्या कर्तृत्वावर ‘ती’ने राजकीय ओळख निर्माण केली आहे. आता केवळ पद भूषविण्यापुरत्या मर्यादित न राहता महिला प्रशासन, विकासकामे आणि जनतेच्या प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेत आहेत. नेतृत्वगुण, सामाजिक भान आणि काम करण्याची तयारी असलेल्या महिलांना संधी मिळू लागल्याने त्यांच्या स्थानाला स्थैर्य प्राप्त होत आहे. त्यांनी ग्रामपातळीपासून ते संसदेपर्यंत आपले अस्तित्व सिद्ध केले आहे. विधानभवनात माजी मंत्री स्व. निर्मलाराजे भोसले यांच्या रूपाने पहिल्या महिला नेतृत्वाला संधी मिळाली होती. त्यापाठोपाठ माजी मंत्री स्व. पार्वतीबाई मलगोंडा, स्व. प्रभाताई झाडबुके, स्व. निर्मला ठोकळ, श्यामल बागल, प्रणिती शिंदे या सहा जणांना संधी मिळाली. मात्र २०२४ विधानसभा निवडणुकीनंतर जिल्ह्यातील महिला नेतृत्वाची उणीव विधानसभेत प्रकर्षाने जाणवत आहे.

### कृषी क्षेत्रातील ‘हिरकणी’



दक्षिण सोलापूर भागातील महिलांना एकत्रित करून त्यांनी यशस्विनी ॲग्रो फार्मर्स प्रोड्युसर कंपनी स्थापन केली. महिलांनी चालवलेली ही महाराष्ट्रातील पहिली शेतकरी कंपनी मानली जाते, जिच्या माध्यमातून ज्वारीचे मूल्यवर्धन, मसाले आणि ’गावाकडची चव’ या ब्रँडखाली प्रक्रियायुक्त अन्नपदार्थांची राज्यालहीरीं विक्री होते. रुक्मिणी चौधरी: मोहोळ तालुक्यातील लांबोटी गावच्या रुक्मिणी चौधरी यांनी शेतमजूर ते यशस्वी महिला उद्योजिका अशी प्रेरणादायी वाटचाल केली आहे.

### शिक्षणातून साधना



महिला सक्षमीकरणाचा पाया शिक्षणात आहे. सोलापूर जिल्ह्यातील मुलींनी शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. उच्च शिक्षण, संशोधन, विज्ञान, तंत्रज्ञान आणि व्यावसायिक शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक विद्यार्थिनी आणि महिला संशोधक आपले वेगळे स्थान निर्माण करत आहेत. सायली जोशी या सोलापूरमधील इंडियन मॉडेल स्कूलच्या माध्यमातून शैक्षणीक क्षेत्रात योगदान देत आहेत. ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाची संधी मिळावी, त्यांना आर्थिक अडचणींवर मात करता यावी आणि त्यांनी उच्च शिक्षणाकडे वाटचाल करावी, यासाठी अनेक संस्था व महिला कार्यकर्त्या प्रयत्नशील आहेत. शिक्षणामुळे आत्मविश्वास वाढतो आणि आत्मविश्वासातून स्वावलंबनाची वाट खुली होते, याचे उदाहरण सोलापूरच्या अनेक महिला देत आहेत.



### उद्योगविश्वातील ‘ती’चे स्थान

उद्योग आणि उद्योजकतेच्या क्षेत्रातही सोलापूरच्या महिलांनी पारंपरिक मर्यादा झुगारून नवी वाट निर्माण केली आहे. सोलापूरच्या ’उद्योगवर्धिनी’ समूहाच्या प्रमुख म्हणून चंद्रिका चौहान यांनी हजारो महिलांना बचत गटांच्या माध्यमातून स्वावलंबी बनवले आहे. डॉ. सुहासिनी शहा या एक महिला उद्योजिका आणि सामाजिक कार्यकर्त्या आहेत. त्यांनी आपले पती यतिन शहा यांच्यासोबत मिळून सोलापूरमध्ये ’प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेड’ या कंपनीची पायाभरणी करून अनेकांना रोजगार दिला आहे. त्या ’प्रिसिजन फाउंडेशन’च्या अध्यक्षा म्हणून सामाजिक क्षेत्रातही मोलाचे योगदान देत आहेत. महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणात त्यांचे योगदान मोठे आहे. वस्त्रोद्योग, अन्नप्रक्रिया, हस्तकला, डिजिटल व्यवसाय, सेवा क्षेत्र, बँकिंग, लघुउद्योग आणि स्टार्टअप्समध्येही महिलांचा सहभाग वाढत आहे. त्यामुळे महिला उद्योजकता ही केवळ आर्थिक स्वावलंबनाची बाब न राहता रोजगारनिर्मिती आणि सामाजिक परिवर्तनाचे माध्यम बनत आहे.

### बचतगटातून अर्थकारण

सोलापूरच्या ग्रामीण भागात महिला बचतगटांनी आर्थिक परिवर्तनाची नवी कहाणी लिहिली आहे. छोट्या बचतीतून सुरू झालेली ही चळवळ आज स्वयंरोजगार, लघुउद्योग आणि उद्योजकतेच्या दिशेने पुढे जात आहे. घरगुती खाद्यपदार्थ, मसाले, पापड, लोणची, हस्तकला, वस्त्रोद्योगातील उत्पादने, विविध स्थानिक वस्तू यांचे उत्पादन करून महिला स्वतःचा व्यवसाय उभा करत आहेत. डिजिटल माध्यमे, ऑनलाइन विक्री आणि आधुनिक विपणन तंत्राचा वापर करून स्थानिक उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळवून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. सोलापुरी चादर, हस्तकला, खाद्यपदार्थ आणि स्थानिक उत्पादनांना मोठी बाजारपेठ मिळवून देण्यात महिला बचतगटांचे योगदान महत्त्वाचे ठरत आहे. आर्थिक उत्पन्नासोबतच या चळवळीने महिलांमध्ये निर्णयक्षमता, नेतृत्वगुण आणि आत्म विश्वास वाढविला आहे.



### कला-संस्कृतील ‘स्त्री’शक्ती

सोलापूरची सांस्कृतिक परंपरा समृद्ध करण्यात महिलांचे योगदान मोठे आहे. लेखिका, कवयित्री, गायिका, अभिनेत्री, लोककलावंत आणि सांस्कृतिक कार्यकर्त्या आपल्या कलागुणांनी या परंपरेला नवी उंची देत आहेत. साहित्य क्षेत्रातील महिलांच्या योगदानामुळे सोलापूरची ओळख अधिक व्यापक होत आहे. ख्यातनाम साहित्यिक पद्मश्री दया पवार यांच्या कन्या असलेल्या प्रज्ञा लोखंडे यांनी सोलापूरच्या भूमीत स्त्री अस्तित्व, स्वातंत्र्य आणि सामाजिक भान जपणाऱ्या साहित्याची निर्मिती केली आहे . त्याचबरोबर नसीमा पठाण, कविता मरूमकर, निर्मला मठपती, स्मिता पाटील, लता अकलूजकर, विशाखा काळे, श्रुतीश्री वडगबाळकर, सुरेखा शहा, वंदना कुलकर्णी, रेणूका महागांवकर आदींनी सोलापूरच्या साहित्य क्षेत्रात ठसा उमटवला आहे.



### आरोग्यसेवेतील माणुसकी

वैद्यकीय क्षेत्रात सोलापूरच्या महिला डॉक्टर, परिचारिका, आरोग्य कर्मचारी आणि विविध आरोग्यसेविका अहोरात्र सेवा देत आहेत. सार्वजनिक आरोग्य, मातृ-शिशू आरोग्य, महिला आरोग्य आणि आरोग्य जनजागृतीमध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. कोविडसारख्या काळात आरोग्यसेवेत कार्यरत महिलांनी दाखविलेली धैर्यशीलता, संवेदनशीलता आणि सेवाभाव समाजाच्या स्मरणात कायम राहील. आरोग्यसेवेबरोबरच ग्रामीण आणि दुर्गम भागात आरोग्यविषयक जनजागृती करण्याचे कामही महिला प्रभावीपणे करत आहेत.

### पत्रकारितेतही प्रभावी वाटचाल



अलिकडे माध्यम आणि पत्रकारिता क्षेत्रातही महिलांनी आपले स्थान भक्कम केले आहे. वृत्तसंकलन, संपादन, निवेदन, डिजिटल मीडिया, सामाजिक माध्यमे आणि विविध पत्रकारितेच्या क्षेत्रात आता महिला सक्षमपणे जबाबदार्या सांभाळत आहेत. सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे, महिलांच्या समस्या मांडणे, ग्रामीण भागातील वास्तव समाजासमोर आणणे आणि जनजागृती करणे, या माध्यमातून महिला सोलापूरच्या पत्रकारित महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

### ‘ती’च्या यशामागे संपूर्ण समाजाची प्रगती



महिलेचे यश हे केवळ तिचे वैयक्तिक यश नसते; तिच्या यशामागे एका कुटुंबाची उन्नती, एका समाजाचा आत्मविश्वास आणि पुढच्या पिढीचे भविष्य दडलेले असते. सोलापूरच्या महिलांनी हे वास्तव आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे. एका महिलेने व्यवसाय सुरू केला की त्यातून इतर महिलांना रोजगार मिळतो; एका मुलीने उच्च शिक्षण घेतले की तिच्या मागोमाग अनेक मुलींना नवी दिशा मिळते; एखादी खेळाडू राष्ट्रीय पातळीवर पोहोचली की गावातील अनेक मुलींच्या डोळ्यांत नवी स्वप्ने जन्म घेतात.

### ‘ती’ ची भरारी म्हणजे सोलापूरची भरारी

आज सोलापूरच्या महिला केवळ संधीची वाट पाहत नाहीत, तर संधी निर्माण करत आहेत. तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून ग्रामीण आणि शहरी महिलांनी व्यवसायाची नवी दारे खुली केली आहेत. स्थानिक उत्पादनांना ब्रँडिंग, ऑनलाइन बाजारपेठ आणि आधुनिक विपणनाची जोड देऊन त्या जागतिक बाजारपेठेकडे वाटचाल करत आहेत. या प्रवासात अडथळे अजूनही आहेत. मात्र सोलापूरच्या महिलांनी या आव्हानांना घाबरून न जाता ‘अडचणीतून संधी’ निर्माण करण्याची जिद्द दाखविली आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे केवळ महिलांना अधिकार देणे नव्हे, तर त्यांना निर्णय घेण्याची क्षमता, आर्थिक स्वावलंबन, शिक्षण, सुरक्षित वातावरण आणि स्वतःच्या स्वप्नांना आकार देण्याची संधी देणे होय. या दिशेने सोलापूरची वाटचाल निश्चितच आशादायी आहे.

# कुडल संगम : निसर्ग, श्रद्धा आणि इतिहासाचा संगम

कुडल संगम हे सोलापूरपासून अवघ्या ३५ किलोमीटर अंतरावर आहे. सध्या सुरु असलेल्या सोलापूर- विजयपूर- बंगळूर सहापदरी महामार्गावरून सुमारे २५ कि.मी. प्रवास करून डावीकडे आणि पुढे १० कि.मी. अंतर पार केल्यावर हे ऐतिहासिक ठिकाण तुम्हाला सामोरे येईल.

येथे भीमा नदी (उत्तर दिशेने येणारी) आणि सीना नदी (पश्चिम दिशेने येणारी) यांचा संगम आकारात होतो. ही रचना भारतात फारच दुर्मिळ आहे, कारण बहुतांश संगम Y आकाराचे असतात. या संगमावर उभे आहेत प्राचीन वास्तुकलेचे दोन खजिने - संगमेश्वर आणि हरिहरेश्वर मंदिरे.

**सोलापूर जिल्ह्याच्या दक्षिण टोकाला, महाराष्ट्र- कर्नाटक सीमेवर वसलेले एक अनोखे आणि दुर्लक्षित ठिकाण म्हणजे कुडल संगम (हत्तरसंग कुडल). भीमा आणि सीना नदीचा संगम असलेले हे स्थळ, केवळ धार्मिकदृष्ट्या नव्हे तर ऐतिहासिक, स्थापत्यशास्त्रीय आणि नैसर्गिक सौंदर्याच्या दृष्टीनेही अत्यंत महत्वाचे आहे.**



## श्री संगमेश्वर मंदिर




या मंदिराचा इतिहास चालुक्यकालीन काळात पोहोचतो. त्रिकूट शैलीतील हे मंदिर तीन गाभाऱ्यांमध्ये विभागलेले असून, मध्यवर्ती गर्भगृहात आहे श्री संगमेश्वर महादेवाचे भव्य शिवलिंग.

### विशेष वैशिष्ट्ये:




भारतातील पहिला मराठी शिलालेख इथेच आहे. सभामंडपातील तुळईवर कोरलेला. शिलालेखात जो कोणी हा लेख वाचेल, तो विजयी होईल असे स्पष्ट वाचन. शके ९४० (इ.स. १०१८) ची तारीख यामध्ये स्पष्टपणे नमूद. पुरातत्व विभाग सध्या या मंदिराची जपणूक व जीर्णोद्धार करत आहे.

### विशेष शिल्पसौंदर्य:

**दोन गर्भगृह** - डावीकडे शिवलिंग, उजवीकडे मुरलीधर श्रीकृष्ण. थोड्या अंतराळात श्री गणेशाची मूर्ती. **छतावर:** स्वर्गसुंदरी, यक्ष, गंधर्व, किन्नर, पशु-पक्षी यांची अप्रतिम शिल्पे. मुख्य मंडपात काळभैरवनाथाची भव्य मूर्ती. कालियामर्दन करणारा श्रीकृष्ण, लक्ष्मी- भैरवी एकाच दगडात, व इतर अनेक कलात्मक साक्षी. मंदिराची शिल्परचना खिद्रापूर (कोल्हापूर) येथील कोपेश्वर मंदिराशी साम्य दर्शवते.



### उत्सव आणि धार्मिक परंपरा

कुडल संगम येथे महाशिवरात्री, श्रावण महिना व मकर संक्रांती निमित्त यात्रांचे आयोजन केले जाते.

मंदिर सुधारणा समिती विविध धार्मिक विधी, सांस्कृतिक कार्यक्रम आणि भजन-कीर्तन यांचे आयोजन करते.

### अध्यात्मिक पर्यटनाचे उत्कृष्ट केंद्रः

सोलापूर भिमा-सीना नद्यांच्या पवित्र संगमावर वसलेल्या पवित्र तीर्थक्षेत्र कुडल संगम (ता.दक्षिण सोलापूर) येथील संगमेश्वर आणि हरिहरेश्वर मंदिर, बहुमुखी शिवलिंगमुळे अध्यात्मिक पर्यटन स्थळ व विकसित होत आहे.



### अन्नपूर्णा देवी

संगमेश्वर मंदिरात श्री अन्नपूर्णा देवी मंदिर असून, प्रत्येक भाविक अन्नपूर्णा देवीस नैवैद्य अर्पण केल्याशिवाय पुढील कार्ये करत नाहीत. अन्न हे परब्रह्म असून, अन्नपूर्णा देवीस नैवैद्य अर्पण केल्यानंतर घरी अन्नदेवतेची कृपा राहते अशी भाविकांची श्रध्दा आहे. अन्नपूर्णा देवी संगमेश्वर मंदिराच्या प्राकार भिंतीच्या नैऋत्य बाजूस आहे.



### श्री हरिहरेश्वर मंदिर

हे महाराष्ट्रात असलेल्या प्राचीन मंदिरांपैकी एक मंदिर आहे. कल्याणीच्या चालुक्यांच्या काळात हे मंदिर इ.स.११ व्या शतकांच्या प्रारंभी ( १०१८) बांधण्यात आले. शिव व विष्णूचे एकत्रित मंदिर सोलापूर जिल्ह्यातील एकमेव आहे. मंदिराच्या बांधकामासाठी कोणत्याही सिमेंट किंवा मातीसारख्या माध्यमाचा उपयोग केलेला नाही. मुख्य मंडप, अर्ध मंडप, रंगमंडप, अंतराळ व गर्भगृह असे विभाग आहेत. असामान्य कलात्मक व भावदर्शी



चेहरा व पाच शरिर असलेले स्त्रिचे शिल्प, काळ भैरव व व्याळमुर्ती आणि कालिया मर्दन शिल्प ही या मंदिराची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

श्री संगमेश्वर मंदिराच्या पायथ्याशी असलेले हे मंदिर, स्थापत्यकलेच्या दृष्टीने अचंबित करणारे आहे. १९९५ पर्यंत हे मंदिर मातीखाली गाडले गेले होते. प्रा. गजानन भिडे व ग्रामस्थांच्या प्रयत्नातून याचे उत्खनन करण्यात आले.

### बहुमुखी शिवलिंगः-

श्री हरिहरेश्वर मंदिराच्या उत्खननात मिळालेले हे एक असामान्य शिल्प असून, याचा आकार शिवलिंगासारखा असून, शिलेचा परिघ चार मिटर व वजन साडेचार टन आहे. शिल्पाच्या वरच्या मध्यापासून तळापर्यंतची उंची ११७ सेंमी आहे. या लिंगावर शिवदेवतेच्या उठाव पध्दतीने एकूण ३५९ मूर्ती कोरलेल्या आहेत. शिवमुर्ती डोक्यावर नागाचा किरीट असून, हातात त्रिशुल डमरु आहेत. ३५९ शिवमुर्ती व एकलिंग अशा ३६० शिवमुर्ती आहेत. एकदा अभिषेक केल्यावर भक्ताला वर्षभर अभिषेक करण्याचे पुण्य मिळते. ही या शिल्पामागील भूमिका आहे. भारतात किंवा जगातील शिवलिंगावर जास्तीत जास्त १२ शिवमुख कोरलेली शिवलिंगे मिळालेली आहेत. बहुमुखी शिवलिंग हे जगातील एकमेव आहे.



### कुडल संगमचा किरणोत्सव

मकर संक्रांतीच्या दिवशी, पहाटेच्या सूर्यकिरणांचा थेट स्पर्श श्री संगमेश्वर मंदिरातील शिवलिंगावर होतो. महाराष्ट्रात फारच कमी ठिकाणी असा नयनरम्य किरणोत्सव अनुभवता येतो. या दिवशी भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती असते.

## भाविकांसाठी परिवहनची सुविधा

श्रीक्षेत्र कुडल संगम येथे यात्रेसाठी भाविकांची मोठ्याप्रमाणात गर्दी होत असल्याने राज्य परिवहन व महापालिका परिवहन विभागाच्यावतीने एस.टी. आणि सीटी बसची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सोलापूर बसस्थानकावरुन सकाळी ९.१५ वाजता व संध्याकाळी ५.३० वाजता निघून रेल्वे रेल्वे स्टेशन, सात रस्ता मार्गे विजापूर रोड मार्गे अनुक्रमे सकाळी १०.३०, संध्याकाळी ७ वाजता कुडलसंगम येथे पोहचणार आहे. तर मनपा परिवहनचे राजेंद्र चौक येथून सकाळी ८ वाजता, दुपारी ३ वाजता मार्गस्थ होऊन कोंतम चौक, पांजरापोळ चौक, रेल्वे स्टेशन रंगभवन, सात रस्ता मार्गे कुडल संगम येथे पोहचणार आहे.

हत्तरसंग कुडल हे सोलापूरच्या पर्यटनाच्या नकाशावर ठळकपणे पुढे आणता येईल असे ऐतिहासीक आणि धार्मिक पर्यटन स्थळ आहे. योग्य पायाभूत सुविधा, माहिती फलक आणि स्वच्छता, नदीसंगम परिसराचे सुशोभिकरण आणि वारसा संवर्धन झाले तर हे ठिकाण सोलापूरच्या पर्यटन विकासाचे महत्त्वाचे केंद्र बनू शकते. मात्र, यासाठी शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## पर्यटकांसाठी उपलब्ध सुविधा

- अन्नछत्र व विश्रांती गृह - देवस्थान समितीमार्फत.
- बोटिंगची सुविधा नदीत.
- शांत, आध्यात्मिक व निसर्गरम्य वातावरण - कुटुंबीयांसाठी योग्य ठिकाण.
- कुडल संगम (हत्तरसंग कुडल) हे ठिकाण केवळ एक धार्मिक स्थान नाही, तर एक जिवंत इतिहास आहे- शिल्प, श्रद्धा आणि निसर्गाचा संगम.
- आपल्या पुढच्या प्रवासात, याला नक्की भेट द्या- माणसाच्या श्रद्धेइतके सुंदर काहीच नाही!



# धाराशिव बदलतय... व्हिजन राणादादांचे..!



धाराशिव... मराठवाड्याच्या नकाशावर असलेला हा जिल्हा इतिहास, अध्यात्म, संस्कृती आणि कष्टकरी माणसांच्या जिद्दीने समृद्ध आहे. तुळजाभवानी मातेचे जागतिक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र, तेरची ऐतिहासिक परंपरा, नळदुर्गचा भुईकोट किल्ला, संतपरंपरा, कृषी संस्कृती आणि ग्रामीण जीवनशैली अशी अनेक वैशिष्ट्ये धाराशिवला लाभली आहेत. मात्र विकासाच्या स्पर्धेत हा जिल्हा अनेक वर्षे मागे राहिल्याची भावना जिल्हावासीयांच्या मनात कायम होती.



रेल्वे, पाणी, उद्योग, पर्यटन आणि आधुनिक शेतीच्या माध्यमातून विकासाचे नवे पर्व; आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पुढाकाराने बदलत्या धाराशिवची कहाणी

दुष्काळ, पाणीटंचाई, सिंचनाचा अभाव, अपुरी रेल्वे जोडणी, मोठ्या उद्योगांची कमतरता, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि त्यातून होणारे युवकांचे स्थलांतर ही धाराशिवसमोरील मोठी आव्हाने होती. उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांना पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर यांसारख्या शहरांकडे जावे लागायचे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला बाजारपेठ मिळत असली तरी प्रक्रिया उद्योगांच्या अभावामुळे मूल्यवर्धनाचा मोठा हिस्सा जिल्ह्याबाहेर जात होता. मात्र गेल्या काही काळात धाराशिवच्या विकासाचा विचार केवळ रस्त्यापुरता किंवा एखाद्या इमारतीपुरता मर्यादित न राहता रेल्वे, पाणी, उद्योग, शेती, पर्यटन, तीर्थक्षेत्र विकास आणि रोजगार या सर्व क्षेत्रांना जोडणाऱ्या व्यापक चौकटीत होताना दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर तुळजापूरचे आमदार तथा महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITR) चे उपाध्यक्ष राणाजगजितसिंह पाटील यांच्या पुढाकाराची चर्चा होते. समर्थकांच्या मते, जिल्ह्याच्या दीर्घकालीन विकासासाठी प्रकल्पांची आखणी, मंत्रालयीन व प्रशासकीय पातळीवर सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यावर त्यांनी भर दिला आहे. हा प्रवास कितपत यशस्वी होतो, हे अर्थातच प्रकल्पांची प्रत्यक्ष अंमलबजावणी, निधी, वेळापत्रक आणि प्रशासनाच्या कार्यक्षम तेवर अवलंबून राहणार आहे. मात्र धाराशिवच्या विकासाची दिशा बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे निश्चित.

## विकासाची नवी विचारधारा...

जिल्ह्याचा विकास म्हणजे केवळ रस्ते, पूल, इमारती किंवा शासकीय कार्यालये उभारणे नव्हे. पाणी असेल तर शेती वाढते; शेती वाढली तर प्रक्रिया उद्योग निर्माण होतात; उद्योग आले तर रोजगार वाढतो; रोजगार वाढला तर स्थलांतर कमी होते; रेल्वे व रस्ते जोडणी सुधारली तर बाजारपेठ विस्तारते; आणि पर्यटन वाढले तर स्थानिक सेवा व्यवसायाला चालना मिळते. याच परस्परसंबंधातून धाराशिवच्या विकासाकडे पाहण्याची गरज आहे.

आज जिल्ह्याच्या विकासासाठी एकाच वेळी अनेक आघाड्यांवर प्रयत्न सुरू असल्याचे चित्र आहे. रेल्वे जोडणी, तुळजापूर तीर्थक्षेत्राचा विकास, औद्योगिक वसाहती, कृषी प्रक्रिया उद्योग, पाणीपुरवठा आणि सिंचनाच्या योजना, पर्यटन स्थळांचा विकास आणि आधुनिक शेती या सर्व बाबी एकमेकांना पूरक ठरू शकतात. म्हणूनच धाराशिवच्या विकासाचा पुढचा टप्पा हा केवळ पायाभूत सुविधांचा नसून स्थानिक अर्थव्यवस्थेच्या पुनर्रचनेचा ठरू शकतो.



अनिल आगलावे
भ्र. ९७६७०९९७११

## रेल्वे: शतकभराच्या प्रतीक्षेला पूर्णविराम..?

धाराशिवच्या विकासाच्या चर्चेत सर्वाधिक महत्त्वाचा विषय म्हणजे रेल्वे.

सोलापूर- तुळजापूर- धाराशिव रेल्वे जोडणी ही जिल्ह्यासाठी केवळ प्रवासी वाहतुकीची सुविधा नसून भविष्यातील आर्थिक संधींचे दार उघडणारी पायाभूत सुविधा म्हणून पाहिली जात आहे.

रेल्वे जोडणीमुळे धाराशिवचा संपर्क मोठ्या बाजारपेठांशी अधिक सक्षम होऊ शकतो. शेतमाल, औद्योगिक कच्चा माल आणि तयार उत्पादने कमी खर्चात दूरच्या बाजारपेठेत पोहोचविण्याची सुविधा उपलब्ध होऊ शकते. याचा थेट फायदा उद्योगांना होईल. कारण कोणत्याही मोठ्या उद्योगासाठी जमीन आणि मनुष्यबळाबरोबरच वाहतूक खर्च हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो.

रेल्वेमुळे विद्यार्थ्यांसाठी, नोकरदारांसाठी, व्यापाऱ्यांसाठी आणि सर्वसामान्य प्रवाशांसाठीही प्रवास अधिक सुलभ होऊ शकतो. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे तुळजापूरच्या धार्मिक पर्यटनाला यामुळे मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे. देशाच्या विविध भागांतून येणाऱ्या भाविकांसाठी रेल्वे हा स्वस्त आणि सोयीस्कर पर्याय ठरू शकतो. रेल्वे आली म्हणजे लगेच विकास होतो असे नाही; परंतु रेल्वे ही विकासासाठी आवश्यक असलेली मजबूत पायाभूत कणा ठरू शकते.

## तुळजापूर : तीर्थक्षेत्रातून जागतिक पर्यटन केंद्राकडे...

आई तुळजाभवानीचे मंदिर हे धाराशिवची सर्वात मोठी धार्मिक ओळख आहे. महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून भाविक तुळजापूरला येतात.




मात्र वाढत्या भाविकसंख्येच्या तुलनेत पार्किंग, वाहतूक, निवास, स्वच्छता, पिण्याचे पाणी, दर्शन व्यवस्था, शहर नियोजन आणि पर्यटकांसाठीच्या सुविधा यांचा विस्तार सातत्याने करणे आवश्यक आहे. तीर्थक्षेत्र विकासाच्या व्यापक आराखड्यामुळे या सर्व बाबींना नवी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे.

तुळजापूरचा विकास केवळ मंदिर परिसरापुरता मर्यादित न राहता संपूर्ण शहराच्या अर्थव्यवस्थेशी जोडला गेला, तर त्याचा परिणाम मोठ्या प्रमाणावर होऊ शकतो. हॉटेल, लॉज, रेस्टॉरंट, वाहतूक, फुलविक्रेते, प्रसाद विक्रेते, पूजासाहित्य, स्थानिक हस्तकला, मार्गदर्शक सेवा आणि विविध लघुउद्योगांना याचा फायदा होऊ शकतो. म्हणजेच तीर्थक्षेत्र विकास हा केवळ धार्मिक सुविधा वाढविण्याचा विषय नसून स्थानिक रोजगार निर्मितीचा मॉडेल ठरू शकतो.

## उद्योगाशिवाय युवकांचे स्थलांतर थांबणार कसे?

धाराशिवमधील सर्वात मोठ्या प्रश्नांपैकी एक म्हणजे रोजगार.शिक्षण घेऊनही स्थानिक पातळीवर अपेक्षित रोजगार उपलब्ध नसल्यामुळे अनेक युवकांना मोठ्या शहरांकडे जावे लागते. यामुळे गावातील कुशल मनुष्यबळ बाहेर जाते. घरातील तरुण शहरात नोकरीला जातो आणि गावात वृद्ध पालक, शेती आणि मर्यादित व्यवसाय अशी परिस्थिती अनेक कुटुंबांमध्ये दिसते.

ही परिस्थिती बदलण्यासाठी औद्योगिक विकास अत्यंत महत्त्वाचा आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणी औद्योगिक वसाहती आणि उद्योगांना पोषक पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू आहेत. मोठे उद्योग आले तर केवळ त्याच उद्योगात रोजगार निर्माण होत नाही; तर त्याभोवती वाहतूक, दुरुस्ती, पॅकेजिंग, खानावळ, लॉजिस्टिक्स, सुरक्षा, सेवा आणि लघुउद्योगांची साखळी तयार होते. त्यामुळे धाराशिवमध्ये उद्योग म्हणजे फक्त कारखाना नव्हे, तर स्थानिक अर्थव्यवस्थेला गती देणारी संपूर्ण इकोसिस्टिम निर्माण होणे गरजेचे आहे.

## शेतीला मूल्यवर्धनाची जोड...

धाराशिवची अर्थव्यवस्था आजही मोठ्या प्रमाणावर शेतीवर आधारित आहे. सोयाबीन, तूर, हरभरा, ऊस, कांदा आणि विविध पिकांचे उत्पादन घेणारा शेतकरी बाजारभावाच्या चढ- उतारावर अवलंबून असतो. उत्पादनाच्या वेळी दर कमी आणि साठवणुकीची



सुविधा नसल्याने शेतकऱ्यांना घाईने माल विकावा लागतो. यावर दीर्घकालीन उपाय म्हणजे शेतमालाचे मूल्यवर्धन.

माळुंब्रा येथील 'तारा' कृषी- औद्योगिक प्रकल्पासारखे उपक्रम या दृष्टीने महत्त्वाचे ठरू शकतात. कृषी प्रक्रिया, साठवणूक, कोल्ड स्टोरेज, पॅकेजिंग, ब्रँडिंग, संशोधन, प्रशिक्षण आणि निर्यात यांची साखळी उभी राहिली तर शेतकऱ्याला केवळ कच्चा माल विकण्याऐवजी मूल्यवर्धित उत्पादनातून अधिक उत्पन्न मिळवण्याची संधी निर्माण होऊ शकते. उदाहरणार्थ, शेतात तयार होणारा कच्चा माल जर जिल्ह्यातच प्रक्रिया करून पॅकिंगसह बाजारात गेला, तर त्या उत्पादनाच्या किंमतीतील मोठा हिस्सा स्थानिक अर्थव्यवस्थेत राहू शकतो. म्हणजेच शेतकऱ्याची शेती आणि उद्योग यांच्यातील दरी कमी करणे ही धाराशिवच्या आर्थिक परिवर्तनाची महत्त्वाची पायरी ठरू शकते.

## पाण्याशिवाय विकास अशक्य!...

धाराशिवच्या विकासाचा विचार करताना पाण्याचा प्रश्न सर्वांत आधी सोडवावा लागेल. पाणी असेल तर शेती टिकेल. शेती टिकली तर ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होईल. उद्योगांसाठी पाणी उपलब्ध झाले तर औद्योगिक गुंतवणुकीला चालना मिळेल. शहरांना पुरेसे पाणी मिळाले तर नागरीकरणाचा वेग वाढेल. उजनी धरणातून पाणी, रामदरा तलाव तसेच पश्चिम महाराष्ट्रातील अतिरिक्त पाणी मराठवाड्याकडे वळविण्याच्या विविध संकल्पना आणि योजनांकडे याच व्यापक दृष्टिकोनातून पाहिले जाते. या योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी, तांत्रिक व्यवहार्यता, निधी आणि पर्यावरणीय बाबी यांचा समतोल साधणे आवश्यक आहे. परंतु या योजना प्रत्यक्षात उतरल्या तर धाराशिवच्या भविष्यातील विकासासाठी पाण्याची मोठी मर्यादा दूर होण्याची शक्यता आहे. पाणी हा केवळ शेतीचा विषय नाही. तो उद्योग, रोजगार, शहर विकास आणि लोकसंख्येच्या स्थैर्याशी जोडलेला विषय आहे.

**पर्यटन: इतिहास, अध्यात्म आणि निसर्गाची सांगड...** धाराशिव जिल्ह्याला पर्यटनाची मोठी क्षमता आहे.

तुळजाभवानी मंदिर, तेरचे ऐतिहासिक वैभव, नळदुर्ग किल्ला, त्रिविक्रम मंदिर, संत गोरोबाकाका मंदिर, रामलिंग अभयारण्य यांसारख्या विविध स्थळांना एका एकात्मिक पर्यटन सर्किटमध्ये जोडण्याची क्षम ता आहे. आज पर्यटक एखाद्या ठिकाणी येतो आणि काही तासांत परत जातो. ही परिस्थिती बदलून 'एक दिवसाचा भाविक' ते '



दोन-तीन दिवसांचा पर्यटक' असा प्रवास घडवणे आवश्यक आहे. त्यासाठी निवास व्यवस्था, स्थानिक खाद्यसंस्कृती, मार्गदर्शक, पर्यटन माहिती केंद्रे, रस्ते, पार्किंग, स्वच्छता आणि डिजिटल पर्यटन सुविधा विकसित कराव्या लागतील. पर्यटन वाढले तर त्याचा फायदा केवळ मंदिर किंवा किल्ल्याला होणार नाही. स्थानिक तरुणांसाठी गाईड सेवा, वाहन व्यवसाय, हॉटेल, होम-स्टे, रेस्टॉरंट, हस्तकला, स्थानिक खाद्यपदार्थ, स्मृतिचिन्हे आणि विविध सेवा व्यवसायांत रोजगार निर्माण होऊ शकतो.

**तुळजापूरचा विकास म्हणजे संपूर्ण जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला चालना...** तुळजापूरला येणारा भाविक धाराशिव जिल्ह्याच्या इतर पर्यटन स्थळांकडे वळला, तर पर्यटनाचा आर्थिक फायदा जिल्ह्याच्या अनेक भागांत पोहोचू शकतो. तुळजापूर- तेर- नळदुर्ग- रामलिंग अशा पर्यटन मार्गांची कल्पना प्रत्यक्षात आली तर जिल्ह्याची पर्यटन ओळख अधिक व्यापक होऊ शकते. यासाठी शासनाबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्था, व्यापारी, हॉटेल व्यावसायिक, पर्यटन संस्था, युवक आणि नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. कारण पर्यटन विकास हा केवळ सरकारी निधीतून होत नाही; स्थानिक समाजाच्या सहभागातून पर्यटन अर्थव्यवस्था उभी राहते.

**आधुनिक शेती : पुढच्या पिढीचा मार्ग...** पाणी आणि उद्योगाबरोबरच शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. ठिबक सिंचन, तुषार सिंचन, माती परीक्षण,



हवामान आधारित पीक नियोजन, आधुनिक बियाणे, यांत्रिकीकरण, ड्रोन तंत्रज्ञान, डिजिटल बाजारपेठ, कृषी प्रक्रिया आणि शेतकरी उत्पादक कंपन्या या माध्यमातून शेती अधिक सक्षम करण्याची गरज आहे. भविष्यातील धाराशिवमध्ये केवळ पारंपरिक शेती नव्हे तर उत्पादन + प्रक्रिया + ब्रँडिंग + बाजारपेठ असा संपूर्ण मॉडेल उभा करणे गरजेचे आहे. यामुळे शेतकऱ्याच्या उत्पादनाला बाजारपेठ मिळेल आणि ग्रामीण युवकांना शेतीशी संबंधित नव्या व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतील.

## शिक्षण आणि कौशल्य : रोजगारासाठी नवी तयारी...

धाराशिवचा विकास झाला तर उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळाची गरज वाढणार आहे. त्यामुळे औद्योगिक विकासासोबत कौशल्य विकासाची यंत्रणा मजबूत करणे गरजेचे आहे. तांत्रिक शिक्षण, आयटीआय, पॉलिटेक्निक, कृषी शिक्षण, डिजिटल कौशल्य, लॉजिस्टिक्स, पर्यटन, हॉस्पिटॅलिटी आणि उद्योजकता या क्षेत्रांत स्थानिक युवकांना प्रशिक्षण मिळाले तर बाहेरील मनुष्यबळ आणण्याची गरज कमी होईल.

'धाराशिवचा उद्योग- धाराशिवचा युवक' हे सूत्र प्रत्यक्षात आणण्यासाठी शिक्षण आणि उद्योग यांच्यात थेट संबंध निर्माण करणे ही पुढची मोठी गरज असेल.

## बदलत्या धाराशिवसमोरची आव्हानेही मोठी..

विकासाचे स्वप्न मोठे आहे; मात्र त्यासमोरची आव्हानेही तितकीच मोठी आहेत. प्रकल्प वेळेत पूर्ण होणे, निधीची सातत्यपूर्ण उपलब्धता, भूसंपादन, पर्यावरणीय परवानग्या, प्रशासकीय समन्वय, दर्जेदार काम आणि देखभाल या बाबी महत्त्वाच्या ठरणार आहेत. रेल्वेचा प्रकल्प असो, औद्योगिक वसाहत असो किंवा जलसंधारणाची योजना-घोषणा आणि प्रत्यक्ष पूर्णत्व यामधील अंतर कमी करणे ही खरी कसोटी असेल. त्यामुळे धाराशिवच्या नागरिकांना आता केवळ आश्वासन नव्हे, तर प्रकल्पनिहाय प्रगती, पारदर्शकता आणि वेळबद्ध अंमलबजावणी अपेक्षित आहे.

## पुढील दशक धाराशिवचे?

कल्पना करा... धाराशिवला सक्षम रेल्वे जोडणी आहे. औद्योगिक वसाहतींमध्ये कारखाने सुरू आहेत. शेतमालाची प्रक्रिया जिल्ह्यातच होत आहे. शेतकऱ्याला आपल्या उत्पादनाला बाजारपेठ मिळत आहे. तुळजापूरमध्ये आधुनिक तीर्थक्षेत्र सुविधा आहेत. तेर आणि नळदुर्गला देश-विदेशातील पर्यटक भेट देत आहेत. युवकांना नोकरीसाठी पुणे-मुंबईकडे जाण्याची सक्ती उरलेली नाही. स्थानिक उद्योजक नवे व्यवसाय उभारत आहेत. आधुनिक शेती आणि तंत्रज्ञानामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होत आहे. ही केवळ कल्पना नाही; योग्य नियोजन, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि प्रभावी अंमलबजावणी झाली तर हे धाराशिवच्या भविष्यातील विकासाचे संभाव्य चित्र ठरू शकते. धाराशिवच्या विकासाचा हा प्रवास एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून संपूर्ण जिल्ह्याचा प्रवास आहे. मात्र मोठ्या प्रकल्पांना दिशा देण्यासाठी दूरदृष्टी, राजकीय इच्छाशक्ती आणि प्रशासकीय पाठपुरावा आवश्यक असतो. याच संदर्भात राणाजगजितसिंह पाटील यांच्या विकासदृष्टीची चर्चा होत आहे. आज धाराशिव एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे.

रेल्वे विकासाचा कणा ठरू शकते. पाणी अर्थव्यवस्थेचा आधार ठरू शकते. उद्योग रोजगाराचा मार्ग ठरू शकतात. शेती मूल्यवर्धनाची ताकद बनू शकते. पर्यटन नव्या व्यवसायांना जन्म देऊ शकते. आणि शिक्षण व कौशल्य विकास धाराशिवच्या युवकांना भविष्यासाठी सक्षम करू शकतो. म्हणूनच...

### व्हिजनपासून वास्तवाकडे...

धाराशिव आज एका संक्रमणाच्या टप्प्यावर आहे. एकीकडे दुष्काळ, पाणीटंचाई, बेरोजगारी, स्थलांतर आणि औद्योगिक मागासलेपणाची जुनी आव्हाने आहेत; तर दुसरीकडे रेल्वे, उद्योग, तीर्थक्षेत्र विकास, पर्यटन, जलव्यवस्थापन आणि आधुनिक शेतीच्या माध्यमातून नव्या संधींचे दरवाजे उघडत आहेत. या परिवर्तनामागे राजकीय इच्छाशक्तीबरोबरच प्रशासन, लोकप्रतिनिधी, उद्योजक, शेतकरी, युवक आणि सामान्य नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पुढाकारातून मांडली जाणारी विकासाची दिशा यशस्वी ठरवायची असेल, तर प्रत्येक प्रकल्पाचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. धाराशिवला विकास हवा आहे; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे संधींचा जिल्हा म्हणून धाराशिवची नवी ओळख निर्माण होणे गरजेचे आहे.

### 'धाराशिव बदलतय...'

ही केवळ राजकीय घोषणा न राहता, प्रत्यक्ष प्रकल्प, रोजगार, पाणी, उद्योग आणि लोकांच्या जीवनमानातील सुधारणांमधून सिद्ध होणे हीच खरी अपेक्षा. आणि हा बदल प्रत्यक्षात आला, तर पुढील दशकात धाराशिवची ओळख 'दुष्काळग्रस्त जिल्हा' म्हणून नव्हे, तर 'विकासाच्या नव्या मॉडेलकडे वाटचाल करणारा जिल्हा' म्हणून निर्माण होऊ शकते. दिशा बदलली आहे... आता वेग आणि परिणामांची प्रतीक्षा आहे!

*नाही पाहिला, नाही देखीला, सूर्यनारायण माझा हृदयी राहिला ।*

**महाराष्ट्रात केवळ एकमेव असणारे असे प्रख्यात सूर्यनारायण देवाने पावन झालेले असे सुंदर, रमणीय, पवित्र, श्रीक्षेत्र नारायण चिंचोली... श्री सूर्यनारायण देवाचे हे स्थान, त्याच्या दर्शनाने चित्यवृत्ती बहरते, भक्तिला उधाण येते. अंतःकरण प्रसन्न होते. प्रापंचिक चिंता, दुःख यांचा परिहार होतो. श्री सूर्यनारायण देव श्रीक्षेत्र 'नारायण चिंचोली' या क्षेत्री प्रवेश करताच सारा निसर्ग जणू सुस्वागतम् सुस्वागतम् म्हणत असल्याचा भास होतो. ग्रामीण वातावरण असल्यामुळे, विशाल असे वृक्ष, हिरवी वनराई आपले बाहू पसरुन अभ्यागतांचे, भाविकांचे स्वागत करतात. पक्षीगण मंजुळ स्वरांनी स्वागत गीते गात असतात. अशा या निसर्गरम्य गांवी व मंदिराच्या दिशेने चालू लागल्यावर भगवान सूर्यनाराणाच्या भेटीची आस लागून राहिलेली, ती पूर्ण होणार म्हणून मनस्वी आनंद होत असतो.**

# सुरम्य सूर्यनारायण दर्शन...



शिवाजी हळणवर
भ्र.-ने. ९८६००४००१३

मंदिराच्या छायेत क्षणभर स्थिरावले की पूर्व बाजूस दिसतो तो मंदिर परिसर. मंदिराच्या सभा मंडपातून पुढे गेले की साक्षात भगवान सूर्यनारायाणाची विशाल अशी नयनरम्य मूर्ती हेच नारायण चिंचोलीचे मुख्य स्थान.... त्यांचे दर्शनाने भाविकांना संतोष लाभतो भेटणाऱ्यांना भेटीचा आनंद गगनात मावेना असा होतो. अनेक श्रध्द भक्तांचे हेच ते श्रध्दा स्थान ! प्रदक्षिणा संपून सूर्यनाराणाचे तीर्थ, प्रसाद, अंगारा घ्यावा.

**घटकाभर मंडपात स्थिर व्हावे.**
**देहभान विसरून जाते. वृत्ती स्थिरावते. ।।**
**विकार नव्हते, विचार नव्हते,**
**नव्हती वृत्ती कुठल्याही ठायी ।।**

अशी स्थिती होते. मंदिरातून बाहेर पडताना आपल्याला भव्य मंदिर परिसर, भक्त निवास, मंगल कार्यालय. पुढे देवीचे मंदिर, दत्त मंदिर, परिसर. अशीच एक वाट पुढे जाते तेथे हनुान मंदिर, जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत.चिंचोली ग्रामी आले की दिसतात ती छोटी छोटी पण सुबक अशी ग्रामस्थांची घरे, पुजाऱ्यांचे घर ही याच परिसरात आहे. असे हे छोटे पण सुबक नारायण चिंचोली. श्रीक्षेत्रांचे मनोहर दर्शन!

नारायण चिंचोलीचे ऐतिहासिक महत्त्व पंढरपूर ही अध्यात्मिक नगरी आहे. महाराष्ट्रातील एक सांस्कृतिक व समस्त वारकरी सांप्रदायाचे आध्यात्मिक व्यासपीठ म्हणून पंढरीचा उल्लेख केला जातो.

महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाचे तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूर हे शतकानुशतके गाजत आलेले आहे. भागयत धर्माची पताका खांद्यावर घेवून त्याचा प्रचार करणारा वारकरी श्री संत ज्ञानेशर, संत तुकाराम यांच्या अमोघ वाणीम धून प्रकटलेले ज्ञानामृत यातून होत असलेला भागवत धर्माचा प्रसार यामुळे पंढरी आणि पंढरीचा पांडुरंगांना महाराष्ट्रातच नव्हे तर देशात देखील जिव्हाळ्याचे व श्रध्देचे स्थान प्राप्म झाले आहे.

इसवी सन १३ व्या शतकापासून पंढरपूरच्या श्री विठ्ठल मंदिराविषयी तसेच स्कंद व इतर पुराणांच्या आधारे श्री विठ्ठलाची माहिती शिलालेखातून मिळते. रामचंद्र देव यादवांच्या काळात लोकवर्गणीतून या मंदिराची उभारणी झाली होती हे लक्ष चौऱ्याऐंशी च्या लेखातून समजते, मात्र त्यावेळी दुर्दैवाने यादवांचा पाडाव झाला या महाराष्ट्रात यवनी सत्तेचा अंल सुरु झाला.

मंदिरे, दैवते, पाडली गेली. भ्रष्ट झाली. पंढरपूर ज्यावेळी भागवत धर्माचे केंद्र म्हणून भरभराटीस आले होते त्याकाळात म्हणजे चालुक्य आणि यादव काळात पंढरपूरच्या परिसराचे (ग्रामदेवता) याचे महत्त्व वाढले होते. त्यामध्ये चिंचोली, तारापूर, पखालपूर, कोर्टी येथील मंदिरे व तेथील ग्रामदैवतं जरी भ्रष्ट झाली तरी केवळ एकदाच हल्ला झाला असल्यामुळे त्याचे मूळ स्वरूप, वैभव शिल्पाकृती या विषयी माहितीचे ते साक्षीदार आहेत. यातील बहुतेक ग्राम दैवते जीर्ण व भग्न अवस्थेत असले तरी येथील शिल्पकला, रेखीवकाम मूर्ती हे अतिशय उल्लेखनीय आहे. याच इतिहासाची साक्ष देणारे पंढरपूर तालुक्यातील पंढरपूर- मोहोळ रोडवरील पंढरपूर पासून सुरे ११ कि. मी. अंतरावर असणारे नारायण देवाचे ग्राम दैवत असलेले नारायण चिंचोली हे गांव...

नारायण चिंचोली हे छोटे खेडे गांव, गांव तस छोटं पण अध्यात्माची अपार महती सांगणारं हे पंढरीच्यां सीमेवरील गांव आहे. हे गाव ईशर वठार या नावाने देखील ओळखले जाते.

गावाच्या पूर्वेस एक मोठे मंदिर आहे याच मंदिराचा उल्लेख सूर्यनारायण मंदिर असा करतात. पूर्वाभिमुख असलेले हे प्राचीन मंदिर गावाबाहेर आहे. पंढरीचा पांडुरंग जसा सर्वश्रुत आहे तशी त्यांची महती सांगणारे देवालये देखील या पंक्रोशीत आहेत त्यातील हे मंदिर म्हणजे सूर्यनारायण मंदिर आहे.

मंदिराची माहिती मंदिर म्हणजे मानव व ईशराला जोडणारा दुया होय. मानवाला कृतार्थ करण्यासाठी देवाने (ईशराने) पृथ्ववर निवास करण्यासाठी निवडलेले पवित्र स्थळ. मंदिराची माहिती ही दंतकथा नुसार ऐकविली जाते. कारण यास काही ठिकाणी शास्त्रीय आधार देणारे पुरावे साधारणपणे ११ व्या शतकापासून यांची माहिती उपलब्ध होते. यानुसार म्हणजे चालुक्य आणि यादव यांच्या काळात पंढरीच्या अगदी नजीक असणारे ग्रामदैवत होते याशिवाय पुराण शाखात देखील याचे महत्त्व सांगितले जाते.

पुरातत्व खात्याच्या सर्वेक्षणानुसार हे मंदिर प्राचीन हे माडपंथी आहे. मंदिरात गर्भगृह, सभामंडप, दगडी खांब आहेत. मंदिराचा आकार आदी चौकोनी पूर्वाभिमुख असा आहे. मंदिरात प्रवेश केल्यावर दगडी सभामंडप हा अंतराळ असा सभामंडप आहे. यात मोठे मोठे दगडी खांब आहेत खांबावर सुंदर असे नक्षीकाम कोरीव आहे. या दगडी स्तंभावर संपूर्ण सभामंडप आधारलेला दिसून येतो. यावरील दगड हे दगडावर दगड असे ठेवलेली आहेत यातूनच या मंदिराच्या संपूर्ण सभा मंडपाची रचना केली आहे.

आधुनिक पध्दतीचा या ठिकाणी कोठेही सिमेंट अथवा चुना यांचा वापर केला नसल्याची दिसून येते. यातच शिल्पकलेचा उत्कृष्ठ नमूना पाहवयास मिळतो. अनेक संशोधकांनी पंढरीच्या पांडुरंगाचा उल्लेख अनेक लेखांनमधुन केला आहे तसाच श्रीक्षेत्र नारायण चिंचोली या देवस्थानचा उल्लेख केला गेला आहे. असे करताना म्हटले आहे की, पुंडलिकाने श्री विठ्ठलाच्या बाबतीत म्हणताना संत कवी श्रीधर म्हणतात..

**पुंडलिकापुढे सर्वेशर।**
**उभा करी ठेवूनी कर ।**
**रुक्मिणीस समजावया आला।**
**तो पंढरीतच राहिला ।।**

आणि त्यानंतर तो पंढरीस्थित झाला पण भक्ताच्या काळजीसाठी त्याला सतत भटकावे लागले. मग नामदेवासाठी राजस्थान, नाथांसाठी पैठण, दामाजीसाठी महार होऊन मंगळवेढ्याला असो किंवा सावतामाळीसाठी अरण भेंडला असो तो पंढरीचा राजा प्रवास करीत राहिला हा यवनांच्या आक्रमणा मध्ये म्हणजेआदिलशहाच्या सेनापती अफजलखानने पंढरपूरवर आक्रमण केले अशी दंतकथा सांगितली जाते.

वरील संदर्भ लक्षात घेता ज्यावेळी तुळजापूर, पंढरपूरपासून हिंदूची तीर्थक्षेत्र नेस्तनाबूत करत अफजलखान पंढरपूरकडे येताना पंढरपूरच्या पंचक्रोशीत असणाऱ्या हेडपंती मंदिराची त्याच्या कडून मोड तोड झाली होती.

तेव्हा हा नारायण मार्गशीर्ष महिन्यातच महिनाभर विष्णूपदावर जाऊन भक्तांसह सहभोजनाचा आस्वाद घेणारा देव भक्तच्या घरी महाजन बडव्यांच्या घरी नित्य ताक-पिठ खायला जाणारा देव, अशा पांडुरंगाची वेगवेगळी रूपे आपल्याला पहावयास मिळतात. सद्यस्थित नारायण चिंचोली येथे सूर्यनारायण मंदिर उभे असलेले दिसते. सूर्य नारायण मंदिर रचना व स्वरूप समाजाचे अधिष्ठान, विशास-निष्ठा श्रध्देचे प्रतीक म्हणजे मंदिर. धर्माचे मूर्त स्वरुप म्हणजे मंदिर. या सूर्यनारायण मंदिराच्या सभामंडपातून थोडे पुढे गेल्यावर गर्भगृह लागते हे गर्भगृह देखील दगडी व पुरातन आहे. यांच्या भिंती दगडी आहेत. गर्भगृहात वेदिका स्थित असून या वेदिकेवरती नारायणाची मुख्य मूर्ती मोठ्या दिमाखात उभी आहे. त्यालाच श्रध्दाळू सूर्यनारायण असे म्हणतात मूर्तीच्या वरील भागात दगडी घुटाकार भाग नक्षीदारपणे दिसतो त्याला शिखर असे म्हणतात.

मंदिर बाह्यपरिसर मंदिर बाह्य परिसर हा शांत व निसर्गरम्य अशा प्रकारचा आहे. या परिसरात मंदिरा बाहेर काही मूर्ती विखरुन पडल्या आहेत. त्यात गजलक्ष्मी, मनुष्यकृती नागयुगल आहेत. बाहेरील बाजूस आणखी दोन मंदिरे आहेत. जवळच ११ व्या शतकातील दोन ओळीचा शिलालेख आहे. आजूबाजूस ३ ते ४ शिवलिंग देखील आहेत. शिवाय एक मोठा नंदी ही दिसतो यावरुन येथे प्राचीन शिवमंदिर आसावे असा कयास बांधला जातो.

**सूर्यनारायण :** नारायण मूर्तीचे वर्णन नाही पाहिले नाही देखिले, सृष्टीवरचे रूप तुझे डोळा पाहिले. नारायण चिंचोली येथील मूर्ती वर्णन व सकल संत मंडळीनी केलेले वर्णन व पंढरपूर जवळ असलेले चिंचोली हे गाव सर्वांनी अवलोकन करता मतीच्या हातात संतांनी वर्णन केलेली सर्व आयुधे आहेत. शिवाय सर्वात महत्वाचे म्हाण् बाजूस असलेल्या दोन उभ्या स्त्री मूर्ती आहेत त्याम्हणजे लक्ष्मी आणि पद्मावती मात्र प्रत्यक्ष ही मूर्ती विलोभनीय व पाहताच आणि डोळ्यात भरणारी आहे.

पुढे गाभाऱ्यात गेल्यावर स्वयंभू असे सुरे तीन ते साडेतीन फूट उंचीच्या महादेवाच्या पिंडीच्या आकाराच्या सिंहासनावर स्वयंभू उभी आहे. साडे सहा फूट उंच सुंदर अशी भगवान सूर्यनारायणाची अत्यंत विलोभनीय व डोळ्यात न मावणारी तसेच जीवनाचे सार्थक करणारी श्रीची मूर्ती उभी आहे. सूर्यनारायणाच्या उजव्या बाजूस लक्ष्मी तर डाव्या बाजूला पद्मावती आहे. त्यामुळे त्यासी लक्ष्मीनारायण म्हणतात तर उजव्या



हाताजवळ शेषाचे प्रतीक आहे त्यामुळे शेषनारायण ही म्हणतात. श्रीच्या हातात शंख, चक्र, गदा आहे म्हणून त्यास व्यास नारायण म्हणतात. श्रीच्या प्रभावळीवर दशावतार कोरले आहेत. म्हणून त्यास व्यासनारायण म्हणतात. सूर्यनारायणच्या मूर्तीवर पायापासून ते डोक्यापर्यंत सूर्यकिरणे पडतात म्हणून त्यास सूर्य नारायण म्हणतात अशी भाविकांची श्रध्दा आहे. हे सर्व मूर्ती वर्णन प्रत्यक्ष मूर्तीवर असलेल्या खुणा मधून केले असल्याचे आढळते.

मूर्ती हि चित्ताकर्षक असल्याने आणखी बारकाईने निरीक्षण केल्यास आपणास मूर्तीच्या मस्तकावर कलाकुसरयुक्त मुकुट, गळ्यात कौस्तुभ मणी व हातामध्ये गदा, शंख, चक्र आहे, कमरेस करदोडा आहे, मकराकार कुंडल गळ्यात कौस्तुभ मणी आहे. पायात वाळे आहेत. हि वर्णने श्रीपांडुरंगाचे देखील आहेत. त्यामुळे ते पाहण्याची अनुभूती श्रीकृष्णाच्या मूर्तीचे लावण्य पाहताना येते. व्यंकटेश स्तोत्रात जे व्यंकटेशाचे वर्णन केले आहे ते सर्व आपणास या मूर्तीत दिसते. त्यामुळे काही भक्त ही देवमूर्ती पाहताना व्यंकटरमण म्हणजे बालाजी देखील म्हणतात. पौष महिन्यातील सूर्यनारायणाचे महत्व वैदिक काळापासून भगवना सूर्यनारायणाच्या उपासनेचा उल्लेख असल्याचा आपल्याला आढळतो, वैदिक युगापासून ते आत्तापर्यंत सूर्यनारायणाला जीवनस्वास्था तसेच शक्ती देवता असे म्हणाले गेले आहे.

छान्दोग्य उपनिषतामध्ये सूर्याला ब्रह्म माणाव गाने आहे. पुराणामध्ये सूर्यनारायणाच्या आराधनेच्या अनेक कथा प्रसिध्द आहेत. ज्यामध्ये या देवाचे स्थान व माहात्य वर्णन केले गेले आहे. सूर्यनारायणाच्या संबंधी नुसत्या कथा जरी ऐकल्या तरी पाप किंवा दुर्गतिपासून मुक्ती मिळते. तैत्तिरीय आरण्यक सूर्यपुराणामध्ये उगवत्या सूर्याची उपासना फल देणारी सांगीतली गेली आहे. सूर्य नारायण जगाला प्रकाश, ज्ञान, उर्जा, उष्णता तसेच जीवनशक्ती प्रदान करणारा आहे. तसेच रोग, कीटाणू, भूत, प्रेत आदि गोष्टींचा नाष करणारहणले जाते. केवळ बेदांधेच नाही- तर अधुनिक विज्ञानाचे निष्कर्ष देखील हेच सांगतात. सूर्यनारायणाची उपासना त्वरीत फल देणारी आहे. म्हणूनच या कलियुगामध्ये सत्यनारायण व्रताचे महत्त्व सांगितले आहे. पुराणांध्ये भगवान रामाचे पूर्वज सूर्यवंशी महाराज यांना सूर्यउपसनुेळे दिर्घायु प्राप्त झाली आहे. तसेच श्रीकृष्णाचा मुलगा सांब याला सूर्यउपासनुेळे कुष्टरोगातून मुक्ती मिळल्याचे सांगीतले जाते.

नथाग्रहांध्ये सर्वप्रथम ग्रह सूर्य हा आहे. जो पितृस्थानी कर्माचा स्वामी मानला गेला आहे. ज्यांना संतान प्राप्ती होत नाही त्यासाठी सूर्यनारायणाच्या उपासनेचा फार लाभ होतो. **ॐ सूर्याय नम:।** या मंत्राच्या जपामुळे व्यक्ती यशस्वी होते हा मंत्र अका रविवार केला पाहीजे. सूर्य उपासनुेळे नेत्ररोगदेखील दूर होतात. त्याचबरोबर सूर्यनमस्काराने आरोग्य प्राप्ती होते. मनाच्या शांतीसाठी सूर्यनारायणाची उपासना करावी. एखाद्या व्यक्तिला एखाद्या रोगाचे औषध चालू असेल तर त्यावेळी हा मंत्र पाठ करावा त्यामुळे त्या रोगाचा समुळ नाश होईल. अशा विशरुप नारायणाचे पवित्र असे श्री क्षेत्र नारायण चिंचोली हे ठिकाण आपल्या पंढरपूर तालुक्यात असल्याने भाविक भक्तांनी तेथे जावून दर्शन घेवून आपले मनोइच्छित फल सूर्यनारायणाच्या कृपेने पूर्ण करुन घ्यावे व पावन व्हावे.

पंढरपूर तालुक्यात एकाहून अधिक चिंचोली नावाची गावे असल्या कारणाने एकाहून भिन्न असे दर्शविण्यासाठी प्रस्तुतचे चिंचोली हे गांव नारायण चिंचोली म्हणून ओळखले जाते. या सर्व वरील गोष्टी लक्षात घेता नारायण, विठ्ठल ही फक्त नांवे आहेत रूप एकच आहे. भक्तांनी देवावर भक्ती करणे महत्त्वाचे आहे, त्यात नावाचा कोणताही उल्लेख येवो. सगुणरुपी परब्रह्म एकच ठिकाणी असून तो प्रत्येकाच्या हृदयात स्थित आहे या गोष्टीचे चिंतन करुन सकल संताप्रमाणे तो मनोन पूजावा हे महत्वाचे आहे. माझे हे अनुान व निष्कर्ष अखेरचे नाहीत त्यात अवलोकनास व ठाम निर्कषास वाव आहे. शेवटी पंढरीच्या परिसरात एवढ्या सुंदर नारायणदेवाच्या मुर्तीचा आढळ असणे ही सुदैवी बाब आहे.

या मध्ययुगीन भागवत धर्माच्या संदर्भात पंढरपूर तालुक्यातील सूर्य नारायण मंदिर हे भाविक भक्तांसाठी भाग्यदायी गोष्ट आहे.

श्री नारायणाची आयुधे व अलंकार शंख, चक्र, गदा, पद्म, धनुष्य, श्रीवत्स, कौस्तुभ, वैजयंती, किरीट, आणि कुंडल ही नारायणाची आयुधे व अलंकार होत.

**शंख:** पंचमहाभूतात्मक शब्द ब्रह्माचे प्रतीक नाव- पांचजन्य चक्र : मनाचे प्रतीक. नाव- सुदर्शन गदा : आदिविद्या नाव- कौदकी पद्म: सृष्टीचे प्रतीक श्रीवत्सः (कौस्तुभ युक्त) तेजाचे प्रतीक वैजयंती : आद्या- अजया- शक्ती किरीट: कूटस्थ तत्व कुंडले : क्षर आणि अ- क्षर तत्वाची प्रतीके. नारायण चिंचोली येथील पौष महिन्यात होणारे दैनिक कार्यक्रम पंढरपूर पासून ११ कि.मी अंतरावरच असणारे नारायण चिंचोली मंदिर पहाटेचे पाच वाजता काकडा आरती सुरुवात होते मंदिराच्या सभोतालची वृक्षलता, सुगंधित वायू, दिव्य तारका, हासरी उषा, सर्वांनाच ध्यास असतो तो जगत् नारायण श्री सूर्यनारायण निद्रेतून जागृत केव्हा होतील. त्यांच्या चरणांचे विलोभनीय दर्शन केव्हा घडेल? याच ठिकाणी मंदिरात भक्तगण जम तात आणि भूपाळ्या गाऊ लागतात. त्यानंतर भगवान सूर्यनारायणास यथासांग व मंत्रोपचारे महापूजा केली जाते. याच बरोबर पौष महिन्यातील तिसऱ्या रविवारी श्री सूर्यनारायण देवाचा पालखी सोहळा आयोजित केलेला असतो. या पालखी सोहळ्यासाठी दुरहून भाविक श्री सूर्यनारायणाच्या दर्शनास अवर्जुन उपस्थित असतात. ही पालखी गाव प्रदक्षिणा करीत पुन्हा मंदिरामध्ये श्रीच्या दर्शनासाठी ठेवली जाते. पौष महिन्याच्या शेवटच्या रविवारी भंडाऱ्याचे (प्रसादाचे) आयोजन केलेले असते.

कै. वासुदेव शंकरराव अवताडे (पूर्व सेवाधारी) कै. श्री. वासुदेव शंकर अवताडे हे मुर्धनारायण मंदिर नारायण चिंचोलीचे पुजारी होते. त्यांना लोक आदराने मामा असे म्हणत हे अतिषय उदार निस्वार्थी व पुरोपक्रमी होते. देवाचा यांचेवर खरोखरच वरद हस्तच होता. रोजच्या जीवनात ऐणाच्या समस्या से विस्वार्थीपणे सोडवत असत ग्रामस्थ तसेच पंचक्रोशीत देखील त्यांची कीर्ती अपार होती त्यामुळे कौटुंचिक गोष्टीपासून ते इतर समस्या लोक त्यांना हक्काने सांगून त्यापासून ते सुटका करून घेत. वयाच्या १०व्या वर्षापासून त्यांना गुर्यनारायणाच्या भक्तीचा छंद रखागला होता. त्यांचे संपूर्ण आयुष्य सूर्यनारायण देवाच्या सेवेत गेले, त्यांनी भगवान सूर्यनारायणाचे नित्योपचार सुरु केले ते आजही अती भावाने सुरु आहे. आजही त्यांची उणीव फार भामत असते. मात्र, हा देह माशवंत आहे. के. वासुदेवराव यांना वयाच्या ८७ व्या वर्षी म्हणजे १० डिसेंबर २००९ रोजी देवाज्ञा झाली त्यांच्या नावाचा उल्लेख केला नसला तर एक अनामिक हुर हर मला लागून राहीली असती म्हणून आजही मामा हे नाव उच्चारलेकी सूर्यनारायण नंतर ज्यांचा चेहरा समोर येतो ते म्हणजे अवताडे मामा.. गणेश काका (सुर्यनारायणाचे सेवाधारी) सूर्यनारायण देवाचे मुख्य पुजारी हे सेवाधारी हे गणेश वा. अवताडे हे आहेत. वडिलांनी सांगितलेल्या पावलावर पाऊल ठेवून त्यांची वाटचाल सुरु आहे. कोणत्याही फळाची अपेक्षा न करता फक्त सेवेचा वारसा हे चालवित आहेत. कोणाजवळ झोळी पसरु नको काही मागू नको, देणारा तो आहे, ज्याने जन्म घातला त्याची सेवा कर, असे वडिलांचे व्रत घेऊन त्यांनी आपली नारायणदेवाची सेवा अखंडपणे चालू ठेविली आहे. या सेवेतून मिळणारा आनंद स्वर्गिय सुखापेक्षा देखील परमोच्च आहे. अतिशय भक्तीपूर्ण व सुसंस्कारी असलेल्या या नारायण चिंचोली या ग्रामी नारायणाची पुजा अर्चा करण्याचे भाग्य लाभल्यामुले ते सुदैवी आहेत. गणेश काका यांचेवर सूर्यनारायण देवाचा वरद हस्त असून ते केवळ याच गावात प्रसिध्द नसून महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आदि राज्यात त्यांच्या ज्योतिषाची किर्ती पसरली आहे. त्यांनी आपल्या बऱ्याच लोकांना ज्योतिषाच्या माध्यमातून मार्गदर्शन केलेले आहे. भगवान सूर्यनारायण देवाचा आशीर्वाद भाविकांच्या पाठीशी राहो अशी ते प्रार्थना करीत असतात. त्यांची मुले श्री व प्रसाद ही त्यांना धार्मिक कार्यात सहकार्य करत असतात.





# अकलूजच्या बदलत्या चेहऱ्यावर विकासाची नवी मोहोर!

## ५३९ कोटींच्या विकासकामांतून पायाभूत सुविधांना बळ



या विकासपर्वाच्या केंद्रस्थानी अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांची सक्रिय भूमिका ठळकपणे जाणवते. नगराध्यक्ष रेशमाताई अडगळे यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषदेच्या माध्यमातून शहराच्या मूलभूत सुविधांना बळकटी देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्याला मिळालेली मोठी आर्थिक ताकद आणि विविध विकासकामांना मिळालेली मंजुरी यामुळे अकलूजच्या भविष्यातील विकासाचा आराखडा आता प्रत्यक्ष आकार घेत आहे.

या संपूर्ण विकासप्रक्रियेला माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील, माजी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील आणि खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाची भक्कम साथ लाभली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मंजूर झालेली विविध विकासकामे सध्या प्रगतीपथावर असून, काही कामांनी पूर्णत्वाचा टप्पाही गाठला आहे.

शहराच्या विकासासाठी विविध विभागांतून मंजूर झालेला एकूण ५३९ कोटी रुपयांचा निधी ही या बदलाची व्यापकता अधोरेखित करणारी बाब आहे. भूमिगत गटार योजना, रस्ते, पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकामे, चौकांचे सुशोभीकरण, पालखी व्यवस्था आणि नागरिकांसाठी उद्यान यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये हा निधी वापरला जात आहे.

शहराच्या आरोग्याशी आणि स्वच्छतेशी थेट निगडित असलेल्या भूमिगत गटार योजनेला १२१ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. १३० किलोमीटरच्या मंजूर कामांपैकी ७० किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. पाच हजार मेन चेंबरपैकी ३३००, तर सात हजार साईड चेंबरपैकी ३६०० चेंबरचे काम पूर्ण झाले आहे.

अकलूज-देवी मंदिराजवळ ४.५० लाख एमएलडी क्षमतेचे मलजल शुद्धीकरण केंद्र उभारण्याचे काम सुरू होणार आहे. भविष्यातील गरज लक्षात घेऊन १२ लाख एमएलडी क्षमतेची आवश्यकता पूर्ण करण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. शहराच्या वाढत्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर ही व्यवस्था अकलूजच्या नागरी विकासातील अत्यंत महत्त्वाची पायाभरणी ठरणार आहे.

सागर खरात
भ्र.९७३०७८९८८८



*काळाच्या ओघात विस्तारत गेलेले, आपल्या वेगळ्या सामाजिक-सांस्कृतिक अस्तित्वाची जपणूक करणारे आणि विकासाच्या नव्या वाटा शोधणारे अकलूज शहर. वाढती लोकसंख्या, बदलत्या गरजा आणि आधुनिक नागरी जीवनशैली यामुळे शहरासमोर उभ्या राहणाऱ्या आव्हानांचे स्वरूपही बदलत आहे. अशा वेळी शहराचा विकास म्हणजे केवळ एखादा रस्ता किंवा एखादी इमारत उभारणे नव्हे; तर पुढील अनेक वर्षांचा विचार करून सक्षम पायाभूत सुविधांची उभारणी करणे होय. याच दूरदृष्टीतून अकलूजमध्ये सध्या विकासाचे एक व्यापक पर्व आकार घेताना दिसत आहे.*






शहरातील रस्ते आणि गटारींच्या विकासासाठी १२० कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे. १८ किलोमीटर रस्ते आणि ३६ किलोमीटर गटारींच्या कामांना मंजुरी मिळाली असून, त्यातील रस्त्यांचे आणि गटारींचे काम सध्या सुरू आहे. शहराच्या दैनंदिन जीवनाशी थेट जोडलेल्या या सुविधा सक्षम झाल्या की नागरी जीवनाची गुणवत्ता आपोआप उंचावते. त्यामुळे ही कामे अकलूजच्या भविष्यातील शहरी व्यवस्थेची महत्त्वाची पायाभरणी मानावी लागेल.

अकलूजच्या विकासाच्या केंद्रस्थानी आणखी एक महत्त्वाचा विषय आहे-पाणी. शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी तब्बल २१२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. १५० किलोमीटरच्या पाणीपुरवठा लाईनपैकी ९० किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे.

७७ मैल ते विझोरी तलावापासून ९ किलोमीटर स्वतंत्र पाइपलाइन, जॅकवेल आणि सोलार सिस्टीमची उभारणी करण्यात आली आहे. जुन्या २३० एमएलडी क्षमतेच्या बॅलन्सिंग टँकची क्षमता वाढवून ती ६८० एमएलडी करण्याचे नियोजन आहे. पूर्ण क्षमतेने ही व्यवस्था उभी राहिल्यानंतर अकलूजच्या पाणीपुरवठ्याला अधिक स्थैर्य मिळण्याची अपेक्षा आहे.

शिवशक्तीनगर, पंचवटी, विद्यानगर, गुळवे नगर आणि राऊत नगर या भागांमध्ये नवीन पाण्याच्या टाक्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. शिवशक्तीनगर आणि पंचवटी येथील कामे पूर्ण झाली आहेत, तर विद्यानगर आणि राऊत नगर येथील कामे सुरू आहेत. गुळवे नगर मधील कामालाही सुरुवात होणार आहे. जुन्या फिल्टर हाऊसची क्षमता वाढवून नवीन १२ एमएलडी क्षमतेचे फिल्टर हाऊस उभारण्यात आले आहे.

माळेवाडीतील शिवाजीनगर, पटेल कॉलनी आणि शांतिनगर परिसरातील कुटुंबे अनेक वर्षांपासून बोअरवेलच्या पाण्यावर अवलंबून होती. आता या भागाला नियमित पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थेत आणण्याचे काम सुरू आहे. आठ ते दहा दिवसांत पाणीपुरवठा सुरू करण्याच्या दिशेने काम सुरू असून, माळेवाडीतील उर्वरित भागातही पुढील काळात पाणी पोहोचविण्याचे नियोजन आहे.

शहराचा विकास झाला असे म्हणायचे असेल, तर रस्ते केवळ गुळगुळीत असणे पुरेसे नाही. रस्त्यांच्या कडेला पादचारी मार्ग, प्रकाशव्यवस्था, बसण्यासाठी बाकडे, झाडे, डिव्हायडर आणि पावसाच्या पाण्याचा निचरा यांसारख्या सुविधाही तितक्याच महत्त्वाच्या ठरतात.

याच विचारातून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सीआरएफ निधीतून १७ कोटी रुपयांची कामे मंजूर आहेत. बायपास रोड ते जयसिंह चौक तसेच महर्षी चौक ते प्रतापसिंह चौक या मार्गावर अंडरग्राउंड स्टॉर्म वॉटर, युटिलिटी, वायडनिंग, फटपाथ, लाईट, बसण्यासाठी बाकडे, डिव्हायडर आणि त्यामध्ये झाडे अशी कामे प्रस्तावित आहेत.

शहरातील चौक हे केवळ वाहतुकीचे केंद्र नसतात; ते शहराच्या ओळखीचेही भाग असतात. म्हणूनच महर्षी चौक, जयसिंह चौक आणि प्रतापसिंह चौकाच्या सुशोभीकरणासाठी २.५० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. महर्षी चौकात डेकोरेटिव्ह पोल उभारण्यासाठी ७० लाख रुपयांची तरतूद आहे.

विकास म्हणजे केवळ रस्ते, गटारी आणि पाणीपुरवठा नव्हे. शहराला मोकळा श्वास घेण्यासाठी हिरवाई, नागरिकांना चालण्यासाठी जागा, ज्येष्ठांना निवांत बसण्यासाठी परिसर आणि मुलांना खेळण्यासाठी सुरक्षित जागाही आवश्यक असते.

याच जाणिवेतून विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल परिसरात 'नमो उद्यान' उभारण्यासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. नागरिकांसाठी बैठक व्यवस्था, वॉकिंग ट्रॅक, ज्येष्ठ नागरिकांसाठी वाचनालय, लहान मुलांसाठी खेळणी, योगा हॉल, ओपन जिम, झाडे-लॉन आणि डेकोरेटिव्ह लाईट अशा सुविधा या उद्यानात अपेक्षित आहेत.

एखाद्या शहराचा विकास हा एका दिवसात घडत नाही. तो अनेक वर्षांच्या नियोजनातून, सातत्यपूर्ण प्रयत्नांतून आणि उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून घडतो. अकलूजमध्ये सध्या सुरू असलेल्या विकासकामांकडे पाहिले तर त्याची व्याप्ती केवळ एका क्षेत्रापुरती मर्यादित नसून शहराच्या सर्वांगीण रूपांतरणाचा प्रयत्न असल्याचे चित्र दिसते.

उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांना केंद्रस्थानी ठेवून, नगराध्यक्ष रेशमाताई अडगळे यांच्या नेतृत्वाखाली आणि विजयसिंह मोहिते पाटील, जयसिंह मोहिते पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील तसेच खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनातून मंजूर झालेली ही विकासकामे अकलूजच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन आकार घेत आहेत.

आज काही कामे पूर्ण झाली आहेत, काही अंतिम टप्प्यात आहेत, तर काहींची कामे वेगाने सुरू आहेत. उद्याचे अकलूज अधिक स्वच्छ, सुबक, सक्षम आणि सुविधायुक्त करण्याच्या दिशेने ही वाटचाल आहे.

५३९ कोटींच्या विकासनिधीची ही केवळ आकडेवारी नाही; तर अकलूजच्या बदलत्या चेहऱ्याची आणि उजळणाऱ्या भविष्यातील शक्यतांची नांदी आहे. या विकासकामांना सातत्य, गुणवत्ता आणि नियोजनाची साथ मिळत राहिली, तर येणाऱ्या काळात अकलूजची ओळख केवळ विकसित शहर म्हणून नव्हे, तर नियोजनबद्ध आणि आधुनिक नागरी व्यवस्थेचे उदाहरण म्हणूनही अधोरेखित होऊ शकते.







सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

NAGESH KARJAGI KIDS SCHOOL BALE

संस्कार, ज्ञान आणि उज्वल भविष्याची वाटचाल...

एन. के. किड्स प्री-प्रायमरी स्कूल
राजेश्वरी नगर, बाळे



अध्यक्ष
विकास कस्तुरे
मो.9767142523



बाळे परिसरातील संस्कार व ज्ञान देणारी एकमेव शिक्षण संस्था

आमची वैशिष्ट्ये
- अनुभवी व प्रेमळ शिक्षकवृंद
- खेळातून आनंददायी शिक्षण
- संस्कारक्षम वातावरण
- सुरक्षित व स्वच्छ परिसर
- विविध सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम
- प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष



आजचे संस्कार... उद्याचे उज्ज्वल भविष्य!

एन.के.किड्स प्री-प्रायमरी स्कूल, राजेश्वरी नगर, बाळे
ज्ञान संस्कार गुणवत्ता

ए.जी.पाटील इन्स्टिट्युटस् तर्फे वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

SHANTI EDUCATION SOCIETY'S
A.G.PATIL POLYTECHNIC INSTITUTE
("NBA" ACCREDITED PROGRAMS)

Courses Offered In Diploma Engineering
- Mechanical Engineering (60)
- Computer Engineering (60)
- Electrical Engineering (60)
- E & TC Engineering (60)
- Civil Engineering (60)

डिप्लोमा प्रवेशाकरिता संपर्क
8888813097
8888878725

SHANTI EDUCATION SOCIETY'S
A.G.PATIL INSTITUTE OF TECHNOLOGY
(An Autonomous Institute)

Courses Offered In Degree Engineering (B.Tech)
- Mechanical Engineering (60)
- E & TC Engineering (60)
- Computer Engineering (60)
- Civil Engineering (60)

B.TECH इंजिनिअरींग प्रवेशाकरिता संपर्क
9604199680
9405548125

प्रथम व थेट द्वितीय वर्ष प्रवेश

डिप्लोमा व डिग्री : संस्थास्तर व कॅप राऊंडनंतर शिल्लक जागांवरील प्रवेश
प्रवेशाचे वेळापत्रक व इतर तपशिल करिता खालील संकेतस्थळाला भेट द्यावे.
Diploma : www.agppi.edu.in | Degree : www.agpit.edu.in

Dr.V.V.Potdar Principal | Dr.M.A.Chougule Campus Director | Shri.S.A.Patil President



Near Saiful, Vijapur Road, Solapur - 413008

भारतीय जनता पार्टी क्रीडा प्रकोष्ठ व आरंभ फाऊंडेशन सोलापूर

सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

शुभेच्छुक



मा.यशवंत पाथरुट



सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिन चिरायु होवो..!

मा.अब्दुल्ला अलीसाब चौधरी

- संस्थापक अध्यक्ष, अनाबिया एज्युकेशन ट्रस्ट
- नेटबॉल, राष्ट्रीय खेळाडू व राष्ट्रीय पंच
- बास्केटबॉल, राष्ट्रीय खेळाडू व राष्ट्रीय पंच
- संचालक, सोलापूर जिल्हा नेटबॉल असोसिएशन
- युवा क्रीडा शिक्षा पुरस्कार, कन्या फाऊंडेशनचा २०१६-१७ वर्षीचा
- आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार, ड्रीम फाऊंडेशन व श्री समर्थ करिअर अकादमीचा २०२५-२६

तरुण भारत वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा

देशपातळीवरील "सर्वोत्कृष्ट साखर कारखाना" म्हणून गौरविलेला व महाराष्ट्र शासनाचा "वनश्री व सहकार भूषण" पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेला

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि; श्रीपूर





देश व राज्य पातळीवरील पुरस्कार
- भारतातील सर्वोत्कृष्ठ साखर कारखाना पुरस्कार प्राप्त
- भारतीय शुगर यांचेकडून "सर्वोत्कृष्ठ कामगिरी" पुरस्कार प्राप्त.
- नॅशनल फेडरेशन यांचेकडून "तांत्रिक कार्यक्षमता" पुरस्कार प्राप्त.
- महाराष्ट्र शासनाचा "सहकार भूषण" पुरस्कार प्राप्त
- महाराष्ट्र शासनाचा "छत्रपती शिवाजी महाराज वनश्री" पुरस्कार प्राप्त.
- महाराष्ट्र राज्य ऊर्जा महामंडळ यांचेकडून "ऊर्जा संवर्धन पुरस्कार" प्राप्त.
- व्ही.एस.आय. पुणे यांचेकडून "बेस्ट मॅनेजींग डायरेक्टर" पुरस्कार प्राप्त
- व्ही.एस.आय. यांचेकडून "उत्कृष्ठ ऊस विकास पुरस्कार" प्राप्त.
- देश व राज्य पातळीवर विविध संस्थेकडून एकूण ६१ पुरस्कार प्राप्त.

मा.आ.श्री.प्रशांतराव परिचारक, चेअरमन



श्री.कैलास खुळे
व्हा.चेअरमन

डॉ.यशवंत कुलकर्णी
कार्यकारी संचालक

सुपंत पॅकेज्ड साखर | सुपंत जैविक खते | सुपंत ऑक्सिजन



सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!



अध्यक्ष, सचिव व सर्व पदाधिकारी
सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुल
८९ ब, श्रीशैल्य नगर, भवानी पेठ, सोलापूर

शुभेच्छुक

भारतीय मजदूर संघ, सोलापूर

सुधांशू रानडे — महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष
नंदकुमार भोसले — जिल्हाध्यक्ष
वसंत पोतदार — कार्याध्यक्ष
शैलेश मारा — सचिव
शेखर कुंभारे — कोषाध्यक्ष
पांडूरंग कोळी — संघटनमंत्री

तरुण भारत वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा



**Hon.Mr.Vijaysinh Mohite-Patil**
Former Deputy Chief Minister

Shivratna Shikshan Sanstha

**ADMISSION OPEN**

**SHANKARRAO MOHITE - PATIL ENGLISH SCHOOL & JR. COLLEGE, AKLUJ**
(Std.1-12 classes - CBSE & Maharashtra state board syllabus)
Ph. 8568055055 / 9970228399
Email - smpesakluj@gmail.com

**SHIVRATNA SCHOOL, AKLUJ**
1-10 classes (Affiliated to CBSE )
Ph. 9172196213
Email - shivratnaschool79@gmail.com

**SHIVRATNA FREE WINGS SCHOOL, AKLUJ**
A/P - Sujaynagar - Akluj
Ph. 8793411005

**SHIVRATNA MILLENNIUM SCHOOL, AKLUJ**
A/p- Sangramnagar, Tal.Malshiras Dist.Solapur
Ph. 8793411005 I Website : www.smillenium.in

**SHIVRATNA SEMI ENGLISH SCHOOL, AKLUJ**
(Pre-Primary & Std. 1 to 6, S.S.C. Board)
Ph. 9834688334
Email - smpsemienglishakluj@gmail.com

**SHIVRATNA BOYS HOSTEL, AKLUJ**
Ph. (02185) 224952
Email - shivratnashikshansanstha@gmail.com

**VIJAYSINH MOHITE - PATIL COLLEGE OF NURSING & MEDICAL RESEARCH INSTITUTE, AKLUJ**
(M.Sc. Nursing, Basic B.Sc. Nursing, R.G.N.M. & R.A.N.M., - Affiliated to I.N.C. New Delhi, M.N.C. Mumbai & M.U.H.S., Nashik)
Ph. (02185) - 226752 I Email - akluj_nursing@rediffmail.com

**SHIVRATNA INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES, AKLUJ**
(B.B.A. - Affiliated to Solapur University,
M.B.A., M.Com. - YCMOU, Nashik Study Center , Naac Grade : B++ )
Ph. (02185) - 222509 I Email - rmpakluj@gmail.com

**SHIVRATNA GIRL'S HOSTEL, SHANKARNAGAR-AKLUJ**
Ph. 9511644311 I Email - shivratnagirlhostel@gmail.com

**SHIVRATNA SPORTS ACADEMY, AKLUJ**
Ph. 80875 41009

**TARARANI WOMEN'S WRESTLING ACADEMY, AKLUJ**
**SHIVRATNA BOY'S WRESTLING ACADEMY, AKLUJ**
A/p - Shankarnagar, New Old Shivamrut Dairy
Mob.9604136946 I Email - twwa.akluj@gmail.com

**SHIVRATNA BASKETBALL ACADEMY, AKLUJ**
VMP KRIDA SANKUL, Akluj I Mob.9860421444

**SHIVRATNA CRICKET ACADEMY, AKLUJ**
VMP KRIDA SANKUL, Akluj I Mob.9822113382 / 9356139697

Trustee, Teaching, Non-Teaching Staff & Students

# SHIVRATNA SHIKSHAN SANSTHA

SHIVRATNA KNOWLEDGE CITY, SHIVAMRUT ROAD, SHANKARNAGAR-AKLUJ TAL.MALSHIRAS DIST.SOLAPUR (MS)
Phone : (02185) 224952 / 227552 ■ Email - shivratnashikshansanstha@gmail.com ■ Web : www.sssakluj.org

- ADMISSIONS ARE OPEN FOR THE ACADEMIC YEAR 2026-2027
- KINDLY CONTACT TO THE RESPECTIVE BRANCHES IMMEDIATELY & CONFIRM YOUR ADMISSION

SWAMIRAJ ADS@9503773073





# सिंहगडच्या गुणवत्तेवर उद्योगविश्वाची मोहोर

**सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा. एम. एन. नवले यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली आणि सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव सोलापूर कॅम्पसचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या प्रभावी मार्गदर्शनाखाली एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाने गुणवत्तापूर्ण, उद्योगाभिमुख आणि कौशल्याधारित शिक्षणाची परंपरा कायम राखत यंदाच्या प्लेसमेंटमध्ये विक्रमी यश संपादन केले आहे.**

आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवी मिळविणे पुरेसे नसून विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाच्या गरजेनुसार सक्षम, कुशल आणि रोजगारक्षम बनविणे ही काळाची गरज आहे. हीच भूमिका सातत्याने जोपासत सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर यांनी यंदाच्या शैक्षणिक वर्षात प्लेसमेंटच्या क्षेत्रात पुन्हा एकदा उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

## कोअर अन् आयटी क्षेत्रात विद्यार्थ्यांची दमदार भरारी

गुणवत्तापूर्ण शिक्षण, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोनाच्या बळावर महाविद्यालयाने राज्यातील आघाडीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील आपले स्थान अधिक भक्कम केले आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षण, अनुभवी प्राध्यापक, अत्याधुनिक प्रयोगशाळा, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासावर दिला जाणारा भर यामुळे यंदा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देशातील नामांकित राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.



**रामकृष्ण लांबतुरे**
**सोलापूर**

यंदाच्या प्लेसमेंटमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना १८.५५ लाख रुपये वार्षिक सर्वोच्च पॅकेज, तर ४.५० लाख रुपये वार्षिक सरासरी पॅकेज मिळाले आहे. एकूण २४३ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली असून त्यापैकी १७८ विद्यार्थ्यांना ४ लाखांपेक्षा अधिक, ३७ विद्यार्थ्यांना ५ लाखांपेक्षा अधिक, तर २८ विद्यार्थ्यांना ७ लाखांपेक्षा अधिक वार्षिक पॅकेज मिळाले आहे. तसेच १२६ विद्यार्थ्यांनी कोअर इंडस्ट्री तर ११७ विद्यार्थ्यांनी आयटी क्षेत्रात करिअरची वाटचाल सुरू केली आहे. याशिवाय ३१ विद्यार्थ्यांनी उद्योजकता आणि उच्च शिक्षणाचा मार्ग निवडला आहे. विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचा विश्वास आणि संस्थेची गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्था यांचा हा यशस्वी संगम असल्याचे मानले जात आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची कॉग्निझंट, कॅप्जेमिनी, टीसीएस, ॲक्सेंचर, विप्रो, यूएमएस, इन्फोसिस, भारत फोर्ज, अल्ट्राटेक, टाटा ऑटोकॉम्प, व्होडाफोन आयडिया यांसारख्या देश-विदेशातील प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये निवड होत असते. आतापर्यंत कॉग्निझंटमध्ये ९६, कॅप्जेमिनीमध्ये ९१, टीसीएसमध्ये ६८, ॲक्सेंचरमध्ये ६४, विप्रोमध्ये ४६, यूएमएसमध्ये ४६ आणि इन्फोसिसमध्ये ३५ विद्यार्थ्यांची निवड ही संस्थेच्या गुणवत्तेची आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण तयारीची साक्ष देणारी आहे.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी नियमितपणे उद्योगतज्ज्ञांचे मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा, सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण, मॉक इंटरव्ह्यू, ग्रुप डिस्कशन, उद्योगभेटी तसेच इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून ते रोजगार बाजारपेठेतील स्पर्धेत यशस्वी ठरत आहेत.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले म्हणाले, विद्यार्थ्यांना केवळ पदवीधर नव्हे, तर उद्योगविश्वासाठी सक्षम, कुशल आणि रोजगारक्षम व्यावसायिक बनविणे हे आमचे ध्येय आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक सुविधा आणि उद्योगांशी असलेले सशक्त संबंध यामुळे विद्यार्थ्यांना सातत्याने उत्कृष्ट प्लेसमेंटच्या संधी उपलब्ध होत आहेत.

सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले म्हणाले, उद्योगाभिमुख शिक्षण, कौशल्य विकास आणि सातत्यपूर्ण प्रशिक्षण या त्रिसूत्रीवर सिंहगड संस्थेने काम केल्यामुळे विद्यार्थ्यांना देशातील आघाडीच्या कंपन्यांमध्ये करिअर घडविण्याची संधी मिळत आहे. यंदाचा प्लेसमेंट रेकॉर्ड हा संस्थेच्या गुणवत्ता, विश्वासार्हता आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा ठोस पुरावा आहे.

उच्च शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत उद्योगविश्वासाठी सक्षम अभियंते घडविण्याचे कार्य एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय सातत्याने करत आहे. यंदाचा प्लेसमेंट रेकॉर्ड हा संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण परंपरेचा आणि उद्योगविश्वातील वाढत्या विश्वासाचा आणखी एक मानाचा तुरा ठरला आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव सोलापूर कॅम्पस**




# कै.वामनराव शिंदे : सामाजिक परिवर्तनाचे प्रेरणास्त्रोत

**वैशिष्ट्यपूर्ण जीवन जगण्यासाठी त्यामागे उच्चतम ध्येय असणे गरजेचे असते. त्या ध्येयावरूनच व्यक्तीची जीवन पद्धती ठरते. असेच एक वैशिष्ट्यपूर्ण व आगळे वेगळे विचार घेऊन जगलेले व्यक्तिमत्व म्हणजेच आमचे वडील कै. वामनराव बाबाराव शिंदे. यांचा जन्म बणजगोळ, ता.अक्कलकोट येथे झाला. ध्येय उंच असली की झेप देखील उंचच घ्यावी लागते. त्याप्रमाणे त्यांचा जन्म एका छोट्या गावात, शेतकरी कुटुंबात झाला असला तरी त्यांच्या कर्तुत्वाची झेप मात्र खूप पुढे गेली.**

शिक्षण हे सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे जे तुम्ही जग बदलण्यासाठी वापरू शकता. या उक्तीप्रमाणे मुळातच शिक्षणाची आवड असल्याने, स्वतः उच्च शिक्षण घेऊन आरोग्य खात्यामध्ये नोकरीसाठी रुजू झाले. परंतु स्वतःचे क्षेत्र फक्त नोकरी पुरतेच मर्यादित न ठेवता समाजासाठी, ग्रामीण भागातील लोकांच्या प्रगतीसाठी काहीतरी करण्याचे ध्येय मनाशी असल्याने, नोकरीचा त्याग करून सांगोला शहरात मशिनरीचा व्यवसाय सुरू केला. हे सर्व करत असताना त्यांना अनेक छोट्या-मोठ्या संकटांना सामोरे जावे लागले असेल कारण नेहमीचाच चाकोरीबद्ध मार्ग सोडून व्यक्ती जेव्हा वेगळा मार्ग निवडतो तेव्हा त्याच्या वाट्याला संघर्ष हा येतोच. परंतु संघर्षातून अस्तित्व निर्माण झाले की आयुष्य जगण्यात एक वेगळीच रुबाब येतो आणि हा रुबाब विकत घेता येत नाही अन् दाखवता पण येत नाही...तो व्यक्तिमत्त्वातून सिद्ध होतो. व्यवसायाच्या माध्यमातून अनेक लोक जोडले गेले. त्यांच्या मनमिळाऊ स्वभावाने लोकांच्या जवळ जाता आले. त्यांच्या समस्या जाणून घेता आल्या. त्यांच्या चाणाक्ष नजरेतून ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाची समस्या हेरली. ग्रामीण भागात त्याकाळी मुलींना जास्त शिकवले जात नव्हते, अशा स्थितीत मुलींना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा उद्देशाने १७ सप्टेंबर १९८६ साली त्यांनी सांगोला तालुक्यात प्रथम मुलींची शाळा सुरु केली. स्वतःच्या कामावर असलेली अपार निष्ठा आणि स्वतःवर असलेला विश्वास यामुळे ते आपले कार्य ,विचार प्रत्यक्षात आणून ते पुढे नेऊ शकले. फांदीवर बसलेल्या पक्षाला फांदी तुटण्याची भीती नसते कारण त्याला त्या फांदीवर विश्वास नसून आपल्या पंखावर विश्वास असतो त्यांच्या अचानक जाण्याने एक मोठी पोकळी निर्माण झाली. कधीही भरून न येणारी...पण म्हणतात ना व्यक्ती त्याच्या विचार व कार्याने नेहमीच आपल्या सोबत असतो त्यांचे हेच कार्य पुढे




**प्रा तेजस्विनी वरवडे**
**मो.९८५००५२४९५**

नेण्याचे काम आमच्या आईने श्रीमती कौशल्यादेवी वामनराव शिंदे यांनी नक्कीच अतिशय निष्ठेने केले आणि यापुढेही ते सुरूच राहील.

कर्तव्यकठोरता, परोपकार, लोकसेवा या गुणांच्या बळावर साहेबांनी सामान्य माणसाच्या जीवनात बदल घडविला. शिस्त व श्रम संस्कार यांच्या आधारे शिंदे साहेबांनी कार्य केले. शिक्षण व समाज सेवेच्या क्षेत्रात शिंदे साहेबांनी विलक्षण निष्ठेने जे प्रयोग केले त्याचा सकारात्मक परिणाम मानवी जीवनावर दीर्घकाळ जाणवत राहील. या तालुक्यातील बहुजन समाजाला शैक्षणिक प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य साहेबांनी केले. अध्ययन, अध्यापन, संशोधन व प्रकाशन याचे महत्त्व लक्षात घेऊनच साहेबांनी आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. आज या संस्थेत असंख्य विद्यार्थ्यांची शैक्षणिक सोय झाली आहे.

स्वातंत्र्याची आशा बाळगणाऱ्या व आयुष्यात स्वावलंबी जीवन जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या वर्गाला साहेबांचा खूप मोठा आधार निर्माण झाला आहे. मुलींसाठी स्वतंत्र कन्या प्रशाला उभारून स्त्रियांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य त्यांनी केले आहे. गावोगावी जाऊन त्यांनी शेती संबंधित इंजिन स्पेअर पार्ट व मोटारी दर्जेदार देऊन सेवा देण्याचे कार्य त्यांनी केले. कामात ज्यांने राम पाहिला त्याचे जीवन कार्य यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही. प्रामाणिक व भरपूर कष्ट करणे, आरोग्यसंपन्न राहणे, शील संपन्न जीवन जगणे, शिक्षणाविषयीची आस्था बाळगणे, दीर्घद्योगी बनणे या संस्काराच्या बळावर शिंदे साहेबांनी समाज निर्मितीचे स्वप्न पाहिले. संत तुकाराम महाराज म्हणतात फोडिले भांडार, धन्याचा माल, मी तो हमाल भारवाही या उक्तीप्रमाणे वामनराव शिंदे साहेबांनी कार्य केले. मोह त्यागून परोपकार व समाज दातृत्व निर्माण करणारे वामनराव शिंदे साहेब त्यामुळेच आधुनिक समाजसुधारक वाटतात. त्यांच्या एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी ज्यावेळेस समाज संक्रमण अवस्थेतून जात होता त्यावेळेस वामनराव शिंदे साहेब हे दीपस्तंभासारखे वाटतात. बघता-बघता ३३ वर्षे उलटली. आज त्या हा एक आठवणीचा ठेवा आणि कार्याचा आढावा लिहिण्याचा छोटासा प्रयत्न.

संचालिका, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला.

# ज्ञान, शिक्षण आणि संस्कारांची सांगड घालणारे एन. के. किड्स स्कूल

**बाळे येथील राजेश्वरी नगर परिसरात २०१७ मध्ये मुख्याध्यापिका सौ. श्वेता कस्तुरे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या एन. के. किड्स स्कूलने अल्पावधीतच गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे पालकांचा विश्वास संपादन केला आहे. सुरुवातीला केवळ १३ विद्यार्थ्यांपासून सुरू झालेल्या या प्री-प्रायमरी शाळेत आज शेकडो विद्यार्थी आनंदी व खेळकर वातावरणात शिक्षण घेत आहेत.**

शिक्षणाची पायाभरणी जितकी भक्कम, तितका विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्याचा पाया मजबूत होतो. बालवयातच मुलांच्या मनावर शिक्षणासोबत संस्कार, शिस्त, आत्मविश्वास आणि सर्जनशीलतेची मूल्ये रुजविण्याच्या उद्देशाने बाळे येथील राजेश्वरी नगर परिसरात सुरु झालेले एन. के. किड्स स्कूल आज गुणवत्तापूर्ण आणि संस्कारक्षम शिक्षणासाठी आपली स्वतंत्र ओळख निर्माण करीत आहे.



मुख्याध्यापिका सौ. श्वेता कस्तुरे यांच्या संकल्पनेतून २०१७ मध्ये या शाळेची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. अवघ्या १३ विद्यार्थ्यांपासून सुरु झालेल्या या प्री-प्रायमरी शाळेने आपल्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक उपक्रमांच्या जोरावर अल्पावधीतच पालकांचा विश्वास संपादन केला. आज शेकडो विद्यार्थी आनंदी, उत्साही आणि खेळकर वातावरणात शिक्षण घेत असून, बालकांच्या सर्वांगीण विकासाला केंद्रस्थानी ठेवून शाळेची वाटचाल सुरु आहे.

'शिक्षण' म्हणजे केवळ पुस्तकापुरते मर्यादित नाही बालवयातील शिक्षण हे केवळ अक्षरओळख आणि पाठांतरापुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला, कल्पनाशक्तीला आणि सर्जनशीलतेला चालना देणे आवश्यक आहे. हीच भूमिका स्वीकारत एन. के. किड्स स्कूलमध्ये ज्ञान, शिक्षण आणि संस्कार यांचा सुंदर समन्वय साधला जातो.

विद्यार्थ्यांना त्यांच्या वयाला आणि आकलन क्षमतेला अनुरूप पद्धतीने शिक्षण दिले जाते. खेळ, कृती, संवाद आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून मुलांना शिकण्याची गोडी लावली जाते. त्यामुळे वर्गातील शिक्षण अधिक आनंददायी आणि परिणामकारक बनते. शाळेतील उच्चशिक्षित, अनुभवी आणि प्रेमळ शिक्षक विद्यार्थ्यांशी आपुलकीचे नाते निर्माण करून त्यांना शिकवतात. प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची क्षमता, आवड आणि सुप्त गुण वेगवेगळे असतात, हे लक्षात घेऊन त्यांच्याकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते.

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांना स्वतःचे विचार व्यक्त करण्यास प्रोत्साहित करणे आणि त्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे, यावर विशेष भर दिला जातो. त्यामुळे लहान वयातच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची भक्कम पायाभरणी होत आहे. एन. के. किड्स स्कूलचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वर्षभर राबविण्यात येणारे विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक उपक्रम. कलर डे, फळ व फुल दिवस, महापुरुषांच्या जयंती, विविध सांस्कृतिक सण-उत्सव अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची आणि परंपरांची ओळख करून दिली जाते. चित्रकला स्पर्धा, क्रीडा दिन, वार्षिक स्नेहसंमेलन आणि विविध सहलींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपले कलागुण, क्रीडागुण आणि नेतृत्वगुण सादर करण्याची संधी मिळते. अभ्यासाबरोबरच कला, क्रीडा, संस्कृती आणि सामाजिक जाणिवांचा विकास करण्यासाठी या उपक्रमांची महत्त्वाची भूमिका ठरते. बालकांचे आरोग्य ही शाळेची महत्त्वाची जबाबदारी मानून विद्यार्थ्यांसाठी वर्षातून दोन वेळा आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांच्या शारीरिक आरोग्यासोबतच त्यांना खेळण्यासाठी प्रशस्त मैदान आणि विविध क्रीडा साहित्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संपूर्ण शाळा परिसर सीसीटीव्हीच्या देखरेखीखाली ठेवण्यात आला आहे. सुरक्षित, स्वच्छ आणि आनंदी वातावरणात विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे, यासाठी शाळेच्या व्यवस्थापनाकडून विशेष काळजी घेतली जाते.


जनसेवक
लोकनेते
कै. आमदार-बाबासाहेब तानवडे
कै. दत्ता (अण्णा) तानवडे
सोलापूर तरुण भारत वर्धापनदिन चिरायु होवो..!
शिवसेना
मा. प्रविण तानवडे
जिल्हा परिषद सदस्य
मो. : ९४२१०४००३३
सुयश इंडस्ट्रीज
SUYASH INDUSTRIES SINCE 1966
४४, उत्तर कसबा, पांजरपोल चौक
बस स्टॉप जवळ, सोलापूर - ४१३ ००७
suyashindustries1966@gmail.com
मोनोब्लॉक पंपस्, सबमर्सिबल पंपस्, सेल्फ प्राईमिंग पंपस्, ओपनवेल पंपस्,
पीव्हीसी पाईप्स, ड्रिप इरिगेशन, स्प्रिंकलर, केबल वायर, स्टार्टर


सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
• शुभेच्छुक •
महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
मंगळवेढा पोलीस ठाणे,
मंगळवेढा


सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
* शुभेच्छुक *
प्रथमेश महेश कोठे
नगरसेवक : सोलापूर महानगरपालिका
संस्थापक : विष्णू महेश प्रतिष्ठान


ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार
शिक्षण प्रसारक मंडळ मंगळवेढा संचलित
डॉ.सुभाष कदम
उपाध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ
ॲड. सुजीत बापू कदम
अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ
दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा
दलित मित्र कदम गुरुजी फार्मसी कॉलेज
इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, मंगळवेढा
इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, वेळापूर
इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, बेगमपूर
इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, भोसे
इंग्लिश स्कूल नरखेड
इंग्लिश स्कूल आंबे चिंचोली
शिवतेज प्राथमिक शाळा मंगळवेढा
शिवतेज प्राथमिक शाळा वेळापूर
शिवतेज प्राथमिक शाळा भोसे
शिवतेज प्राथमिक शाळा नरखेड
शिवशंभो महिला सह.पतसंस्था मंगळवेढा
शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांची सहकारी पतसंस्था
सोलापूर तरुण भारत वर्धापनदिन चिरायु होवो..!
* शुभेच्छुक *
शिक्षण प्रसारक मंडळ मंगळवेढा संचलित

# रासायनिक शेतीला इंडियाग्रो सेंद्रीय शेतीची जोड!

**भयंकर अशा दुष्काळजन्य परिस्थीतीचा सामना करत असताना देखील आई-वडीलांनी वडीलोपार्जीत जमीन टीकवली. याचे भान त्याने ठेवले. पदवी शिक्षण पुर्ण करून तो सुरवातीस प्रवाशी टमटम चालवत असताना शेतकऱ्यांचा पालेभाज्या व फळभाज्या मार्केटला पोहचवण्याचे काम करत होता. साखर कारखान्यामध्ये ऊस तोडणी धंदा करूनही पडतळ राहत नसल्याने अचानक डाळींब शेती करणाऱ्या मित्रांच्या प्रेरणेतुन स्वत: रासायनीक बरोबर इंडियाग्रो ब्रँड शेंद्रीय पध्दतीने डाळींब शेती करण्यास सरवात केली. बयता-बयता नऊ, सतरा, पस्तीस व यावर्षी पासष्ठ लाख रूपये असे वाडते व उच्चांकी उत्पंन्न मिळवणीऱ्या माढा तालुक्यातील निमगांव टें येथील तानाजी व दत्तात्रय शिंदे या तरूण भावंडांचे परिसरात सर्वत्र कौतुक, कुतुहल वाटत असून अभिनंदन होत आहे.**





## निमगाव (टें)च्या शिंदें बंधूंनी मिळवले डाळींबाचे विक्रमी उत्पन्न

निमगांव टें येथे बबन शिंदे,पत्नी जयश्री,दोन मुले तानाजी,पत्नी आशामती व दत्तात्र्यय पत्नी सारीका असे एकत्र कुटुंब पध्दतीत राहणारे कुटुंब आहे.पदवी पर्यंत शिक्षण घेतलेल्या तानाजी बबन शिंदे यांनी ज्या माळरानावर कुसळं उगवत होती, कायम जनावरे चरत होती अशा खडकाळ माळरानावर चार वर्षापुर्वी व्होळे येथील मित्र नंदकुमार क्षिरसागर, दिनकर क्षिरसागर व विठ्ठल चव्हाण यांच्या डीळींब शेतीची पाहणी करून त्या प्रेरणेतुन स्वत: डाळींब लागवड करण्याचे धाडशी पाऊल उचलले. मार्गदर्शक अनिल कुंभार यांचे मार्गदर्शन व सोमनाथ शिंदे यांनी इडियाग्रो या शेंद्रीय शेती प्रोडक्टचे स्वत: अनुभवातुन तयार केलेले काँबीनेशन कोर्सच्या माध्यमातुन डाळींब बागेत ट्रीटमेंट चालु करून एका वर्षातच फळ धरण्यास सुरवात केली.



सोमनाथ शिंदे
भ्र. ९४०३४६८७५५

सुरूवातीपासुनच शेंद्रीय औशधांचा वपर केला जात होता मात्र सोमनाथ शिंदे यांच्याकडील इंडियाग्रो प्रोडक्टचा काँबीनेशन कोर्सचा त्यांच्या मार्गदर्शनानुसार बागेत वापर केल्याने ज्या फळांची पाचशे ग्रँमच्या पुढे फळाची साईज जात नव्हती त्याच बागेतील फळाला चकाकी तर चांगलीच आली परंतू साईज अकराशे ग्रँमपर्यंत मीळाली.त्यामुळे चालु वर्षात आजपर्यंत पासष्ठ लाख रूपयाचे उत्पंन्न मीळाले अजूनपण मागे राहीलेला तीन ते चार टन माल असून अजूनही कमीतकमी आठ लाख रूपये मिळू शकते. ज्या माळरानावर जनावरे चरत होती.कुसळं सुध्दा जीथं निट उगवत नव्हती तीथं तानाजी व दत्तात्र्य शिंदे या भावंडांनी डाळींब शेती करण्याचे नियोजन केले.आ.बबनराव शिंदे यांनी सिना-माढा उपसा जलसिंचन योजनेमुळे माढा तालुक्यात पाणी फिरवल्यानेच दोन भावंडांनी डाळींब लागवडीचे धाडशी पाऊल उचलले. प्रथम वर्षी सातशे रोपांची लागवड करत दोन वर्षात नऊ लाख रूपयांचे उत्पंन्न काडले.दुसऱ्या वर्षी सतरा लाख रूपये उत्पंन्न काडले.नंतर पुन्हा अकराशे रोपांची लागवड केली. दोन वर्षात पुन्हा पस्तीस लाख रूपयाचे उत्पंन्न काडले. घरातील आई - वडील, लहान भाऊ,दोघांच्याही पत्नींची त्यांना या काळात मोलाची साथ मीळाली. मजुरलेस शेती करत भरघोस असे उत्पंन्न काडले.ज्या ठीकाणी साधे पत्र्याचे घर होते त्याच ठीकाणी पन्नास लाख रूपयेचा बंगला बांधून घराचे व कुटुंबाचे रूपडे तानाजी शिंदे यांनी पालटले. मार्गदर्शक अनिल कुंभार यांच्या माध्यमातुन रासायनिक शेती करण्याबरोबर शेंद्रीय शेतीचे अभ्यासक सोमनाथ शिंदे यांच्याकडून इंडियाग्रो ब्रँडचे त्यांनी स्व: ता बनवलेले काँबीनेशन कोर्सचा शेतीमध्ये आधूनिक शेंद्रीय पध्दतीची जोड देत वापर करून वाडते उत्पंन्न मीळवले. आधुनिक पध्दतीने शेती करत रासायनिक खतांचा अती वापर न करता इंडियाग्रो या शेंद्रीय प्रोडक्टचा वापर केल्याने झाडाला मोठ्या प्रमाणावर फळ धारणा करण्यात तानाजी शिंदे यांना यश आले.शेंद्रीय शेती केल्याने झाडे ट्रेसमध्ये न येता झाडाचे स्टोरेज वाडून झाडाला व फळाला चांगली चकाकी येवून फळ दर्जेदार येते,फळ जास्त दिवस टीकून राहते.झाडाला तेल्या,कुजव्या रोग येत नसून झाड मर रोगाला बळी न पडल्याने झाडाचे आयुष्यमानही वाडते व उत्पंन्नही वाडते. याचा मोठ्या प्रमाणावर तानाजी व दत्तात्र्यय शिंदे यांना चांगला फायदा झाला.

**तानाजी व दत्ताजी या दोघांनी अतीशय प्रतीकुल परीस्थीतीमध्ये शेती करण्यास सुरवात केली. सुरवातीपासुनच त्यांनी डाळींब शेतीत रासायनीक खतांचा वापर करत होते.त्यावेळी ते माझ्या संपर्कात आले.त्यांना मी इंडियाग्रो ब्रँडचे शेंद्रिय खताबध्दलची डाळींब शेतीबाबतचे काँम्बीनेशन शेड्यूल्ड कोर्स बाबत माहीती देवून कशा पध्दतीने उत्पंन्नात कमालीचे वाढ होते त्याबध्दल सांगीतले. सेड्यूल्डनूसार त्यांनी सर्व खते रासायनिक खताबरोबर वापरली. त्याचा त्यांना चांगला फायदा झाला. चार एकरात उत्पंन्न वाढून पासष्ठ लाख रूपये झाले.**

मी सुरवातीपासुनच शेंद्रीय इंडिया ग्रो ब्रँडचे थोडी फार औषध वापरत होतो. फळाची चकाकी व साईज पाहीजेतेवढी मिळत नव्हती. दरम्यान शेंद्रीय शेतीचे अभ्यासक सोमनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी त्यांनी फक्त औषध वापरुन नाही तर त्या औषधाचा काँबीनेशन कोर्सप्रमाणे वापर करावयाचा असतो असे सांगीतले.तेव्हापासुन सोमनाथ शिंदे यांनी स्व: ता अभ्यासपुर्ण काँबीनेशन कोर्स बनवला आहे तो परिस्थीतीनुसार त्यांच्या माग्रदर्शनाखाली वापरत गेलो. त्यामुळे झाडाचे चकाकी व स्टोरेज,फळाची सेटींग एकाचवेळी, फळाची विक्रमी साईज वाढली. पाचशे ग्रँमच्या पुढे न मिळणारी साईज आज अकराशे ग्रँमपर्यंत मीळाली आहे. त्यामुळे टनेज वाडले. रेट दीडशे प्लस मिळून चालु वर्षात पासष्ठ लाख असे वाढते उत्पंन्न मीळाले. अजूनही तीन ते चार टन राहीलेल्या मालाचे चार लाख उत्पंन्न मीळण्याची शक्यता आहे.एकमात्र नक्की आ. बबनराव शिंदे यांनी सिना माढाचे पाणी आणल्यामुळेच हे शक्य झाले.

तानाजी शिंदे, शेतकरी




# विकासाच्या वाटेवरील मोहोळ



**इतिहासाचा अभिमान, संतपरंपरेचा आशीर्वाद, सामाजिक समतेचा वारसा आणि विकासाची नवी उमेद या चारही वैशिष्ट्यांचा सुंदर संगम म्हणजे मोहोळ तालुका. स्वातंत्र्य चळवळीच्या प्रेरणादायी इतिहासापासून ते आधुनिक औद्योगिक आणि कृषी विकासापर्यंतचा प्रवास मोहोळने अत्यंत आत्मविश्वासाने पूर्ण केला आहे. गेल्या सात दशकांहून अधिक काळात या तालुक्याने प्रत्येक क्षेत्रात प्रगतीची नवी क्षितिजे गाठत सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.**

## इतिहास, परंपरा आणि प्रगतीचा त्रिवेणी संगम

दिलीप देशपांडे
मोहोळ

भौगोलिकदृष्ट्या मोहोळ हे सोलापूर जिल्ह्याचे मध्यवर्ती केंद्र आहे. राज्यातील अनेक महत्त्वाच्या शहरांना आणि पंढरपूर, अक्कलकोट, तुळजापूर, कोल्हापूर, सोलापूर यांसारख्या सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्रांना जोडणारे रस्ते मोहोळमधून जातात. मुंबई-हैदराबाद, मुंबई-विजापूर आणि नागपूर-रत्नागिरी या राष्ट्रीय महामार्गांमुळे वाहतूक, व्यापार आणि उद्योगासाठी मोहोळला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

सन १९५० मधील राज्य पुनर्रचनेनंतर हैदराबाद संस्थानातील ६४, मिरज संस्थानातील ६ आणि माढा तालुक्यातील २० गावे समाविष्ट होऊन मोहोळ तालुका १०४ गावांचा बनला. सुमारे १ लाख ५६ हजार ४०० हेक्टर भौगोलिक क्षेत्र असलेल्या या तालुक्यात १ लाख २४ हजार ७७५ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे. भीमा, सीना, भोगावती आणि नागझरी या नद्यांनी या भूमीला समृद्ध केले असून कृषी विकासाचा भक्कम पाया घातला आहे.

एकेकाळी मालदांडी ज्वारीसाठी प्रसिद्ध असलेला मोहोळ आज आधुनिक शेतीचे यशस्वी उदाहरण ठरला आहे. उजनी धरणाच्या कालव्यांमुळे सिंचनाची सुविधा वाढली आणि ऊस उत्पादनात मोठी भर पडली. आज डाळिंब, द्राक्ष, केळी यांसारख्या नगदी पिकांबरोबरच स्ट्रॉबेरी आणि सफरचंद यांसारख्या प्रयोगशील पिकांची लागवडही येथे होत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून मोहोळच्या शेतकऱ्यांनी शेतीला नवा चेहरा दिला आहे.



तालुक्याच्या आर्थिक विकासात सहकार क्षेत्राचा सिंहाचा वाटा आहे. भीमा, लोकनेते बाबुराव पाटील, आष्टी आणि जकराया हे चार साखर कारखाने हजारो शेतकरी आणि कामगारांच्या जीवनाला आधार देत आहेत. या उद्योगांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत झाली असून युवकांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

मोहोळची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण ओळख म्हणजे सामाजिक समता आणि राजकीय सुसंवाद. स्वर्गीय बाबुराव (आण्णा) पाटील, माजी मंत्री शहाजीराव पाटील आणि देशभक्त संभाजीराव गरड (महाराज) यांनी वैचारिक मतभेद असले तरी वैयक्तिक मैत्री जपण्याचा आदर्श घालून दिला. आजच्या बदलत्या राजकीय वातावरणात ही परंपरा टिकविण्याची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते.

तालुक्याच्या विकासात विविध राजकीय पक्षांतील अनेक नेत्यांनी योगदान दिले आहे. विद्यमान आमदार राजाभाऊ खरे, माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, माजी आमदार राजन पाटील, यशवंत माने, रमेश कदम, दीपक गायकवाड, अशोक देशमुख विजयराज डोंगरे, उमेश पाटील, शंकरराव वाघमारे, संतोष पाटील (नरखेडकर), सतीश काळे, रमेश माने, सुनील चव्हाण आणि सुशील भैय्या क्षीरसागर यांनी विविध विकासकामांसाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

उजनी धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यांमुळे सिंचन क्षेत्रात वाढ झाली असली तरी आष्टी आणि शिरापूर या महत्त्वाच्या सिंचन योजना अद्याप अपूर्ण आहेत. आष्टी योजना पूर्ण झाल्यास हजारो हेक्टर क्षेत्र कायमस्वरूपी ओलिताखाली येईल. या योजनेसाठी सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शासनाने ४० कोटींची तरतूद केली आहे, ही विकासाच्या दिशेने महत्त्वाची पायरी मानली जाते.

तथापि, कृषी आणि उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करूनही शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांत अपेक्षित वेगाने विकास झालेला नाही. आधुनिक वैद्यकीय सुविधा, उच्च शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगारनिर्मिती यावर अधिक भर देण्याची गरज आहे. जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असूनही मोहोळला अजूनही अनेक मूलभूत सुविधांची प्रतीक्षा आहे.

आज मोहोळ एका नव्या उंबरठ्यावर उभा आहे. समृद्ध इतिहास, संतांची परंपरा, मेहनती शेतकरी, सक्षम सहकार चळवळ आणि विकासाची प्रबळ इच्छा या सर्वांच्या बळावर मोहोळ भविष्यात राज्यातील आदर्श तालुक्यांमध्ये स्थान मिळवू शकतो. त्यासाठी राजकारणापलीकडे जाऊन सर्वांनी एकत्रितपणे विकासाचा ध्यास घेणे ही काळाची गरज आहे.

मोहोळची ओळख केवळ इतिहासापुरती मर्यादित नाही; ती संघर्ष, समता, सहकार, संस्कृती आणि विकास यांच्या सशक्त संगमाची आहे. हा प्रवास असाच अविरत सुरू राहो आणि विकासाच्या वाटेवरील मोहोळ लवकरच महाराष्ट्रातील सर्वाधिक प्रगत तालुक्यांमध्ये गणला जावो, हीच सर्व मोहोळकरांची सामूहिक अपेक्षा आहे.





# विकासाचे NEXT DESTINTION सोलापूर..

कधीकाळी कष्टकरी हातांचे, गिरण्यांचे आणि चादरींच्या शहराचे म्हणून ओळखले जाणारे सोलापूर आता नव्या ओळखीच्या उंबरठ्यावर उभे आहे. बदलत्या काळाची पावले ओळखत हे शहर आणि जिल्हा आता केवळ विकासाचा भागीदार राहिलेला नाही, तर विकासाचे पुढचे छशुंं ऊशीींळपरींळेप होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

सोलापूरची खरी ताकद त्याच्या मातीमध्ये आहे. कष्ट करण्याची तयारी, उद्योजकतेची वृत्ती, शेतीशी असलेले नाते, कुशल मनुष्यबळ आणि विविध संस्कृतींना सामावून घेण्याची परंपरा ही या भूमीची ओळख आहे. या ताकदीला आधुनिक पायाभूत सुविधांची, तंत्रज्ञानाची आणि दूरदृष्टीच्या नियोजनाची जोड मिळाली, तर सोलापूरच्या विकासाला नवे क्षितिज मिळू शकते.

आज विकासाची व्याख्या केवळ मोठे रस्ते किंवा उंच इमारती एवढी राहिलेली नाही. उद्योग आले पाहिजेत, रोजगार निर्माण झाला पाहिजे, तरुणांना कौशल्य मिळाले पाहिजे, शेतीला बाजारपेठ मिळाली पाहिजे, पर्यटनाला चालना मिळाली पाहिजे आणि नागरिकांचे जीवनमान उंचावले पाहिजे–या सर्वांचा एकत्रित विचार म्हणजे आधुनिक



ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर मंदिर, श्री रुपाभवानीमाता मंदिर, दक्षिण भारताची काशी पंढरपूरचा श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, बार्शीचे श्री भगवंत, माढ्याची श्री माढेश्वरी, अरणचे संत श्री सावतामाळी, करमाळ्याची श्री कमलाईमाता, अकलूजची अकलाईमाता, शिल्पसृष्टी, सांगोल्याचे श्री अंबिकामाता मंदिर, मंगळवेढ्याचे श्री संत दामाजी, अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ, मोहोळचे श्री नागनाथ महाराज, उत्तर सोलापूरची माता यमाई, दक्षिण सोलापूरचे कुडल संगम येथील श्री महादेव मंदिर ही सोलापूरची धर्मिक शक्तिस्थळे आहेत.



## कनेक्टिव्हिटी ठरेल गेमचेंजर

सोलापूरच्या विकासातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे कनेक्टिव्हिटी. रस्ते, रेल्वे, विमानसेवा आणि लॉजिस्टिक सुविधांचे जाळे मजबूत झाले की सोलापूरचे भौगोलिक स्थान आर्थिक ताकदीत रूपांतरित होऊ शकते.

सोलापूर हे महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणाच्या दिशांना जोडणार्या महत्त्वाच्या पट्ट्यात आहे. त्यामुळे वाहतूक आणि म ालवाहतुकीच्या दृष्टीने या शहराला मोठी क्षमता आहे. भविष्यात लॉजिस्टिक हब, वेअरहाऊसिंग, कोल्ड स्टोरेज आणि औद्योगिक क्लस्टर्स विकसित झाले, तर सोलापूरच्या अर्थकारणाला मोठी चालना मिळू शकते. रेल्वे आणि महामार्गांच्या माध्यमातून निर्माण होणारी कनेक्टिव्हिटी ही केवळ प्रवासाची सुविधा नसते; ती गुंतवणूक, उद्योग आणि रोजगाराची वाहिनी असते.


प्रशांत माने
मो.९८८११९१४४३



## उद्योगांच्या नव्या पर्वाची चाहूल

सोलापूरची पारंपरिक वस्त्रोद्योगाची ओळख ही त्याची आर्थिक संपत्ती आहे. मात्र आता या परंपरेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याची वेळ आली आहे.

टेक्स्टाइलसोबतच फूड प्रोसेसिंग, सौरऊर्जा, अभियांत्रिकी, कृषीआधारित उद्योग, लॉजिस्टिक्स, स्टार्टअप्स आणि लघु– मध्यम उद्योग यांना चालना मिळाली तर रोजगाराच्या असंख्य संधी निर्माण होऊ शकतात.

सोलापूरचा तरुण केवळ नोकरी शोधणारा नसून नोकरी निर्माण करणारा उद्योजक बनला पाहिजे. त्यासाठी कौशल्य विकास, उद्योग–शिक्षण संस्था यांच्यातील समन्वय आणि स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन आवश्यक आहे.

ए केकाळी गिरणगाव म्हणून ओळखले जाणाऱ्या सोलापूरने देश पारतंत्र्यांत असताना सोलापूरच्या नगरपरिषदेवर तिरंगा फडकावून देश स्वातंत्र्यांचा आनंद देश स्वातंत्र्यापूर्वीच लुटल्याचा सोलापूरचा इतिहास आहे. इंग्रजांच्या जुलमी राजवटीत देशासाठी हसतमुखाने फासावर चढलेल्या चार हुतात्म्यांचे शहर अशी सोलापूरची ओळख आहे. सोलापुरात जगप्रसिध्द माळढोक पक्षाचे वास्तव्य आहे.

सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण हे १२३ टीएमसी क्षमतेचे महाकाय विशाल धरण सोलापूरच्या बळीराजासह सर्वांचीच वरदायिनी ठरलेले आहे. सोलापूर शहराला पाणीपुरवठ्यासाठी उजनी धरण ते सोलापूर दोन जलवाहिन्या कार्यान्वित असून ग्रामीण भागासह अनेक तालुक्यांना उजनी धरणातून पिण्याचे पाणी उपलब्ध होते. उजनी धरणावर शेती, उद्योगासह सर्वच क्षेत्रातील वार्षिक आर्थिक उलाढाल ही सुमारे २००० हजार कोटींच्या आसपास आहे. सोलापूर जिल्ह्यात जवळपास ४० साखर कारखाने असून ऊसासह डाळिंब, केळी, द्राक्ष, बोर, पपई, ज्वारी आणि खरिपांच्या पिकांची मोठ्या प्रमाणात लागवड येथे होते. रब्बीसह आता सोलापूरची ओळख खरिपासाठी देखील होत असल्याने येथील बळीराजाने सोलापूरच्या नावलौकिकात भर टाकण्याचे मौलिक कार्य केलेले आहे. सोलापूरी चादर, टॉवेलने जागतिक बाजारपेठ पादाक्रांत केलेली असून सोलापूरची खाद्यसंस्कृती देखील जगाच्या पातळीवर नावाजलेली आहे. सोलापूर हे मेडिकल हब म्हणून उदयास आलेले असून येथे वाजवी दरात योग्य उपचार मिळत असलयाने मराठवाडा, कर्नाटकसह महाराष्ट्राच्या अनेक भागातून रुग्ण येथे उपचारासाठी येतात, सोलापुरात एक शासकीय आणि एक खासगी वैद्यकीय महाविद्यालय दिमाखात सुरु आहे. देशातील प्रत्येक भागाला जोडणारे रेल्वेमार्गाचे जाळे सोलापूरला असून सोलापूरकडे येणाऱ्या सर्व आठही दिशांना परिपूर्ण महामार्ग जोडलेले आहेत. सोलापुरातून मुंबई, गोव्यासह अनेक शहरांसाठी विमानसेवा सुरु आहे. वीज निर्मिती करणारा एनटीपीसीचा मोठा प्रकल्प आणि पॉवर ग्रीड देखील कार्यान्वित आहे. सोलापूरच्या प्रिसिजन कॅमशॉप्ट, बालाजी अमाईन्स, लक्ष्मी हायड्रोलिक्स आदी जागतिक कंपन्यांनी सोलापूरचा औद्योगिक डंका संपूर्ण जगभर गाजवलेला आहे. सोलापूर शहरात एक विमानतळ कार्यान्वित असून लवकरच शहरालगत बोरामणी हे आंतरराष्ट्रीय विमानतळ साकारत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने सोलापुरात लवकरच आयटी पार्क साकारला जात असून यासाठी शासनाने जमीन देखील उपलब्ध करून दिली आहे. सोलापूर शहरात दोन उड्डाणपूल होत आहेत. शहरात फाईव्ह स्टार हॉटेलसह सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध आहेत. आयटी पार्कसाठी जमीन उपलब्ध होत असल्याने लवकरच जागतिक पातळीवरील आयटी कंपन्या सोलापुरात येतील यात शंका नाही. मुंबई, पुणे, नाशिकसह अनेक शहरांम ध्ये सध्या औद्योगिक वसाहतींचे मोठे जाळे निर्माण झालेले असून यापुढे या शहरात सर्वच प्रकारच्या उद्योगांना जागेसह अनेक सुविधांचा अभाव जाणवत असल्याने विकासाचे नेक्स डेस्टिनेशन म्हणून आपल्या सोलापूरची निवड सर्वच उद्योजकांकडून होणार यात शंका नाही. मुख्यमंत्री देवाभाऊंनी देखील सोलापूरचे पालकत्व स्वीकारलेले असून सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदारांनीदेखील सोलापूरच्या विकासासाठी कंबर कसलेली दिसून येते. त्यामुळे आगामी काळात सोलापूरचा विकास कोणी रोखू शकणार नाही, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. यासाठी सोलापूरकरांची मोठी जबाबदारी असून प्रत्येक सोलापूरकराने सकारात्मक चर्चा सुरु करणे गरजेचे आहे. सोलापूरच्या विकासासाठी शासन आणि प्रशासनाकडून होणाऱ्या प्रयत्नांना सोलापूरकरांनी साथ देण्याची गरज आहे. सोलापूरला आयटी पार्कसह इतर उद्योग येताच सोलापूरच्या युवा–युवतींना रोजगारासाठी आपले गाव सोडावे लागणार नाही. केवळ शासन– प्रशासनाकडे बोट न दाखवता सोलापूरकरांनीही सोलापूरच्या विकासासाठी शासकीय यंत्रणांना सकारात्मक प्रतिसाद दिल्यास विकासाचे नेक्स्ट डेस्टिनेशन होण्यापासून सोलापूरला कोणी रोखू शकणार नाही, हे शंभर टक्के खरे.



## शेतीपासून ॲग्री–बिझनेसपर्यंत

सोलापूरच्या विकासाची चर्चा शेतीशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. दुष्काळाच्या आव्हानांवर मात करत शेतकर्यांनी अनेक पिकांमध्ये आपली क्षमता सिद्ध केली आहे. आता पुढचे पाऊल आहे. शेतीला बाजारपेठेशी जोडण्याचे.

प्रक्रिया उद्योग, मूल्यवर्धन, आधुनिक साठवणूक, पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि थेट बाजारपेठ उपलब्ध झाली तर शेतमालाची किंमत वाढू शकते. शेतकरी केवळ उत्पादक न राहता ॲग्री–बिझनेसचा भागीदार बनू शकतो. यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळेल आणि शहराकडे होणारे स्थलांतरही कमी करण्यास मदत होईल.



## पर्यटनाला मिळू शकते नवी ओळख

सोलापूरकडे धार्मिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक पर्यटनाची मोठी क्षम ता आहे. पंढरपूर, अक्कलकोट, तुळजापूर परिसराशी असलेली जवळीक, उजनीचा विस्तीर्ण जलाशय, सिद्धेश्वर मंदिराची परंपरा, बार्शी परिसरातील धार्मिक–सांस्कृतिक वारसा आणि जिल्ह्यातील विविध पर्यटनस्थळे यांना एका व्यापक पर्यटन सर्किटमध्ये जोडता येऊ शकते.

एक दिवसाचा प्रवास ते दोन–तीन दिवसांचा पर्यटन अनुभव असा बदल घडवून आणणे ही काळाची गरज आहे.

पर्यटन वाढले की हॉटेल्स, वाहतूक, स्थानिक खाद्यसंस्कृती, हस्तकला, लघुउद्योग आणि स्थानिक रोजगाराला चालना मिळते. म्हणजे पर्यटन हा केवळ आनंदाचा विषय नसून स्थानिक अर्थव्यवस्थेचा इंजिन ठरू शकतो.



## सोलार सिटीची संधी

सोलापूर या नावातच सोलारची एक वेगळी शक्यता दडलेली आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. मुबलक सूर्यप्रकाश ही सोलापूरची नैसर्गिक ताकद आहे. सौरऊर्जेचा मोठ्या प्रम ाणावर वापर, रूफटॉप सोलार, सौरआधारित उद्योग आणि हरित ऊर्जेच्या प्रकल्पांमधून सोलापूर ग्रीन इकॉनॉमीचे केंद्र बनू शकते.

भविष्यात स्वच्छ ऊर्जा, पाणी व्यवस्थापन, हरित वाहतूक आणि पर्यावरणपूरक शहरी नियोजन यांचा संगम साधणारे सोलापूर हे देशासाठी एक आदर्श मॉडेल ठरू शकते.

सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
युगंधर फाऊंडेशन, सोलापूर
MADHUVAN HONEY
युगंधर वन आणि
-: शुभेच्छुक :-
प्रा. रेश्मा माने
संस्थापक अध्यक्ष
प्रियदर्शी माने (सचिव) प्रा. रेश्मा माने (खजिनदार)
युगंधर फाऊंडेशन सोलापूर आणि युगंधर फाऊंडेशन परिवार
६३, लक्ष्मीबाग डोणगाव रोड, सोलापूर मो.8788139229

दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!
तरुण भारत
सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटना
डॉ. राजीव प्रधान — अध्यक्ष
झेड. एम. पुणेकर — सचिव

राष्ट्रीय विचाराचे एकमेव दैनिक
सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
ॲड.बसवराज शि. सलगर
ॲड.प्रदीप सलगर
ॲड.प्रतिक सलगर
-: शुभेच्छुक :-
ॲड. विनोदकुमार जमादार । ॲड. संदीप सातलगांवकर । ॲड. सुमित पाटील । ॲड. निखील गोदेपुरे । ॲड. कादंबरी गंगणे । ॲड. आश्लेषा क्षीरसागर । ॲड. पूर्णिमा दिवटे । प्रकाश जाधव । राजकुमार सलगर

सोलापूर तरुण भारतच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..
आपल्या मुलाच्या क्रिकेट करिअरसाठी सोलापुरातील अग्रगण्य क्रिकेट अकॅडमी म्हणजे
एन.जी.तथा निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी
सोलापूर जिल्हा संघात प्रत्येक वयोगटात आमच्या अकॅडमीचे चार ते पाच खेळाडू, तसेच महाराष्ट्राच्या संभाव्य संघात प्रत्येक गटात दोन ते तीन खेळाडू असतातच, म्हणूनच आव्हाने प्रवेश घ्यावा.
* संपर्क *
निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी
अध्यक्ष : मा.विकेश गायकवाड
उपाध्यक्ष : मा.राजेंद्र गोटे
मुख्य प्रशिक्षक : निलेश गायकवाड
सहाय्यक प्रशिक्षक : विष्णू गायकवाड, विनोद पाटील, दीपक सुरवसे
स्थळ : रेल्वे मैदान, भैय्या चौक, सोलापूर
वेळ : स.७ ते ९.३० व दु.४ ते ६.३० मो.8999558704

सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
Hotel Ajanta
FACILITY AVAILABLE
- Economical Rooms
- A.C. & Non A.C. Rooms
- Great Location (Near Market & Centrally Located)
- Near Railway Station (1.5Km) & Bus Stand (0.5Km)
- Pantry Service
- Laundry Service
- Locker (Safe Deposit Service)
- Flexible Rate, 24 hrs Check Out time

* शुभेच्छुक *
ऋत्विज चव्हाण
93/1, Gold Finch Peth, Infront of Bhagwat Theatre Mechanic Chowk, Solapur -413001 (MH) INDIA
9881626200 chavanrutvij@gmail.com

लोकप्रिय उपमुख्यमंत्री
मा.श्री.एकनाथजी शिंदे साहेब
शिवसेना
सोलापूर तरुण भारत
४२ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
मा.खा.धैर्यशील मानेसाहेब — सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख
मा.अमोल बापू शिंदे साहेब — जिल्हाप्रमुख गटनेता : सोमपा
मा.महेश साठे — माजी सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख
* शुभेच्छुक *
मा.श्री.राजीव (भाऊ) बाबर
सोलापूर शिवसेना जिल्हा उपप्रमुख
माजी संचालक : दामाजी शुगर मंगळवेढा

प्रखर राष्ट्रीय विचाराचे दैनिक
सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
* शुभेच्छुक *
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मंगळवेढा
सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद

सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
मा.सुहास मोतिचंद छंचुरे
क्रीडा शिक्षक : उमाबाई श्राविका विद्यालय, सोलापूर
शहराध्यक्ष : सोलापूर शहर शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघ

सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
मा.मुकुंद गिरी
पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक सरस्वती मंदिर, सोलापूर

सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
मा.अजित मुरलीधर पाटील
क्रीडा शिक्षक
पी.एस.इंग्लिश मिडीयम स्कूल, सोलापूर

दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
ॲड.धनंजय माने — बी.एस.सी.एलएल.बी — मो.९८२२२८२९२५
ॲड.जयदीप माने — बी.एस.एल.एलएल.बी — मो.९४२२५३२७५४, ९८२२५३२७५४
कार्यालय : चेंबर नं. ७ लॉयर्स चेंबर्स, जिल्हा न्यायालय आवार, सोलापूर ४१३००३
निवास : माने सदन, २११, नवीपेठ, सोलापूर ४१३००७

सोलापूर तरुण भारत
४२ व्या वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
Tally® POWER OF SIMPLICITY
KIRAN INFOTECH
SIMPLIFYING YOUR BUSINESS
5 Star Certified Tally Partner
www.kiraninfotech.co.in

सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
रजि.नं. एफ २९०६०
आस्था सामाजिक संस्था सोलापूर
मोफत जेवण वाटप
आनंद तालिकोटी — अध्यक्ष
शिवानंद सावळगी — सचिव
चंद्रकांत शहा — उपाध्यक्ष
सिध्दू बेऊर — सहसचिव
सुहास छंचुरे — कोषाध्यक्ष
हर्षलभाई कोठारी — सल्लागार
-: संचालक :-
डॉ.महावीर शास्त्री, अनिल जमगे, देविदास चेळेकर, योगेश कुंदूर, महेश नळे, वेदांत तालिकोटी
अन्नदानासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

दैनिक सोलापूर तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
श्री.अजिंक्य एम.उंबरजे
गव्ह.रजि. कॉन्ट्रॅक्टर
मो.9561786009
१८,१९/१, कोळी समाज सोसायटी सैफूल, विजापूर रोड, सोलापूर

# या चिमण्यांनो, परत फिरा रे...



## सोलापूर झेपावतंय, संधी शोधा!

**नोकरीच्या संधीचा अभाव... आयटी उद्योगाची उणीव... मध्यमवर्गीय जीवनशैली आणि मोठ्या उद्योगधंद्याची कमतरता अशा एक ना अनेक कारणांमुळे सोलापुरातील तरुण नोकरी-धंद्याच्या निमित्ताने स्थलांतरित होत आहेत. अशा स्थलांतर करणार्या तरुणांचे प्रमाण अलीकडील काळात वाढले असून मुले शहराबाहेर आणि आई-वडील सोलापुरात हे चित्र घरटी दिसत आहे. स्मार्ट सोलापूरसाठी या चिमण्यांना... परत फिरा रे ची साद घालण्याची गरज बनली आहे.**



मयुरा तारे
सोलापूर

शहरातील लोकसंख्येचा विचार केला तर २००१ ची जनगणना आणि २०११ ची जनगणना यामध्ये दहा वर्षांत शहराची लोकसंख्या अवघी लाखाने वाढली आहे. शहराची लोकसंख्या घटण्यामागे येथील तरुणांचे वाढते स्थलांतर ही सर्वात मोठी बाब आहे. जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ४३ लाख १७ हजार ७५६ आहे. यामध्ये शहराची लोकसंख्या ९ लाख ५१ हजार ११८ एवढी आहे. २००१ ला जिल्ह्याची लोकसंख्या ३८ लाख ४९ हजार होती. त्यामध्ये साडे आठ लाख शहराची लोकसंख्या होती. २००१ च्या तुलनेत सोलापूर शहराची लोकसंख्या २०११ मध्ये घटल्याचे दिसत आहे.

ग्रामीण भागाची लोकसंख्या वाढ कमी आणि शहराची लोकसंख्या वाढ जास्त असे सर्वत्र चित्र असताना सोलापुरात मात्र हे चित्र उलटे दिसत आहे. शहराची लोकसंख्या का घटली हा खरा चिंतनाचा विषय आहे. गत दहा वर्षांत उच्चशिक्षित मोठ्या प्रमाणात शिकून बाहेर पडले आहेत. अशा तरुणांना नोकरीच्या संधी सोलापुरात नाहीत. त्यामुळे हे तरुण पुणे, मुंबई, बंगळुरू अशा ठिकाणी गेले आहेत. आणि तेथेच स्थायिक होताना दिसत आहेत. शहराचा विकासही होत नाही. त्यामुळे ती तरुणाई परत सोलापुरात स्थायिक होण्याचा विचारही करत नाही. त्यामुळे करिअरसाठी शहराबाहेर पडलेले तरुण परत केवळ शहर, आई-वडिलांना भेटण्यासाठी आणि कामापुरतेच येतात. मात्र ते सोलापूरकर होत नाहीत.

आज कित्येक सुशिक्षित कुटुंबातील १-२ मुलांनी नोकरी-धंद्यासाठी शहर सोडले आहे. मात्र आई-वडील तेथील हवामान मानवत नाही असं सांगून सोलापुरातच राहतात. वास्तविक मुलं, सुना, नातवंडात रमायचं त्यांचं स्वप्न असतानाही मुलं येथे राहत नाहीत अन् त्यांचं मन सोलापूरशिवाय दुसरीकडे रमत नाही. त्यामुळे शहरातील बर्याच कॉलनींमध्ये फक्त ज्येष्ठ मंडळीच दिसतात. तरुणांच्या तुलनेत ज्येष्ठांचे प्रमाण जास्त असल्याने सोलापूर ज्येष्ठांसाठीच उरल्याचे दिसत आहे.

सुशिक्षित, कर्तृत्वान तरुणाईचे स्थलांतर खरोखरच चिंताजनक आहे. ही क्रियाशील तरुणाई शहराच्या विकासाला हातभार लावू शकते. त्यामुळे स्थलांतर करणार्या तरुणाईला रोखण्यासाठी शहराचा बकालपणा दूर करून नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. जर तरुणाईच्या करिअरसाठी पोषक वातावरण आणि संधी निर्माण झाली तर सोलापूरकरांनी घातलेली मया चिमण्यांनो परत फिरा रे...याला तरूण प्रतिसाद देतील आणि स्मार्ट सोलापूर स्किल्ड सोलापूर बनेल.

### जन्मदरही घटला

ग्रामीण भागापेक्षा शहरीभागाचा जन्मदर जास्त असतो. मात्र सोलापूर शहराचा विचार केला तर २००१ च्या जनगणनेत शहराची लोकसंख्या साडे आठ लाख होती. तर २०११ मध्ये ती ९ लाख ५१ हजार ११८ एवढी झाली. दहा वर्षात एक लाखाची वाढ झाली आहे. याला सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे येथील तरुणांचे होणारे स्थलांतर हेच आहे. सोलापूर सोडून इतरत्र स्थायिक झालेल्या तरुणाईमुळे जन्मदर घटला असून वाचा परिणाम लोकसंख्या वाढीवर दिसत आहे.

### स्मार्ट सिटीनंतर चित्र पालटेल?

केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेत समावेश झाला आणि ती योजना प्रभावीपणे राबविली गेली तर निश्चित सोलापूरचा लूक पालटेल आणि तरुणांना शहराचे नव्याने आकर्षण वाटेल. स्मार्ट सिटीमुळे शहरातील मूलभूत समस्या दूर होतील. शहर नव्या तंत्रज्ञानाशी जुळल्याने नव्या संधी निर्माण होतील. त्यामुळे स्थलांतर रोखले जाईल. सोलापूर म्हणजे मोठे खेडे ही ओळख संपुष्टात येऊन स्मार्ट सोलापूर ही नवी ओळख शहराचे चित्र पालटून टाकेल अशी आशा आहे.

### मुलं अन्यत्र आणि आई-वडील शहरात

आज शहरातील बर्याच कुटुंबातील मुलं नोकरी-धंद्याच्या बाहेरगावी स्थायिक झालेली. त्यामुळे घरामध्ये फक्त आई-वडीलच दिसतात. सोलापुरात संधी नसल्याने मुलांच्या करिअरमध्ये व प्रगतीत अडथळा नको म्हणून ही मंडळी मुलांना बाहेरगावी पाठवून आपल्या मनावर दगड ठेवून एकाकी जगत आहेत. आई-वडिलांचे मन सोलापुरातच रमत असल्याने त्यांना सोलापूर सोडवत नाही तर मुलांना करिअर आड येणारे सोलापूर मानवत नाही. अशा फेर्यात मुलं आणि आईबाबा अडकले आहेत. मुलं सणासुदीला व कधीतरी भेटायला येतात हेच त्यांच्यासाठी आनंददायी आहे. ज्या वयात मुलांची साथ हवी असते त्याच वयात मुलं त्यांच्यापासून दुरावत आहेत. केवळ सोलापुरात चांगल्या पगाराच्या नोकर्या नाहीत. त्यामुळे मुले अन्यत्र आणि आईबाबा सोलापुरात हे सर्रास घरातील चित्र आहे.

## तरूणांचे वाढते स्थलांतर चिंताजनक

### स्थलांतर रोखण्यासाठी काय करायला हवे

अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या बहुतांश तरुणांना आयटीत काम करण्याची इच्छा असते. गलेलठ्ठ पगार मिळविणे हे त्यांचे स्वप्न असते. मात्र त्यांचे ते स्वप्न सोलापुरात पूर्ण होण्यासाठी आयटी उद्योग सुरू करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. वेगवेगळ्या क्षेत्रातील तरुणांना विविध प्रकारच्या नोकरीच्या संधी उपलब्ध करून द्यायला हव्यात. शहरात फक्त ७२० उद्योग आहेत. साडे नऊ लाख लोकसंख्येच्या तुलनेत असणारे उद्योगांचे प्रमाण पाहता आणखी मोठ्या प्रमाणात उद्योगांची निर्मिती व्हायला हवी. सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा शहरात उपलब्ध आहेत. मात्र शैक्षणिक वातावरण नाही. ते निर्माण करायला हवे. शहरात सोय असतानाही अनेक तरुण शिक्षणासाठी बाहेर जातात हे चित्र बदलायला हवे. शहरात मनोरंजनाच्या बाबींचा अभाव आहे. २-३ चांगल्या बागा आणि सिध्देश्वर मंदिर सोडले तर सोलापूरकरांचा विरंगुळा होईल अशी स्थळे नाहीत. विक एंडला सोलापुरात फिरण्यासाठी पॉईंट नाहीत. शहरी लोकांची आर्थिक स्थिती जेमतेम असल्याने शहराची जीवनशैलीच मध्यमवर्गीय आहे. उत्त्चशिक्षित तरुणांना स्टँडर्ड लाईफ स्टाईल हवी असते. त्यामुळे लोकांचा पर्यायाने शहराचा आर्थिक स्तर उंचाववाला हवा.

> **का सोडतात सोलापूर?**
> चांगल्या नोकरीच्या संधी दुर्लभ * आयटीचा एकही उद्योग नाही मोठे उद्योगधंदे अगदी मोजकेच * शिक्षण दर्जेदार पण वातावरण नाही * स्पर्धा परीक्षांसाठी वातावरणाचा अभाव * शहराचा बकालपणा नकोसा * मध्यमवर्गीय जीवनशैली * मनोरंजनाच्या बाबींची उणीव * मोठ्या पगाराच्या नोकऱ्या नाहीत

### सर्वकाही असताना विकास हरवला

सोलापूर जिल्ह्यात उद्योग व्यवसाय वाढीला पोषक वातावरण आहे. जिल्ह्यात ४० साखर कारखाने आहेत. उजनी धरणाच्या माध्यमातून पाण्याच्या कालव्यांचे जाळे मजबुत आहे. त्यामुळे डाळींब, द्राक्षे, केळींसह अन्य फळपीके घेण्याकडे शेतकर्यांचा कल आहे. दक्षिण भारताला जोडणारे रेल्वेचे जाळे, सोलापूर-विजयपूर, सोलापूर-कलबुर्गी, सोलापूर- हैद्राबाद-तेलंगणा, सोलापूर- मराठवाडा, सोलापूर- पुणे-मुंबई, सोलापूर-बंगळुरु, सोलापूर-कोल्हापूर, सांगली अशा शहरांना जोडणारे महामार्गाचे जाळे आहे. विमानतळही आहे. असे सर्वकाही असतानाही सोलापूरचा विकास का हरवला? असा प्रश्न सातत्याने निर्माण होतो. मुलांना शहरातच नोकरीच्या चांगल्या संधी मिळाल्या तर तरुणांचे होणारे स्थलांतर थांबेल. आयटीसारखे उद्योग सोलापुरात निर्माण होणे गरजेचे आहे. शहराचा मागासलेपणा दूर होऊन नव्या इंडस्ट्रीज विकसित झाल्या तर करिअरसाठी दूर जाणारी मुले थांबतील.

# वेळापूरचे प्राचीन अर्धनारी नटेश्वर मंदिर



**देवगिरीच्या यादवांच्या काळात वेळापूर प्रामुख्याने भरभराटीस आले. वेळापूरची प्राचीनता पहायची झाल्यास एक हजार वर्षे मागे जावे लागते. खूप वर्षापूर्वी वेळापूरचे स्थान जसे बदलत गेले तसे नावही बदलत गेले. यादवांच्या काळापर्यंत वेळापूरचे नांव एकचक्रनगर असे होते. महाभारताचा कालावधी पाच हजार वर्षांपूर्वीचा आहे. त्याकाळी दक्षिणेकडचा भाग हा दंडकारण्य म्हणून प्रसिद्ध होता. यावरूनच वेळापूरचा भागही दंडकारण्यात समाविष्ट होता आणि या दंडकारण्यात अनेक ऋषी-मुनींनी तपश्चर्या केली आहे. म्हणजेच फार प्राचीन काळापासून ही भूमी तपोभूमी, पावनभूमी अशी आहे. शांडिल्य ऋषीसह अनेकांनी येथे तपश्चर्या केली आहे.**

औदुंबर भिसे
वेळापूर

महाभारत ते यादवकाल या कालावधीमध्ये वेळापूरबाबतचे पुरावे उपलब्ध नाहीत. मात्र यादवकालापासून म्हणजे इ.स.१३०० पासूनचे पुरावे येथे आढळतात. देवगिरीची दक्षिण सीमा म्हणजे वेळापूर. वेळ म्हणजे सीमा. पूर म्हणजे भोवती तटबंदी असलेले गांव. यावरून वेळापूर हे नांव या गावास यादवांच्या काळातच मिळाले असावे. माणदेश व इतर भागावर लक्ष ठेवण्यासाठी वेळापूर येथे उपराजधानीप्रमाणे यादवांचे लष्करी ठाणे होते व यादवांच्या वतीने या ठाण्याचा कारभार बाईदेवराणा हे पहात होते. एक मध्यवर्ती लष्करी ठाणे म्हणून वेळापूरला अनन्य साधारण महत्व होते. त्या काळात सर्वच दृष्टीने वेळापूर भरभराटीस आलेले होते.

त्याकाळात पर्यटनस्थळ म्हणा किंवा सांस्कृतिक केंद्र म्हणा, येथील श्री अर्धनारी नटेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार केला गेला. या जिर्णोद्धाराचा संकल्पक बाईदेवराणा होते. स्वतःच्या अधिकारात त्यांनी या मंदिराचा जिर्णोद्धार केला आहे. शिलालेखातील उल्लेख पाहता पूर्वी हे मंदिर होते. पण स्वरूप छोटे म्हणजे मुख्य गाभारा, गाभार्यात पिंड व आतील नंदी, तो ही उघड्यावर एवढेच असावे. नंतर सर्व बाजूंनी जिर्णोद्धार झाल्यानंतर बाहेरच्या नंदीची प्रतिष्ठापना केली असावी. कारण इतरत्र कोणत्याही महादेवाच्या मंदिरासमोर दोन नंदी नाहीत.

या जिर्णोद्धाराचे बांधकाम इ.स.१३०० व इ.स.१३०५ या टप्प्यात झाल्याचा उल्लेख शिलालेखात आढळतो. सध्याची मूर्ती प्रतिष्ठापना सोमवार दि.२२ नोव्हेंबर १३०५ रोजी केल्याचा उल्लेख तीन शिलालेखातून आढळतो. श्री अर्धनारी नटेश्वराच्या मूर्तीची रचना अत्यंत कोरीव असून ही मूर्ती सालंकृत आहे. शिल्पकलेच्या दृष्टीने अत्यंत उच्चप्रतीची शिल्पकृती आहे. मूर्तीकाराने मूर्ती कोरताना वस्त्रांऐवजी अलंकाराचा वापर खुबीने केला आहे. अत्यंत देखणी अशी ही मूर्ती १.१५ मीटर उंचीची आहे. मंदिरात प्रवेश केल्यानंतर आतील नंदी, दक्षिणी भिंतीत ब्रह्मा, मद्रिश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी व चामुंडा अशा सात मातृका, वीरभद्र व गणपती आहे. बाजूस उपदेवता, उत्तरेला शेजघर आहे. छतास काही विरगळ वापरले आहेत. मुख्य गाभार्यात शिवलिंगावर सालंकृत शंकर-पार्वतीची मूर्ती उभी आहे. वर किर्तीमुख, किर्तीमुखापासून दोहोबाजूस अष्टगण, ब्रह्मदेव, विष्णू, पायाजवळ नंदी, अस्थिपंजर, उभी सरस्वती, उंदीर, गणपती अशा प्रतिमा कोरल्या आहेत. शंकरमूर्ती ही चतुर्हस्त असून डावा हात पार्वतीच्या कमरेवर आहे. दुसर्या हातात पंचफणी नाग असून तो पार्वतीच्या केशसांभारावर धरलेला आहे. उजव्या हातात त्रिशूल असून दुसरा हात आशिर्वादात्मक उभा आहे. अंगठ्यात जपमाळ असून अंगठा, अनामिका, करंगळीचा छेद गेला आहे. पार्वती द्विहस्त असून डाव्या हातात पाश आहेत तर उजवा हात शंकराच्या खांद्यावर ठेवलेला आहे. शंकरमूर्ती दोन्ही पायावर उभी असली तरी तो डाव्या पायावर रेलला आहे व उजवा पाय किंचीत सैल आहे. पार्वती डाव्या पायावर देहुडाचरण मुद्रेत उभी आहे. उजव्या तूळ पायावर चक्र आहे. या चक्रामुळेच या गावास एकचक्रनगर नाव असावे व येथे भिम-बकासुराच्या युद्धात बकासुराचा वध झाला असावा व त्यानंतर या गावाचे नांव वेळापूर झाले असावे असाही समज येथे आहे. हे मंदिर गजलक्ष्मीस अर्पण केले आहे.

> **अन्नदान सेवा :**
> प.पू.डॉ.भाईनाथ महाराज कारखानीस यांच्या प्रेरणेने गतवर्षी श्रावणामासाच्या निमित्ताने सोमवार दि.२ सप्टेंबर २०१३ पासून प्रत्येक सोमवारी सायंकाळी ७ वा. आरतीनंतर अन्नदान सेवेचा संकल्प केला. तो संकल्प आज सद्गुरूंच्या कृपेने येथे पूर्णत्वास आला आहे. आता दर सोमवारी सायंकाळी ७ वाजता श्री अर्धनारी नटेश्वर अन्नछत्र मंडळाच्यावतीने मोठ्या प्रमाणात अन्नदान सेवा सुरू आहे.





या श्री अर्धनारी नटेश्वर ग्रामदैवताची यात्रा चैत्र पौर्णिमेस होते. शुद्ध पंचमीस हळदी, अष्टमीस लग्न व पौर्णिमेस वरात आणि वद्य अष्टमीस सोळावी असा महोत्सव दरवर्षी साजरा केला जातो. या कालावधीत विविध स्पर्धेचे आयोजन केले जाते.

पुरातन खात्याने १९७० साली मूर्ती संग्रहालय बांधले आहे. या संग्रहालयामध्ये वेळापूर व महाळूंग परिसरातील अनेक विरगळ एकत्र केले आहेत. या विरगळा पर्यटकांच्या व वेळापूरच्या दृष्टीने ऐतिहासिक अनमोल ठेवा आहे. या विरगळा अशा पद्धतीने ठेवण्यात आल्या आहेत की त्या विरगळातून सारेगमपधनीसा या सप्तसुरांची निर्मिती होते. वेळापूर येथे दोन प्रशस्त ऐतिहासिक वाडे आहेत. त्यापैकी एक पार्वतीच्या वाड्यात सध्या शाळा बांधण्यात आली आहे. ह्या वाड्यात यादवांचा खजिना होता. येथे मंदिरासाठी देणगी स्विकारली जाई. तसा उल्लेख तेथे सापडलेल्या शिलालेखात आहे. याची नोंद इतिहासकारांनी आपल्या संशोधनात नमूद केली आहे. वि.का.राजवाडे, गो.स.सरदेसाई, सेतू माधवराव पगडी, डॉ.तुळपुळे यांच्यासह अनेक संशोधकांनी वेळापूरला भेट देवून येथील इतिहास वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या ग्रंथामध्ये वेळापूरचे बरेच प्राचीन उल्लेख आढळून आले आहेत.

यादवकालीन या मंदिरामुळे वेळापूरला अनन्य साधारण असे महत्व प्राप्त झाले आहे. पर्यटनदृष्ट्या, सोईसुविधांच्यादृष्टीने वेळापूर दुर्लक्षित राहिले होते. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री खा.विजयसिंह मोहिते-पाटील यांनी तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत येथे भक्तनिवास बांधले आहे. येणार्या पर्यटकांसाठी त्याचा चांगला उपयोग होत आहे. याबरोबरच मल्लसेठीचे स्मारक, अंबाबाई मंदिर, कांचन महाल, नाथ मंदिर, खंडोबा मंदिर, काळा मारूती आदि प्राचिन मंदिरे येथे पहायला मिळतात. केंद्रीय पुरातत्व विभागाच्यावतीने कोट्यावधी रूपये खर्च करून या मंदिराभोवती उंच जाळीसह संरक्षक भिंत, जमिनीवर दगडी फरशी बसवून तेथील परिसर स्वच्छ केला आहे.

वेळापूर हे आळंदी-पंढरपूर या श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी मार्गावर वसलेले एक ऐतिहासिक गांव आहे. या गावापासून श्री क्षेत्र पंढरपूर हे केवळ ३२ कि.मी., श्री क्षेत्र सिद्धरामेश्वर (सोलापूर) १०० कि.मी., श्री क्षेत्र तुळजापूर १५० कि.मी., श्री क्षेत्र अक्कलकोट १५० कि.मी., शिखर शिंगणापूर (मोठा महादेव) ५० कि.मी., श्री क्षेत्र गोंदवले ६० कि.मी., निरा-भिमा या पवित्र नद्यांच्या संगमावरील श्री क्षेत्र निरा-नरसिंहपूर २५ कि.मी., जैन धर्मियांचे अतिशय क्षेत्र दहिगांव हे ५० कि.मी. अंतरावर आहे तर पर्यटनाच्या दृष्टीने विकसीत झालेले अकलूज हे केवळ १० कि.मी. अंतरावर आहे. अकलूजमध्ये श्री अकलाई, आनंदी गणेश, शिवपार्वती मंदिर, श्रीराम मंदिर, श्री साईबाबा मंदिर, यांच्यासह शिवसृष्टी, सयाजीराजे वॉटर पार्क, शिवामृत गार्डन, विद्युत कारंजे अशी पर्यटनस्थळेही आहेत.



समर्थ रामदासस्वामी स्थापित नवसाला पावणारा दक्षिणमुखी
श्री जागृत मारुती
श्रीकांत खानापुरे अध्यक्ष | सिद्राम वाघमोडे कार्याध्यक्ष | प्रकाश मेंथे सचिव
* विरुपा पुजारी * परमेश्वर सुतार * शांतय्या स्वामी
* चौंडप्पा सोलापुरे * ज्ञानेश्वर फुलारी (पुजारी)
समस्त भाविक व ग्रामस्थ गौडगाव (बु.)
गौडगांव बु।।(ट्रस्ट) ता.अक्कलकोट, जि.सोलापूर
संपर्क : 9422458898 / 8698778651 / 9420261881 / 9422307010
Website : www.jagrutmaruti.com
श्री स्वामी समर्थ मंदिरापासून 11 किमी अंतरावर






४२व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
सोलापूर शहर व जिल्हा हँडबॉल असोसिएशन
व अजिंक्यतारा स्पोर्ट्स फाउंडेशन
सर्व पदाधिकारी, सदस्य व खेळाडू



दैनिक सोलापूर तरुण भारतच्या
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...




* शुभेच्छुक *
मा.प्रताप चव्हाण
जिल्हाप्रमुख : शिवसेना, उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष
मा.महेश धाराशिवकर
सोलापूर महानगर प्रमुख
मा.सुरेश जगताप
विधानसभा प्रमुख
मा.बंटी बेळमकर
सोलापूर उपशहरप्रमुख



सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिन चिरायु होवो..!
संजीवनी इलेक्ट्रीकल्स

प्रो.प्रा.अप्पासाहेब विराजदार
मु.पो.वडकबाळ, ता.द.सोलापूर
+91 9156138138 / 8391818189



सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!
-: शुभेच्छुक :-
श्री रुद्रमुनी डेव्हलपर्स
कुमठा नाका, सोलापूर
प्रो.प्रा.शिवराज नागनाथ शिवसिंगवाले
इंजिनीयर
मो.9975345559


दै.तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक हार्दिक शुभेच्छा..!

# महिला व बालकल्याण विभाग

## जिल्हा परिषद, सोलापूर

महिला व बालविकास विभागाअंतर्गत ग्रामीण भागातील महिला व मुली यांचे सक्षमीकरण तसेच त्यांच्या आर्थिक उन्तीसाठी व्यवसायभिमुख योजना खालीलप्रमाणे

**जिल्हा परिषद सेस योजना सन २०२६-२७ मधील योजना**

| | गट अ | | गट ब |
|---|---|---|---|
| १. | इयत्ता ७ वी ते १२ वी पास मुलींना एम.एस.सी.आय.डी.प्रशिक्षण देणे | १. | महिलांना पिकोफॉल मशिन पुरवणे |
| २. | १० पास मुलींना टॅली संगणक प्रशिक्षण देणे | | |
| ३. | मुलींना स्वसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षण देणे | | |
| ४. | महिलांना समुपदेशन केंद्र | २. | महिलांना पिठाची गिरणी/मिरची कांडप यंत्र पुरवणे |
| ५. | मुलींना उच्च शिक्षणासाठी अर्थिक मदत करणे | | |

**विशेष घटक योजना सन २०२५-२६ मधील योजना**

| | गट अ | | गट ब |
|---|---|---|---|
| १. | इयत्ता ७ वी ते १२ वी पास मुलींना एम.एस.सी.आय.डी.प्रशिक्षण देणे | १. | महिलांना पिकोफॉल मशिन पुरवणे |
| २. | १० पास मुलींना टॅली संगणक प्रशिक्षण देणे | २. | महिलांना पिठाची गिरणी/मिरची कांडप यंत्र पुरवणे |

**वरील प्रमाणे योजनाकरिता खालील प्रमाणे सर्व साधारण अटी व शर्ती आहेत.**

* लाभार्थी ग्रामीण भागातील रहिवासी असावी.
* उत्पन्न रु.१,२०,००० आत असलेले तहसीलदारा यांचा दाखला असावा.
* टॅली करिता इ.१० वी पास असणे आवश्यक.
* संगणक व टॅली प्रशिक्षणासाठी लाभार्थ्यांने शाळेचा/महाविद्यालयाचा बोनाफाईड अथवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा गुण पत्रक जोडणे आवश्यक राहील.
* लाभार्थ्यांने यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
* लाभार्थ्याने आधारकार्डची नोंदणी कार्डची झेरॉक्स प्रत सोबत जोडणे आवश्यक असेल.
* वैयक्तिक लाभाच्या योजनामध्ये लाभार्थी हिस्सा १०% भरणे आवश्यक आहे.
* विशेष घटक योजना ही अनु.जातीच्या लाभार्थ्यांसाठी असल्याने त्यांचेकडील जातीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
* महिलासाठी समुपदेशन केंद्र चालविणेत येत असून कुटूंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर तऱ्हेने त्रासलेल्या व मानसिक दृष्ट्या असंतुलित महिलांच्या सामाजिक मानशास्त्रीय दृष्ट्या खचलेल्या महिला करिता कायदेशीर दृष्टीने समुपदेशन केले जाते.
* लेक लाडकी योजना अंतर्गत दि.०१/०४/२०२३ नंतर जन्मलेल्या मुलींना लेक लाडकी योजना अंतर्गत आर्थिक सहाय्य दिले जाते.

**जिल्हा कार्यक्रम अधिकारी (बा.क)**
जि.प.सोलापूर


सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिन चिरायु होवो..!

मा.अशोक जानराव
कामगार नेते
* शुभेच्छुक *
लिंबराज जेटीथोर, दत्ता तुळसे, शशी शिरसट, विद्यासागर मस्के, अंबादास डावरे, सतीश नागटिळक, दत्ता शिंदे, बाळू गोतसुर्वे, संघा आहेरकर, श्रीनिवास कांबळे, कोरे, बालाजी सोरटे, भास्कर कांबळे, सचिन आवारे, सुनील बनसोडे, अरविंद कसबे आणि पदाधिकारी, कर्मचारी आणि सदस्य
कामगार क्रांती युनियन, सोलापूर




सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिन चिरायु होवो..!

मा.श्री.प्रशांतराजे पाटील
युवा मोर्चा अध्यक्ष
मा.श्री.श्रीकांत मोरे
* शुभेच्छुक *
भाजपा युवा मोर्चा माढा पूर्व मंडल


तरुण भारत
धाराशिव जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा
श्री. उद्धवराव काळे
अध्यक्ष : भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान
श्री.डॉ. अभय शहापूरकर
उपाध्यक्ष : भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान
श्री. विवेक आयचित
कार्यवाह : भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान
संचालक मंडळ
नरेश एकनाथ पोटे (कोषाध्यक्ष), परेशकांत प्रेममनोहर मांगलिक (सदस्य), अभय भास्कर कुलकर्णी (सदस्य), संतोष वसंतराव शिर्के (सदस्य), विजय गोविंद गिजरे (सदस्य), डॉ. संजय उमाकांत पुरी (सदस्य), अशोक ताराचंद संकलेचा (सदस्य), गोविंदजी छोगा पुरोहित (सदस्य), प्रणाद उपेंद्र मोकाशी (सदस्य), ॲड. प्रदीपसिंग मोहनसिंग राजपुत (सदस्य), डॉ. प्रणिता रमेशराम गडेकर, ॲड. जनक धनंजयराव कदम-पाटील
श्री. विठ्ठल म्हेत्रे
मुख्याध्यापक
श्री. अण्णासाहेब कोल्हटकर
मुख्याध्यापक
शुभेच्छुक
भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान संचलित
एकलव्य विद्या संकुल यमगरवाडी, ता. तुळजापूर


तरुण भारत
धाराशिव जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनास
शिवसेना
हार्दिक शुभेच्छा
श्री. ऋषिकेश (भैय्या) मगर
युवा नेते, शिवसेना धाराशिव
खासदार साहेब !
कामाचा माणूस...
श्री. सुजित (भैय्या) हंगरगेकर
जिल्हाध्यक्ष : सरपंच परिषद, धाराशिव
युवा नेते : शिवसेना पक्ष
शुभेच्छुक
श्री. सुजित (भैय्या) हंगरगेकर
जिल्हाध्यक्ष : सरपंच परिषद तथा युवा नेते शिवसेना पक्ष, धाराशिव


शिवसेना
(उद्धव बाळासाहेब ठाकरे)
सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा..
आ. कैलास घाडगे पाटील
धाराशिव-कळंब विधानसभा
जिल्हाप्रमुख शिवसेना,धाराशिव



महाराष्ट्राला गड किल्ल्यांचा वैभवशाली परंपरा आहे इथल्या दगड धोंड्यांना प्रेरणादायी इतिहास आहे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या या महाराष्ट्राच्या भूमीत ऐतिहासिक इतिहासाचा साक्षीदार असलेला अभेद्य व भक्कम असा किल्ला धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्ग येथे आहे , सोलापूर पासून अवघ्या ४५ किमी. हैद्राबाद हायवेवर नळदुर्ग हे शहर निजामकालीन जिल्हा आहे, या शहरात हिंदू, मुस्लिम एकत्रित गुण्या गोविंदाने राहतात, अशा या शहरात हा किल्ला आसून, महाराष्ट्रातील सर्वात मोठा भुईकोट किल्ला म्हणून नळदूर्ग किल्ल्याचा उल्लेख होतो जवळपास १२५ एकरामध्ये हा किल्ला आहे ऐतिहासिक व धार्मिक या दोन्ही क्षेत्रांमध्ये या किल्ल्याचा उल्लेख आढळतो. मुघलशाही ,कुतुबशाही ,निजामशाही, आदिलशाही आणि मराठीशाही या सर्व राज्यसत्ता मध्ये या किल्ल्याचा इतिहास आढळतो. किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी एकच मार्ग आहे किल्ल्याच्या तिन्ही भागाला मोठे खंदक आहे बोरी नदीचे पाणी वळवून किल्ल्याला संरक्षण देण्यात आले आहे..

# जाज्वल्य इतिहासाचा साक्षीदार नळदूर्गचा किल्ला

हुलमुख दरवाजा- किल्ल्याच्या प्रवेशद्वाराला हुलमुख दरवाजा असे म्हणतात हूल म्हणजे हुलकावणी देणे नवीन माणसाला किल्ल्यात प्रवेश करताना किल्ल्याचा नेमका प्रवेशद्वार कोणता हे लवकर समजू नये अशा पद्धतीने या प्रवेशद्वाराची निर्मिती करण्यात आली आहे आत मध्ये प्रवेश करताना आपल्याला एक लाकडी दरवाजा दिसतो हा दरवाजा अतिशय भव्य आणि भक्कम आहे दरवाज्याची उंची २० फूट असून रुंदी सात ते आठ फूट आहे शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी हा दरवाजा बनविण्यात आला होता, दरवाजाच्या अनेक ठिकाणी मोठमोठे खिळे मारण्यात आलेले आहेत हूलमूक दरवाजातून आत मध्ये प्रवेश केल्यानंतर आपल्याला किल्ल्याची भव्यता दिसते एका नजरेमध्ये हा किल्ला आपल्याला सामावता येत नाही नळदूर्ग किल्ल्याला बुरुजांचा किल्ला असे म्हटले जाते एकूण ११४ बुरुज या किल्ल्याला आहेत यामध्ये तूर्या, संग्राम, फतेह, परंडा अशा अनेक नावाची बुरुज आहेत पण यामध्ये सर्वात आकर्षण म्हणजे उपल्या बुरुज

हूलमुख दरवाजातून मध्ये गेल्यानंतर उजव्या हाताला एक आयताकृती इमारत आहेत याला अंबरखाना म्हणतात आणि यालाच हत्ती खाना असेही म्हणतात, येथे एका मोठ्या शिळावर हत्ती कोरण्यात आला आहे त्यानंतर आपल्याला दिसते एक सुंदर इमारत ज्याला मुन्सिफ कोर्ट म्हणून ओळखले जाते १९३२ साली निजाम राजवटीच्या काळात ही इमारत बांधण्यात आली. या ठिकाणी निजामाची कोर्ट होते आणि या या ठिकाणावरून न्यायनिवाडा करण्यात येत असे..

मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्मे हुतात्मा बाबूराव बोरगावकर हे याच मुन्सिफ कोर्टामध्ये वकील होते तर हुतात्मा निलय्या स्वामी हे मुनिम होते..

मुन्सिफ कोर्टाच्या थोडे पुढे गेल्यावर किल्यातील सर्वात थंड असलेली इमारत महाल आपल्या दृष्टीस पडेल त्याचे नाव बारादरी असे आहे.. या महालाला एकूण १२ दरवाजे होते म्हणून त्याला बारादरी असे म्हटले जाते. वास्तूकलेच्या दृष्टीने ही इमारत उल्लेखनीय आहे.. मुख्य इमारत अतिशय थंड असून आदिलशाह निजामशाह यांचा परिवार येथे विश्रांतीसाठी येत असे.. या इमारतीच्या पाठीमागे बालकनी असल्यासारखे आहे.. या ठिकाणावरून बोरी नदीचे मनमोहक रूप पाहायला मिळते...

या महालाच्या बाजूला आणखीन एक मुख्य इमारत आहे त्याला रंगमहाल नाव आहे याच्याच बाजूला दरबार महाल आहे.. हा दरबार महाल उत्तराभीमुख असून त्याला २४ खांब व ५ कमानि आहेत..

उपल्या बुरुज -

नळदुर्ग किल्ल्यातील पर्यटकासाठी सर्वात महत्त्वाचे ठिकाण म्हणजे उपल्या बुरुज.. हा बुरुज किल्ल्याच्या मध्यभागी उभा आहे.. हे किल्ल्यातील सर्वात उंच ठिकाण असून यावरून संपूर्ण किल्ला आणि परिसरावर लक्ष ठेवता येत असे.. या उपल्या



बुरुजाला एकूण ७७ पायऱ्या आहेत.. पहिला टप्पा ३१ पायऱ्या चा तर दुसरा टप्पा ३४ पायऱ्याचा आणि तिसरा टप्पा बारा पायऱ्याचा यात बुर्जावर मोठ-मोठे तोफा ठेवण्यात येत होत्या म्हणे , बुर्जाच्या पाठीमागे दोन मोठे पाण्याचे तलाव आपणास पहावयाला मिळते. बुरुज चढताना मध्यभागी एक दहा बाय दहाची खोली आहे ही खोली आराम खोली म्हणून ओळखली जाते

नऊ बुरुज - उपल्या बुरजानंतर किल्ल्यातील महत्त्वाचे ठिकाण म्हणजे नऊ बुरुज या बुरुजाला नऊ पाकळ्यांचा बुरुज म्हणतात प्रत्येक पाकळी मध्ये स्वतंत्र खिडकी आहे या बुरुजावरून किल्ल्याचा बाहेरचा भाग संपूर्णपणे दृष्टिक्षेपात येतो यावरून संपूर्ण परिसरावर नजर ठेवता येते

पाणी महाल -

नळदुर्ग किल्ल्यातील सर्वात प्रसिद्ध आणि प्रेक्षणीय स्थळ म्हणजे पाणी महाल अर्थात नर्मदी धबधबा महाराष्ट्र सह संपूर्ण देशातील लाखो पर्यटकांचा हा आवडता पर्यटन क्षेत्र आहे पाणी महाराची बांधणी १६१३ मध्ये आदिलशहाच्या काळात इब्राहिम आदिलशाही दुसरा यांनी बांधलेला आहे हा पाणी महाल वास्तुशास्त्राचा अत्यंत सुंदर आणि उत्कृष्ट असा नमुना आहे मिर मोहम्मद इमदिन या वास्तुशास्त्रज्ञाने या पाणीमहालाची बांधणी केली आहे किल्ल्यातून वाहत जाणारी बोरी नदी ही अडवण्यात आली आणि त्यावर एक धरण बांधण्यात आले हे नुसते धरण नसून या धरणाच्या मध्यभागी एक सुंदर महाल बांधण्यात आला यालाच पाणी महाल असे म्हणतात या महालात बसून नयनरम्य दृश्य आपणास पहावयास मिळते पाणीमालाच्या दोन्ही बाजूला दोन सांडवे या ठिकाणी आहेत पावसाळ्यामध्ये जेव्हा पाऊस जास्त पडतो तेव्हा आढळून आले पाणी या सांडव्यातून



बाहेर पडते यालाच जगप्रसिद्ध नरमादी धबधबा असे म्हटले जाते.. हा धबधबा जमिनीपासून जवळपास ९० फूट इतका उंच आहे आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे या धबधब्यातून पडणारे पाणी एका धबधबातून पांढरे शुभ्र पाणी बाहेर पडते तर दुसऱ्या धबधबातून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा रंग थोडासा हिरवा असतो..

खरंतर या नळदुर्ग किल्ल्याला एक खूप मोठा प्राचीन धार्मिक इतिहास सुद्धा आहे हा किल्ला सुरुवातीच्या काळामध्ये रणमंडळ या नावाने ओळखला जायचा किल्ला सुरुवातीला संपूर्ण मातीचा होता चालुक्याच्या काळामध्ये इसवीसन ५३७ स*** राजा नळपती तिसरा यांनी बांधण्याचा उल्लेख आहे तालुक्यानंतर बहमनी सत्ता येथे निर्माण झाली त्यांच्या काळामध्ये नजर किल्ल्याचे दगडी बांधकामात रूपांतर करण्यात आले इसवी सन १४८१ स*** विजापूरच्या आदिलशहाने हा किल्ला जिंकला नंतर मोगल काळामध्ये साधारणपणे इसवी सन १५५८ मध्ये दगडी बांधकामा सुरुवात झाली. पुढे बोरी नदीवर बंधारा बांधून रणमंडळ व नळदूर्ग हे दोन वेगवेगळे किल्ले एकत्र करण्यात आले १६७६ स*** औरंगजेबाने हा किल्ला जिंकल्याचे उल्लेख आहे त्याचबरोबर १७५८ स*** झालेल्या सिंदखेडच्या तहामध्ये पेशव्यांनी हा किल्ला जिंकल्याचा उल्लेख आहे त्यामुळे हा किल्ला काही काळासाठी मराठाशाहीच्या वतनाखाली होता त्यानंतर हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला परंतु १८५८ स*** झालेल्या उठावाच्या वेळेस निजामाने इंग्रजांना मदत केली होती आणि या मदतीची परतफेड म्हणून इंग्रजांनी हा किल्ला पुन्हा निजामाच्या स्वाधीन केला स्वाधीन करताना नळदुर्ग आणि रायचूर हे दोन वेगवेगळे जिल्हे निजामाच्या ताब्यात देण्यात आले. पुढे निजाम काळामध्ये हा किल्ला अनेक वर्ष होता १५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला परंतु नळदुर्ग किल्ला हा निजामाच्या राजवटीखाली असल्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ स*** निजामाच्या विरोधात झालेल्या सैनिकी कारवाईनंतर निजाम शरण आला आणि मराठवाडा नळदुर्ग हे भारत देशामध्ये सामील झाले आजही १५ ऑगस्ट २६ जानेवारी एक मे आणि १७ सप्टेंबर या राष्ट्रीय सणाच्या दिवशी नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्यावर भारताचा तिरंगा ध्वज फडकवण्यात येतो यावेळी शहरातील सर्व नागरिक व सर्व शाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने झेंडावंदनासाठी किल्ल्यामध्ये उपस्थित राहतात नळदुर्ग चा किल्ला हा इतिहास धार्मिक पर्यटन निसर्ग या सर्व क्षेत्रांमध्ये अत्यंत सुंदर आणि प्रसिद्ध असा हा किल्ला आहे, अक्कलकोटचे समर्थ,गाणगापूर चे श्री दत्त, पंढरीचा विठोबा यांच्या पासून जवळच हा किल्ला असून,या किल्ल्याच्या कुशीत,

त्यालगतच वसलेले एक फार मोठे, सुंदर रिसॉर्ट असून त्याचे नाव,युनिवंडर्स रिसॉर्ट अँड थीम पार्क, हे आहे त्या मध्ये कुटुंबासह निवासाची उत्तम सोय असून त्या मध्ये मनोरंजनासाठी विविध खेळ

महिलांसाठी व मुलांसाठी सुरक्षित वातावरण

टेंट हाऊस,किड्स प्ले झोन

स्विमिंग पूल,रॉकेट इजेक्टर,ह्युमन गायरो,

रोप कोर्स, वॉल क्लाइंबिंग, बोटिंग अनुभव निसर्गाचा आनंद घ्यावा, पर्यटक भक्त भाविकांनी या किल्ल्याला एक वेळ अवश्य भेट द्यावी हीच भावना या प्रसंगी व्यक्त करतो.



विनायक अहंकारी
माजी नगरसेवक, नळदुर्ग
७३५०५३२८३४

**शब्दांकन- अजय अणदूरकर**
**पत्रकार दै.तरुण भारत अणदूर**



# वारी..!!

**शंतनूला प्रवास करण्याची, वेगवेगळी शहर, हिलस्टेशनवर जाण्याची खूप आवड होती, छंद होता आणि लग्न झाल्यापासून असा एकही वीकएंड गेला नव्हता की तो शरयूला, बायकोला घेऊन बाहेर फिरायला गेला नव्हता आणि आज पहिल्यांदाच शरयूमुळे वीकएंड्ला त्याच्यावर घरी रहायची वेळ आली होती ! आणि याच कारणावरुन तो चिडला होता व त्याची रात्री शरयूशी मोठी वादावादी झाली होती.**

शंतनु अरे तुला सांगायचं राहीलच. रात्री बेडवरच पांघरुण झटकत शरयू म्हणाली.. उद्याच्या शनिवार रविवारी आपण कुठेही फिरायला जाणार नाही आहोत. उद्या परवा आपल्याला पंढरपुरच्या आषाढी वारीला जायचय.. आपल्या भागातल्या नगरसेवकानी सर्व व्यवस्था केलीय आणि सोसायटीतील मी आणि अजून चार पाच तरूण कपलस् नी आपली नाव त्यांच्याकडे दिली आहेत. विठ्ठलाच्या कृपेने किती छान योग आला आहे ना.! लहानपणापासून शरयू प्रचंड भाविक आणि श्रद्धाळू होता. सोमवारी महादेव, बुधवारी विठ्ठल आणि गुरूवारी दत्त मंदिरात जाऊन दर्शन घेतल्यावर शिवाय ती जेवण करीत नसे. शंतनूचं मात्र याच्या उलट होत. आयुष्यात जे काहीं होत असत, ते आपल्या पूर्वकर्माचं फळ असतं आणि ते कोणताही देव आला तरी बदलू शकत नाही हा त्याचा आवडता सिद्धांत होता आणि देवधर्म पूजाअर्चा यावर त्याची श्रद्धा नव्हती आणि आता शरयू त्याला पंढरपूरच्या वारीला घेऊन जायला निघाली होती.! वारी..? काय वेडबिड लागलयं का तुला ? चांगला वीकएंड एंजॉय करायचा सोडून हे काय खूळ तू काढलयं. आणि तुला माहित आहे ना मला देवदर्शन, यात्रा जत्रा अशा गोष्टीत अजिबात इंटरेस्ट नाही म्हणून. आपण बाहेर फिरायला गेलो तरी मी कुठल्याही गावातल्या प्रसिद्ध मंदिरात वगैरे जात नाही तू बघितलय. मी नाही येणार वारीबिरीला..! शंतनू प्रचंड वैतागला होता.

हे बघ शंतनू आजपर्यंत आपण इतक्यावेळा कुठे कुठे फिरायला गेलो.. मला आवडो व आवडो मी एकदातरी तुला येत नाही म्हटलयं का ? मग आता माझ्यासाठी तुला एक दिवस तेही काही तास वारीला यायला काय हरकत आहे ? आणि आपल्याला लोणंद ते तरडगाव या वारीच्या एका टप्प्यात म्हणजे दहा पंधरा किलोमीटर पालखीबरोबर चालायचं आहे आणि विठ्ठलाचे चरणी आपली सेवा रूजू करायची आहे.. शरयू त्याचा हात हातात घेत म्हणाली.

शंतनू काहींसा वरमला होता. तिनं आजपर्यंत त्याच मन कधीही दुखावलं नव्हतं हे खरं होतं पण तिच्यासाठी गळ्यात तुळशीची माळ घालून टाळ वाजवत रस्त्यानं चालत जायला त्याच मन अजून तयार नव्हतं. पण शरयूला नाही म्हणायला त्याला काहीं कारणही सुचत नव्हतं. हे बघ मी तुला एकदाच सांगितलय मी वारीला येणार नाही म्हणजे नाही.

उगीच वाद घालू नकोस. तुला जायचं



असेल तर तू एकटी जाऊ शकतेस. शंतनू आता एकेरीवर आला होता. ठीक आहे बाकीचे सगळे जोडीने असताना मी मात्र एकटी जाईन पण सोसायटीत तुझी इमेज राहील याचा विचार. वाद वाढायला लागलेला पाहून दोघांनीही आवरत घेतलं आणि एकमेकांकडे पाठ करून ते झोपी गेले.

लग्न झाल्यानंतर पहिल्यांदाच दोघात एवढी वादावादी झाली होती. त्यामुळे रात्रभर शंतनूला नीट झोप लागली नव्हती.

आणि सकाळी बेडवर पडल्या पडल्या रात्रीचा हा प्रसंग त्याच्या डोळ्यासमोर उभा राहिला. शंतनूनं अंगावरच पांघरुण बाजुला केलं आणि उठून तो किचनकडे निघाला. शरयू ओट्याजवळ उभा राहून बहुधा चहाच करत होती. मोबाईलवर कानडा राजा पंढरीचा..



हे भक्तीगीत लावलेलं होतं आणि ती तितक्याच भक्तीभावाने ते ऐकत होती. शंतनूनं तिच्याजवळ जाऊन तिचा हात हातात घेतला शरू..रात्री मी थोडसं जास्तच जोरात बोललो..आय एम रिअली सॉरी पण.... त्याच ते वाक्य अर्धवटच राहिलं आणि त्याच्या फोनची रिंग वाजायला लागली. तो ग्वाल्हेरला असलेल्या त्याच्या जिवश्चकंठश्च मित्राचा, पवनचा कॉल होता. शंत्या..कुठे पुण्यातच आहेस की गेलायस कुठे उंडरायला ? शंतनूनं घरीच आहे असं सांगितलं.

बरं झालं बाबा..हे बघ मी संध्याकाळच्या फ्लाइटनं पुण्याला येतोय तुझ्याकडे ! तुला माहित नाही मागची पाच वर्षे मी आणि माझी बायको आषाढी वारीसाठी पुण्याला येतोय. तुला धार्मिक गोष्टींची आवड नाही हे मला माहित आहे त्यामुळे तुला सांगितलं नव्हतं. पुण्यात धोडपकर म्हणून माझा मित्र आहे त्याचा वारी करणारा एक मोठा गृप आहे त्यांच्याबरोबर मी जात असतो. वारीमध्ये टप्पे असतात त्यातील लोणंद ते तरडगाव हा दहा बारा किलोमीटरचा टप्प्यत मी पालखीबरोबर सहभागी होत असतो. नेमकी काल ही आजारी पडली. वारी चुकवायचं माझ्या जिवावर आलं होतं आणि का कुणास ठाऊक माझ्या मनात आलं की यावेळी तुला आणि वहिनींना वारीला घेऊन जायचं.

अरे पण..शंतनूनं शेजारीच कपात चहा ओतता ओतता फोनवरचं त्यांच बोलणं ऐकत असलेल्या शरयूकडे पाहिलं..ती गालातल्या गालात हसत होती! पण बिण काहीं नाही..मी तुमच्या दोघांच नाव माझ्याबरोबर गृपवर नोंदवलय आणि आपल्याला जायचयं ! एकदा बघतरी तिथ कसं प्रसन्न आणि भक्तीमय वातावरण असतं ते..! आणि शंतनू कांही बोलायच्या आत त्यानं फोन कट करून टाकला होता.

शंतनूनं शरयूकडे एक दृष्टीक्षेप टाकला आणि दोघही आता हसायला लागली !

मी रात्री वारीला जायचं म्हणून म्हटलं तर माझ्याशी भांडायला लागलास आणि आता मित्रापुढे मात्र गप्पगार ! चहाचा कप त्याच्यापुढे ठेवत शरयू लटक्या रागानं म्हणाली. शंतनू मात्र आश्चर्यचकित झाला होता. काल शरयूनं वारीच्या ज्या टप्प्यात सहभागी व्हायच म्हणून सांगितलं, त्याच टप्प्यात सहभागी होण्यासाठी त्याला आज पवनचा फोन आला होता इतकचं नाही तर त्यानं गृपवर त्यांच नावही नोंदवून टाकलं होतं. हा केवळ योगायोग आहे की एखादा दैवी संकेत आहे असा पुसटसा विचार त्याच्या डोक्यात येऊन गेला पण त्यानं तो लगेच झटकून टाकला ! शरू.. तुमच्या दोघांपुढे माझा नाईलाज झाला आहे. ठीक आहे मी येतो पण मी तेथे गळ्यात तुळशीची माळ आणि कपाळावर बुक्का वगैरे लावणार नाही हे आत्ताच सांगून ठेवतो..मी फक्त तुम्हाला कंपनी म्हणून येणार. अरे.. मी कुठे म्हणतेय तुला तिथे तुळशीची माळ घाल म्हणून! मी पण तुला फक्त बरोबर चलं म्हणतेय. आता ते जाऊ दे पण माझं एक काम कर. माझ्यासाठी आणि पवन भावजींसाठी दोन तुळशीच्या माळा आणि वाजवायचे टाळ तेवढे कोणत्याही परिस्थितीत संध्याकाळपर्यंत आणून दे. उद्या आपल्याला लवकर निघायचय. मला आज कामं आहेत त्यामुळे वेळ नाही. शरयू उत्साहाने म्हणाली. नवरा वारीला यायला तयार झाला याचाच तिला जास्त आनंद झाला होता! दुपारी शंतनूनं बाईक काढली आणि तो तुळशीच्या माळा घेण्यासाठी निघाला. दगडूशेठ गणपती मंदिराजवळ धार्मिक वस्तूंची दुकान आहेत तिथं या वस्तू सहज मिळतील म्हणून तो तिकडे निघाला पण तिथे त्याला तुळशीची माळ काहीं मिळाली नाही. त्यानंतर पुण्यातल्या सगळ्या प्रसिद्ध मंदिराजवळची धार्मिक दुकान त्यानं बघितली पण कुठेही तुळशीची माळ मिळायला तयार नव्हती.

त्याला आता आश्चर्य वाटायला लागलं. माळा आणि टाळ नेणं आवश्यक होतं नाहीतर 'एवढी साधी गोष्ट पण तू करू शकत नाहीस.. हा शरयूचा डायलॉग त्याला ऐकून घ्यावा लागणार होता. शेवटचा एक प्रयत्न म्हणून कंटाळून तो पेठेतल्या विठ्ठल मंदिराजवळ आला आणि तिथल्या दुकानदाराकडे तुळशीची माळेची चौकशी केली.

दुकान बंद करता करता तो म्हणाला साहेब तुम्हाला तुळशीची माळ सध्या पुण्यात कुठेही मिळणार नाहीत. परवा पुण्यात दोन्ही पालख्या येऊन गेल्या त्यादिवशीच पुण्यातल्या सगळ्या दुकानाकडच्या तुळशीच्या माळा आणि इतर वस्तू संपून गेल्या आहेत. आता नवीन यायला निदान दोन दिवस तरी लागतील.

तुळशीची माळ कुठेही न मिळण्याचं कारण आता त्याच्या लक्षात आलं. निराश होऊन त्यानं बाईक स्टार्ट केली. इतक्यात अंगात मळकट पांढरा शर्ट, खांद्यावर राम कृष्णहरी लिहलेली पिशवी लटकवलेली आणि कपाळावर उभा टिळा असलेला एक काळासावळा गृहस्थ मंदिरातून त्याच्याकडे येतांना दिसला. आणि त्याच्या हातात तुळशीच्या माळा असलेली प्लॅस्टीकची पिशवी लटकत होती. साहेब मी तुमचं बोलणं ऐकत होतो. तुम्हाला तुळशीच्या माळा पाहिजेत ना..ह्या घ्या. त्यानं हातातल्या पिशवीतील दोन माळा काढून त्याच्या हातावर ठेवल्या.! शंतनू आश्चर्यचकीत झाला होता !

ज्या माळा घेण्यासाठी तो गेले दोन तास गावभर फिरत होता त्या त्याच्या समोर होत्या. अहो, पण काका तुम्हाला लागणार नाहीत का या माळा ? तुम्ही तर वारकरी दिसताय ! आणि याचे पैसे किती द्यायचे.

साहेब तुम्हाला किती द्यायचे तेवढे द्या. माझं वारीला जायच रहित झालयं..दुसरं महत्वाचं काम निघालय.. माळा शंतनूच्या हातावर ठेवत ते म्हणाले. शंतनूनं माळा घेतल्या आणि पैसे देण्यासाठी खिशात हात घातला. खिशात पाचशेची नोट होती. थँक्यू काका, दोन मिनिट थांबा..मी नोट सुटी करून आणतो.शंतनूचा मोठा प्रश्न सुटला होता. घाईघाईने जवळच्या दुकानात जाऊन तो सुटे पैसे घेऊन आला आणि काय आश्चर्य..! ते गृहस्थ कुठेच दिसत नव्हते. त्यानं आजूबाजूला पाहिलं पण त्यांचा कुठेही मागमूस नव्हता!

पैसे न घेताच ते नाहिसे झाले होते ! शंतनूला आज हा आणखी एक धक्का बसला होता. आज सकाळपासून काहीं वेगळंच घडत होतं. अघटित घडत होतं ! आधी त्याच्या मित्र पवन त्याची इच्छा नसताना त्याला पंढरपुरच्या वारीला घेऊन चालला होता आणि आता पागोटे घातलेला हा काळासावळा गृहस्थ तुळशीच्या माळाचे पैसे न घेताच अदृष्य झाला होता. कुठलीतरी अज्ञात शक्ती त्याला वारीकडे पंढरपुरच्या विठ्ठलाकडे खेचीत होती, त्याच्या अधर्मिकत्वाला तडे देत होती, आव्हान देत होती !त्याच विचारांच्या चक्रव्युहात अडकलेला शंतनू घरी जाण्यासाठी परत निघाला. पवन बरयाच वर्षानी येत असल्यामुळे येता येता चितळेकडून श्रीखंड विकत घेतलं आणि वाटेत ट्रॅफिक लागल्यामुळे त्याला घरी पोहचेपर्यंत उशीर झाला होता.

शरयूनं दार उघडलं. अरे किती उशीर ? साध्या तुळशीच्या दोन माळा आणायला एवढा वेळ..मी फोनच करणार होते तुला.

शंतनू काहीं बोलला नाही. त्यानं आणलेल्या तुळशीच्या दोन माळा आणि टाळ तिच्या हातात दिले.

काय झालं सिरियस दिसतोस? बरं नाही का ?

आणि हो एक सांगायचय.. आत्ताच संतसाहित्य प्रचारक मंडळाचे एक काळेसावळे आणि कपाळावर उभा टिळा लावलेले गृहस्थ तुला भेटायला आले होते ! काळेसावळे आणि उभा टिळा लावलेले ? काय म्हणतेस ? शंतनू जागेवरून उडालाच ! हो ..तू सोसायटीचा सेक्रेटरी आहेस ना..त्यांना तुला भेटायचं होत. त्यांनी सोसायटीत वाटण्यासाठी 'हरिपाठा'च्या अभंगाच्या पुस्तिका आणल्या होत्या. तू भेटला नाहीस म्हणून त्या माझ्याकडे ठेऊन गेले आहेत. शंतनू अरे आपण वारीला जायचं ठरवलं आणि आज हरिपाठाचे अभंग न मागता आपल्या घरी आले ! खरचं देवा विठ्ठला तुझी कृपा अगाध आहे ! शरयूनं भक्तिभावाने आपले हात जोडले. शंतनू आता उतावीळ झाला होता. कुठायत ती पुस्तकं? ती काय प्लॅस्टीकच्या पिशवीत सेंटर टेबलवर ठेवलीत.. शरयू म्हणाली. शंतनू अधीरपणे टेबलजवळ गेला ! ज्या प्लॅस्टिकच्या पिशवीतून आणलेल्या तुळशीच्या माळा त्या काळ्यासावळ्या गृहस्थानी त्याला दिल्या होत्या तशाच पिशवीत हरिपाठाची पुस्तक टेबलंवर ठेवलेली होती..!!




शंतनूच अंग शहारून आलं होतं. डोळे अश्रूनी डबडबले होते. त्याच्या अहंकाराचा श्रद्धाभक्तीच्या पवित्र भावनेनं आज पराभव केला होता ! त्यानं अभावितपणे काळ्यासावळ्या रंगाच्या आणि कपाळावर उभा टिळा लावलेल्या त्या अनामिक देवदूताला हात जोडले आणि आपले डोळे मिटून घेतले.!! आणित्याच्या डोळ्यासमोर त्या अनामिक 'देवदूता'च्या जागी प्रसन्न चेहरयाची, कमरेवर दोन्ही हात ठेवलेली विठ्ठलाची काळीसावळी मनोहर मुर्ती दिसायला लागली होती..!!!

- कृष्णकेशव.




VIDYAPEETH
IIT-JEE | NEET | FOUNDATION
COMES TO
DHARASHIV!
BIG NEWS FOR Foundation & JEE | NEET ASPIRANTS!
PHYSICS WALLAH
SCHOOL INTEGRATED PROGRAM (SIP)
NOW AT
SHRIPATRAO BHOSALE JR COLLEGE
DHARASHIV
SMART PREPARATION. LESS STRESS. BETTER RESULTS.
OFFLINE CLASSES BY EXPERT PW FACULTY
NO EXTRA COACHING NO TRAVEL
EXPERT MENTORSHIP
APP ACCESS
REGULAR TESTS & PERFORMANCE TRACKING
CLASSES: 8th - 12th | JEE & NEET
ADMISSIONS OPEN!
ENROLL NOW!
9921417663 / 7498748668
अधिक माहितीसाठी : फिजिक्स वाला ऑफिस, प्रशासकीय कार्यालय
श्रीपतराव भोसले हायस्कूल, धाराशिव


तरुण भारत
धाराशिव जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा!
अखिल भारतीय मराठी
नाट्य परिषद शाखा, धाराशिव
बालरंगभूमी परिषद, धाराशिव
विशाल शिंगाडे
अध्यक्ष
अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, धाराशिव
धाराशिव जिल्ह्यातील 'दिंडी लोकनृत्य' कलाप्रकारात भारतातून प्रथम क्रमांक मिळविला
सहभागी नृत्य, गायन, वादक कलावंत...
विशाल शिंगाडे, सुगत सोनवणे, अंबिका आगळे, अंकिता माने, रमण भोईबार, सुहास झेंडे, विजय उंबरे, संकेत नागणे, दिशा सोनटक्के, प्रियंका पोतदार, निकिता साळुंके, सुजीत माने, अश्विनी माने, तनुजा शिंदे, पौर्णिमा गायकवाड, शुभम खोत, ऋषी गवळी, अक्षय दिवटे, किशोर कसबे, आलम बेग, सुमेध चिलवंत, विश्वनाथ काळे, शशिकांत माने, मंगल ओव्हाळ, ताहेर शेख, अविनाश बनसोडे, योगेश वाघमारे, भैरू कसबे, दयानंद साबळे.


विश्वासाचा आवाज... लोकांच्या विकासाचा ध्यास...
सोलापूर
तरुण भारत
महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी
भारताच्या उज्वल भविष्यासाठी
दैनिक तरुण भारत च्या
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!
KAY DIPS
INFRA PVT. LTD.
SOLAR ENERGY SOLUTIONS
&
SHREEL
INFRA PVT. LTD.
WIND ENERGY SOLUTIONS
स्वच्छ ऊर्जा • शाश्वत विकास • समृद्ध भारत
निसर्गाशी सुसंवाद... आजची ऊर्जा, उद्याचा विकास!
जय महाराष्ट्र! जय हिंद!


तरुण भारत
धाराशिव जिल्हा कार्यालयाच्या
वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा...
श्री. गुलचंद (भाऊ) व्यवहारे
मा. प्रदेश कार्यकारिणी सदस्य, भाजपा, महाराष्ट्र राज्य
अध्यक्ष : राष्ट्रतेज सामाजिक संस्था, तुळजापूर


तरुण भारत
धाराशिव जिल्हा कार्यालयाच्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा...
सौ. सुवर्णा सिन्नप्पा गुंजोटे
माजी सरपंच (होर्टी)
सदस्या : पंचायत समिती, तुळजापूर (गण होर्टी)
श्री. सिन्नप्पा (संजय) बाबूराव गुंजोटे
माजी सरपंच (होर्टी)
तुळजापूर तालुकाध्यक्ष : सरपंच परिषद, पुणे महाराष्ट्र
जिल्हा उपाध्यक्ष : राष्ट्रीय काँग्रेस सेवादल धाराशिव


विश्वासाचा आवाज... लोकांच्या विकासाचा ध्यास...
सोलापूर
तरुण भारत
महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी
भारताच्या उज्वल भविष्यासाठी
दैनिक तरुण भारत च्या
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!
KAY DIPS
INFRA PVT. LTD.
SOLAR ENERGY SOLUTIONS
&
SHREEL
INFRA PVT. LTD.
WIND ENERGY SOLUTIONS
स्वच्छ ऊर्जा • शाश्वत विकास • समृद्ध भारत
निसर्गाशी सुसंवाद... आजची ऊर्जा, उद्याचा विकास!
जय महाराष्ट्र! जय हिंद!